म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १६३३
IRBK-0101633
IRBK-0101633

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्रु. मा. प.)

प्रो. माधव दामोदर अळतेकर यांचे प्रसिद्ध होणारे ग्रंथ

# प्रकाशनाची योजना

## आगाऊ ग्राहकांस विशेष सवलत

यासंबंधीं पूर्वीं प्रसिद्ध केलेल्या माहितीपत्रकांतील पृष्ठसंख्या आणि किंमती यांच्यांत, कागदाची किंमत वाढल्यामुळें, थोडाफार फेरफार करावा लागला आहे, व कागदाची किंमत आणखी वाढल्यास किंमती थोड्याशा वाढविणें भाग पडेल. पण या प्रकाशनयोजनेचे पांच रुपये भरून आगाऊ ग्राहक होणारांच्या बाबतींत वाढलेल्या किंमतीचा बोजा त्यांच्यावर पडूं नये असें ठरविलें आहे. म्हणजे पुढील सर्व पुस्तकें त्यांना वीस रुपयांतच मिळतील.

पुढील ग्रंथ क्रमाक्रमानें प्रसिद्ध व्हावयाचे आहेत; क्रमांत फेरबदल झाल्यास त्याची सूचना आगाऊ देण्यांत येईल.

**१ कालिदासाची सृष्टि**—कालिदासाच्या काव्यनाटकांचें अपूर्व विवेचन. ग्रंथकर्त्यानें अगदीं नवीन दृष्टीनें कालीदासीय वाङ्मयाचें आलोचन या विस्तृत निबंधांत केलेलें आहे. या ग्रंथाला डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें बक्षिस दिलें असून तो मुंबई सरकार, मध्यप्रांत सरकार, ग्वालेर दरबार व बडोदें राज्य यांनीं मंजूर केलेला आहे. किंमत रुपये २।.

**२ पानें व फुलें**—ग्रंथकर्त्याच्या कांहीं प्रकाशित व कांहीं अप्रकाशित कविता, निबंध, गोष्टी वगैरेंचा संग्रह. भाग १ ( निबंध ) व २ ( लघुकथा आणि कविता ). किंमत प्रत्येकीं रु. १॥.

**३ ज्ञानेश्वर**—विवेचनात्मकनिबंध. किंमत रु २.

**४ हिंदी अर्थशास्त्र**—या विषयावर सांगोपांग माहितीनें भरलेला आणि अगदीं आधुनिक पद्धतीनें लिहिलेला ग्रंथ. किंमत रु. ३.

**५ मराठी वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास**—किंमत रु. ३.

**६ अपराध कोणाचा?**—ग्रंथकर्त्याची ही पहिली कादंबरी. पूर्वीं "उद्यान" मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाली होती. हिचा विषय सामाजिक असून आकर्षक आहे. किंमत रु. १॥.

**७ मराठी साहित्यशास्त्र**—किंमत रु. ३.

**८ ललिता**—ही कादंबरी "नवयुग" मासिकांत प्रसिद्ध झालेली होती. किंमत रु. १॥.

**९ विपर्यास**—सामाजिक विषयावरील अगदीं आजच्या काळची नवीन पद्धतीनें लिहिलेली कादंबरी. किंमत रु. २.

**१० कौंट मॉंटे क्रिस्टो**—या अद्भुतरम्य फ्रेंच कादंबरीचें सुरस भाषांतर. दोन भाग; किंमत प्रत्येकीं रु. ३॥.

या सर्व पुस्तकांची किंमत रु. २८-१४-० होते. हीं सर्व पुस्तकें घेण्याचें अभिवचन देऊन प्रारंभीं निदान पांच रुपये पाठविणारास तीं वीस रुपयांस मिळतील. टपालखर्चाचा निराळा बोजा पडणार नाहीं. पहिलीं तीन पुस्तकें ग्राहकांच्या हातांत पडल्यावर आणखी निदान पांच रुपये मागण्यांत येतील. या वर्गणीदारांना प्रो. अळतेकरांची **मुक्तबंध** आणि **नवें मानसशास्त्र व नवी नीति** हीं पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतील. मात्र त्याबद्दल टपालखर्च निराळा पडेल.

योजनेसंबंधीं सर्व पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावाः—

**प्रो. माधव दामोदर अळतेकर,**
व्हिले-पार्ले
( बी. बी. अँड सी. आय्. रेल्वे )
( मुंबई २४ )

१२२१ ७८९

# प्रणय आणि परिणय—

IRBK-0101633

प्रेमसमुद्रांत आपणांला जळसमाधि मिळाली किंवा प्रणयपर्वताच्या उत्तुंग शिखरावर आपण आरूढ झालों, अशी रामरावांची बालंबाल खात्री झाली होती. तसें त्यांना वाटावें यांत आश्चर्य नव्हतें; कारण त्यांच्या परिणयेच्छेची विषयीभूत जी सरला ती हजारांत नांवाजण्यासारखी मुलगी होती. भ्रुकुटीखेरीज वक्रगणा तिच्या ठिकाणीं नव्हता असें म्हणणें बिलकूल अतिशयोक्तीचें होणार नाहीं. सरला सुविद्य होती, सुस्वरूप होती, सुदृढ होती, आणि तिचे वडील सुसंपन्न होते. स्वरूपाचा चांगलेपणा, पोषाखाचा नीटनेटकेपणा, आणि मुखावरचा हंसरेपणा, या योगानें तिच्याकडे पाहून पुष्पधन्व्याच्या शरसंधानांत एखाद्यानें सांपडावें हें साहजिकच होतें. रामरावांची तीच स्थिति झाली. सरलेचे वडील सुधारक असल्यामुळें तिच्या घरांत स्त्रीपुरुषांना गप्पागोष्टी मोकळेपणानें करण्याला हरकत नव्हती. शिवाय सरलाहि मोकळ्या मनाची आणि बोलकी होती. अशा परिस्थितीचा फायदा घेऊन रामरावांनीं आपल्या अंतःकरणांतील प्रणयाचें गुणावाहन तिच्यापुढें अनेक वेळां केलें होतें, व आपली अर्धांगी होऊन आपल्याला सर्वांगी धन्यता द्यावी अशी इच्छा त्यांनीं प्रकट केली होती. त्यांच्यावर कवितादेवीचा कृपाकटाक्ष मुळींच नव्हता. पण प्रेमाच्या भाषेत जीं गद्य वाक्यें ते बोलत तींच इतकीं काव्यमय असत, कीं, तीं ऐकून शेक्सपीयर आणि कालिदास यांनीं तोंडांत बोटेंच घातलीं असतीं. दुःखाची गोष्ट इतकीच होती, कीं, रामरावांच्या प्रेमाचा मोठा स्रोत वाहिला तरी त्यामुळें सरला थोडीशी-सुद्धां अस्थिर होत नसे. तिला त्यांच्या प्रेमाचें कांहींच वाटत नव्हतें. प्रणयावर त्यांचीं मोठमोठीं व्याख्यानें ऐकून तिला द्रव आला नाहीं. काव्यमय भाषेत परिणयावर गुंफलेले त्यांचे विचार ऐकून तिला पाझर फुटला नाहीं, एकदां तर ते म्हणाले, " सरले, तुझी प्राप्ति जर मला झाली नाहीं तर संन्यास किंवा आत्महत्या याखेरीज मला तिसरी गति नाहीं. " त्यावर ती वात्रट मुलगी हंसली. नुसती गालांतल्या गालांत हंसली नाहीं, तर मोठ्यानें हंसली आणि म्हणाली, " तिसरी गति नाहीं कां ? एखादी मनाजोगती नवरी

पाहून लग्न उरकून टाका म्हणजे झालें." अशी हृदयविदारक भाषा ऐकून रामरावांचें अंतःकरण दुभंग झालें तर त्यांत नवल नाहीं. सरलेचें हें तामसी बोलणें ऐकून रामराव इतके दुःखी झाले कीं, ते रोज तीन वेळेच्या ऐवजीं सात वेळां चहा पिऊं लागले, व त्या आठवड्यांत त्यांनीं बारा वेळां सिनेमा पाहिला. आग्रह कर कर प्रेम करावें आणि सरलेला त्याचें चीज तर नाहींच, पण हसें यावें, या गोष्टीची त्यांना स्वाभाविकच चीड आली, आणि त्यांनीं एकदां सर्व प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें, प्रणयदग्ध माणसाला शोभण्यासारखा पोषाख करून आणि प्रणयासंबंधीं कित्येक कविमंडळांचीं वचनें स्मरणांत चांगलीं ठेवून ते सरलेच्या घरीं आले. सरला बाहेर बागेंत फुलझाडांच्या ताटव्यांजवळ एक खुर्ची टाकून बसली होती. रामराव तेथें गेले आणि त्यांनीं छाती खालीं करून व डोळे वर करून मोठ्यानें एक सुस्कारा सोडला.

"या रामराव, ही खुर्ची घ्या. आज तुमची प्रकृति बरी दिसत नाहीं."

"सरले, माझी प्रकृति अशीच राहणार. माझें प्रेम म्हणजे तुला चेष्टा वाटते. मी तुझी इतकी मनधरणी करतों त्याचें तुला कांहींच नाहीं. हें बरें नव्हे. माझ्यांत तुला कांहीं वैगुण्य दिसत नसेल असें माझें म्हणणें नाहीं. पण तूं एकदां माझी पत्नी झालीस म्हणजे तुझ्या सहवासानें सर्व वैगुण्य नाहींसें होईल. आज मी काय तो शेवटचा शब्द ऐकण्यासाठीं आलों आहें."

"खरं कीं काय? पण खरोखर रामराव, तुमच्यासारख्या सुलतानाला मी बिबीसाहेब मुळींच शोभणार नाहीं. माझे विचार जरा अलीकडचे आहेत. स्त्रियांना बरंच स्वातंत्र्य असावं असं मला वाटतं—"

"सरले, मी तुला किती वेळां सांगूं कीं, तुझे विचार, तुझीं मतें, सर्व मला मान्य आहेत. माझ्या प्रेमाचा जोर इतका आहे कीं, त्यामुळें माझीं मतें आणि विचार हीं नाहींशीं होऊन गेलीं आहेत."

"पण या प्रेमाच्या जोरांत माझ्यांतील एखादा कमीपणा तुम्हांला दिसणार नाहीं असं मात्र नाहीं."

"कमीपणा! वेडे सरले! सूर्य आणि अंधार यांच्यांत जितका निकट भाव असतो तितकाच तुझ्यांत आणि कमीपणांत आहे. तूं पूर्णतेची पुतळी आहेस."

"पण माझ्याविषयीं तुम्हांला काय माहित आहे?"

" दुसरी माहिती काय पाहिजे ? तुझें रमणीय सौंदर्य, तुझा स्वभाव, तुझी हुषारी, तुझी तरतरी—"

" तुझा फॅशनेबल पोशाख, तुझा थाट, तुझी ऐट,—" सरला अगदीं मनापासून हंसूं लागली.

" हंस तूं बापडी. पण खऱ्या प्रेमाची अशी निर्भर्त्सना करणें तुझ्यासारख्या सुजाण मुलीला शोभत नाहीं. "

" आणि त्यामुळें माझा अजाणपणा व्यक्त होतो. आतांच तुम्ही मला पूर्णतेची पुतळी म्हणालांत, आतां अजाण म्हणतां ?—"

" तुझ्याशीं बोलण्याची मुळीं सोयच नाहीं. पण सरले, तूं मला सांग कीं, तुझा माझ्यावर इतका राग काय म्हणून—"

" राग ? माझा तुमच्यावर राग मुळींच नाहीं. फक्त तुमची प्रणयाची कल्पना मला जरा चुकीची वाटते. आपलं माझ्यावर प्रेम आहे अशी कांहींतरीं कल्पना तुम्हीं करून घेतली आहे. "

" कल्पना ! ? सरले, माझ्या प्रेमाची कल्पना तुला नाहीं हेंच खरें. तुझ्या चिंतनानें माझी झोंप गेली, भूक कमी झाली,—"

" तुम्हीं आतांशा चहा ज्यास्त पितां असं मीं ऐकिलं आहे. त्याच्यामुळं हे सर्व परिणाम उद्भवूं शकतात. मी आतां तुम्हाला स्पष्टपणं विचारतें, या प्रेमाच्या जोरावर तुम्हीं कायकाय करूं शकाल ? "

" काय पाहिजे तें करीन—"

" किंवा करणार नाहीं ?

" किंवा करणार नाहीं. "

" उदाहरणार्थ, माझ्याशीं लग्न—"

रामराव वेड्यासारखा पाहूं लागला. तिच्या बोलण्याचा अर्थ त्याला कळेनासें दिसलें. मग तो म्हणाला, " सरले, प्रेम आणि लग्न, प्रणय आणि परिणय या गोष्टी चेष्टेच्या नव्हत, थट्टेच्या नव्हत. "

" माझं तरी असंच म्हणणं. या गोष्टी चेष्टेच्या नव्हेत, थट्टेच्या नव्हेत, आणि कल्पनेच्या पण नव्हेत. रामराव, माझे किती दोष तुम्ही प्रेमाच्या जोरावर सोसाल?"

" सरले, तूं निर्दोष आहेस. दोष मुळीं तुझ्या ठिकाणीं संभवत नाहीं. तूं मूर्तिमती देवता आहेस—"

" पुजाऱ्यालासुद्धां आपल्या नवसाला न पावणारी देवता आवडत नाहीं. "

" थट्टा, पुनः थट्टा. सरले, तूं ही थट्टा सोडणार केव्हां ? मुली सुशिक्षित झाल्यावर तरी त्यांनीं थट्टेखोर होऊं नये. "

" जशा काय अशिक्षित मुली थट्टेखोर असतात ! तुमच्या जुन्या समजुती-प्रमाणं मुलींनीं चारचौघांत हसणंसुद्धां गुन्हा होतो. तुमचाहि थट्टेवर कटाक्ष आहेच. पण रामराव, मी थट्टा करीत नाहीं. माझ्याविषयीं तुम्हांला कांहीं माहिती नाहीं. कदाचित् मी थोडीशी शिकलें आहें त्याची, कदाचित् माझं रूप जरा नीटनेटकं आहे म्हणतात त्याची, कदाचित् बाबांच्या पैशाची–कशाची ना कशाची तरी तुम्हांला थोडीफार भुरळ पडली आहे. त्यावरून तुम्हांला वाटतं, कीं, प्रणयाच्या उच्च भावनेची आपल्याला प्रेरणा झाली आहे; पण त्या भावनेचा तुमच्या ठिकाणीं भाव आहे का अभाव आहे याचा निर्णय येत्या दिवसांत कदाचित् लागण्याचा संभव आहे. तीन दिवसांनंतर तुम्हीं होऊन माझा नाद सोडला नाहीं तर मी माझं निश्चित म्हणणं तुम्हांला जरूर कळवीन. "

" तीन दिवस ! आणि माझी परीक्षा ! सरले, तूं मूर्तिमंत पूर्णता आहेस, पण वेडी आहेस. माझें प्रेम इतकें तीव्र आहे, कीं, कसल्याहि कसोटीला तें उतरलेंच पाहिजे. तूं तसें केल्याशिवाय मी तुझा नाद सोडणें शक्य नाहीं. एखादे वेळीं दिवसा अंधार होईल आणि रात्रीं प्रकाश पडेल, समुद्र-कोरडा ठणठणीत होईल आणि आकाशाची पोकळी कशानें तरी भरून निघेल पण माझें तुझ्यावरचें प्रेम केव्हांहि ढळणार नाहीं."

रामराव पुनः खालीं वांकले. मात्र त्यांचे डोळे आकाशाकडे होते. त्यांनीं पुनः एक सुस्कारा टाकला आणि ते हळुहळू परत निघाले. सरलेनें त्यांच्याकडे कांहीं वेळ पाहिलें. मग ती हंसली. मोठ्यानें हंसली नाहीं--गालांतल्या गालांत हंसली. कांहीं वेळानें उठून ती फुलांच्या ताटव्यांत गेली. तेथें एक गुलाबाचें फूल घेऊन तें तिनें आपल्या बुचड्यांत खोवलें, व आपल्याशींच कसलेंसें गीत पुटपुटत ती घरांत शिरली.

[ २ ]

रामराव घरीं आले व त्यांनीं निजावयाच्या वेळीं रोजनिशींत पुढील मजकूर लिहिला—" सरलेचें मन अद्यापि वळत नाहीं. माझें प्रेम तिला खोटें वाटतें.

तिनें मला जेव्हां विचारलें कीं, 'प्रेमासाठीं तुम्ही काय काय कराल?', तेव्हां शेक्स-पीयरनें हॅम्लेटच्या तोंडीं घातलेलीं वाक्यें माझ्या अगदीं जिव्हाग्रीं आलीं होतीं. पण मीं माझी जीभ आवरली. सरले ! प्राणसखे ! तुला माझी केव्हां ग दया येणार ? माझ्या प्रणयाला तूं केव्हां भीक घालणार ? माझ्याशीं परिणीत होऊन तूं माझी अर्धांगी आणि सगळी मालकीण केव्हां होणार ? सरले, तूं माझा जीव आहेस. तूं मला कायमचें झिडकारलेंस कीं, माझ्या देहांतून प्राण निघून गेलेच असें समज. तुझ्यासंबंधीं मला कोणीं कांहींहि सांगितलें तरी माझें तुझ्यावरचें प्रेम 'यावच्चंद्रदिवाकरौ' अढळ रहाणार. सरले, तूं माझी देवता आहेस आणि मी तुझा दासानुदास आहें."

अंतःकरणांत उठलेल्या कल्लोळाचे लोळ याप्रमाणें रोजनिशींत अक्षरांकित झाल्यामुळें रामरावाला अर्थात् शांत व गाढ झोंप लागली. दुसरे दिवशीं सकाळीं त्याचे परम प्रिय मित्रशिरोमणि हरिनाना त्याच्याकडे आले.

"काय रामराव !"

"काय हरिनाना !"

"म्हटलें, तूं चहा पितोस लौकर, तुझ्याकडे यावें चहाला; काल रात्रभर झोंप नाहीं."

"तें कसें काय बुवा ?"

"अरे काल गेलों नाटकाला. नाटक संपलें तीन वाजतां. मग घरीं पोंचलों अर्ध्या तासानें. पुढें ढेकणांचा त्रास. इकडेतिकडे करतांकरतां उजाडलें. हे ताशे, वाजंत्री तर भंडावून सोडतात. आपलें लग्न नाहीं तें नाहीं आणि वरती दुसऱ्यांच्या लग्नासाठीं जागरण !"

"नाटक कसें काय झालें ?"

"तें चांगलेंसें लक्षांत नाहीं."

"म्हणजे ?"

"म्हणजे काय ? आम्ही पहात होतों दुसरेंच नाटक. ती नानासाहेबांची सरला आहे ना—"

"सरला--नानासाहेबांची–तिचें काय ?"

"ती आली होती नाटक पहावयाला—"

"नाटक पहायाला आणि सरला एकटी ?"

"एकटी नव्हे रे. नानासाहेब आले होते, त्यांच्या घरची मंडळी होती; आणि तो शामराव--"

"काय शामराव--"

"होय--तो आपला शामराव--"

"मग--त्याचें काय ?"

"तो आणि सरला सारखीं गप्पा मारीत होतीं, हंसताखिदळत होतीं, नाटकावर टीका करीत होतीं. मी आपली तीच मजा पहात होतों--नव्हे, ऐकत होतों--"

"मजा--मजा कसली ?"

"मजा म्हणजे त्यांचें हंसणेंखिदळणें. मला वाटतें शामरावाचें सरलेशीं लग्न होणार !"

"काय म्हणतोस !" रामरावानें जरा ओरडून विचारलें.

"बाकी, असें सार्वजनिक ठिकाणीं तरण्याताठ्या मुलीनें पुरुषाशीं हसणेंखिदळणें बरें नव्हे."

"अलबत् बरें नव्हे--पण हें स्त्रीशिक्षण बोकाळतें आहे ना ?"

"रामराव !"

"कां बुवा ?"

"तूं तर स्त्रीशिक्षणाचा मोठा अभिमानी आणि स्त्रीस्वातंत्र्याचा चहाता."

"म्हणून काय झालें ! सरला आणि त्या शाम्याशीं हंसत खिदळत होती. हंसत आणि खिदळत ! बायकांनीं हंसणें आणि खिदळणें या गोष्टी बिलकूल करतां कामा नये -- आणि सरला -- मला सरला अशी असेलसें वाटलें नव्हतें."

"अरे तूं म्हणालास तें ! या शिकलेल्या अलीकडच्या पोरी ! काय करतील त्याचा नियम नाहीं ! शहाण्या पुरुषांनीं त्यांच्याविषयीं सावध असावें."

"आणि त्यांनीं काय काय केलें ?"

"कां बुवा ? तुला फारशी पंचाईत ? 'अनिर्वर्णनीयं परकलत्रं' हें तुला माहीत आहे ना कविवचन ?"

रामरावानें जीभ चावली. सकाळची वेळ होती तरी संतापानें दुपारच्यासारखा तो भाजून निघाला होता. तो हळूच म्हणाला, "हरिनाना, खरोखर सांग, तुझें सरलेविषयीं काय मत आहे ?"

"माझें मत ? माझें मत एकंदरींत शिकलेल्या आणि सुंदर स्त्रियांच्या विरुद्ध आहे हें तुला माहीत आहेच."

"पण सरलेविषयीं तुझें काय मत आहे ?"

"ती इतकी शिकली हें मला मुळींच मान्य नाहीं. मी मॅट्रिकच्या परीक्षेंत तीन वेळां नापास झालों. ती पहिल्या सपाट्यालाच पास झाली. बायका जर असें करूं लागल्या तर आम्हां पुरुषांची किंमत राहणार नाहीं. शिवाय अशानें त्या स्वतंत्र होतात. पुरुषाबद्दल त्यांना आदर रहात नाहीं, व नवरा हासुद्धां पुरुष असल्यामुळें त्याच्याबद्दलहि त्यांना आदर वाटत नाहीं."

"तूं म्हणतोस हें खरें दिसतें. वास्तविक सरलेचें लग्न ठरल्यासारखें असतांना तिनें नाटकगृहांत जाऊन परपुरुषाशीं गुजगोष्टी करणें हें निखालस गैरशिस्त. आणि – आणि त्यांनीं काय केलें—?"

"पण तूं म्हणतोस तिचें लग्न ठरलें आहे–"

"म्हणजे ठरल्यासारखें आहे."

"कोण असा दुर्भागी असेल तो असो."

"कां बुवा, त्याला दुर्भागी कां म्हणतोस ?"

"दुर्भागी नव्हे तर काय ? या शिकलेल्या आणि वाढलेल्या अलीकडच्या मुली – त्यांचा नियम कुणीं काय सांगावा ? त्या काय करतील–त्यांनीं काय केलें असेल—यांचा काय करण्याचा विचार असेल—कांहीं—कांहीं पत्ता लागणार नाहीं. शिवाय नाटक संपल्यावर—"

"नाटक संपल्यावर काय झालें ?"

"नानासाहेब आणि त्यांचें कुटुंब हीं एका गाडींत बसून गेलीं आणि शामराव व सरला हीं दुसऱ्या गाडींतून गेलीं."

"काय म्हणतोस ?"

"अगदीं अक्षरशः खरें."

"शामराव आणि सरला एका गाडींतून गेलीं ! खरोखर अलीकडच्या मुली अगदीं बहकल्या–एका गाडींतून !—"

"पण रामराव, आपणांला काय करावयाचें त्याच्याशीं ! हे दिवस बाबा सुधारणेचे आहेत. तुला किंवा मला सरलेशीं थोडेंच लग्न करायचें आहे. माझा तर निश्चय आहे, कीं, शिकलेली आणि वाढलेली मुलगी बायको म्हणून करून घ्यायची नाहीं."

"मला तुझें म्हणणें अगदीं बरोबर दिसतें. स्त्रीजात म्हणजे सारी बेइमान असें हॅम्लेट म्हणाला तें कांहीं खोटें नाहीं. मला वाटतें याबद्दल आपण चळवळ केली पाहिजे. स्त्रीपुरुषांची गांठदेखील पडतां कामा नये, अशी तजवीज झाली पाहिजे."

"मला वाटतें बंगाल्याकडची पडद्याची चाल या कामाला फार चांगली आहे."

"मला देखील आतांसें तसेंच वाटूं लागलें आहे. खरोखर या बाबतींतील माझीं सर्व मतें साफ चुकलेलीं असावींत असें वाटतें. पण कायरे, सरलेचा चेहरा कसा दिसत होता?"

"काय तूं वेड्यासारखें विचारतोस? तिचें स्वरूप चांगलें आहे हें तर तुला माहीत असलेंच पाहिजे. तुझें तर नानासाहेबांच्या घरीं येणेंजाणें आहे."

"येणेंजाणें आहे. पण मला हे अलीकडचे चाळे आवडत नाहींत. मी मुळीं बायकांशीं बोलणेंच टाळतों. माझा स्वभाव तुला माहीतच आहे. ही अलीकडची मंडळी मोरे 'कोर्टिंग' च्या गप्पा बोलतात. पण हरिनाना, तूं आजपर्यंत सांगत होतास तेंच खरें. बायकांना शिक्षण दिलें, कीं, त्या बिघडल्याच म्हणून समजावें. अरे ही सरलासुद्धां किती वात्रट, किती चेष्टेखोर—अनेकांचे दोष काढणारी—खरोखर चांगल्या बायकांना असें शोभत नाहीं."

"मुळींच शोभत नाहीं."

इतका संवाद झाल्यावर दोघांनींहि चहापान केलें. कांहीं वेळानें हरिनानांनीं निरोप घेतला. मग रामराव हळूच उठला. त्यानें खिशांतील पाकिटांतून एक फोटो काढला, त्याकडे तुच्छतादर्शक मुद्रेनें पाहिलें आणि रागारागानें त्याच्या चिंध्या करून त्या हवेंत फेंकून दिल्या.

आपले सद्‌गुण आणि मोठेपणा हीं किती अगाध आहेत यांचा विचार करीत करीत रामरावानें एक सुस्कारा टाकला.

[ ३ ]

संध्याकाळीं रामराव आणि शामराव यांची गांठ पडली. शामरावाच्या मुखावर हास्य झळकत होतें. रामरावाच्या कपाळावर मुंबई आणि कल्याण यांच्या दरम्यान आगगाड्यांचे रूळ पडले आहेत त्याप्रमाणें आंठ्या पडल्या होत्या. शामरावाकडे त्यानें पाहिलेंसुद्धां नाहीं. पण शामरावानेंच त्याला थांबविलें.

" ओहो, रामराव, बोलायलासुद्धां वेळ नाहीं. ?"

" आमची पंचाईत करण्याचें तुम्हांला कारण नाहीं."

" खरें कीं काय ?"

" मी खोटें बोलत नसतों."

" केव्हांपासून ?"

रामरावानें क्रुद्ध दृष्टीनें शामरावाकडे पाहिलें. त्याच्या मनांत चांगलें भांडण करावयाचें होतें, पण कशी सुरवात करावी हें त्याला समजेना.

शेवटीं तो म्हणाला, " शामराव, चव्हाट्याच्या जागेवर तरण्याताठ्या मुलीं-बरोबर गुजगोष्टी करणें सभ्यपणाला सोडून आहे हें तुम्हांला माहीत असेलच."

" हें मला माहीत नव्हतें. आतांच तुमच्याकडून कळलें." पण मी विचारतों, " सदरहू तरणीताठी मुलगी जर तुमच्याशीं बोलली तर तुम्ही आपल्या तोंडांत बोळा घालाल का ?"

" ती बोलणार कशी ? आमच्या बायका कांहीं उठून गेलेल्या नाहींत."

" शाबास ! तुह्मी स्त्रीशिक्षणाचे आणि स्त्रीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते. तुमच्या तोंडून हीं मुक्ताफळें गळतात तेव्हां धन्य आहे."

" स्वातंत्र्य म्हणजे निर्लज्जपणा नव्हे."

" अगदीं एकदम कबूल. पण आपण कशाविषयीं बोलतां आहांत ?"

" काल सरलेला तुम्हीं नाटक दाखविलें ?"

" अस्सें ! पण सरलेनें तें माझ्याबरोबर पाहिलें काय म्हणून—?"

" शामराव ! हा सारा अलीकडच्या शिक्षणाचा परिणाम. या वाढलेल्या आणि शिकलेल्या मुली किती बेताल होतील याचा नियम नाहीं."

" आपण तर सरलेची केवढी स्तुति करीत होतां. तिच्यांत सर्व सद्गुणांचें माहेर आहे असें आपण सांगत होतां. मग आपलें मत एकाएकीं कसें बदललेंत ?"

" मत बदलूं नये तर काय करूं ? तुमच्यासारखे दिवटे पाजळूं लागले म्हणजे आमच्यासारख्यांना मतें बदलावीं लागतात. बस्स. या अलीकडच्या पोरी म्हणजे अगदीं बदफैली— वाटेल त्याचा हात धरून जातील !"

" कां ? सरला आपला हात धरून जाण्याला तयार नाहीं वाटतें ? तसें असेल तर वाटेल त्याचा हात धरून जाण्याचा आरोप तिच्यावर करणें रास्त होणार नाहीं."

" शामराव, तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ? "

" तो तुला आतांच समजावून सांगतों. तुझी इच्छा सरलेशीं लग्न लावण्याची आहे. तिच्याविषयीं प्रेमानें तूं अगदीं वेडा झाला होतास. तिच्यावर तिच्या सौंदर्याला मुळींच न शोभणाऱ्या अशा आचरट कविता लिहिण्याचा तूं कितीतरी वेळां प्रयत्न केलास. तिला तूं पूर्णतेची पुतळी म्हणत होतास. प्रेमाच्या वाटेल त्या कसोटीला मी उतरेन म्हणून तिला थापा देत होतास. आणि आतां एक अगदीं साधी निरुपद्रवी गोष्ट घडल्याबरोबर डोक्यांत राख घालून तिच्याविषयीं वाटेल त्या कुत्सित कल्पना करतोस. ती तुझी देवता, मग तूं जर एवढा भक्तीचा आणि प्रेमाचा कांदा, तर तुझी देवता इतक्यांत आसुरी कशी रे झाली ? "

" कालच्या प्रकाराला तूं साधी आणि निरुपद्रवी गोष्ट म्हणतोस ? "

" कालचा प्रकार तरी काय होता ? ती आपल्या आईबापांबरोबर नाटक पहाण्याला गेली. मीहि गेलों होतों. लहानपणापासून माझा त्यांच्या घरीं घरोबा आहे. तिची माझी गांठ पडली तर आम्ही काय छत्तिसाच्या आंकड्याप्रमाणें तोंडें फिरवावीं ? शाबास, रामराव. आपल्याकडे पडद्याची चाल नव्हती आणि नाहीं हें तुम्हाला माहीत आहेच. आणि शिवाय बायकांना आतां दाव्याला बांधलेल्या म्हशीप्रमाणें वागविण्याचें धनगरयुग गेलें हें तुला तरी कळलें पाहिजे. तूं तर या विषयावर पांचपंचवीस लेक्चरें झोडलीं आहेस. पण स्त्रियांविषयीं तुझ्या ज्या घाणेरड्या आणि कुत्सित कल्पना आहेत, त्यामुळेंच तूं भलभलते संशय घेतोस आणि वाटेल तीं तर्कटें रचतोस. सरला तुला नेहमीं सुलतान म्हणते त्यांत कांहीं खोटें नाहीं. "

" सरला मला काय म्हणते हें तुला कसें रे समजलें ? "

" तूंच मला किती वेळां सांगितलें आहेस. ज्या व्यक्तीवर तुझें अत्यंत प्रेम आहे असा तूं बहाणा करतोस, त्या व्यक्तीविषयीं घटकेघटकेला तुझ्या कल्पना बदलतात यावरून तुझ्या प्रेमाच्या हिणकसपणाची पुरी खात्री पटते. "

" हेंदेखील तुला सरलेनेंच सांगितलें का ? "

" सरलेला एकाच्या गोष्टी दुसऱ्याजवळ सांगण्याची घाणेरडी संवय नाहीं. "

" तिचें तुझ्याशीं लग्न ठरलें आहे वाटतें ? "

" मुळींच नाहीं. तिचें लग्न इतक्यांत ठरणार नाहीं असें तिच्या वडिलांनीं

मला सांगितलें. पण तुमची ही करामत ऐकून ती तुमच्याविषयीं काय समजायचें तें समजेल."

"अरे जा! मला तरी असली घोडनवरी पाहिजे कुठें?"

"ठीक आहे. मग एखादी गाढवनवरी करून घे. गाढव नवरी आणि गाढव नवरा म्हणजे खराखुरा संसार होईल आणि बुडत चाललेली आपली सोज्ज्वल विवाहसंस्कृति तरेल. पण कायरे, रामराव, तूं मला सांगत होतास कीं, सरलेनें जर आपल्याला नकार दिला, तर पुढें संन्यास किंवा आत्महत्या! मग यांपैकीं कोणतें?"

"बस्स कर. असल्या पोरीबद्दल मी आत्महत्या करावयाला बसलों आहें?"

"बसूं नकोस. उभा राहून केलीस तरी चालेल. मग तुझ्या त्या प्रणयाच्या बाता आणि प्रणयाच्या उच्च वातावरणांतील कल्पना म्हणजे सगळ्या खोटेपणाच्या थापा का बावळटपणाच्या गप्पा?"

रामरावानें कांहींएक उत्तर दिलें नाहीं. संतापानें फणफणत तो पुढें गेला. त्याला क्षणभर वाटलें,कीं, सरलेसारख्या चांगल्या मुलीबद्दल आपण एकदम साशंक होण्यांत फार चूक केली. पण लागलीच विकाराचा अम्मल विचारावर बसला आणि मावळणाऱ्या सूर्याकडे पहात तो आपल्याशीं पुटपुटला:

"या शिकलेल्या बायका आपणाशीं गप्पा मारायला बऱ्या दिसतात. पण यांना स्वातंत्र्य द्यायचें ह्मणजे या वाटेल त्याच्याशीं गप्पा मारणार आणि तें कांहीं आपल्याला खपणार नाहीं. बस्स. आपण अगदीं जुन्या पद्धतीप्रमाणें लग्न लावणार. प्रणय वगैरे सब झूट आहे. आपल्याला खरें सात्त्विक प्रेम पाहिजे."

पुढें दोन दिवसांनीं त्याला एक पत्र आलें. तें सरलेचें होतें. हें पाहून त्याला जरा चमत्कारिक वाटलें. त्यांत पुढील मजकूर होताः—

"प्रिय बंधु रामराव,

आपण पुनः आमच्या घरीं फिरकला नाहीं, त्यावरून आपला प्रणयज्वर उतरला असावा असें दिसतें. तसें असल्यास मला फार आनंद होईल. आपल्या सुधारणेच्या गप्पा जितक्या खऱ्या तितक्याच प्रणयाच्या. कारण आपले वडील आमच्या बाबांकडे आले होते व आपण एक लग्न ठरविलें आहे, पण 'मुलग्याच्या डोक्यांत कसलें खूळ आहे, तो ऐकूनच घेत नाहीं' असें ते म्हणाले; तेव्हां मीं त्यांना सांगितलें, कीं खूळबीळ कांहीं नाहीं, तुम्ही बेलाशक लग्न ठरवा.

पुढच्या आठवड्यांत पुष्कळ मुहूर्त आहेत. मुलगी मीं पाहिली आहे. आतां पुढें काय करील सांगवत नाहीं; पण सध्यां तर आपल्यासारख्याला सर्व तऱ्हेनें जमण्यासारखी आहे.

बायकांनीं पुरुषांना पत्रें लिहिणें जरा गैरशिस्त, म्हणून यापुढें मी असलें साहस करणार नाहीं. लग्नाचें आमंत्रण मला देण्याला बरीक विसरूं नका.

सरला. ”

रामराव तें पत्र वाचून स्तंभितच झाला. इतक्यांत हरिनाना हातांत कसलेंसें पुडकें घेऊन आला आणि हंसतहंसत म्हणाला,

“ बसा, रामराव. मीं अगदीं ताजे कुरमुरे आणले आहेत आणि त्यांत खारे चणे टाकले आहेत. पहा तर कसे आहेत ते ? ”

मनोरंजन; एप्रिल १९२०

# मोत्यांची डबी.

“ आरोपी, तूं आपला दोष कबूल करतोस किंवा नाहीं ? ” न्यायाधिशानें विचारलें.

“ मी निर्दोषी आहें. ” हे शब्द आरोपीनें इतक्या धीटपणानें, शांतपणानें आणि निर्भयपणानें उच्चारले, कीं कोर्टांत हजर असलेल्या प्रत्येकाला आश्चर्य वाटलें.

न्यायाधिशांनीं चष्मा वर करून आरोपीकडे एकदां पाहिलें.

“ तुझें काम चालविण्याला कोणी वकील आहे काय ? ” न्यायाधिशानें विचारलें.

“ नाहीं, महाराज. ”

“ तुझ्यावरचा आरोप फार भयंकर आहे. या बाबतींत मला बोलण्याचें कारण नाहीं. परंतु वकिलाशिवाय आपलें चालेल असें तुला वाटतें ? ”

“ त्याला माझा उपाय नाहीं. वकील नको अशी माझी इच्छा आहे असें नाहीं. पण मी दरिद्री आहे; मजजवळ पैसा नाहीं; म्हणून मला वकील देणें शक्य नाहीं. ”

न्यायाधिशानें थोडा वेळ हातांतल्या लेखणीच्या मागच्या भागानें डोकें खाजवलें. “ वकील हुडकून देण्याचें माझें काम नाहीं, परंतु हें काम चालविण्याची कोणाची इच्छा असल्यास मला संतोष होईल. ”

“ महाराज, ” आरोपी नम्र व गोड शब्दांनीं म्हणाला, “ मध्यें बोलल्याबद्दल माफी असावी. परंतु ते वकील जर माझें काम चालवितील तर मी मोठा कृतज्ञ होईन. ” आरोपीनें समोरच्या एका वकीलाकडे बोट दाखविलें. तो वकील बराच वेळ आरोपीकडे दयार्द्र दृष्टीनें पहात होता. केशवराव तरुण होते तरी आपल्या धंद्यांत त्यांनीं चांगला लौकिक मिळविला होता. आजच्या आरोपीच्या आणि केशवरावाच्या चेहऱ्यांत विलक्षण साम्य होतें आणि म्हणून या कोर्टांत त्यांचें काम नव्हतें, तरी त्या सारखेपणामुळें त्यांना जरा चमत्कार वाटला आणि ते केस ऐकत बसले. दोघांची उंची सारखी होती. दोघांचा आकार व ठेवण हींही सारखीं होतीं. अंतर इतकेंच केशवराव नेहमीं मिशा

काढीत व आरोपीला थोड्या मिशा व दाढी होती. त्यामुळें एकदम पाहाणाऱ्याला दोघांतील साम्य लागलींच लक्षांत येत नसे.

"केशवरावांना काम फार असतें," न्यायाधीश म्हणाले. "त्यांचा वेळ घेऊन नुकसान करणें बरोबर होणार नाहीं."

"आपली हरकत नसेल तर ही केस मी मोठ्या खुषीनें घेतों," केशवराव म्हणाले; "बाकी सदर केसची कांहींच हकीगत अद्यापपर्यंत मला माहीत नाहीं."

"आरोपीचा गुन्हा फार मोठा आहे. फिर्यादीतर्फेचे वकील सर्व माहिती तुम्हांला मोठ्या आनंदानें देतील."

"सर्व कागदपत्र पाहण्याला मला एक दिवस तरी लागेल. तेव्हां खटला उद्यांपर्यंत तहकूब ठेवण्याची कोर्टानें मेहेरबानी करावी." केशवरावांनीं विनंति केली.

"उद्यांला माझ्यापुढें एक दुसरा महत्त्वाचा खटला आहे." न्यायाधीश म्हणाले. "परवां दिवशीं हें काम चालण्यास तुमची हरकत आहे काय?"

"मुळींच नाहीं."

याप्रमाणें खटला दोन दिवस तहकूब झाला. केशवराव आपल्या बंगल्यांत आले व तोंडांत एक सिग्रेट ठेवून त्यांनीं खटल्याचे कागद वाचले. आरोप भयंकर होता व पुरावा भरपूर होता हें त्यांच्या चटदिशीं लक्षांत आलें. दहा-हजार रुपयांचें मोतीं चारल्याचा आरोप होता. आणि आरोपी गणपतराव याच्यावर उत्कृष्टपणें आरोप शाबीद होईल इतका पुरावा होता. प्रसिद्ध मोतीवाले चिमणलाल यांच्याकडे सदर मोतीं एका डबीतून विकण्यासाठीं आलें होतें, व मोत्यांची डबी टेबलावर ठेवून चिमणलालशेट आपल्या कारकुनाबरोबर बोलत होते व पुनः परतून पाहतात तों डबी नाहींशी झालेली! ही चोरी झाली त्याच वेळीं गणपतराव चिमणलालच्या दुकानांत होते व त्यानंतर लागलीच ते गडबडीनें बाहेर गेले. चिमणलालनें दुकानाचीं दारें लागलींच लावून सात आठ माणसें दुकानांत होतीं त्यांची झडती घेतली. पण त्यांत कांहीं सांपडलें नाहीं. त्यामुळें त्याला गणपतरावाचा वहीम आला. यानंतर पंधरा मिनिटांनीं दुसरा एक मोतीवाला किसनशेट यांच्या दुकानांत गणपतराव दृष्टीस पडले व तेथें ते तीच डबी काढून मोतीं विकत घ्या म्हणूं लागले. किसनशेट आंत होते. त्यांना गणपतरावाविषयीं संशय आला हें पाहतांच गणपतराव दुकानांतून पळत सुटले, तेव्हां किसनशेटनें पोलीसास बोलावलें.

किसनशेटबरोबर पोलीस गणपतरावाच्या खोलीकडे गेले. तेथें गणपतराव होता. त्यानें किसनशेटना पाहतांच त्याला पाजी, लुच्चा, चोर म्हणून शिव्या दिल्या. पोलीसनें गणपतराव च्या खोलीची झडती घे .ली. पण त्यांत मोत्यांची डबी कांहीं सांपडली नाहीं. इतर चौकशी करितां आरोपी पैशाच्या अडचणींत असून अलीकडे सट्टे करण्यांत त्यास फार नुकसान आलें असल्याचें आढळून आलें.

केशवरावांनीं सर्व कागद लक्षपूर्वक वाचले व त्यांत मधून मधून तांबड्या पेन्सिलीनें खुणा केल्या. पुरावा अगदीं सणसणीत होता व त्यांतून आरोपी सुटणें अगदीं अशक्य दिसत होतें. परंतु केशवरावांची खात्री होईना. त्यांना आरोपीच्या निर्भय, धीट व शांत भाषणाची आठवण झाली आणि गणपतराव निरपराधी असला पाहिजे असें त्यांना वाटलें. त्यांनीं पुराव्यांत कांहीं वाव मिळतो कां म्हणून पाहण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण तो फुकट गेला. केससंबंधीं केशवराव बरीच रात्र होईपर्यंत विचार करीत होते. शेवटीं सकाळीं तुरुंगांत जाऊन गणपतरावाची गांठ घ्यावयाची व मग काय तें करावयाचें असें त्यांनीं ठरविलें व ते झोंपी गेले.

दुसरे दिवशीं सकाळीं ते गणपतराव अटकेंत होता तेथें गेले. गणपतरावाची गांठ पडण्याची लागलीच व्यवस्था झाली. गणपतराव हाताच्या तळव्यावर डोकें टेकून एका लहानशा खोलींत स्टुलावर बसले होते. पहारेकऱ्यानें गणपतरावाची तासभर गांठ घेण्याला परवानगी आहे म्हणून केशवरावांला सांगितलें.

केशवराव येतांच गणपतरावानें वर पाहिलें व त्याचे डोळे कृतज्ञतेच्या अश्रूंनीं भरून आले. " तुम्ही याल असें मला वाटलेंच होतें. "

" आपले चेहरे फार सारखे आहेत नाहीं ? "

" हें कांहीं माझ्या लक्षांत आलें नव्हतें. पण कोर्टांत तुम्ही माझ्याकडे दयार्द्रपणानें पहात होतां, त्यामुळें तुम्ही मला साहाय्य कराल असें मला वाटलें "

" हें पहा गणपतराव, या गोष्टी तूर्त राहूं द्या. सध्यां तुम्हांला या संकटांतून कसें सोडवावयाचें हें पाहिलें पाहिजे. तेव्हां तुमची हकीगत सांगा. तुम्ही निर्दोष आहांत याबद्दल मला शंका नाहीं. पण एकदां तुमचा वृत्तांत ऐकला पाहिजे. "

" मी कोठून सुरवात करूं ? "

" मी तुम्हांला प्रश्न विचारतों त्याचीं सरळ उत्तरें द्या म्हणजे झालें. कोणता साक्षीदार खोटें बोलतो आहे ? "

" किसनशेट खोटें बोलतो आहे. अगदीं निखालस खोटें बोलतो आहे ! "

" मला वाटलेंच होतें. " केशवरावांनीं आपल्या नोंदबुकांत कांहीं लिहून घेतलें.

" बरें, चिमणलालच्या दुकानांत तुम्ही काय म्हणून गेला होतां ? "

गणपतरावांचा चेहरा खालीं पडला.

' हें पहा, मी तुमचा वकील आहें हें एक आणि तुम्हांला सोडवावें अशी माझी फार इच्छा आहे हें दुसरें; तेव्हां मजपासून कांहीं लपवून ठेवूं नका '

" नाहीं. मी कांहीं चोरून ठेवीत नाहीं पुराव्यावरून मी सट्टेबाजींत सर्व पैसे गमावले हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. माझ्याजवळ हिऱ्याची एक आंगठी होती. ती विकून पैसे करावेत व दुसरीकडे जाऊन नशीब पहावें म्हणून त्या आंगठीची किंमत करण्यासाठीं मी चिमणलालच्या दुकानांत गेलों होतों. "

" चिमणलालच्या दुकानांतून तुम्ही कां पळालांत ? "

" रस्त्यावर एक फार दिवसाचा स्नेही चालला होता असें मला वाटलें म्हणून मी गडबडीनें गेलों. पाहतों तों तो दुसराच मनुष्य होता. जातां जातां मी खिशांत जी डबी घातली व तिच्यांत मोतीं होतें. मी आश्चर्यानें चकित झालों. कोणी तरी चोरानें निकराच्या प्रसंगीं पळतां पळतां ती माझ्या खिशांत टाकली असावी असें मला वाटलें. किसनशेटची माझी थोडीशी ओळख आहे. वाटेनें त्याच्या दुकानांत शिरण्याची मला बुद्धि झाली. आणि तेथें जाऊन डबींतील मोत्यांची व माझ्या आंगठीची किंमत विचारण्याचें मीं ठरविलें. डबींतलें मोतीं पाहून किसनशेट चकित झाला. त्यानें जाऊन प्रथम दार लावलें व हें मोतीं तुजजवळ कसें आलें म्हणून त्यानें मला विचारिलें व तें कसें आलें होतें हें मीं त्याला सांगितलें.

" तुला मी त्याबद्दल एक हजार रुपये देतों; " किसनशेट म्हणाला.

" तीं मोतीं माझीं नव्हतीं. तीं कोणींतरी चोरलीं आहेत. " मी म्हणालों.

" अं ! तूं कांहीं ते चोरलेले नाहींस. आणि आतां त्यांत कांहीं भय नाहीं. ते कांहीं कोणी ओळखील असेंही नाहीं. तेव्हां आतां उगीच बोलणें वाढविण्यांत अर्थ नाहीं. मी तुला दीड हजार रुपये देतों चल, मी आतांच्या आतां ब्यांकेवर चेक देतों "

"किसनशेट, तूं चोर आणि लुटारू असलास तरी मीं नाहीं." मीं रागानें म्हटलें.

" जाऊं द्यारे, मी तुला दोन हजार रुपये देतों. मग तर झालें ? "

" त्याला कांहींच उत्तर न देतां मी जावयाला निघालों. " थांब मुकाट्यानें; माझ्या म्हणण्यास कबूल हो. माझीं तीन माणसें दुकानांत आहेत. बाहेर पाऊल घालशील तर चोर म्हणून तुला पकडण्यासाठीं मी पोलीसला बोलावीन."

" तो तसें करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं अशी माझी खात्री झाली व संतापानें माझें देहभान गेलें. मीं त्याच्या गळ्याला हात घातला, त्याचा गळा खुर्चीत चेपला आणि कांहीं एक विचार न करतां दार उघडून पळालों."

"हें बरें नाहीं झालें. पण अशा प्रसंगीं असेंच व्हावयाचें"; केशवराव म्हणाले.

" मी माझ्या खोलींत गेलों. माझी म्हातारी मावशी माझ्याकडे नुकतीच येऊन राहिली होती. आपल्याजवळ जमवलेले शेंदोनशें रुपये आहेत असें तिनें मला सांगितलें. इतक्यांत तिनें माझा घाबरलेला चेहरा पाहिला आणि मला काय झालें म्हणून विचारलें. मी तिला इत्थंभूत हकीगत सांगितली व तिच्या हातांत डबी दिली. तेव्हां ती म्हणाली, " पोलीस आले तर त्यांना ही डबी सांपडतां कामा नये. ती मी दडवून ठेवतें"; असें म्हणून माझ्या उत्तराची वाट न पाहतां ती निघून गेली. ती गेली आणि पोलीस आले व त्यांनीं मला गिरफदार केलें. कोर्टांत मला कांहीं उत्तर देतां येत नाहीं याचें कारण हें आहे. माझ्या बिचाऱ्या मावशीनें कोर्टाची पायरी चढूं नये अशी माझी इच्छा आहे."

केशवराव ही हकीगत ऐकून दोन मिनिटें स्तब्ध बसले. मग ते म्हणाले, " ही हकीगत मोठी चमत्कारिक आहे व खरी आहेशी सुद्धां वाटणार नाहीं. "

" तुमचा तरी विश्वास बसतो का ? " गणपतरावानें काकुळतीनें विचारलें.

" मला तिच्या खरेपणाबद्दल मुळींच शंका नाहीं. पण जज किंवा ज्यूरी यांना ती मुळींच खरी वाटणार नाहीं. "

" मग माझी सुटका होणें शक्य नाहीं. "

" तसें माझें मुळींच म्हणणें नाहीं. हें पहा, मला एक युक्ति सुचली आहे. तुमच्या मावशीजवळ तीं मोतीं अद्यापि असलीं पाहिजेत नाहीं ? "

" अलबत् ! असलींच पाहिजेत. "

" तुम्ही चिठ्ठी द्याल तर ती मला तीं मोतीं देईल ? "

" खचित देईल. "

" मग एक चिठ्ठी लिहा पाहूं. ही कागद पेन्सील इथें आहे. त्यांत, मी तुमचा

वकील असून तुमच्या निरपराधीपणाविषयीं माझी खात्री झालेली आहे आणि माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव, म्हणून लिहा."

गणपतरावानें ती चिठ्ठी लिहिली व केशवरावांजवळ दिली. "तुमची युक्ति मला सांगणार नाहीं का?" गणपतरावानें विचारलें.

"इतक्यांत नाहीं कारण तिनें भागलेंच नाहीं, तर मला दुसरी कांहीं योजना करावी लागेल. असो. मी जातों, तुम्ही भिऊं नका."

केशवराव तेथून बाहेर पडले व गणपतरावांनीं सांगितलेल्या ठिकाणीं गेले. जातां जातां त्यांनीं एका नाटकी सामानाच्या दुकानांतून दाढी मिशा खरेदी केल्या. त्यांची गणपतरावाच्या खोलींत म्हातारीची गांठ लागलीच पडली. त्यांनीं तिच्या हातांत तें पत्र दिलें. म्हातारीला वाचतां येत होतें तें तिनें वाचलें व तिनें एकदां केशवरावाकडे पाहिलें. नंतर ती आंत गेली व एक अक्षरसुद्धां न बोलतां तिनें ती डबी केशवरावांच्या स्वाधीन केली. गणपतरावाच्या अटकेमुळें म्हातारी अगदीं खचून गेली होती. पण उद्यां संध्याकाळीं गणपतराव घरीं सुखरूप येईल म्हणून केशवरावानें सांगितलें, तेव्हां म्हातारीच्या जिवांत जीव आला. नंतर केशवरावानें आपली युक्ति तिला सांगितली.

"पण तुम्ही तर नाहीं ना त्यामुळें गोत्यांत येणार?" तिनें विचारलें.

"त्याची काळजी नको. गणपतरावाचे कपडे तेवढे मला द्या पाहूं?"

कपडे घेऊन केशवराव बाहेर पडला व आपल्या घरीं गेला.

त्या रात्रीं दहा वाजण्याच्या सुमाराला किसनशेटच्या घरीं त्यांना भेटण्यासाठीं एक माणूस आला व महत्वाचें काम आहे व तावडतोब भेट पाहिजे, म्हणून त्यानें दारावरच्या शिपायाला सांगितलें.

थोड्याच वेळानें तो माणूस किसनशेटच्या खोलींत गेला. किसनशेटच्या बैठकीजवळच एक मोठी सेफ होती.

"काय बुवा, तुमचें काम आहे काय या वेळीं?" किसनशेटनें विचारलें; पण त्या माणसाकडे निरखून पाहतांच तो अगदीं भांबावून गेला!

"कोण गणपतराव?"

"होय तोच."

"पण तुम्हीं अटकेंतून सुटलांत कसें?"

"त्याची हकीगत आतां सांगण्याचें कांहींच कारण नाहीं. हें पहा, झालेंतें

झालें. आतां पुढची गोष्ट बोलूं". असें म्हणून त्यानें ती मोत्यांची डबी बाहेर काढली.

"एकूण तुला स्वहित थोडें तरी कळतें म्हणायचें."

"मी अडचणींत आहे. तेव्हां दुसरा उपाय नाहीं. मी आतां होईल तितका लौकर दुसरीकडे जाणार आहे. त्या दिवशीं मला तुम्ही याबद्दल दोन हजार रुपये देत होतां ते घेण्याला मी तयार आहें."

"तूं असशील तयार पण मीं दिले पाहिजेत ना? पहा, विचार कर. माझ्या एका शब्दानें तुझें जन्माचें नुकसान होण्यासारखें आहे, पण तसें करण्याचा माझा विचार नाहीं. मी तुला हजार रुपये देतों."

"ठीक आहे. हजार तर हजार."

"हें खरें बोललास. हा चेक घे."

"मला चेक नको. रोख नाणें किंवा करन्सी नोटा पाहिजेत."

"काय वेडा आहेस रे तूं? चेकचे पैसे तुला मिळणार नाहींतसें वाटतें! कां होइना, तुझी मर्जी. तुला हजार रुपये रोख देतों मग तर झालें."

किसनशेटनें सेफ उघडून त्या माणसापुढें रक्कम टाकली. कांहीं रुपये होते, कांहीं नोटा होत्या. त्यानें ते कसेबसे खिशांत घातले. आज मोठाच सौदा केला म्हणून किसनशेट निजावयाच्या खोलींत स्वतःची तारीफ करीत गेले.

मध्यरात्रींनंतर किसनशेटला हांका मारीत आणखीं कोणीसे आले, दार उघडलें, तें पोलीस पार्टी आंत घुसली. त्यांनीं सारी झडती घेऊन ती मोत्यांची डबी जप्त केली व किसनशेटच्या हातांत बिडी ठोकली.

दुसरे दिवशीं खटला सुरू झाला. तेव्हां चोरीचा माल किसनशेटच्या घरीं जप्त केलेला पोलीसनें कोर्टांत हजर केला. आरोपी रात्रीं घरीं आला होता, म्हणून किसनशेटनें सांगितलेली गोष्ट ऐकून तर त्याच्याविषयीं जज्जाचें मत फारच प्रतिकूल झालें. कारण आरोपी तर अटकेंत होता; तेथून त्यानें जाणें शक्य नव्हतें. किसनशेटच्या येथें मुद्देमाल सांपडल्यामुळे गणपतरावाला ताबडतोब मुक्त करण्यांत आलें. हें सांगावयास नकोच.

गणपतराव बाहेर आल्यावर केशवरावांना म्हणतात, "बुवा, हें झालें कसें?" आणि मावशी किंवा केशवराव यांच्याकडून कांहींच न कळल्यामुळें गणपतरावांची शंका अजून फिटली नाहीं. आतां ही कथा प्रसिद्ध झाल्यावर कदाचित् त्यांना खरा प्रकार कळेल.

**उद्यान**, जानेवारी १९१६.

# रावबहादुरांची जुगत.

सकाळचे आठ वाजले होते. रावबहादुर आपल्या लहानग्या नातीला घेऊन चहापान करीत होते. रावबहादुरांचे चिरंजीव एक चिरूट पेटवून धूर सोडीत उभे होते. संतति, संपत्ति, राजदरबारीं मान्यता व लोकांमध्यें मान्यता या सर्व गोष्टी रावबहादुरांना अनुकूल होत्या, अर्थात् जगांतील सुखी लोकांत त्यांची गणना करण्यास कांहींच हरकत नव्हती. संततीची संतति त्यांच्या मांडीवरच लोळत होती. सरकारी नोकरींत असतांना वरिष्ठांची मर्जी रावबहादुरांनीं अगदीं खूष ठेवून पेन्शन घेण्याच्या पूर्वींच, एका जानेवारीच्या पहिल्या तारखेला, रावबहादुरी पटकाविली होती. लोकवार्ता खरी मानावयाची असेल तर रावसाहेबांच्याजवळ मायाही भरपूर होती. इतकी माया त्यांच्याजवळ कशी; यासंबंधीं कुटाळ लोक कांहींतरी बोलत असत. पण पेन्शन घेतल्यापासून रावबहादूर जरा धार्मिक बनल्यामुळें लोकांतही त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न झाला होता. व्रतें, उद्यापनें, सोवळें-ओवळें, एकादशी-द्वादशी अशा गोष्टी ते करूं लागले होते व अलीकडच्या सुधारकांना संध्याकाळच्या वेळीं घरांत बसून वेंचक शिव्या देण्याचा त्यांचा परिपाठ होता; त्यामुळें त्यांचें बस्तान बरें बसलें होतें. सध्यां त्यांच्यापुढें प्रश्न म्हणजे चिरंजिवांना नोकरी लावून देण्याचा होता. चिरंजीव त्रिविक्रमराव हे कसेबसे एल्‌एल्. बी. झाले होते, व नुकतीच एका सबजजाची जागा भरण्यांत येणार होती. ती आपल्या चिरंजिवांना मिळावी म्हणून रावबहादुरांची खटपट होती. रावबहादुरांचें अधिकारीवर्गांत जबरदस्त वजन असल्यामुळें त्यांच्या मुलाला नोकरी मिळण्याला तशी हरकत कांहींच नव्हती. शिवाय ज्या साहेबांकडे ते खेपा घालीत होते त्यांची तर रावबहादुरांच्यावर उपकार करण्याला हरकत नव्हती. रावबहादुर तरी हेंच म्हणत कीं, आम्हीं इमानें इतबारें सरकारची नोकरी केली, आतां आमच्या मुलाला सरकारनें नोकरी दिलीच पाहिजे. आणि ती नोकरी याच खेपेला साध्य व्हावी असें त्यांचें म्हणणें होतें. आयती संधि आली आहे, तेव्हां आमच्या त्रिविक्रमाला लावून टाका एकदां, अशा तऱ्हेनेंच बोलणें साहेबांकडे त्यांनीं वरचेवर काढलें व साहेब तें मान्य करणार असा रंग दिसूं लागला. इतक्यांत विनायकरावांचा अर्ज साहेबांकडे आला. विनायकराव एल. एल्. बी. च्या परीक्षेत

पुष्कळ वर आले होते, आणि जरी त्यांचे वडील रावबहादुर नव्हते तरी त्यांच्या प्रोफेसर मंडळींनीं त्यांची शिफारस चांगली केली होती. खुद्द साहेबांच्या भेटींत विनायकरावांविषयीं साहेबांचें मन फारच अनुकूल झालें व एकदां रावबहादुरां-बरोबर बोलतां बोलतां त्यांनीं तें मत प्रकटही केलें. साहेबांनी असेंही सांगितलें कीं, पोलिटिकल कारण नसल्यास विनायकरावांना एकदम नोकरी देऊन टाकण्यास हरकत नाहीं. तेव्हां रावबहादुर जरा विवंचनेंत पडले. विनायकराव त्यांच्या चिरंजीवाबरोबर कॉलेजांत होते, त्यामुळें त्यांना त्यांची माहिती होती व निःपक्षपातीपणानें विचार केला तर विद्या, हुषारी आणि वय या सर्व बाजूंनीं विनायकरावांनाच ती नोकरी मिळण्याची लायकी अधिक होती हें त्यांनाही कबूल करावें लागलें असतें. परंतु सध्यां त्यांच्यापुढें स्वार्थाचा प्रश्न होता, व तो कसा सोडवावा या काळजींत ते होते. कांहीं तरी लटपट करून विनायकरावांना मार्गांतून दूर केलें पाहिजे आणि त्रिविक्रमाला लावून दिला पाहिजे; पुनः अशी संधि येतेच असें कोणीं सांगावें, असा त्यांचा विचार चालला होता. साहेबांचें मत विनायकरावांविषयीं चांगलें झालेलें, त्याविरुद्ध साहेबांसमोर बोलण्याची रावबहादुरांची छाती नव्हती. शिवाय बोलून चालून साहेबांशीं गांठ; आपल्या मुलाला नोकरी मिळावी म्हणून हा विनायकरावाविरुद्ध बोलतो आहे असें साहेबांच्या मनानें घेतलें तर सारेंच मुसळ केरांत, अशी स्थिति व्हावयाची, हाही विचार त्यांच्या मनांत आला. विनायकरावांचे बदनाम करावें अशी कांहीं त्यांची इच्छा नव्हती. परंतु आपल्या चिरंजिवांच्या मार्गांत हा कांटा काय म्हणून ? तेव्हां कांहीं का होईना, तो दूर झाला म्हणजे तिसरा माणूस नाहीं; मग सब-जजाची जागा त्रिविक्रमाला हटकून मिळेल. आणि एकदां त्रिविक्रम मुन्सफ झाला म्हणजे आपल्या मागची काळजी सुटली; मग धार्मिकपणा आणि निस्पृहपणा यांवर लोकांपुढें व्याख्यानें देण्याला हरकत नाहीं. अशा प्रकारें रावबहादुरांच्या डोक्यांत विचारांची गर्दी चालली होती. इतक्यांत धोंडोपंत आले. ते आल्या-बरोबर रावबहादुरांनीं त्यांच्याकडे मोठ्या संतुष्ट वृत्तीनें पाहिलें.

"या धोंडोपंत, बसा", रावबहादूर म्हणाले, "अरे त्रिविक्रम, आणखीं पेलाभर चहा आणायला सांग. हे धोंडोपंत तुझ्या ओळखीचे आहेत काय ?"

धोंडोपंतासारख्या गरीब माणसाची विचारपूस करण्याला त्रिविक्रमाला वेळ नव्हता तो चिरूट फुंकीत फुंकीत आंत गेला.

" खरेंच धोंडोपंत, केवळ गरिबीमुळें तुमचा कॉलेजचा अभ्यास शेवटाला गेला नाहीं ना? मला बोवा फार वाईट वाटतें तुमची हकीगत ऐकून. अहो, माझ्याकडे आला असतात तर मींसुद्धां थोडीबहुत मदत केली असती. जाऊंद्या पण आतां काय? एकूण कांहीं तरी उद्योग पाहण्यासाठीं येथें आलां आहांत."

" होय. रावसाहेब", धोंडोपंत नम्रपणानें म्हणाले, " आपल्या ओळखी-पाळखीनें दहा पांच रुपये अधिक मिळण्याची सोय झाली तर विचारावें म्हणून आपल्याला तसदी दिली."

" तसदी कसली हो ह्यांत? आपली ओळख फार जुनी, माझ्यावर तसा तुमचा हक्कच आहे. पाहतों मी कोठें जमलें तर. रहा पुण्यांत चार दिवस. खानावळबिनावळ बरी आहे ना तुम्ही जातां ती?"

" आहे. बरी आहे त्यांतल्या त्यांत."

" झालें तर मग. पुनः तुमची दैन्यावस्थाच आहे, तेव्हां घरच्यापेक्षां खाना-वळीचा बेत चार दिवस बरा वाटण्यालाही कांहीं हरकत नाहीं."

धोंडोपंताचा चेहरा जरा गोरामोरा झाला. पण रावबहादुरांच्या तो लक्षांत आला नाहीं. ते पुढें म्हणाले, "कां हो, विनायकराव तुमचा वर्गबंधुच नाहीं?"

"होय. हायस्कूलांतसुद्धां तो आणि मी एकाच वर्गात होतों. पुढें तो चांगला हुषार म्हणून स्कालर्शिपांवर त्यानें एल्एल्. बी.पर्यंत मजल मारली."

" हुषार तर खराच. विनायकराव चांगला हुषार यांत कांहींच शंका नाहीं. बाकी काय म्हणा घोकंपट्टी करून वर नंबर मारणारे कांहीं थोडे लोक असतात असें नाहीं."

" पण विनायकराव कांहीं त्यांतील नव्हे. तो चांगला बुद्धिमान् आहे. लाजाळू फार आणि बोलण्याच्या कामांत जरा कमी आहे म्हणून तो सरकारी नोकरी पाहतो आहे. त्याला वकिलीची हौस नाहीं. नाहीं तर वकिलींत त्याला पैसा मिळेल."

" न मिळायला काय झालें? मला तर वाटतें त्यानें सरकारी नोकरीच्या फंदांत न पडतां वकिलीच करावी. तो कांहीं का करीना? सध्यां तुमची सोय लागली पाहिजे म्हणतां. अगदीं लौकर लागली पाहिजे अं?"

" रावसाहेब, माझी स्थिति तोंडावाटे बोलण्याची माझी इच्छा नाहीं. अब्रूनें कसे दिवस काढावेत हीच पंचाईत आहे."

" समजलों. समजलों. तुमची स्थिति कांहीं तुम्ही बोलून दाखवायला नको. काल दुपारीं त्या......साहेबाकडे जाणार आहें, तेव्हां तुमच्याविषयीं अवश्य विचारीन. पण काय हो धोंडोपंत, तुम्हांला नोकरी मिळवून देण्याचें मी वचन देतों समजा. पण एक अट आहे."

" काय अट आहे ?" धोंडोपंतानें संशयित मुद्रेनें रावबहादुरांकडे पाहिलें !

" अट म्हणजे तशी कांहीं नाहीं, परंतु...परंतु, अट म्हणजे कांहीं विशेष नाहीं–पण —"

धोंडोपंतांना कांहींच उमगेना.

" समजा, तुम्हांला एकदम चाळीसांची नोकरी दिली तर ? मी सांगेन ते कराल ?"

" तें वाईट नसल्यास करीन."

रावबहादूर चमत्कारिक तऱ्हेनें हंसले. " मी वाईट गोष्ट तुम्हांला कशाला सांगेन ? पण हें पहा, तुम्हांला नोकरीची जरूरच असेल तर पहा. उगीच भीडभाड कशाला ? वाईट कांहीं नाहीं आणि तुमचा फायदा आहे."

" पण असें मीं केलें तरी काय पाहिजे ?"

" विशेष कांहीं नाहीं. आज दुपारीं मी साहेबांकडे जाणार आहें तेव्हां मजबरोबर चला. मी तुम्हांला नेऊन भेटवतों. तुमची शिफारस करतों. कदाचित् विनायकरावासंबंधीं बोलणें निघालेंच तर—"

" तर–तर–काय ?" धोंडोपंत जरा भांबावला.

" जरा राजकीय बाबनींत विशेष लक्ष घालतों म्हणून सांगा."

" तें काय म्हणून ?" धोंडोपंतांनीं जरा आवेशानें विचारलें. रावबहादूर हंसले व थोडेसे शरमले, पण तें त्यांनीं बाहेर दाखविलें नाहीं. एकदां धोंडोपंताकडे निरखून पाहून ते म्हणाले, " छे छे त्यांत विशेष नाहीं. परवां साहेब आपले विचारीत होते. तुम्हांला जरा विशेष माहिती आहे विनायकरावांची. ठीक आहे; तुम्ही आतां जा. दुपारीं साहेबांची गांठ जरूर घालून देईन. तीन वाजेपर्यंत या; एक जागा रिकामी आहे व मिळण्याचा संभव आहे."

धोंडोपंत नमस्कार करून जावयास निघाले. रावबहादूरही जरा त्यांच्याबरोबर जिन्यापर्यंत गेले व तेथें त्यांच्याशीं कांहीं कुजबुजले व मग तीनवाजेपर्यंत या, नाहीं तर पुनः येण्याची जरूरी नाहीं ! इतकें बोलून परतले.

[ २ ]

धोंडोपंत बिऱ्हाडीं परत आले. रावसाहेबांच्या बोलण्याचा अर्थ त्यांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिला नाहीं. त्यांचें सर्व बोलणें त्यांच्या कानांत गुणगुणत होतें, व रावबहादुरांचा त्यांना रागही आला; पण एका क्षणांत स्वतःची दैन्यावस्था त्यांच्यापुढें उभी राहिली. वाढता संसार आणि दारिद्य यांचा देखावा नेत्रांपुढें सरकून, चाळीस रुपयाची नोकरी मिळाल्यास आपली ददात संपेल; रावबहादुरांनीं मनांत आणल्यास त्यांना अशक्य नाहीं; साहेबलोकांत त्यांचें वजन आहे; असेही विचार त्यांच्या मनांत आले. परंतु स्वार्थाच्या पायीं दुसऱ्याचा नाश करावा, दुसऱ्याच्या विरुद्ध सांगावें ही गोष्ट त्यांना कशीशीच वाटली. शिवाय विनायकरावांचा त्यांचा बराच परिचयही होता. विनायकरावांचें त्यांनीं वाईट चिंतावें असा त्यांचा कोणताही अपराध त्यानें केला नव्हता. धोंडोपंतांच्या मनांत विनायकरावांविषयीं कांहीं बुद्धि असेल तर ती चांगलीच बुद्धि — प्रेमाची आणि आदराची बुद्धि होती. शिवाय चहाडखोरपणानेंच नोकरी मिळवायला रावबहादुरांची पण मध्यस्थी आणखीं कशाला? हेंही त्यांच्या मनांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. परंतु या सर्व गोष्टी मनात आल्यावर पुनः त्यांना आपल्या दारिद्याची आठवण झाली. लहानपणीं आपल्या उमेदी काय होत्या आणि आपलीं मनोराज्यें काय चालत, व आतांची वस्तुस्थिति त्या मनोराज्याहून किती निराळी आहे हें त्याच्यापुढें उभें राहिलें. विनायकराव माझा कोण आणि मी त्याचा कोण? माझा फायदा होत असतांना मीं त्याची परवा काय म्हणून करावी? असेंही एकदां त्यांना वाटलें. बराच वेळ ते विचार करीत होते, तरी त्यांचा निर्णय होईना. रावसाहेबांचा उपदेश ऐकल्यास ददात संपेल; न ऐकल्यास आहे ह्याच दरिद्रावस्थेंत काळ कंठावा लागेल. पण त्यांचा उपदेश ऐकावयाचा म्हणजे काय करावयाचें? त्यांचा उपदेश ऐकावयाचा म्हणजे जाणून बुजून चहाडखोरपणा करावयाचा. आणि क्षणिक सुखासाठीं — छे, पण क्षणिक सुख का? सद्गुणांच्या क्षणिक रक्षणासाठीं जन्माचें नुकसान करून घेणें तरी बरें काय? पुष्कळ वेळ विचार करून सुद्धां धोंडोपंतांचा निर्णय होईना. त्यांचें डोकें मात्र भणभणूं लागलें.

अकरा वाजायला आले तेव्हां धोंडोपंत खानावळीकडे जाण्यासाठीं म्हणून निघाले. चार पांच मिनिटें रस्ता चालले नाहींत तोंच त्यांची व विनायकरावांची गांठ पडली.

" धोंडोपंत, अरे तूं इथें कसा ? आणि चालला आहेस कोणीकडे ? "

" असाच आलों होतों. तुम्ही इथेंच असतां वाटतें. "

" हो, आम्ही इथेंच असतों. पण तुम्ही चाललांत कुठें ? "

विनायकरावानें हंसत हंसत विचारलें.

" मी चाललों आहे खानावळीकडे."

" खानावळीकडे ? शाबास. मग, चला माझ्याकडे जेवायला. "

" घरीं अगोदर वर्दी दिल्याशिवाय ? "

" अरे, मग घर कशाला ? घर म्हणजे कांहीं खानावळ नव्हे. आणि आज तूं बऱ्याच दिवसांनीं भेटला आहेस. "

" तुम्हीं म्हणे काय सरकारी नोकरीची खटपट चालविली आहे ? "

" अगोदर तें ' तुम्ही आम्ही, बोलण्याचें सोडून दे पाहूं ".

" बरें बोवा, तुझी मर्जी ".

" हां, असा ये ताळ्यावर. होय, नोकरीची खटपट चालली आहे, मिळेल तेव्हां खरें. पण तूं जेवायला येणार ना माझ्याकडे ? "

" तुझा आग्रहच आहे तेव्हां येतों. "

" मला जर तूं येणार हें अगोदर कळतें, तर तुला खानावळींत जाण्याची जरूरच पडली नसती. चल, आज पुष्कळ दिवसांनीं भेटतो आहेस. जेवण करूं, गप्पाविप्पा मारूं, तुझी हकीगत मला कळेल, माझी तुला कळेल. "

याप्रमाणें बोलत बोलत विनायकराव धोंडोपंताला आपल्या घरीं घेऊन गेले. विनायकरावांचा तो निगर्वी स्वभाव धोंडोपंताला लहानपणापासून माहीत होता. त्यांच्या बुद्धिमत्तेप्रमाणेंच मनाचा मोकळेपणाही फार मोठा होता. परंतु आपण विद्येत मागें राहिलों, हा इतका पुढें आला, तरी याच्या पूर्वीच्या वर्तनांत अंतर नाहीं, अगत्यांत कमीपणा नाहीं हें पाहून धोंडोपंताला फार समाधान झालें व रावबहादुरांच्या भाषणांमुळें त्याची जी चलबिचल झाली होती ती अगदीं नाहींशी झाली. चाळीस रुपड्यांसाठीं विनायकरावांचा घात करावयाचा नाहीं असा त्यानें निर्धार केला व रावबहादुरांविषयीं आलेला त्याचा तिटकारा वृद्धिंगत झाला. विनायकरावांच्या घरीं गेल्यावर त्याला भोजनापूर्वी घटकाभर विचार करण्याला वेळ मिळाला. त्यांत त्यानें रावबहादुरांचे दांत जमलें तर त्यांच्या घशांत घालावयाचें ठरविलें व रावबहादुरांसारख्या निवळ स्वार्थपरायण

माणसाशीं जशास तसें वागण्यांत कांहींच पाप नाहीं असा त्यानें सिद्धांत केला. शिवाय, सकाळच्या संभाषणांत रावबहादुरांनीं आपल्या गरिबीला अनुलक्षून काढलेले उद्गार तो विसरला नव्हता. रावबहादुरांनीं बोलावल्याप्रमाणें तीन वाजतां त्यांच्याकडे जावयाचें, त्यांनीं ' तुझें ठरलें का ? ' म्हणून विचारल्यास होय म्हणावयाचें आणि साहेबांकडे जाऊन त्यांच्यापुढें शिफारस करून घ्यावयाची आणि मग —

विनायकरावांनीं धोंडोपंताला पाय धुण्यास सांगितलें. जेवतांना ते काय बोलले याचें वर्णन करण्याची फारशी जरूरी नाहीं. जगांत जेवढे म्हणून विषय आहेत त्यासंबंधीं तें बोललें. इंग्रजी चौथ्या पांचव्या इयत्तेपासून तों प्रिव्हिअसच्या वर्गापर्यंत धोंडोपंत आणि विनायकराव बरोबर होते. अर्थात् त्या काळांतील सहाध्यायी आणि शिक्षक यांच्याविषयीं वर्णनें त्यांच्या संभाषणांत भरपूर होतीं. अमका प्रोफेसर घोकून येत असे; फलाणा प्रोफेसर पुस्तकांत कोरे कागद टांचून त्यांवरून नोटा उतरून ठेवी; वगैरे महत्त्वाच्या गोष्टींची त्यांनीं पुनरावृत्ति केली. बरोबर जी मंडळी होती त्यांपैकीं कोणाचें काय झालें अशी विचारपूसही त्यांनीं केली. जेवण झाल्यावर बराच वेळ त्यांच्या याच गप्पा चालल्या होत्या.

" मग तुला ही मुन्सफाची जागा मिळण्याचा संभव आहे म्हणतोस ? "

" हो, मी म्हणतों आहें. त्या साहेबाच्या हेड क्लार्कनें मला सांगितलें कीं, बहुधा माझी नेमणूक होईल म्हणून. मग काय होईल तें खरें. "

" सरकारी नोकरीपेक्षां वकिली तुला बरी वाटत नाहीं काय ? "

" बरी वाटून काय फायदा ? वकिली चालली पाहिजे ना ? आतां पांच पांच वर्षें माशा माराव्यात तेव्हां वकिलींत बसला तर जम बसतो. पुनः वर्षभरसुद्धां दम धरण्यासारखी माझी स्थिति नाहीं. माझ्यामागें माणसें किती आहेत, हीं तूं पाहतोसच. प्रिन्सिपालसाहेबांनीं शिफारस चांगली केली आहे आणि मलाही जरुरीच आहे. "

" ठीक आहे. सरकारी नोकरी म्हणजे कांहीं वाईट नव्हे ".

" वाईट तर नव्हेच. परंतु सारेच कांहीं प्रिन्सिपाल परांजपे नाहींत. शिवाय प्रिन्सिपाल परांजप्यांची योग्यता असेल तरच या स्वार्थत्यागाचें चीज होतें. आपण दुबळीं माणसें आहोंत. त्यांतल्या त्यांत अधिक सोय कशांत होईल याच्या पलीकडे आपली दृष्टि जावी तरी कशी ? मला पुष्कळ वेळां वाटतें कीं, स्वतंत्रपणें

धंदा करून कांहीं तरी करावें. पण स्वतंत्रपणें धंदा करणें दरिद्री माणसाला शक्य नाहीं. वास्तविक ही जबाबदारी श्रीमंतांच्या मुलांवर आहे."

"खरें आहे."

"म्हणजे आमच्यासारख्या गरिबांवर नाहीं असें नव्हे. परंतु ज्यांना स्वास्थ्य भरपूर आहे त्यांना स्वतंत्र धंदा करणें जड नाहीं."

धोंडोपंतांनीं त्यावर कांहीं उत्तर दिलें नहीं.

"अलीकडे किती तरी पेन्शनर मंडळी सरकारी नोकरी करूं नका, कांहीं देशकार्य करा म्हणून दुसऱ्यांना—माझ्यासारख्यांना सांगतात; पण देशकार्यांत आपल्या मुलांना घालत तर नाहींतच पण त्यांना नोकऱ्याही लावून देतात. वास्तविक त्यांच्याजवळ पैसा भरपूर असतो; त्यांच्या मुलांचें नोकरीशिवाय चालण्याजोगें असतें. अशा प्रकारें गरिबांची दुहेरी त्रेधा आहे."

धोंडोपंत किंचित् हंसला. कांहीं वेळ आणखीं बोलणें झाल्यावर संध्याकाळीं जेवायला येण्याचें कबूल करून धोंडोपंतांनीं विनायकरावाची रजा घेतली.

[ ३ ]

रावबहादुर फारच खुषींत होते. साहेबाकडे जाऊन धोंडोपंताला भेटवूं, त्यांची खूप शिफारस करूं, मग साहेब त्याला एखादी नोकरी देवोत वा न देवोत. विनायकरावांविषयीं बोलणें काढून त्यांचा राजकीय बाबतींत जरा विशेष संबंध आहे एवढें धोंडोपंतांकडून वदविलें कीं आपलें काम झालें. साहेब सरळ आहेत तरी राजकीय दृष्टीचा चष्मा डोळ्यांवर चढला आणि त्यांतून अल्प स्वल्प संशयित असें कांहीं दिसलें तरी विनायकरावांना नोकरी मिळणार नाहीं व विनायकरावास नोकरी नाहीं मिळाली कीं, पुढच्या गव्हर्मेंट ग्याझेटांत त्रिविक्रमाची नेमणूक जाहीर झाल्याशिवाय रहात नाहीं, अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनांत येत होते. हा सारा व्यूह रचण्यात विनायकरावाला बिचाऱ्याला आपण निष्कारण तोफेच्या तोंडीं देत आहोंत हा विचारही त्यांच्या मनात आला नाहीं. वास्तविक एखाद्यासुद्धां साहेबाची विनायकरावासंबंधीं भलती समजून होणें त्यांना सदादित बाधक होईल, एवढें तरी रावबहादुरांच्या मनांत यावयाचें होतें. पण आपल्या स्वार्थापुढें तसला विचारसुद्धां त्यांना सुचला नाहीं. रावबहादुराना तत्त्वज्ञानाची चांगली माहिती होती व अलीकडच्या मुलांनीं देशकार्य करावें वगैरे गप्पाही ते कधीं कधीं बोलत असत; व या गप्पा मारतांना सरकारला व सरकारी नोकरीला शिव्या देण्यालाही

कमीं करीत नसत. मात्र या शिव्या अलीकडच्या मुलांसमोरच चालत; व या मुलांनाही रावबहादुरांसारख्यांचा हा उपदेश जरा विशेष महत्त्वाचा वाटे. अशा गप्पा मारल्यानें रावबहादुरांना लोकांत जरा मान मिळे. तिकडे किती का फाटक्या साहेबाची गांठ पडेना, रावबहादुराची दृष्टि त्याच्या बुटाकडे; त्यामुळें त्यांच्या भरून वाहणाऱ्या राजनिष्ठेची शंका कोणाला येणेंच शक्य नव्हतें. आणि अशा आपल्या राजनिष्ठेचें बक्षीस म्हणूनच आपल्या चिरंजिवांचा सरकारी नोकरीवर हक्क आहे; अलीकडच्या भकलेल्या पोरांना नोकरींत शिरूं देतां उपयोगी नाहीं, अशा गोष्टी ते तिकडे बोलत. आज रावबहादूर जोरांत होते. पावणेतीन वाजतां धोंडोपंत आले. रावबहादुरांनीं त्यांना मोठ्या आदरानें या बसा म्हटलें, व चहा वगैरे घेऊन चार वाजतां निघूं म्हणून सांगितलें. धोंडोपंत रावबहादूर बोलतील त्याला होय होय म्हणत बसले. रावबहादुरांच्या राजनिष्ठेला आज जरा महापूर आला होता. धोंडोपंतांनीं त्यांची देशभक्तीवरचीं व्याख्यानेंही ऐकलीं होतीं, तेव्हां हा विचारांत विसंगतपणा कशामुळें आला असें रावबहादुरांना विचारण्याचा मोहसुद्धां त्यांना एकदां झाला पण त्यांनीं तो आवरला. काय करावयाचें हें त्यांनीं ठरविलेंच होतें. तेव्हां साहेबांची गांठ पडेपर्यंत आपण दमानेंच घेतलें पाहिजे; परत येतांना रावबहादुरांचा टांगा मिळणार नाहीं; चालत यावें लागेल हें ते समजून होते. रावबहादूर उठून चूळ वगैरे भरून आले व चहापाणी झाल्यावर ते कपडे करण्याला उठले. अलिकडच्या मुलांच्या छानछोकीवर त्यांचा नेहमीं कटाक्ष असे, तरी आरशासमोर घटकाभर उभे राहून आज नेपथ्यविधान करण्याला ते मुळींच कचरले नाहींत. बरोबर चारांच्या ठोक्याला त्यांचा टांगा त्यांना व धोंडोपंतांना घेऊन निघाला. धोंडोपंत आतां आपल्या अगदीं हातांत आला असें समजून साहेबाला काय काय सांगावें हें ते त्याला वाटेंत पढवीत होते.

साहेबांच्या दिवाणखान्यांत प्रवेश झाल्यावर प्रथम रावबहादुरांनीं धोंडोपंताचा परिचय करून दिला. परिचय करून देतांना त्यांनीं धोंडोपंताच्या हुशारीची बरीचशी शिफारस केली व गरिबीमुळें जरी त्यांचें शिक्षण कडेला गेलें नाहीं तरी ग्रॅजुएटापेक्षां ते कोणत्याही प्रकारें कमी नाहींत असें त्यांनीं सांगितलें. साहेबांनीं धोंडोपंताला इकडचे तिकडचे कांहीं प्रश्न विचारले. त्यांचीं धोंडोपंतानें उत्तरें दिलीं. कांहीं वेळ गेल्यानंतर साहेब धोंडोपंताकडे वळून म्हणतो; "चहा घेण्याला तुमची कांहीं हरकत नाहीं ना?"

धोंडोपंतांनीं रावबहादुरांच्या चेहऱ्याकडे पाहिलें, पण त्यांचा चेहरा दुसरीकडेसच होता. " माझी कांहीं हरकत आहे असें सांगणें म्हणजे खोटें बोलण्यासारखेंच होईल. पण रावबहादूर धार्मिक आहेत. त्यांना तें आवडणार नाहीं. " धोंडोपंत म्हणाले

" अं, " साहेब बोलले, " रावबहादूर वाटेल त्याच्याकडे चहा घेतात. तुमची हरकत नसणार हें मला माहीतच होतें. अलिकडे तुमचे सारे लोक वाटेल तेथें चहा घेतात, पण प्रसिद्धपणें मात्र तसें सांगण्याला धजत नाहींत. त्याला तुम्ही अपवाद दिसतां ही संतोषाची गोष्ट आहे. "

रावबहादूर मात्र धोंडोपंताकडे साहेबाला न दिसेल अशा बेतानें एवढाला डोळा करून पहात होते.

"धोंडोपंतांना विनायकरावांची चांगली माहिती आहे." रावबहादूर म्हणाले.

" खरें कीं काय ? " साहेब उद्गारले. " माझें मत त्या गृहस्थाविषयीं चांगलें झालें आहे. तुमची त्याची ओळख कुठली ? "

" मी व तो बरेच दिवस एकाच शाळेंत होतें " धोंडोपंतांनीं उत्तर दिलें. " विनायकराव फारच चांगला मनुष्य आहे. "

" पण—पण—" रावबहादुर जरा त्रासिक स्वरानें म्हणाले.

" पण काय आहे बुवा त्यांत ? " साहेबांनीं विचारलें.

" नाहीं–अलीकडच्या राजकीय चळवळी—" रावबहादुर जरा हलक्या स्वरांत बोलले.

" हो ? हो ? धोंडोपंत म्हणाले, " अलीकडच्या राजकीय चळवळीशीं आपल्या रावबहादुरांचा संबंध आहे तितकासुद्धां विनायकरावांचा नाहीं. "

" म्हणजे मुळींच नाहीं ", रावबहादुर जरा रागानें धोंडोपंताकडे पहात बोलले.

" हो, म्हणजे मुळींच नाहीं. कारण तुमचाही राजकीय चळवळीशीं संबंध मुळींच नाहीं", साहेब म्हणाले."एकूण विनायकराव उत्तम मनुष्य आहे म्हणतां. त्याच्या हुषारीविषयीं कांहीं कोणाची शिफारस नकोच. प्रत्यक्ष माझ्या भेटींत त्याबद्दल माझी खात्री झाली. पण धोंडोपंत, विनायकराव वकिली कां करीत नाहीं ? वास्तविक हुषार माणसाला तिकडे अधिक प्राप्तीचा संभव. "

" वकिलीच्या प्राप्तीचा नियम नाहीं आणि ती घरीं येण्याला फार दिवस

वाट पाहिली पाहिजे. विनायकरावांची स्थिति गरिबीची आहे व त्याच्यावर चार माणसांचा बोजा आहे. तेव्हां त्यांना नोकरी धरल्यावांचून गत्यंतर नाहीं."

" खरें आहे " साहेब म्हणाले.

आणखीं कांहीं वेळ संभाषण झाल्यावर साहेबांनीं भेटावयास आलेल्या मंडळींना निरोप दिला.

" मिस्टर धोंडोपंत, मला उद्यां याच वेळीं भेटा रावबहादुरांनीं तुमची शिफारस केलेलीच आहे शिवाय ती शिफारस मला वावगीही दिसत नाहीं. माझे एक व्यापारी स्नेही आहेत. त्यांना चांगला सचोटीचा कारकून पाहिजे, उद्यां ते मजकडे येणार आहेत."

रावबहादुर आणि धोंडोपंत बाहेर पडले. रावबहादूर तडक टांग्याकडे गेले. धोंडोपंतांना ते 'या' सुद्धां म्हणाले नाहींत. संध्याकाळचे पांच वाजले होते. उन्हाचा ताप कमी झाला होता व धोंडोपंत रावबहादूर नसल्यामुळें त्यांना चालण्याची संवय होती. ते झाल्या प्रकाराबद्दल विचार करीत यशस्वी मुद्रेनें चालूं लागले.

बरोबर पंधरा दिवसांनीं विनायकरावांची नेमणूक ग्याझेटांत जाहीर झाली. धोंडोपंतांनाही साहेबांनीं आपल्या व्यापारी मित्राकडे नोकरी लावून दिली. रावबहादुरांचे चिरंजीव मात्र चिरूट फुंकीत बसले आहेत. रावबहादुरही अलीकडे देशभक्तीवर घरांतल्या घरांत व्याख्यानें देत असतात.

नवयुग — जानेवारी १९१६

# " आंतरः कोऽपि हेतुः "

तो फोटो पाहिल्यपासून गुलाबराव अगदीं बेहोष झाले होते. त्यांना कांहीं सुचेना. नित्यक्रमाप्रमाणें ते संध्याकाळीं टेनिस खेळण्याससुद्धां गेले नाहींत. रात्रीं क्लबांत जेवावयाला जाण्याची वेळ झाली, त्यांचे दोघेतिघे स्नेही खोलीचें दार खडखडावून गेले, तरी गुलाबराव आपल्या तारेंतच होते. शेवटीं त्यांचे अगदीं जीवश्चकंठश्च मित्र छबूनाना आले व म्हणाले, " काय रे गुलाब, तुला काय जेवायचें खायचें नाहीं वाटतें आज ? किती वाजले पाहिलेस का ? "

गुलाबराव आपल्याच विचारांत मग्न होते. त्यांची दृष्टि छबूनानांकडे वळली, पण छबूनानांना त्यांनीं ओळखलें असेंसुद्धां दिसलें नाहीं, एखाद्याची तंद्री लागली त्याप्रमाणें त्यांची चर्या झाली होती.

" असा रे काय भ्रमिष्टासारखा पाहतोस तूं ? " छबूनानांनीं जरा मोठ्या आवाजांत विचारलें. " कांहीं पिशाचबाधा झाली नाहीं ना तुला ? "

" व्यतिषजति पदार्थानांतरः कोऽपि हेतुः " गुलाब म्हणाला. " काय त्या भवभूतीचें काव्य ! "

" अरे गृहस्थ, आतां जेवायची वेळ झाली आहे. या वेळीं भवभूतीच्या महाकाव्यापेक्षां भाजीभाकरीचें महत्त्व अधिक आहे. चल, जेवायला चल. "

" छेः बुवा, आज मला भूक आहे का नाहीं हें पण समजत नाहीं. प्रणयाच्या ज्वालांनीं मी कसा होरपळून निघालों आहें ? "

" या कसल्या ज्वाला काढल्यास तूं ? नुकतीच संक्रांत झाली. होळीला अद्यापि अवकाश आहे. इतक्यांत कसल्या ज्वाला ? "

" अरे प्रणयाच्या ! "

" असतील ! फार तर प्रथम बाथरूममध्यें जाऊं; तुझ्या अंगावर ओततों चार बालद्या गार पाण्याच्या, म्हणजे होरपळला आहेस तो बरा होशील. ऊठ. "

" कसला रे अरसिक तूं ! अरे वेड्या, आज एका सुंदरीचें मला दर्शन झालें. तिची माझी गांठ जर लौकरच पडली नाहीं, तर माझे प्राणहि राहणार नाहींत. "

" प्राणाचा काय संबंध आहे या ठिकाणीं ? सध्यां प्रश्न असा आहे, कीं, जेवल्याशिवाय आपली भूक राहील का ? आणि ही सुंदरी कोण पाहिलीस तूं ? "

" पाहिली नाहीं रे; दिसली. "

" कुठें दिसली ? "

" फोटोंत ".

" फोटोंत ? कुणाच्या ? "

" अरे मूर्खा तिच्या. दुसऱ्याच्या फोटोंत का ती दिसली असती ? "

" आणि या फोटोकडे पाहून तुला प्रणयाच्या ज्वाळांनीं होरपळायला सुरवात केली ? "

" तें कांहीं विचारूं नकोस. "

" पण वेड्या, हा जाळ किती जरी पेटला तरी त्यावर चहासुद्धां होणार नाहीं. फार तर सिगरेटसुद्धां पेटणार नाहीं. तेव्हां स्वयंपाक तर होणारच नाहीं. मग तूं क्लबांत येणार नाहींस ? "

" आतां कसला क्लब मला ? ही सुंदरी कधीं भेटेल आणि तिच्याशीं लग्न कधीं करीन असें मला झालें आहे."

" काय वेडा आहेस रे तूं ? ही सुंदरी का उंदरी तुला का आतां आज भेटणार आहे ? आणि तुझें लग्न का तावडतोब लागणार आहे ? निदान मुहूर्त तर पाहिला पाहिजे. सांडगे–पापड राहिले, तरी एकदोन पक्वान्नांची तरी तयारी झाली पाहिजे. तोंपर्यंत आपण क्लबांतून जेवून येऊं. "

गुलाबरावांनीं एक दीर्घ उसासा टाकला. मग एकदां डोळे मिटले. बहुधा त्या वेळीं त्यांनीं त्या दिवशीं पाहिलेल्या सुंदरीचें मुखकमल अंतश्चक्षूंनीं पाहिलें असेल. मग त्यांनीं डोळे उघडले. छबूनानांचा हात घट्ट धरून ते म्हणाले, " छब्या, मला एक वचन दे ".

" एक सोडून दहा वचनें देतों तुला, पण अगोदर क्लबांत जेवायला चल".

" वचन असें पाहिजे, कीं, या सुंदरीच्या प्राप्तीसाठीं तूं मला मनोभावानें मदत करशील."

" तुला पाहिजे तर वचन घे. पण ही सुंदरी का दरी कोण हें तुलासुद्धां माहीत नाहीं, तर तिच्या प्राप्तीची तूं खटपट तरी काय करणार आणि मी तुला मदत तरी काय करणार ? "

" तूं मदत करण्याला तयार आहेस ना ? "

" अगदीं दोन्ही पायांवर आणि दोन्ही हातांवर. पण तूं अगोदर जेवायला चल."

" जेवायला येतों, पण एक तुला सांगतों."

" मग सांगेनास ?"

" छेः छेः, आतांच सांगणें जरूर आहे. पण तूं कोणाला सांगणार नाहींस ना ?"

" छेः, त्याची काळजीच नको तुला."

" तूं मला विचारलेंस कीं, या सुंदरीची मी प्राप्ति कशी करून घेतली ?"

" उघडच आहे. तिच्यासंबंधीं तुला कांहींच माहिती नाहीं. तूं नुसतें चित्र पाहिलेंस—"

" नुसतें पाहिलें नाहीं, तें मीं घेतलें आणि येथें या ज्याकिटाच्या आंत माझ्या अगदीं हृदयाजवळ मीं तें ठेवून दिलें आहे. नांव गांव नसलें तरी तिचा फोटो मजजवळ आहे. म्हणून तर माझी सारी आशा. मी का असा अगदीं वेडा आहे ?"

" भलतेंच कांहीं तरी. आणि शिवाय प्रेमाच्या उबाऱ्यानें डोकें असें गरम होण्याची संवय पुष्कळांना असते—"

" छबू—"

" गुलाब—"

" ही माझी संवय नाहीं. आजपर्यंत मीं पुष्कळ स्त्रिया पाहिल्या आहेत. त्यांपैकीं एकीनेंहि माझें चित्त हिरावून नेलें नाहीं. पण ही मीं माझ्या—"

" ज्याकिटाच्या आंत ठेवलेली—"

" अंतःकरणाजवळ बाळगलेली सुंदरी–हिच्या दर्शनानें मी नुसता वेडा झालों आहे. तुला तो " आंतरः कोऽपि हेतुः " हा श्लोक माहीत आहेच."

" हो परीक्षेसाठीं घोकला होता."

" तो मला पोरकट वाटे. पण आतां माझी खात्री झाली."

" झाली ना खात्री ? मग चल जेवायला."

" पण तो फोटो तुला पाहण्यास नको का ?"

" जेवल्यावर पाहिला तर नाहीं का चालणार ?"

" तूं पाहिलास कीं तुझी तहानभूकच हरेल. "

" म्हणून म्हणतों अगोदर पोटभर जेवूं, पाणी यथास्थित पिऊं आणि मग हा क्षुधामांद्य उत्पन्न करणारा तुझ्या सुंदरीचा फोटो पाहूं. "

" पण मला तूं वचन देतोस ना ? "

" वचन कसलें ? "

" तिची प्राप्ति मला व्हावी म्हणून तूं मला, सर्व प्रकारें, कोणत्याहि अडचणीला न जुमानतां मदत केली पाहिजेस. "

" हें वचन लेखी देऊन खालीं एक आण्याचें तिकिट लावून सही केली पाहिजे कीं काय ? "

" नाहीं, नाहीं. तूं वचन दिलें म्हटलेंस कीं पुरें. माझा तुझ्या शब्दावर विश्वास आहे. "

छबूनानांनीं गुलबरावाचा हात घट्ट धरला व ' हें घे वचन ' म्हणून त्याला सांगितलें. तेव्हां गुलाबरावाचा चेहरा थोडा सतेज झाला आणि त्यावर थोडेसें हास्यहि चमकलें.

" तूं कसलें वचन दिलें आहेस हें तुला तो फोटो पाहिल्यावर कळेल. कारण, छबूनाना, तिचें चित्रगत दर्शन झाल्यावर तूं नुसता बेहोष होऊन जाशील अशी माझी खात्री आहे. "

" चित्रगत दर्शनानें बेहोषच होईन ना ? दिवंगत नाहीं ना होणार ? घे, मी माझ्या वचनाचा पुनरुच्चार करतों आणि तुझें अनेकवचन होण्यास निदान माझ्याकडून केव्हांहि आडकाठी येणार नाहीं, हें मी तुला निश्चयपूर्वक सांगतों."

छबूनाना हा वेळपर्यंत दारांत उभे होते ते आंत आले व टेबलाजवळ इझीचेअरवर त्यांनीं आंग टाकलें. गुलाबरावांनीं टेबलाच्या खणांतून फोटो काढला व तो मोठ्या औत्सुक्यानें आपल्या मित्राच्या पुढें धरला—

" पहा, तो गोंडस चेहरा, ते नीटस डोळे, ते रसरशीत ओंठ, ते नाजूक हात—"

फोटोकडे पाहून छबूनाना गारीगार झाले असावेतसें दिसलें व त्यांनीं एक वेळ गुलाबरावाकडे निरखून पाहिलें व एक वेळ स्वतःचें डोकें खाजविलें. मग ते उठून म्हणाले—" चल गुलाबराव, चित्र पाहून मी बेहोष झालों, हें कबूल करतों; पण मला भूक फार सपाटून लागली आहे. "

[ २ ]

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं गुलाबराव आरशासमोर बरोबर सव्वादोन तास उभे होते. बरोबर चार वाजतां त्यांनीं स्वहस्तें दाढी केली. ती मोठ्या कसोशीनें केली हे सांगावयास नकोच. त्यांच्या मिशांचा नूर फ्रेंच फयाशनवर असे. तो त्यांनीं अगदीं बरोबर बसविला. दहा वेळां तरी त्यांनीं चेहऱ्यावर हात फिरवून त्याला जरूर तो गुळगुळीतपणा आला आहे का नाहीं हें पाहिलें. मग त्यांनीं फेसपावडरचा एक हात मारला. नंतर डोक्याचे केंस साफ करून, त्यावर जरूर त्या तैलअत्तरादिकांचा यथाप्रमाण वर्षाव करून, त्यांनीं ते जितके मर्दानी व मोहक दिसतील तितके केले. सुंदर रेशमी शर्ट घालून मग लंगोटीसंप्रदायाच्या पुरस्कर्त्यांनीं ज्याला गळोटी हें नांव दिलें आहे तो " टॉय ", " बो " करून त्यांनीं घातला. डाव्या मनगटांत सोन्याचें सुरेख घड्याळ बांधून टाकलें. उजव्या हातांत लव्हेंडरच्या वासानें भरलेला रेशमी रुमाल त्यांनीं घेतला व पॉलिश केल्यामुळें नीग्रोच्या तुळतुळीत गालाप्रमाणें गुलजार दिसणारा बूट त्यांनीं साडेसात रुपये किंमतीच्या मोज्याच्या जोडीवर चढविला.

आपल्या मित्राचें हें नेपथ्यविधान चाललें असतां छबूनाना त्याकडे पहात होते. त्याचा चेहरा आपल्याकडे असला म्हणजे ते एखादी सूचना करीत; चेहरा फिरला कीं ते हंसत. अशा प्रकारें एकदां साडेसहा वाजण्याच्या सुमारास गुलाबराव तयार झाले.

" अरे गुलाब, " छबूनाना त्याच्या दोन्ही खांद्यांवर दोन हात ठेवून म्हणाले, " आज तुझ्याकडे पाहून रंभासुद्धां गडबडून जाईल यांत कांहीं शंका नाहीं. पोषाखानें माणसाच्या स्वरूपांत किती सुधारणा होईल हें आतापर्यंत माझ्या लक्षांतच आलें नव्हतें. "

" म्हणजे मी काय अगदींच टाकाऊ स्वरूपाचा आहे काय ? "

" छे छे, तुझ्या स्वरूपाला टाकाऊ म्हणणाराची अक्कलच टाकाऊ असली पाहिजे. बरें, आतां बाहेर पडूं या. बरोबर सात वाजतां आपणाला भरतपौत्रसत्पात्र नाटक मंडळीच्या मॅनेजरकडे हजर झालें पाहिजे. आज शनिवार. आज त्यांची धांदल कोण असणार. ही तुझी चित्रगत सुंदरी आज तुझ्या नाटकाला येणार आहे व तिची जागा रिझर्व झाली आहे. तिच्या शेजारींच आपल्यासाठीं दोन खुर्च्या राखून ठेवल्या आहेत. तूं अर्थात् तिच्याजवळ— "

भरतपौत्रसत्पात्र नाटक मंडळीचे मॅनेजर मधुकरराव यांनीं मोठ्या मेहरबानीनें गुलाबराव व छबूनाना यांच्याबरोबर मोठी घाई असतांनासुद्धां गोखल्यांच्या विश्रांतिगृहांत कॉफी घेण्यासाठीं येण्याचें कबूल केलें होतें. मधुकरराव व छबूनाना यांची दोस्ती होती व गुलाबरावांची चित्रगत सुंदरी मधुकररावांना माहीत होती. तेव्हां मित्रकार्य करण्याच्या सद्बुद्धीनें छबूनानांनीं हा सर्व योग जुळवून आणला होता. भरतपौत्रसत्पात्र मंडळी मुंबईला येऊन एक आठवडाच झाला होता. आजचें शनवारचें त्यांचे चौथें नाटक होतें. कंपनी नवीन असतांहि केवळ एका आठवड्यांत मुंबईकरांवर तिनें चांगलीच छाप बसवून दिली होती. मधुकरराव हे मोठे कर्तृत्वान् मॅनेजर होते. ते पंधरा दिवस अगोदर मुंबईला आले. तेवढ्या अवधींत त्यांनीं सोळा एडिटरांची ओळख केली व त्यांना सतरा चोक अडसष्ट वेळां चहा पाजला. एका एडिटरचें पैशाच्या अभावीं लग्न अडून राहिलें होतें, त्याला त्यांनीं पन्नास रुपयांची मदत केली व जरूर लागल्यास एखाद्या खेळाचें एकतृतीयांश उत्पन्न देण्याचें कबूल केलें. स्वतःला मार्मिक समजणाऱ्या लब्धप्रतिष्ठित तीन टीकाकारांना टॅक्सींत घालून त्यांनीं एक दिवस त्यांना ठाण्यापर्यंत नेऊन आणलें. एका लोकमान्य देशभक्ताच्या हस्तें सुरवातीचा प्रयोग खुला करण्याची व्यवस्था केली. गोरक्षणफंडाला एक, गोट्या खेळण्याच्या क्लबाला एक आणि सरकारनें हद्दपार केलेल्या एका देशभक्ताला मनीआर्डर पाठविण्यासाठीं एक याप्रमाणें मदतीदाखल खेळ देण्याचें त्यांनीं कबूल केलें. त्याचप्रमाणें जावळ गांवच्या आवळीखालीं झटपट नवसाला पावणारा फुटाण्या म्हसोबा आहे, त्याला पायली फुटण्याचें वर्षासन देण्याचा त्यांनीं पतकर घेतला. या सर्व सत्कार्यांचा परिणाम असा झाला कीं, भरतपौत्र-सत्पात्र नाटकमंडळीचा प्रत्यक्ष मुक्काम होण्यापूर्वींच मुंबईत तिचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें व मधुकरराव म्हणजे अकलेचा एक कांदा आहे असें कांदेखाऊ लोकांनींसुद्धां कबूल केलें. पहिल्या खेळापासूनच मंडळीच्या उदरीं शनि आला व सर्वजण मधुकररावांना धन्यवाद देऊं लागले. तेव्हां मधुकरराव म्हणजे कांहीं लहान सामान्य व्यक्ति नव्हती, हें निदान् वर्तमान-पत्रांच्या वाचकांना तरी सांगण्याची जरुरी नाहीं.

बरोबर सात वाजतां गुलाबराव व छबूनाना मॅनेजरसाहेबांकडे हजर झाले. त्यांना पाहतांच मधुकररावांनीं फेटा बांधण्यास सुरवात केली. इतक्यांत त्यांच्या-

कडे एक वीस बावीस वर्षे वयाचा मुलगा आला. मुलगा म्हणण्याचें कारण त्याची आकृति लहानसर होती व त्यानें मिशा काढलेल्या होत्या. काढलेल्या होत्या म्हणजे मिशा साफ काढण्याच्या पंथांतील तो असावा असें दिसत होतें. या वेळीं त्याच्या अंगांत फक्त एक गंजीफ्राक होता व त्याचीं बटणें सुटलीं होतीं. त्यामुळें छातीवर उगवलेलें केंसांचें अरण्य कोणाच्याहि सहज दृष्टीस पडे. त्याच्या डोक्यावर केस खूप होते; किंबहुना ते केस बायकांच्या केसांसारखे वाढविले होते. एखाद्या नाटकांतील नायिका त्या केशपंजरांत सहज दडूं शकली असती. त्याचा चेहरा अगदीं जून दिसत होता. त्यांत मार्दव हें कसलेंहि नव्हतें. त्याचीं गालफडें बसलेलीं होतीं. जोंधळ्याची कापणी झाल्यावर सड उरलेलें शेत जसें दिसतें त्याप्रमाणें वस्तऱ्याचा हात दोन दिवस न फिरल्यामुळें त्याचा चेहरा दिसत होता. तमाखूच्या धुराचीं पुटेंच्या पुटें चढून ओंठ धुराड्यासारखे दिसत होते. ही स्वारी मधुकररावांपुढें इतक्या ताठरपणानें येऊन उभी राहिली कीं, असला ओंगळ माणूस किती आढ्यतेनें वागत आहे, असें गुलाबरावांना वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

" मग येतांना ? " छबूनानांनीं विचारलें.

" कुठें चाललांत मधुकर या वेळीं ! " त्या मनुष्याचा आवाज अर्ध जनानी होता. " आतां सात वाजले. आठाला तर नाटक सुरू आहे ! "

" मी आतां पंधरा मिनिटांत जाऊन येतों, बळवंतराव. "

" आणि कोणी विशेष मंडली आली म्हणजे मॅनेजर नाहींत असा बोभाटा व्हाययाचा. ही का वेळ बाहेर जाण्याची ? "

" तुम्ही अगदीं त्याची काळजी करूं नका. आज सहा माणसें दरवाज्यावर आहेत. तुम्ही अगोदर तो न्हावी आला आहे तिकडे चला. तुमचा चेहरा सध्यां कोणीं पाहिला तर—"

" काय होईल ? "

" नाटकाचें उत्पन्न कमी होईल. "

" पण प्रेक्षकमंडळी कांहीं इकडे येऊन माझा चेहरा पहात नाहींत. माझ्या रंगभूमीवरच्या स्वरूपाचीच त्यांना ओळख असते. "

" मग त्या स्वरूपाच्या तयारीला लागा. नाटक आठ वाजतां सुरू होणार ना ? "

बळवंतराव आंत गेले. त्यांची माहिती सांगण्याचें आतां फारसें प्रयोजन उरलेलें नाहीं. भरतपौत्रसत्पात्रांतील हें पहिलें पात्र असें चतुर वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. असल्या पात्रांच्या साहाय्यानें रंगदेवतेसाठीं तयार केलेलीं पक्वान्नें कशीं काय तयार होतात, असा कोणीं प्रश्न केल्यास त्याला उत्तर म्हणून सोळा एडिटरांचे सोळा अभिप्राय त्याच्या तोंडावर टाकले म्हणजे पुरे आहे.

" हे आमचे मुख्य स्त्रीपार्टी. यांचें स्वरूप आतां असें दिसलें, पण तुम्ही यांना रंगभूमीवर पहाल तर डोळे अगदीं दिपून जातील." कॉफीची वशी ओंठाला लावतां लावतां मधुकररावांनीं सांगितलें.

" आपले डोळे मुळींच दिपणार नाहींत." गुलाबरावांनीं ठासून सांगितलें. " तुम्ही रागावत नसाल तर बोलतों "

" बोला हो. आम्हीं धंदेवाले लोक. आमचे गुणदोष आम्हांला माहीत आहेत. पण भपकेदार जाहिराती हें कोणत्याहि विशेषेंकरून आमच्या धंद्याचें महत्त्वाचें अंग आहे."

" तुमच्या बळवंतरावांना रंगभूमीवर पाहून माणसांचे डोळे दिपतात म्हणतां ?" गुलाबरावानें विचारलें.

" अरे, दिपतात म्हणून काय विचारतोस ?" छबूनाना म्हणाले. " आंधळे होतात आंधळे !"

" अशा लोकांना बैल किंबहुना गाढव म्हणणें अगदीं चुकीचें होणार नाहीं." गुलाबराव म्हणाले.

" आमच्या बाळ्याला स्टेजवर पहा आणि मग या गोष्टी बोला." मधुकर-रावहि जोरानें उद्गारले.

" माझी तर गोष्ट सोडूनच द्या. पण तुम्ही सांगतां असे डोळे दिपणारे लोक असतील यावरसुद्धां माझा विश्वास नाहीं."

" मग तुम्हांला आणखीं कांहीं माहिती देतों." कॉफीचा पेला खालीं ठेवून मधुकरराव म्हणाले. " स्त्रीवेषांतील आमच्या बाळ्याचे फोटो विकून पुण्याच्या एका फोटोग्राफरनें किती तरी पैसा मिळविला."

" ही अगदीं निव्वळ झूट बात आहे." गुलाबराव म्हणाले.

" पण असा एखादा हरीचा लाल मीं तुम्हांला प्रत्यक्ष दाखविला तर ?" मधुकररावांनीं विचारलें.

"मी त्याला तोंडावर सांगेन कीं, तूं गाढवापेक्षांहि कमअक्कल आहेस म्हणून."

तें बोलणें तितकेंच राहिलें व हें त्रिकूट नाटकगृहाकडे वळलें.

[ ३ ]

नाटकाला सुरवात झाली, पण गुलाबरावांचें चित्त नाटकाकडे नव्हतें. जवळच्या खुर्चीवर त्यांचें हृदय चोरून नेणारी सुंदरी येऊन बसणार होती. त्या संबंधींच्या मनोराज्यांत तें चूर होते. तिचा फोटो त्यांनीं बरोबर आणला होता, व मधून मधून ते तो बाहेर काढून त्याकडे पहात असत. नाटक नवीन पद्धतीचें होतें व त्यांतील विशेष नवीनपणा म्हणजे नायिकेचा प्रवेश दुसऱ्या अंकापर्यंत नव्हताच. पहिल्या अंकांत मात्र नायक दर पावलागणिक नायिकेचें नांव घेत होता व तिच्या सौंदर्याबद्दल व नानाविध गुणांबद्दल मोरे लंबे लंबे आलाप घेत होता.

"काय रे छबू, तो बाळक्याच ना येणार ही नायिका होऊन?" गुलाबरावांनीं विचारलें.

"हो, मग?"

"त्या तसल्या ओंगळ पोरासाठीं का हा लठ्ठंभारती एवढा आक्रोश करतो आहे?"

"आंतरः कोऽपि हेतुः" एवढेंच उत्तर छबूनानानें दिलें.

"छब्या, लेका, महाकविवचनाची अशी चेष्टा करतोस? या नाटकी प्रेमाला का उद्देशून भवभूतीनें तसें म्हटलें? कोणाला लागू होत असेल तर मला आणि—" गुलाबरावांनीं फोटो काढून दाखविला.

"हें पहा, ही कांहीं वाद करण्याची जागा नव्हे. शिवाय तुझें म्हणणें मला एकदम कबूल आहे."

"तें निश्चल माणसांना चंचल करतें—" छबू पुटपुटला. नाटकांतील नायक जोरांत आला होता. आपल्या प्रियकरणीची गांठ अद्याप पडली नाहीं म्हणून शोकरसानें त्याच्या अंतःकरणाचें पाणी पाणी होऊन तें घामाच्या रूपानें गळूं लागलें व त्याच्या ताना जसजशा उंच होऊं लागल्या, तसतसा त्याचा तो पाणीदारपणा प्रेक्षकांनाहि दिसूं लागला. तरी पण रंगभूमीवर नायिकेचा जरी वास भरपूर सुटला होता, तरी तिच्या प्रत्यक्ष दर्शनाच्या अभावामुळें प्रेक्षकांना नायकाच्या शोकरसामुळें खरोखरच रडें कोसळण्याची पाळी येईलसें दिसत होतें.

आपल्या चित्रंगत सुंदरीचा अद्याप पत्ता नाहीं म्हणून गुलाबरावहि उसासे टाकीत होते. इतक्यांत म्यानेजरांनीं दरवाज्यांतून खूण केली व या दोघांना बाहेर बोलाविलें. गुलाबराव व छबूनाना त्याबरोबर बाहेर गेले.

" त्या बाई आल्या आहेत. पण दुसरा अंक सुरू होण्याच्या वेळीं आंत येणार असें त्यांचा शिपाई म्हणत होता. "

" शिपाई ? आल्या आहेत ? कोठें आहेत ? " गुलाबरावानें मोठ्या धांदलीनें विचारलें.

" अशी घाई कां करतां ? त्या वर आल्या म्हणजे तुमच्या शेजारींच बसणार आहेत. " मधुकरराव म्हणाले.

" पण कोठें आहेत ? " गुलाबरावानें पुनः विचारलें.

" त्या आतांच मोटारमधून उतरल्या व त्या तिकडे बायकांसाठीं आम्ही वेटिंग रूम केली आहे तिकडे गेल्या. "

" मोटारमधून ? " गुलाबराव वेड्यासारखें पाहूं लागला. " मोटार ठेवणाऱ्या गृहस्थाची मुलगी माझ्याशीं थोडेंच लग्न लावणार ! "

" अरे लग्नाची चर्चा पुढें करूं. तूं नवऱ्या मुलीला पाहून तर घे ! " छबूनाना डोळे मिचकावीत म्हणाले. त्यांच्या बोलण्यांतील खोंच लक्ष्यांत येण्यासारखी गुलाबरावांची मनःस्थिति नव्हती. ते मॅनेजरसाहेबांनीं सांगितलेल्या " वेटिंग रूम " कडे त्यांच्याबरोबरच गेले. " वेटिंग रूम " आगगाडीच्या स्टेशनावर असते, थिएटरमध्यें, निदान ग्रांटरोडच्या थिएटरमध्यें तरी नाहीं, ही गोष्टसुद्धां ते विसरले. मॅनेजरच्या पाठोपाठ ते गेले. छबूनाना होता त्याच ठिकाणीं राहिला.

आणि त्या " वेटिंगरूम "मध्यें गुलाबरावांनीं अर्थात् दुरून आपली चित्रंगत सुंदरी प्रत्यक्षावस्थेंत पाहिली. तिच्या स्वरूपापुढें ते अगदीं चकित झाले. तिच्या स्वरूपाचा अर्धा हिस्सासुद्धां त्या फोटोंत उतरलेला नव्हता. तिचा पोशाख फाजील भपकेबाज होता. तिच्या गळ्यांत मोत्यांची पेंडकी इतकी होती, कीं, ती फणसाच्या भावानें विकत घेतली असावींत अशी एखाद्याला शंका आली असती. पण " आंतरः कोऽपि हेतुः "नें व्यग्र झालेल्या गुलाबरावांना आपल्या प्रेमविषयांत असले किरकोळ दोष दिसले नाहींत यांत नवल नाहीं. त्यांनीं एक दीर्घ उसासा टाकला. ते मॅनेजरांना म्हणाले, " मी गरीब माणूस

आहे. एवढी श्रीमंत मुलगी पदरांत पडण्याचें माझें भाग्य नाहीं. बाकी मी तिच्याखेरीज दुसऱ्या कोणाशींहि लग्न करणार नाहीं."

"गुलाबराव, अशी प्रतिज्ञा करूं नका. अगोदर तुम्हांला इतकें हताश होण्याचें कारण नाहीं. शिवाय समजा, ती तुम्हांला नाहींच मिळाली, तर आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा प्रसंग यावयाचा."

"आला तरी फिकीर नाहीं. माझें प्रेम असें चंचल नाहीं. एका भार्या सुंदरी वा दरी वा, या पंथाचा मी आहें." मधुकररावांनीं त्यांचा हात धरून त्यांना परत आणलें. छबूनाना सिगरेट फुंकत उभे होते. इतक्यांत अंक संपला; मंडळी बाहेर येऊं लागली.

"चल रे छबू, आपण जाऊन आपल्या जागेवर बसूं. ती आतां इतक्यांत आंत येईल." गुलाबराव म्हणाले.

"तूंच जा बाबा आंत!" छबूनानांनीं उत्तर दिलें. "मी आणखी दोन सिगरेट ओढणार आणि मग आंत येईन. किंवा हें पहा, तूं आणि ती त्यांत माझी तिसरी ब्याद पाहिजे कशाला? मी आंत येईन, नाहीं तर खोलीकडे जाईन."

गुलाबरावांनीं निमिषभर आपल्या मित्राकडे पाहिलें, आणि मग ते म्हणाले, "तरीहि हरकत नाहीं. पण तूं माझ्याबरोबर आलास तरी हरकत नाहीं."

"हरकत कसली आली आहे? हें नाटकगृह आहे, हें तूं विसरला नाहींस ना?"

गुलाबराव एकटेच आंत गेले. छबूनानांनीं व मधुकररावांनीं एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावले व छबूनाना थिएटरच्या बाहेर आले. एका व्हिक्टोरियांत बसून त्यांनीं आपल्या बिऱ्हाडाचा रस्ता सुधारला.

गुलाबराव आपल्या सुंदरीची वाट पहात बसले. अंक सुरू होण्याच्या तिन्ही घंटा वाजल्या, पण तिचा पत्ता नाहीं. शेवटीं एकदांचा पडदा वर गेला आणि नाटकांतलि नायिका गायनाचे आलाप घेत घेत रंगभूमीवर प्रविष्ट झाली. गुलाबरावांचें लक्ष्य शेजारच्या खुर्चीकडे होतें, पण त्या खुर्चीला कोणी मालक येईना. तेव्हां त्यांनीं रंगभूमीकडे पाहिलें आणि क्षणभर त्यांना कसेंसेंच झालें. त्यांनीं एकदां डोळे चोळून रंगभूमीकडे पाहिलें. मग खिशांतील फोटो काढून त्याकडे पाहून रंगभूमीकडे पाहिलें. दहा मिनिटें ते वेड्यासारखे पहात होते. त्यांना आतां बिलकूल शंका उरली नाहीं. खिशांतील फोटो ही नाटकी

बाळ्याची रंगावृत्ति आहे याबद्दल त्यांची खातरजमा झाली. त्यांनीं क्षणभर डोकें खाजविलें. मग ते तिरिमिरी आल्यासारखे करून बाहेर आले. दारावर मधुकरराव भला मोठा चिरूट फुंकीत होते.

" काय गुलाबराव— " मॅनेजर म्हणाले.

" तो लेकाचा छब्या कोठें आहे ? " गुलाबरावांनीं विचारलें.

" छबूनाना इतक्यांत गेले. ते म्हणाले, कीं, आज शनिवार तेव्हां झोंपण्यापूर्वीं चणेकुरमुरे— "

गुलाबरावांनीं मॅनेजरांचे शब्द ऐकले नाहींत. ते एका व्हिक्टोरियांत बसून आपल्या खोलीकडे पळाले. आंत जाऊन त्यांनीं थकलेल्या डोक्याला विश्रांति देण्यासाठीं म्हणून सिगरेट पेटविण्याला काडी ओढली. खिशांतून सिगरेटबरोबर तो फोटो त्यांच्या हाताला लागला. तेव्हां त्यांनीं ती पेटलेली काडी त्या फोटोला लावली.

पुढें बरोबर एक महिना गुलाबरावांनीं छबूनानांशीं भाषण केलें नाहीं. त्यानंतर त्यांची सहज गांठ पडली तेव्हां ते म्हणाले, " छब्या लेका, तूं पाजी आहेस. "

" आंतरः कोऽपि हेतुः" असें म्हणून छबूनानांनीं तेथून पळ काढला म्हणून ते वांचले, नाहीं तर गुलाबरावांची छत्री "व्यतिषजति पदार्थान् " या वाक्याचा कर्ता झाली असती.

**मनोरंजन**, ऑक्टोबर १९२२

# ठाकूरसिंगाची करामत.

"ही पहा, सर्व हकीकत या 'इव्हिनिंग एको'त आली आहे." हातांतील वर्तमानपत्र ठाकूरसिंगापुढें करून शामराव म्हणाला.

संध्याकाळीं साडेपांच वाजण्याची वेळ. मेडोज् स्ट्रीटमधील कार्नेलिआच्या उपहारगृहांत ठाकूरसिंग आपला प्रियमित्र शामराव यासह चहापान करीत होता. दुकानांत जातां जातां शामरावनें रस्त्यावर 'एको', 'एको' म्हणत पोऱ्या ओरडत चालला होता, त्याजकडून 'इव्हिनिंग एको'चा अंक विकत घेतला. त्या दिवशीं सगळ्या मुंबई शहरांत चर्चेचा विषय एकच होता. प्रसिद्ध धनाढ्य व्यापारी मणिलाल माणकलाल हे आदल्या रात्रीं 'मून शाइन' क्लबांतून घरीं आले. भोजन झाल्यानंतर त्यांनीं, वेगळा रहात असलेला आपला मुलगा केशवलाल भेटावयास आला होता त्याची गांठ घेतली. केशवलाल रात्रीं अकरा वाजतां परत गेला. त्या वेळीं मणिलालशेट आपल्या शयनगृहांत होते. पहांटे चार वाजतां उठून साडेचार वाजतां चहा घेण्याची मणिलालांची पद्धत असे. त्याप्रमाणें चार वाजतां त्यांचा नोकर रतन हा त्यांच्या खोलींत गेला. नेहमींप्रमाणें त्यानें शेटसाहेबांना उठविण्यासाठीं हांका मारल्या, पण 'ओ' येईना. म्हणून त्यानें विजेची बत्ती लावली आणि त्याला पलंगावर धन्याऐवजीं धन्याचें प्रेत दिसलें. रतन ओरडतच बाहेर आला. बंगल्यावर शेटचा पुतण्या किशोरीलाल व इंदुशेखर वकील हे होते. ते लागलेच धांवत आले व त्यांनीं सर्व प्रकार पाहून पोलिसांत वर्दी दिली. सकाळच्या वर्तमानपत्रांत येवढीच हकीगत आली होती. मणिलालच्या बंगल्यावर पोलिसांचा पहारा होता व तेथेंच दुपारीं ज्यूरी भरावयाची होती. मणिलालशेट म्हणजे मुंबईतील धनाढ्य व्यापारी. त्यांची एकंदर संपत्ति निदान पाऊण कोट तरी असावी अशी लोकांत बोलवा होती. त्यांचा एकुलता एक मुलगा केशवलाल हा विलायतेला जाऊन आला होता. तिकडून आल्यानंतर त्यानें आपल्या जातींतील मुलगी न करतां इंटरमीजिएटपर्यंत शिकलेली, थोडीशी निराळ्या जातीची, रूपवती व गुणवती अशी एकोणतीस वर्षांची मुलगी पाहून तिच्याशीं विवाह केला. केशवलालच्या पत्नीचें नांव कमलकुंवर असें होतें. या विवाहामुळें पितापुत्रांत बरेंच वितुष्ट आलें व केशवलाल वेगळा राहूं लागला. त्याचें बापाकडे फारसें जाणें येणें नसे. मणिलालशेटनीं आपल्या मृत्युपत्रांत चिरंजिवांना कांहीं ठेवलें नाहीं अशीहि लोकांत बोलवा होती.

दुपारीं भरलेल्या ज्यूरींतील सर्व हकीकत 'इव्हिनिंग एको'नें दिली होती, व मणिलाल, केशवलाल आणि कमलकुंवर यांचे फोटोहि दिले होते. "ज्यूरीचें काम दोन तासांत आटोपलें व त्यानंतर लागलीच पोलिसनें केशवलालास गिरफदार केलें" अशी बातमी जाड ठशांत छापिली होती. त्यामुळें तर शहरभर मोठी खळबळ उडाली. कित्येक लोक तर म्हणूं लागले कीं, केशवलालनें पैशाच्या लोभानें बापाचा खून केला. मरणाच्या रात्रीं केशवलाल व मणिलाल यांच्या भेटींत दोघांचा तंटा झाला होता, व दोघेहि ओरडून बोलत होते अशी रतननें साक्ष दिली होती. त्यामुळें केशवलालाबद्दल कुणालाहि फारशी शंका नव्हती. असले सुधारकी चाळे करणारा मुलगा बापाचा खून करण्यासहि मागेंपुढें पहाणार नाहीं, असे उद्गार कित्येक जण काढीत होते. पोलिसाकडे सर्व पुरावा जमा झाला म्हणजे खटला कोर्टापुढें यावयाचा. तेथें काय काय होईल याची जो तो आपापल्यापरीनें कल्पना करीत होता.

ठाकूरसिंगानें ती हकीकत साद्यंत वाचल्यावर सिग्रेटची डबी काढून शामरावापुढें केली व आपण एक सिग्रेट पेटवून धूम्रपानाला सुरवात केली. शामरावानें सिग्रेट नुसती हातांत घेतली व तो म्हणाला,—"ठाकूरसिंग, ही हकीकत वाचून तुम्हांला कांहींच वाटत नाहीं?"

"असें कसें होईल? मला वाटलें कीं, सिग्रेट ओढावी आणि वाटल्याप्रमाणें मी करतों आहें."

"पण या केशवलालाला तुम्ही अपराधी समजतां?"

"केशवलाल अपराधी ठरला तरी मणिलालची संपत्ति मला मिळणार नाहीं. अपराधी नाहीं ठरला तरी आनंदच. आपला काय संबंध आहे या प्रकरणांत?"

"हे इतके लोक या प्रकरणाची आज सकाळपासून चौकशी करीत आहेत त्यांचा तरी काय संबंध आहे त्यांत? हें पहा, ठाकूरसिंग, मला वाटतें या केशवलालानेंच बापाचा खून केला, आणि केवळ न्यायाच्या दृष्टीनें तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. पण समाजांत परस्पर संबंध योग्य राहण्यासाठींहि असल्या घोर अपराधांना जबर शासन होणें जरूर आहे."

"मला वाटतें, तूं ज्यूरींत असतास तर पुरावा ऐकण्यापूर्वींच केशवलालच्या विरुद्ध निकाल दिला असतास. पण जाऊं दे रे शामराव; आपल्याला कांहीं कोणीं हा गुन्हा पकडण्यासाठीं बोलावलें नाहीं; चल, आज एम्पायर थिएटरांत

'डर्बी 'च्या शर्यतीचा चित्रपट आला आहे. सहा तर वाजले. साडेसहाला खेळ सुरू होतो. काड्यांची पेटी टाक इकडे, आणि आतां ऊठ पाहूं."

वेटरनें आणलेलें बिल ठाकूरसिंगानें चुकतें केलें आणि नंतर हें मित्रद्वय एम्पायर थिएटरकडे गेलें. तेथें आठ वाजेपर्यंत सिनेमा पाहून ठाकूरसिंग आपल्या माटुंग्यावरील बंगल्याकडे गेला आणि शामराव गिरगांवांत आपल्या बिऱ्हाडीं आला. ठाकूरसिंग बंगल्यावर एकटाच असे. एकटाच म्हणजे त्यानें अद्यापि कुटुंब केलेंच नसल्यामुळें त्याच्याजवळ कुटुंबांतील कोणी माणसें नव्हतीं. एक आचारी व दोन नोकर असे त्याच्या तैनातींत होते. त्याच्या राहणीवरून त्याला पैशाची बिलकूल ददात नव्हती, असें कोणालाहि वाटलें असतें. त्यानें केवळ सर्व हिंदुस्थानांतच नव्हे, तर जगांतील बऱ्याचशा देशांत प्रवास केलेला होता. सढळ हातानें खर्च करण्याची संवय असल्यामुळें त्याचें काम करण्यास कोणीही तयार असे. गुन्हेगारांना शोधून काढण्याचीं कित्येक अवघड कामें त्यानें आजपर्यंत बजावलेलीं होतीं. आणि त्यामुळेंच ज्यांचे जीव किंवा मालमत्ता त्यानें वांचविली, अशा लोकांनीं बक्षिसें देऊन देऊन तो सांपत्तिक बाबतींत अगदीं स्वतंत्र झाला होता. पोलिस खात्याशीं त्याचा कांहींहि संबंध नव्हता. पण त्या खात्यांतील बहुतेक बड्या अंमलदारांना त्याची हुषारी पटली होती, व वेळीं—प्रसंगीं त्याच्या साहाय्याची याचना करण्यांत त्यांना कमीपणा वाटत नसे. चोरी, लबाडी उजेडांत आणावी, अन्याय होत असेल तर तो टाळावा, दुर्दैवानें गोत्यांत आलेल्यांना सोडवावें अशा तऱ्हेचा ठाकूरसिंगाचा क्रम होता. त्यामुळें पुष्कळ वेळां त्याच्याकडे अडचणींच्या वेळीं माणसें येत व विशेष अवघड संकट असल्यास तो त्यांना साहाय्य करी. अलीकडे अलीकडे त्यानें अशा गोष्टींतून अंग काढून घेण्यास सुरवात केली होती. तरी मधून मधून त्याला ओळखणारीं माणसें त्याला त्रास दिल्याशिवाय अर्थात् रहात नसत.

ठाकूरसिंगानें घरीं आल्यावर स्नान केलें व साडेनवांच्या सुमारास तो भोजनास बसला. भोजन करून चिरूट पेठवून तो व्हरांड्यांत इझी चेअरवर पडतो न पडतो इतक्यांत टेलिफोनची घंटा जोरानें वाजूं लागली. खुर्चीवरून उठण्याचा ठाकूरसिंगाला अगदीं कंटाळा आला होता. म्हणून त्यानें नोकराला हांक मारून टेलीफोनवर जाण्यास सांगितलें. नोकरानें येऊन सांगितलें कीं, कोणी बाई आपल्याला बोलावीत आहे.

रात्रीं दहा साडेदहा वाजतां आपल्याला बोलावणारी बाई कोण असावी, असा तर्क करीत ठाकूरसिंग उठला व त्यानें टेलिफोन कानाशीं लावला. टेलिफोनमधून आलेला आवाज स्त्रीचा होता याबद्दल शंका नव्हती. तो आवाज घाबरलेल्या माणसाचा होता हेंही उघड होतें.

" आतांच आपल्याला भेटलें पाहिजे. अतिशय जरुरीचें काम आहे, " टेलिफोनवरून शब्द आले.

" मी आतां अगदीं कंटाळलों आहें. उद्यां सकाळीं दहा वाजण्याच्या सुमारास–" ठाकूरसिंगाला बोलतां बोलतां थांबावें लागलें. कारण टेलिफोनमधून पुनः आवाज आला–" छे, छे, इतका वेळ थांबून मुळींच चालणार नाहीं. मला आपली मुलगी समजा आणि या भयंकर प्रसंगीं मला साहाय्य करा. माझ्या सासऱ्याच्या मृत्यूसंबंधानें तुम्हीं वाचलें असलेच. दुपारी चार वाजतां वहिमावरून त्यांना पोलिसांनीं धरून नेलें आहे. माझ्याशीं लग्न केल्यामुळें मामंजी त्यांच्यावर रागावले होते, पण त्यांच्याहातून असें भयंकर काम होणें शक्य नाहीं. माझ्या वडिलांची आणि आपली चांगली माहिती होती. ती लक्षांत आणून आपल्या कन्येला चुडेदान देण्यासाठीं तुम्ही धावून या. मला या प्रसंगांतून दुसरें कोणी सोडवील असें वाटत नाहीं. "

" हा मी आलोंच. " ठाकूरसिंगानें कपडे घातले. मोटरचा तबेला जवळच होता, तेथून त्यानें एक गाडी मागविली व ड्रायव्हरला मोटार जलदीनें हांकण्यास सांगितलें. होय, कमलकुंवरला साहाय्य करणें हें त्याचें कर्तव्य होतें; कारण तिचा पिता त्याचा चांगला स्नेही होता. पंधरा मिनिटांनीं गांवदेवीला ज्या इमारतींत केशवलाल रहात असे तेथें ठाकूरसिंगाची गाडी येऊन पोंहोंचली.

[ २ ]

कमलकुंवरनें ठाकूरसिंगाला जी हकीगत सांगितली, तींत कांहीं कौटुंबिक गोष्टी निष्पन्न झाल्या. पहिली गोष्ट अशी कीं, केशवलाल व किशोरलाल यांचें बिलकूल नीट नव्हतें. केशवच्या लग्नाला मणिलाल विरुद्ध होताच, पण त्याच्या मनांत आपल्या प्रत्यक्ष मुलाविषयीं इतका द्वेष बिंबविण्याला किशोरलाल कारणीभूत झाला. किशोरलाल व इंदुशेखर यांची अलीकडे फार दोस्ती जमली होती. ते दोघे मिळून सट्टे करीत व शर्यतीला जात. ' तुझ्याऐवजीं मी सगळी

इस्टेट किशोरला देऊन टाकीन,' असें मणिलाल रागाच्या भरांत एक दोन वेळां बोलला होता व केशवलाल नसता तर म्हाताऱ्याच्या मागें त्याचा सर्व पैसा ( मृत्युपत्राच्या अभावीं ) किशोरकडे गेला असता. त्यानंतर असेंहि दिसलें, कीं, इंदुशेखर व मणिलाल यांचीं पैशाच्या बाबतींत कांहींतरी बोलाचाली झाली होती व अलीकडे इंदुशेखर व किशोर यांची चोरटेपणानें पुष्कळ वेळां खलबतें चालत. या सर्व गोष्टी ठाकूरसिंगानें लक्षांत ठेविल्या. कारण पुराव्याचे दुवे जुळवितांना त्या कोठें ना कोठें तरी उपयोगांत येतील असें त्याला वाटलें. आपला नवरा पूर्ण निरपराधी असल्याबद्दल कमलकुंवरची खात्री होती.

त्यानंतर कमलकुंवरला आश्वासन देऊन ठाकूरसिंग तेथून नेपियनसी रोडवर मणिलालच्या बंगल्यावर गेला. तेथें पोलिसचा पहारा होता हें वर सांगितलेंच आहे. केशवलाललाहि त्या रात्रीं तेथेंच ठेविलें होतें. शिवाय ज्याच्याकडे या प्रकरणाची चौकशी सोंपविली होती तो अंमलदारहि तेथेंच होता. ठाकूरसिंगानें प्रथम जाऊन त्या अंमलदाराची गांठ घेतली.

" एकूण कमलकुंवरबाईनीं तुम्हांला या केसवर बोलावलें आहे, ठाकूरसिंगजी, " तो अंमलदार म्हणाला—" मलादेखील केशवलालची दया येते. पण त्याच्याविरुद्ध पुरावा भरभक्कम आहे त्याला काय करणार ? "

" काय, आहे तरी काय पुरावा ? हरकत नसेल तर मला सांगा. माझी जर खात्री झाली, कीं, केशवलालनें खरोखर आपल्या बापाचा खून केला— "

" कोर्टाचा निकाल लागेपर्यंत तुमची आमची खात्री काय कामाची ? पण मला केशवलालचें नशीब ठीक दिसत नाहीं. "

" मणिलालला कोणत्या प्रकारें मरण आलें ? "

" कांहींतरी वस्तु त्याच्या डोक्यांत घातल्यामुळें त्याला तावडतोब मृत्यु आला, असें डॉक्टरांचें म्हणणें आहे. रतननें आपल्या जबानींत सांगितलें, कीं, मणिलाल आणि केशव यांची पुष्कळ वेळ बोलाचाली चालली होती; मग केशव मोठ्या गडबडीनें बाहेर आला. तो बाहेर येण्यापूर्वीं सुमारें दहा मिनिटें रतनला कांहीं तरी धाडदिशीं आपटल्याचा आवाज ऐकूं आला. "

" रतनशिवाय ज्याला या गोष्टी समजल्या असत्या असा दुसरा कोणी माणूस त्या वेळीं जवळपास नव्हता काय ? "

" कोणीहि नव्हता; आणि रतनच्या जबानीला महत्त्व देण्याचें दुसरें कारण असें आहे, कीं, त्याचा केशवलालबरोबर भांडणतंटा कांहीं नव्हता. "

" रतनला मला भेटतां येईल का ? "

" संध्याकाळींच मुलखांत त्याची म्हातारी आजारी असल्याबद्दलची तार आली. त्यानें जाण्याला कांहीं हरकत नाहीं, कोर्टांत खटला सुरू होईपर्यंत तो परत येईल, असें किशोरलालानें सांगितल्यामुळें मी त्याच्या जाण्याला हरकत घेतली नाहीं. "

ठाकूरसिंगानें निमिषमात्र डोळे झांकले व कपाळाच्या शिरेवरून बोट फिरविलें. नंतर तो म्हणाला–" मला किशोरलल व इंदुशेखर यांची गांठ घेण्याला कोणती हरकत नाहीं ना ? "

" ठाकूरसिंग, तुम्हांला कोणाचीहि गांठ केव्हांहि घेण्याला हरकत नाहीं. पाहिजे असल्यास केशवलालची गांठ घ्या. तुम्हांला शक्य ती कायदेशीर मदत करण्याला माझी आडकाठी नाहीं. पण तुमचा वहीम दुसऱ्या कोणावर आहे कीं काय ? "

" मी या घटकेला कांहीं सांगूं शकत नाहीं. मीं तर असें गृहीत धरलें आहे कीं, हा खून केशवलालनें बापाचा राग येऊन व पैशाच्या लोभानें केला. या उपपत्तींनीं घडून आलेल्या सर्व गोष्टी व त्या वेळीं असलेली परिस्थिति हीं जर जुळलीं, तर केशवाच्या अपराधाविषयीं शंका नाहीं. पण जर तसें जुळलें नाहीं तर आपणांला दिसणाऱ्या गोष्टी कोणत्या उपपत्तीशीं जुळण्यासारख्या आहेत हें पाहावें लागेल. "

ठाकूरसिंगाला किशोरलाल व इंदुशेखर यांची गांठ एकदम पडली. बंगल्याच्या एका खोलींत ते दोघेहि मदिरापानांत निमग्न होते. त्यांनीं दाराला कडी लावून घेतली नव्हती, त्यामुळें दार हळूंच एकीकडे सारून ठाकूरसिंग आंत शिरला. त्यांनीं त्याला पाहिलेंहि नाहीं. त्यांच्याशीं या स्थितींत बोलणें बरें कां नाहीं, याचा तो विचार करीत होता, इतक्यांत इंदुशेखरनें त्याला पाहिलें. "

" अरे, तुम्हीं खोलींत असे कसें आलांत बुवा ? " त्याच्या बोलण्यावर मदिरापानाचा फारसा परिणाम झालेला नव्हता. दोघेहि दारुबाजींत चांगले

निष्णात आहेत, असा तर्क ठाकूरसिंगानें बांधला व त्याच्याशीं बोलण्याला कांहीं हरकत नाहीं असें त्यानें ठरविलें.

" तुमचा तो रतन आहे ना, त्याची चौकशी करण्यासाठीं मी आलों. तें तुमचें दार उघडें दिसलें म्हणून आंत शिरलों. "

" वाः ! दार उघडें दिसलें आणि म्हणे आंत शिरलों. " किशोर म्हणाला,– " खूप आहे तुमची युक्ति ! आणि तुम्ही आंत शिरलेले दिसलां म्हणून आम्ही तुम्हांला पोलिसच्या हवालीं केलें तर ? "

" तर काय ? त्यांच्या हवालीं झालें पाहिजे. बरें, या रतनची माझी गांठ पडेल काय ? "

" रतन कां तुमचा जावई आहे ? "

" माझ्या लग्नालाहि अद्याप पत्ता नाहीं, तेव्हां जावयाची बात दूर आहे. मला रतनची अशासाठीं माहिती पाहिजे—"

" कशासाठीं ? " इंदुशेखरनें विचारलें.

" त्याची बायको फार आजारी पडली आहे मुलखावर, म्हणून मला आली आहे तार. "

" त्याच्या बायकोची तार तुम्हांला काय म्हणून ? आणि त्याची बायको मुळीं नव्हतीच. "

" त्याची म्हातारी तरी होती का ? "

" काय ? काय म्हणतां तुम्ही ? " इंदुशेखरनें विचारलें.

" ग्लास झोंकून तुमचे कान जरा थंडावलेले दिसतात. मी म्हणतों, कीं, रतनची म्हातारी केव्हां उपस्थित झाली ? आणि ती रहाते कोठें ? परळला का दादरला " ?

इंदुशेखर व किशोरलाल दोघेहि उठून उभे राहिले. इंदुशेखर म्हणाला, " तुम्हांला ही पंचाईत करण्याचें कारण काय ? "

" कारण इतकेंच ", ठाकूरसिंगानें काडी ओढून सिग्रेट पेटविली. " कारण इतकेंच, कीं, एवढा महत्त्वाचा साक्षीदार जर मुलखावर गेला आणि तो ऐन वेळेला हजर राहिला नाहीं तर तुमचें कसें होणार ? "

" का–का–का–काय म्हणतां ? " इंदुशेखरनें विचारलें.—" त्याला हजर करण्याची आम्हीं हमी घेतली आहे. "

" बरोबर आहे; " शांतपणें ठाकूरसिंग म्हणाला—" तुम्हीं हमी घेतली आहे म्हणून तुम्हांला विचारतों कीं, रतनचा मुलूख परळला आहे कां दादरला आहे?"

" आम्ही उत्तर देऊं इच्छित नाहीं. " इंदुशेखरनें सांगितलें.

" कां हो वकीलसाहेब, तुम्ही मणिलालचें किती देणें होतां ? "

" आम्ही उत्तर देऊं इच्छित नाहीं. "

" आणि तुम्ही, किशोरलाल ? तुम्हांला म्हणे कर्ज फार झालें आहे. नुकत्याच एका चेकबाबत तुमचा कांहीं घोंटाळा झाला होता, असें त्या नॅशनल बॅंकचा सराफ सांगत होता. "

" आम्हांला तुमच्याशीं बोलण्याची इच्छा नाहीं. " किशोरलालनें उत्तर दिलें.

" ठीक आहे, माझ्याशीं बोलूं नका. पण उद्यां सकाळीं रतन सांपडला म्हणजे मग बोलाल ? "

ठाकूरसिंग बाहेर आला आणि अंमलदाराला म्हणाला— " माझें काम झालें. आतां थोड्या वेळानें इंदुशेखर आणि किशोर बाहेर जाण्यासाठीं तुमची परवानगी मागण्यास येतील. त्यावेळीं त्यांना जाऊं द्या. ते आपल्या गाडींतून बाहेर पडले म्हणजे तुम्ही, माझी गाडी बाहेर त्या वळणावर उभी आहे तेथें ताबडतोब या. तुम्ही परत येईपर्यंत दुसऱ्या सार्जंटला येथें तुमच्या जागीं बसवा. "

इतकें सांगून ठाकूरसिंग बंगल्याच्या बाहेर पडला व आपल्या मोटारीच्या आडोशाला उभा राहिला. थोड्या वेळानें इंदुशेखर व किशोरलाल यांनीं कांहीं निकडीच्या कामासाठीं बाहेर जाण्याची परवानगी मागितली व ती त्यांना मिळाल्यानंतर ते ताबडतोब मोटार काढून बाहेर पडले.

[ ३ ]

वकीलसाहेब आणि त्यांचे पक्षकार मोटारींतून बाहेर पडले त्यांवेळीं दोन प्रहर रात्र होऊन गेली होती. ते इतक्या गडबडींत होते, कीं, आपल्यामागून एक गाडी येत आहे हें त्यांना कळलेंहि नाहीं. वार्डनरोडवरून ते महालक्ष्मीकडे गेले व तेथून त्यांनीं वरळीकडे गाडी वळविली व समुद्राच्या बाजूनें थोड्या अंतरावर गेल्यावर ते थांबले. गाडी उभी होती तेथें वारा फार जोराचा होता,

त्यामुळें त्यांना सिग्रेट पेटवितां येईना, म्हणून ते एका मोठ्या झाडाच्या आडोशाला उभे राहिले व तेथें त्यांनीं धूर फुंकण्याला सुरवात केली.

" काय रे किशोर, या लेकानें—रतननें कांहीं घोंटाळा तर नाहींना केला ?" इंदुशेखरनें विचारलें.

" त्याची काय छाती लागली आहे घोंटाळा करण्याची ! " किशोरलाल म्हणाला— " मीं त्याला रोख पैसे मुद्दाम दिलें नाहींत. तीन हजारांचे दागिने त्याच्या हवाली केले. प्रसंग आला तर त्याच्यावर चोरीचा आळ घालतां येईल. बाकी त्या लेकाला माझी ही खुबी मुळींच कळली नाहीं. आतां आपण त्याच्या-कडे जाऊं व त्याला सांगून देऊं कीं, खुनाचा आरोप, लेका, तुझ्यावर आला आहे. तर तूं उद्यां उजाडतांच आपल्या मुलुखाची वाट धर. मणिकाकाच्या खोलींत आम्ही गेलों होतों हें फक्त त्यालाच माहीत आहे. तो नाहींसा झाला म्हणजे आपण अगदीं सुखरूप झालों. "

" पण नुसता सुखरूपपणा काय करायचा आहे ? केशवची मान जेव्हां फांसावर लटकेल तेव्हांच तुझ्या पदरांत मणिलालची इस्टेट पडणार, आणि ती तुझ्या पदरांत पडल्यावर तिचा निम्मा वांटा मला मिळणार. "

" त्याची काळजी तुला नको. काल दुपारीं ज्यूरीपुढें ज्या जबान्या झाल्या, त्यावरून सर्वांचें मत केशवच्या विरुद्ध झालें आहे. खुद्द त्यानें आपल्या जबानींत बापाचा व आपला तंटा असल्याचें कबूल करून आपल्यावर आलेल्या आरोपाची निम्मीशिम्मी कबुली दिली आहे. शिवाय मी एक शेवटचा बार भरून ठेवला आहे तो तुला माहीतच नाहीं. "

" तो कोणता बाबा ? "

" तो लोखंडी गज— "

" तो—तो—तो— " इंदुशेखर थरथर कांपूं लागला.

" तो लोखंडी गज; ज्या गजानें तूं मणिकाकाचा प्राण घेतलास—ज्या गजाच्या एका बाजूला रक्ताचा डाग पण पडला आहे, तो गज— "

" मग—मग—त्या गजाचें काय ? "

" त्या गजाचा पोलिसला अद्यापि पत्ता लागला नाहीं. "

" पत्ता लागणार कसा ? " इंदुशेखर भीत भीत म्हणाला— " तो गज तर आपण लपवून ठेवला आहे. "

क्र. ९६३३

" तो गज आज मीं रतन इथून गेला तेव्हां त्याजबरोबर दिला. त्याची लांबी फारशी नसल्यामुळें तो त्याच्या बिछान्यांत सहज खपून गेला. माझ्या सांगण्यावरून कमलकुंवरला न कळतां तो गज रतननें केशवाच्या बिछान्याच्या खोलींत कपाटाच्या मागें ठेवला असला पाहिजे."

" ठेवला असला पाहिजे !—म्हणजे तुला नक्की माहीत नाहीं ?"

" ठेवला आहे. मग तर झालें ? आणि आतां आपण रतनला भेटूं तेव्हां विचारूं. तो गज केशवकडे सांपडला कीं, त्याचीं शंभर वर्षें भरलींच."

" आहे तुझी शिताफी खरी !" इंदुशेखरनें हंसण्याचा प्रयत्न केला. झाडाच्यामागें कांहीं सळसळ असा आवाज झाल्यासारखा वाटला तेव्हां ते दोघेहि बिचकले. पण तो आवाज पुन्हां झाला नाहीं. उंदीरबिंदीर असेल असें म्हणून ते पुन्हां गाडींत येऊन बसले व कांहीं वेळानें वरळीच्या बाजूला एका झोंपडीपुढें येऊन दाखल झाले. ते झोंपडींत शिरल्यावर दोनतीन मिनिटांनीं आणखी दोन व्यक्ति अंधारांतून आल्या व झोंपडीच्या मागच्या बाजूला गेल्यासारख्या दिसल्या.

झोंपडींत रतन एकटांच होता. एका कोंपऱ्यांत हरिकेनचा कंदील मिणमिण जळत होता. इंदुशेखर व किशोरलाल यांनीं दारावर टिचक्या मारल्या तेव्हां रतन दचकून उठला. कंदील घेऊन तो दारावर गेला व कोण आले आहेत याची खात्री करून घेऊन त्यानें दार उघडलें.

" किशोरशेट !" कंदील खालीं ठेवून रतन म्हणाला—" इतक्या रात्रीं इकडे आलांत ?"

" तुझा गळा फांसावर चढूं नये म्हणून आलों."

" म्हणजे ?—माझ्या गळ्याचा संबंध काय ?"

" आपल्या धन्याचा तूं खून केलास असा पोलिसला वहीम आला आहे. तूं मुलुखावर गेलास तो पळून जाण्यासाठीं, असें वाटून त्यांचा वहीम अधिक दृढ झाला आहे. तुझा मुलूख अजमीरकडे आहे म्हणून मी त्यांना सांगितलें आहे. तर तूं उद्यां सकाळच्या गाडीनें बोरीबंदरावरून तुझ्या खऱ्या मुलखाला जा. येथें राहिलास तर गोत्यांत येशील आणि तुला सोडविणें आतां आमच्या हातीं राहिलें नाहीं."

" पण शेट, माझा यांत संबंध काय ? या इंदुशेखरशेटनीं तो गज हाणला—"

" चूप बैस, गाढवा ! " किशोर ओरडला. " तो गज केशवाच्या येथें ठेवतांना तूं गाफिलगिरी केलीस. कारण त्या वेळीं तूं काय करीत होतास तें पोलिसचीं दोन माणसें पहात होतीं. तेव्हां तुझा तूं विचार पहा. "

" मा–मा–माझा विचार काय शेट ? मी सकाळीं उठून जातो दिल्लीला निघून. पण माझ्याजवळ पैसा तर रोख मुळींच नाहीं. "

किशोरनें खिशांतून दहादहांच्या पांच नोटा काढून त्याच्या हातावर ठेवल्या व त्याला पुनः बजावून तो व इंदुशेखर बाहेर आले. कोणीतरी धांवत जात असावें, असा त्यांना संशय आला, पण अंधारांत त्यांना कोणी दिसलें नाहीं. थोड्या वेळानें ते बंगल्यावर परत आले. त्यावेळीं त्यांना पहिलाच अंमलदार चिरूट फुंकीत बसलेला आढळला.

पहांटेस उठून रतन बोरीबंदरवर गेला. त्याची गाडी बरोबर सात वाजतां जावयाची होती. दिल्लीचें तिकीट काढून तो गाडींत जाऊन बसला. गाडी केव्हां सुटते असें त्याला झालें होतें. शेवटीं घंटा झाली, गाडीची शिटी वाजली, आणि गाडी निघाली. बोरीबंदरहून निघून ती भायखळ्याला थांबली. भायखळ्याला बरीच गर्दी झाली. दोन माणसें येऊन रतनला आपलें बोंचकें उचल म्हणून म्हणूं लागली. तो नाहीं म्हणाला. तेव्हां त्यांनीं त्याची वळकटी व गांठोडें बाहेर फेंकून दिलीं. रतन काय करतो बिचारा ! तो खालीं उतरला व गांठोडें व वळकटी घेऊन पुन्हां गाडींत चढूं लागला. इतक्यांत दोन बाजूंनीं दोन माणसांनीं येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवले. एकानें त्याची वळकटी घेतली व दुसऱ्यानें गांठोडें घेतलें.

" माझी गाडी चुकेल ना ! " रतनचे पाय लटपटले.

" त्याची काळजी नको. तिकिटाचे पैसे आम्ही परत आणून देऊं. "

" तुम्ही कोण ? "

" आम्ही पोलिसचे लोक. "

" मग माझ्याशीं तुमचा काय संबंध ? "

" किशोरलालचे दागिने चोरून तूं पळून चालला आहेस, म्हणून आमच्याकडे वर्दी आली. तुला मुकाट्यानें आमच्याबरोबर आलें पाहिजे. "

" ही वर्दी कोणी दिली ? "

" किशोरलालनें. "

रतननें क्षणभर विचार केला. मग तो म्हणाला–" ठीक आहे; मी तुमच्याबरोबर येतों. किशोरलालचे दागिने, म्हणजे त्यानें आपल्या चुलत्याचे चोरून मला दिलेले दागिने, त्या गाठोड्यांत आहेत. ते मी चोरलेले नाहींत."

" तुला काय सांगवयचें तें आमच्या साहेबाला सांग." रतन त्या दोघांच्यामध्यें चालूं लागला. त्याची दिल्ली भायखळ्यालाच झाली.

[ ४ ]

दुसऱ्या दिवशीं सकाळीं किशोरलाल व इंदुशेखर हे पहाऱ्यावर असलेल्या अंमलदाराकडे गेले. इंदुशेखर म्हणाला–" या गुन्ह्यासंबंधीं कांहीं गोष्टी काल रात्रीं आमच्या लक्ष्यांत आल्या म्हणून आम्ही तावडतोब येथून बाहेर गेलों हें तुम्हांला माहीत आहेच. तुम्हांला जो संशय आला होता तो खरा असल्याबद्दल आमची खात्री झाली आहे."

" कोणत्या गोष्टीबद्दल तुमची खात्री झाली आहे?" अंमलदारानें विचारलें.

" केशवलालनें एक लोखंडाचा गज घेऊन तो मणिलालच्या डोक्यांत घातला, त्यामुळें मणिलालचा प्राण गेला. तो गज अद्याप सांपडलेला नाहीं. कांहींतरी जड वस्तूचा प्रहार लागून मणिलालांना मृत्यु आला, हें डॉक्टरांनीं काल ज्यूरीपुढें सांगितलेलें तुमच्या लक्षांत असेल."

" तें सर्व माझ्या लक्षांत आहे."

" हा गज केशवलालच्या निजावयाच्या खोलींत कपाटापाठीमागें आहे. त्याला रक्ताचा डागसुद्धां आहे."

" खरें कीं काय?" अंमलदार आश्चर्यचकित होऊन म्हणाला–" असा पुरावा मिळाल्यावर ज्यास्ती चौकशीच करण्याची जरुरी नाहीं. चला पाहूं तुम्ही माझ्याबरोबर. मी आतांच्या आतां जाऊन केशवलालच्या घराची झडती घेतों."

इंदुशेखर आणि किशोरलाल मोठ्या लगबगीनें आणि समाधानानें सार्जंटच्या गाडींत बसले. सर्व मंडळी लवकरच केशवलालच्या घरीं आलीं. तेथें कमलकुंवर व ठाकूरसिंग बोलत बसले होते. सार्जंटला पाहतांच त्यांचें बोलणें थांबलें.

" मला या घराची झडती घ्यायची आहे." सार्जंट म्हणाला.

" पण झडती घेण्याची जरूरी काय?" ठाकूरसिंगानें विचारलें.

"जरूरी काय हें तुम्हांला लौकरच कळेल." किशोरलाल हंसत हंसत म्हणाला.

अर्धा एक घंटा घराची कसून झडती झाली. निजावयाच्या खोलींत कपाटाच्या मागें लोखंडी गज सांपडला. त्याचा अर्थ समजतांच बिचारी कमलकुंवर ढळढळां रडूं लागली. ती ठाकूरसिंगाला म्हणाली–" हें अगदीं तुफान आहे हो ? ते परवांच्या दिवशीं मामंजीकडून आले त्यावेळीं मी घरांत होते. त्यांच्या हातांत कांहीं नव्हतें हें मी त्या वेळीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. हा गज कोणी तरी दुष्टानें येथें आणून टाकला असला पाहिजे."

" कमलबेहन, पुरुषांचीं कारस्थानें तुम्हांला कळायचीं नाहींत. हा गज तुम्हांला नकळत निजायच्या खोलींत घरच्या माणसाखेरीज दुसऱ्याला कसा बरें आणतां येईल ? " किशोरलाल बोलला.

" झालें तें झालें. नशिबापुढें कोणाचें चालणार " ? इंदुशेखर दुःखाचा आविर्भाव आणून म्हणाला. " केशवलालनीं असलें खराब काम करावयास नको होतें. आपल्यामागें आपली गरीब बिचारी बायको आहे याचासुद्धां त्यांना विसर पडला. "

" कमलबेहन, " किशोरलाल म्हणाला–" ज्याच्या कर्माचें फळ त्याला मिळणार, त्याला इलाज नाहीं. जेथें प्रत्यक्ष पुरावा सांपडला तेथें केशवलालची सजा कोण चुकविणार ? पण तुम्ही घाबरूं नका. मणिलालकाकाच्या संपत्तीचा मी जरी मालक झालों, तरी तुमची आबाळ मी बिलकूल होऊं देणार नाहीं. "

बिचारी कमलकुंवर शोकानें हतबुद्ध झाली. तिच्या तोंडांतून शब्दसुद्धां निघेना. मग ठाकूरसिंग म्हणाला–" सार्जंट, तुमचें काम झालें ना ? मग तुम्ही आतां गेलांत तरी हरकत नाहीं. "

" आम्ही चाललों, " सार्जंट म्हणाला,–" आज दुपारीं दोन वाजतां मॅजिस्ट्रेटपुढें केशवलालची जबानी घेण्यांत येईल व त्यानंतर त्याच्यावर रीतीप्रमाणें खटला भरण्यांत येईल. "

" त्यावेळीं मी बाईंना घेऊन येतों. " ठाकूरसिंग म्हणाला.

दुपारीं दोन वाजले. मॅजिस्ट्रेटच्या चेंबरमध्यें केशवलालला आणून उभे केलें. किशोरलाल व इंदुशेखर हेहि तेथें हजर होते. चेंबरमध्यें व बाहेर पोलिसांची गर्दी जरा विशेष दिसली. त्याच्याविरुद्ध काय काय पुरावा होता तो केशवलालला सांगण्यांत आला, व तुम्ही मुकाट्यानें गुन्हा कबूल करावा म्हणून मॅजिस्ट्रेटनें त्याला उपदेश केला.

" मी गुन्हा केलेला नाहीं. मी बंगल्यांतून बाहेर आलों तेव्हां माझे वडील सुखरूप होते. बाहेरच्या पुराव्यावरून जरी मी दोषी दिसत असलों तरी हा खून कसा झाला हें मला मुळींच माहीत नाहीं. "

कमलकुंवर रडत होती. तिचा शोक ठाकूरसिंगाला अगदीं असह्य झाला. मग तो पुढें होऊन म्हणाला—" हुजूर, या खुनाबद्दल भरपूर पुरावा माझ्याजवळ आहे व तो आपल्यापुढें मी मांडतो. "

किशोरलाल व इंदुशेखर डोळे फाडून पाहूं लागले व डोळ्यापुढें जें आलें तें पाहून त्यांना आपण जागे आहों कां स्वप्नांत आहों हेंच कळेना. कारण रतन, दिल्लीला गेलेला रतन—मॅजिस्ट्रेटपुढें येऊन हात जोडून उभा राहिला. रतन पाहतांच आमचे वकीलसाहेब घाबरले व बाहेर जाण्याला कोठें वाट आहे काय म्हणून पाहूं लागले. पण जिकडे पाहावें तिकडे त्यांना पोलीस उभा असलेला दिसला. रतननें इत्थंभूत हकीकत सांगितली. केशव गेल्यानंतर इंदुशेखर व किशोर हे मणिलालकडे गेले. तेथें त्यांची बोलाचाली होऊन किशारनें गज इंदुशेखरच्या हातीं दिला व भांडण वाढतां वाढतां इंदुशेखरनें तो शेटच्या डोक्यांत घातला, वगैरे हकीकत त्यानें सांगितली आणि दागिन्यांच्या आणि बक्षिसाच्या लोभानें आपण ज्यूरीपुढें खोटें बोलल्याबद्दल त्यानें कबुली दिली.

किशोरलाल व इंदुशेखर यांच्या हातांत हातकड्या तावडतोब पडल्या, हें सांगावयास नकोच. ठाकूरसिंग म्हणाला—" वकीलसाहेब, केल्या कर्मांची फळें भोगलींच पाहिजेत. केशवलालला वडिलांची इस्टेट मिळाली हें रास्तच झालें पण तुम्हांलाहि तुम्ही पेरलें त्याचें पीक मिळालें ! "

कमलकुंवर, केशवलाल व ठाकूरसिंग तिघे मिळून घरीं आले. पुढें थोड्या दिवसांनीं इंदुशेखरला फांशीची व किशोरलालला काळ्या पाण्याची शिक्षा झाली। हें ऐकून त्या बिचारीला त्यांची दया आली. ती म्हणाली—" माणसें असल्या खराब गोष्टी काय म्हणून करतात ? "

" कमलबेहन, पुरुषांचीं कारस्थानें तुम्हांला कळायचीं नाहींत. " त्यांना भेटावयास आलेला ठाकूरसिंग गंभीरपणानें बोलला.

**मनोरंजन**, जुलै, १९३३

---

# शेजारधर्म*

नारळवाडी ही गेल्या चारपांच वर्षांत शहराच्या शेजारीं अस्तित्वांत आली होती. शहरांतील मोठमोठ्या घरांत राहाणारे श्रीमंत लोक जेव्हां त्या बाजूनें हिंडावयास जात तेव्हां ते म्हणत—" अरे, ही नारळवाडी उत्पन्न झाली केव्हां? आम्ही तर गेल्या वर्षींच इकडे वनभोजनाला आलों होतों ना? आणि आतां तर कितीतरी लहान लहान घरें येथें तयार होऊन राहिलीं आहेत. नवीन घरसंसार करूं लागलेल्या मंडळींना तीं फारच सोयीचीं दिसतात."

नवीन घरें बांधून तीं भाड्यानें किंवा विकत देऊन पैसे काढण्याची युक्ति कांहीं मंडळींनीं एक 'हाउसिंग कंपनी' काढून अंमलांत आणली होती. या कंपनीनें अशा तऱ्हेची वस्ती व्हावी म्हणून आणखी दोन तीन ठिकाणीं अशींच घरें बांधलीं होतीं. नारळवाडीला पोफळवाडी हें नांव दिलें नाहीं याचें कारण इतकेंच, कीं पलीकडे एक मैलावर नारळवाडी अस्तित्वांत येण्याच्य अगोदर दोन तीन वर्षें पोफळवाडीचा जन्म झाला होता. दोन्हीं वाड्यांत लहान लहान बंगल्या बांधून पुढेंमागें बगीच्याला जागा ठेविली होती. घरें आधुनिक पद्धतीनें बांधलीं असून जमिनी कपबशांचे तुकडे बसवून मुंबईच्या धर्तीवर केल्या होत्या. घरांकडे पाहून हीं नवीन घरसंसाराला योग्य आहेत असें जरी वाटत असे तरी बहुतेक मंडळी विवाहश्रृंखलेनें पुष्कळ वर्षांपूर्वी बद्ध झालेलीं अशींच त्या ठिकाणीं राहात होती. नारळवाडींत राहाणारी मंडळी चार पैसे कमावणारी असून मोठ्या घरांत राहाणारीं कांहीं माणसें चांगलीं सुखवस्तु होतीं.

नारळवाडींत सगळयांत मोठा बंगला अण्णासाहेब गोडसे यांचा होता. अण्णासाहेबांच्या कुटुंबाचें नांव अन्नपूर्णाबाई असें होतें. त्यांच्या बंगल्याला 'वृंदावन' असें नांव होतें. वृंदावन हा नारळवाडींत सर्वांत मोठा बंगला होता, इतकेंच नव्हे, तर त्या ठिकाणीं तो अगदीं प्रथम बांधलेला होता. अर्थात् नारळवाडींत वृंदावनाचें माहात्म्य विशेष होतें आणि अण्णासाहेब व अन्नपूर्णाबाई यांच्याकडे एक प्रकारचें पुढारीपण आलेलें होतें.

---

* एका सुप्रसिद्ध अमेरिकन कथाकाराच्या गोष्टीला मराठी पेहराव देण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथेंत केलेला आहे.

वृंदावनाच्या समोरून जाणारा रस्ता ओलांडून पलीकडे एक लहानसा बंगला होता, तो मधुकररावांनीं नुकताच विकत घेतला होता. त्यांनीं गृहस्थाश्रमांत चार महिन्यापूर्वी प्रवेश केलेला असून, त्यांच्या तरुण व सुशिक्षित पत्नीचें नांव गुलाबबाई होतें. नारळवाडींतील चाल म्हणजे वृंदावनाला मोठा बंगला समजावयाचा व तेथील मालक व घरधनीण यांना मोठे समजून मान द्यावयाचा. गुलाबबाईंना सुरवातीला ही गोष्ट फारशी पसंत पडली नाहीं. त्या व मधुकरराव तेथें नुकतींच राहावयास आलीं होतीं आणि अण्णासाहेबांच्या घरीं अद्याप जाणें-येणें सुरू झालें नव्हतें. परंतु वृंदावनाच्या मालकिणीचा पाहुणचार घेण्याची संधि त्यांना लवकरच आली आणि तिकडून परत आपल्यावर पतिपत्नींत खालीं दिलेला संवाद झाला.

"आपल्याला तर तीं माणसं मुळींच आवडलीं नाहींत." गुलाबबाई पतिराजांना म्हणाल्या.

"का बोवा?" मधुकरराव म्हणाले—"मला तर अण्णासाहेब आणि अन्नपूर्णाबाई फार चांगलीं माणसं वाटतात. त्यांनीं आपलें आदरातिथ्य किती चांगलें केलें, आणि आपल्याशीं ते किती स्नेहभावानें वागत होते—"

"हो! हो! केवढा त्याना श्रीमंतीचा डौल! जसे काय ते कुणीतरी इनामदार आणि आम्ही त्यांचीं गरीब कुळं—" गुलाबबाई बोलूं लागल्या,—"आम्ही आपलीं गरीबच आहोंत; मी नाहीं असं म्हणत नाहीं. पण त्यांच्या तरी बंगल्यांत काय सगळ्या नऊ खोल्या आणि सगळी एक मोटर गाडी. त्यांनीं कशाला एवढा सरदारी थाट दाखवावा?"

मधुकरराव हंसत हंसत म्हणाले—"त्यांच्याकडे मोटार गाड्या दोन नाहींत, एकच आहे हें खरें, पण त्यांचा तबेला दुमजली आहे आणि वरच्या माळ्यावर त्यांचा ड्रायव्हर राहातो."

"एवढ्यासाठींच कां त्यांनीं जहागिरदाराचा डौल आणावा?"

"मला तर कांहीं त्यांच्या वागण्यांत असा डौल आढळून आला नाहीं. मला तर तीं माणसें फार अगत्याचीं दिसलीं. आतां अण्णासाहेब आपल्या धंद्यांत पुष्कळ पैसा मिळवितात ही गोष्ट तर खोटी नाहीं, तेव्हां जरा श्रीमंतीचें वारें त्याच्या वागणुकींत दिसलें तर त्यांत फारसें नवल नाहीं; परंतु मला तर तो भला माणूस वाटला."

गुलाबबाई म्हणाल्या,—" त्यांच्या वागण्यांत श्रीमंतीचा प्रतिष्ठितपणा होता एवढं तर खरं ? ते स्वतःला एकदां जमिनदार म्हणाले तें ऐकलं कां आपण ? "

" मग त्यांत काय झालें ? ते जमिनदार नाहींत कां ? त्यांनीं जमीनजुमला पुष्कळ कमाविला आहे. "

" केवढेपण जमिनदार–! जहागिरदार–! सरदार–! इनामदार–! काय पण नांवं, आणि सगळा पैसा त्यांनीं असलीं घरं विकूनच कमाविला नां ? "

मधुकरराव आपल्या पत्नीला म्हणाले—" हें पहा, तू उगीच दुसऱ्यांचे दोष काढीत बसली आहेस. तीं माणसें खरोखर फार चांगलीं आहेत आणि आपल्याबरोबर तर तीं फार अगत्यानें वागलीं. "

गुलाबबाई तोंड वेंगाडून म्हणाल्या—" त्या अन्नपूर्णाबाईला तर धड शुद्ध मराठी पण बोलतां येत नव्हतं. व्याकरणाच्या चुका तर ती सारख्या करीत होती.'

" हें पहा, आपल्याकडे कांहीं सगळ्या बायका विदुषी नसतात. बोलतांना व्याकरणाच्या चुका व्हायच्याच. मला तर अन्नपूर्णाबाई सरळ मनाची व दयाळू अंतःकरणाची वाटली. "

" काय पण दयाळू ! सगळं बोलणंच मुळीं खोटं. अगत्य दाखविणं तेंही सगळं वरवरचं. असल्या फाजील अगत्य दाखविणाऱ्या बाया मला मुळींच आवडत नाहींत. अगत्याचा एवढा डोंगर करून दाखविणारी अशी बाई मी पाहिलीच नाहीं. अण्णासाहेबांना ती घरीं सुख देत असेल असं मला मुळींच वाटत नाहीं. "

" काय बरळत सुटली आहेस तूं ? "

" बाकी अण्णासाहेबांना असलीच बायको ठीक. जमिनदारीची हौस ती चांगली पुरवीत असेल. "

" पण तूं आतांच म्हणालीस कीं अन्नपूर्णाबाई मोठ्या अगत्यवान्—"

" अतिशयच अगत्यवान् ! असल्या अगत्य दाखविणाऱ्या बाया मला मुळींच आवडत नाहींत. "

मधुकरराव घोंटाळ्यांत पडल्यासारखे दिसले. ते म्हणाले—" तूं काय बोलते आहेस हें मला मुळीं समजतच नाहीं "

" मी बोलतें आहे अन्नपूर्णाबाईसारख्या अगत्य दाखविणाऱ्या बायांविषयीं. त्याचं सगळं अगत्य वरवरचं असतं. अगदीं परक्या माणसाबद्दल देखील त्या

केवढी कळकळ दाखवितात ! तोंडाकडे पहावं तर जशा कांहीं साधुत्वाच्या मूर्तीच ! अशा बाईबरोबर जो तो अदबीनं बोलतो आणि तिच्याविरुद्ध चकार शब्द काढण्याचं प्रत्येकाला भय वाटतं, मग तिला टाकून बोलणं म्हणजे तर महापातक ! या बाया गोड गोड बोलतात आणि आपलं बोलणं आपणच ऐकत असतात. जें जें करतील तें दुसऱ्यासाठीं करतें म्हणून दाखवितात, पण त्या खरोखर आपल्याला करायला पाहिजे तेंच करतात, इतकेंच नव्हें तर दुसऱ्यालाहि करायला लावतात. म्हणून मी सांगते, कीं अण्णासाहेबांनीं बाहेर किती जरी ऐट दाखविली तरी घरीं बायकोपुढें ते गोगलगाय होत असले पाहिजेत. ''

'' काय तूं वेड्यासारखी बोलते आहेस ! प्रत्येकजण म्हणतो कीं, त्यांच्या-सारखें सुखीं जोडपें नाहीं. ''

'' प्रत्येकजण म्हणजे कोण ?'' गुलाबबाईंनीं विचारलें–'' जेव्हां तेव्हां आपण ऐकतों कीं, प्रत्येकजण असं असं बोलतो, पण तें किती वेळां खरं असतं ? आमची यांची अजूनहि चांगली ओळख झाली नाही आणि त्यांच्याशीं घसण असल्यापैकीं आमच्या कुणी माहितीचं नाहीं; तेव्हां हें मोठं सुखी जोडपं म्हणून आपल्याला सांगितलं तरी कुणी ? ''

'' मला आपलें एकंदरींत तसें वाटतें. तिकडे परवां मी बाजारांत गेलों तेव्हां कोणसें म्हणत होतें, कीं, अण्णासाहेबांसारखा भाग्यवान् पुरुष नाहीं. ''

'' एकूण आपल्याला असं वाटतं; प्रत्यक्ष माहिती कांहीं नाहीं ना ? ''

'' प्रत्यक्ष माहिती नसली म्हणून काय झालें ? पण या बाबतींत तुझी समजून अगदीं चुकीची झाली आहे. ''

गुलाबबाई थोड्याशा फणकाऱ्यानें म्हणाल्या–'' सदान्कदा चूक माझीच असायची; पण हातच्या कांकणाला कांहीं आरसा नको. हें पलीकडे अण्णासाहेबांचें घर. त्यांच्याकडे काय चाललं आहे तें आपणाला दिसतं अन् आपल्याकडचं त्यांना दिसतं. तेव्हां केव्हांना–केव्हां तरी मी म्हणत्ये त्याचा खरेपणा आपल्याला कळून येईल. थोडा धीर धरा म्हणजे अण्णासाहेबांचं वर्म आपल्याला समजेल. ''

'' ठीक आहे; पण तें किती दिवसांत समजेल ? ''

" त्याचा काय नियम? एक महिन्यांतहि समजेल, नाहींतर एकादवेळ वर्षभर वाट पहावी लागेल. "

मधुकरराव आपल्या पत्नीला लडिवाळपणानें म्हणाले-" हें पहा, आपण एक महिन्याची मुदत ठरवूं. तेवढ्या वेळांत जर अन्नपूर्णाबाई आणि अण्णासाहेब यांचे बरोबर जमत नाहीं असें आपल्याला आढळून आलें नाहीं, तर मग तूं आपली चूक कबूल करशील ना? "

" मी चूक मुळींच कबूल करणार नाहीं. पण अगोदर महिन्याच्या आंतच माझा तर्क खरा आहे याबद्दल आपली खातरी होईल. असल्या गोष्टी माझ्या चटकन् लक्षांत येतात आणि त्या चूक केव्हांच ठरत नाहींत. पुरुषांना ज्या गोष्टीबद्दल शंकासुद्धां येत नाहीं त्या बायकांना आपोआप कळतात. अन्नपूर्णाबाई-बद्दल मी म्हणतें यांत मुळींच चूक नाहीं; याबद्दल मला तर शंका नाहीं. "

मधुकररावांनीं विचार केला कीं, वाद वाढविण्यांत कांहीं हंशील नाहीं, शिवाय सुशिक्षित कुटुंबाशीं गांठ, तेव्हां " जेव्हां तेव्हां शेवटीं आपलें म्हणणं खरं करण्याचा हट्ट " केल्याचा आरोप यावयाचा. याप्रमाणें मधुकररावांनीं तो विषय डोक्यांतून काढला पण गुलाबबाईंना मात्र त्याशिवाय दुसरें कांहीं सुचेना. खरें सांगावयाचें म्हणजे गुलाबबाईचा स्वभाव थोडासा हट्टी होता आणि मूळच्या हट्टीपणांत मिळालेल्या शिक्षणानें थोडीशी भर पडली होती. प्रत्येक वेळीं जर पतीपुढें आपण हार खाल्ली तर पुढें आपल्या शब्दाला घरांत कांहींच किंमत राहणार नाहीं. तेव्हां एव्हांपासूनच आपले म्हणणें खरें करण्याची वहिवाट घालावी हा विचारहि त्यांच्या मनांत नव्हता असें नाहीं. पुष्कळ वर्षें घरसंसार केलेल्या कुटुंबांत पतीचें प्राबल्य कसें असतें आणि वयोवृद्ध पत्नीलासुद्धां प्रत्येक वेळीं आपल्या पतीपुढें कसें चूप बसावें लागतें हें गुलाबबाईंना पाहून आणि ऐकून माहीत झालें होतें आणि अशा प्रकारची लाजिरवाणी स्थिति स्वतःला यावी अशी त्यांची मुळींच इच्छा नव्हती. अर्थात् एव्हांपासून मधुकररावांवर शह ठेवण्याचा त्यांनीं निश्चय केला होता. आपण बोलतों तें जवळ जवळ वेदवाक्य; त्यांत चूक म्हणून असणें शक्य नाहीं अशी आपल्यासंबंधीं पतिराजांना एव्हांपासून शिस्त लावून दिली म्हणजे पुढें पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येणार नाहीं असें गुलाबबाईंनीं ठरविलें आणि अण्णासाहेबांच्या बाबतींत सदर शिस्तीला सुरवात केली.

वर सांगितल्याप्रमाणें दूरवर विचार करून आपण जी जी गोष्ट करूं त्यांत चूक म्हणून असणार नाहीं, अशा प्रकारचा अंमल बसविण्याचा निश्चय गुलाबबाईंनीं केला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं योगायोग असा जमून आला कीं वृंदावनाकडील कित्येक महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या कानांवर पडल्या. त्या गोष्टीवरून आपला झालेला ग्रह अगदीं यथातथ्य आहे याबद्दल त्यांना शंका उरली नाहीं. मधुकररावांचें ऑफिस नारळवाडीपासून पांच मैलांवर शहरांत होतें. ते नऊ वाजतां तिकडे निघून गेले. पुढें गुलाबबाई बागेमध्यें इकडे तिकडे पहात हिंडत होत्या. हिंडतां हिंडतां त्या बागेच्या फाटकाजवळ आल्या. फाटकावर बाहेरच्या बाजूनें हात टेकून एक लहान मुलगा उभा होता. त्याचें वय आठ वर्षांचें होतें. गुलाबबाईंनीं त्याला विचारिलें, " तुला कांहीं हवें आहे काय ? " त्यावर तो मुलगा फाटक उघडून आंत आला आणि त्यानें विचारलें, " तुम्ही इतकी जमीन उकरली आहे, तुम्हांला कांहीं चांगले किडे सांपडले आहेत कां ? "

तो प्रश्न ऐकून गुलाबबाईंना फार आश्चर्य वाटलें. त्या म्हणाल्या– " नाहीं. पण चांगले किडे म्हणजे कसले किडे ? किडे तर सगळे घाणेरडे असतात. "

" छे ! छे ! मुळींच नाहीं. " त्या मुलानें ताबडतोब मोठ्या गंभीरपणानें उत्तर दिलें. " कितीतरी किडे चांगले असतात. "

" मला नाहीं वाटत तसं. "

तो मुलगा पुन्हां म्हणाला– " चांगले किडे असतातच ! कितीतरी किडे चांगले हें सगळ्यांना माहीत आहे. "

" या वेडगळपणाच्या गोष्टी तुला कुणी शिकविल्या ? किडे चांगले असतात म्हणून तुला सांगितलं तरी कुणी ? "

तो मुलगा कांहीं वेळ विचार करीत उभा राहिला आणि मग म्हणाला– " मला माझ्या आईनें सांगितलें. ती तर खोटें सांगणार नाहीं ? "

गुलाबबाईंनीं क्षणभर त्याच्याकडे निरखून पाहिलें आणि मग त्यांनीं विचारलें " तुझें नाव काय ? " आपलें नांव बाळू असें त्या मुलानें सांगितलें. त्यावर गुलाबबाई म्हणाल्या– " तूं पलिकडल्या वृंदावन बंगल्यांत राहातोस कां ?– " " होय, मी तेथेंच राहतों; " असें मुलानें सांगितलें. तें एकून गुलाबबाईंना

वाटलें, कीं, अन्नपूर्णाबाईच्या घरच्या कांहींतरी भानगडी आपल्या कानावर येणार. मग त्या म्हणाल्या–" बाळू, तुझी आई तुला असं कसं सांगेल ?"

" कसं सांगेल म्हणजे ? माझी आई बाबांनां किती तरी वेळां तुम्ही कीडा-मुंगीसारखे असें म्हणते, आणि बाबा तर चांगले आहेत. किडे जर त्यांच्यासारखे असतील तर ते चांगलेच असले पाहिजेत."

" बाळू, तूं हें भलभलतं काय बोलतो आहेस ?"

" आई किती तरी वेळां बाबांना तसें म्हणते. काल तिणें कपडे साफ करण्याचा ब्रश असतो ना त्यानें बाबांनां मारिलें."

" अरे, तिनें कांहीं तरी थट्टेनं केलें असेल."

" मुळींच नाहीं. ती रागानें अगदीं वेडी झाली होती. आणि मला घेऊन आजोबांच्या घरीं जाणार असें ती म्हणत होती. मी मुळींच नाहीं जाणार तिच्या बरोबर. बाबा मला किती तरी आवडतात. पण आई मुळींच आवडत नाहीं. ती अलिकडे वेड्यावेड्यासारखीच करीत असते."

गुलाबबाईच्या मनांत बाळूला आणखी पुष्कळ विचारावयाचें होतें, परंतु त्या चालरीत अगदींच विसरल्या नव्हत्या म्हणून म्हणाल्या–" बाळू, अशा गोष्टी बोलूं नयेत. तुझे बिचारे वडील आणि आई यांच्यांत कांहीं तंटा झाला तर तूं तो असा सांगत हिंडूं नये."

त्या बोलण्याचा बाळूवर कांहींच परिणाम झाला नाहीं. ऐकणाऱ्या माणसाला ऐकण्याबद्दल उत्सुकता आहे कीं नाहीं हें सात आठ वर्षांच्या मुलांना समजतें आणि असे श्रोते मिळाल्यावर मुलांनांसुद्धां गोष्टी सांगण्याचें स्फुरण चढतें. बाळू पुढें म्हणाला– " काल तिनें बाबांच्या अंगावर पाण्यानें भरलेला तांब्या फेंकला तो त्यांच्या कानशिलांत बसला. तेथें त्यांना थोडी जखमसुद्धां झाली आहे."

" बाळू, तूं कांहींतरी अगदीं खोटं सांगतो आहेस. काल संध्याकाळीं मी तुझ्या बाबांना पाहिलं. तेव्हां तर कसलीहि जखम त्यांच्या कानाजवळ दिसत नव्हती."

" ती कांहीं दिसत नाहीं. बाबांनीं तिथें काय काय लावून ती दिसत नाहीं असें केलें आहे. बाबांचा तर आई अगदीं द्वेष करते."

" तो काय म्हणून ?" गुलाबबाईंना विचारल्याशिवाय राहवेना.

" ती रोज रोज पैसे मागते; आणि बाबा म्हणतात, " तुला पैसे देऊन

काय उपयोग? तूं सगळे पैसे उधळून टाकतेस"; आणि एकदां बाबांनीं रागावून तिला मारलें, तेव्हां पासून तर ती अगदीं वेड्यासारखें करते. एकदां तर मला घरीं ठेवून ती आजोबांच्याकडे निघून गेली. पण बाबांनीं जाऊन तिला वाटेंत पकडून आणलें. ती तेथें त्या गोविंदरावाबरोबर बोलत उभी होती. पुढें बाबांनीं तिला घरीं आणलें आणि तिच्या थोबाडींत मारल्या."

"हा सगळा प्रकार तुझ्या देखत झाला?"

"हो! त्यांचीं भांडणें सगळीं माझ्या देखतच होतात. परवांच एकदां केवढा मोठा तंटा झाला."

बाळू याप्रमाणें बोलत होता इतक्यांत तिकडून एका पांच वर्षांच्या मुलीला हातांत धरून अन्नपूर्णाबाई आल्या आणि "बाळू, बाळू," म्हणून त्यांनीं अगदीं सावकाशपणानें हांक मारली. गुलाबबाईकडे पाहून त्यांनीं हंसत हंसत मान डोलविली. मग त्या म्हणाल्या—"बाळू, तूं अगदींच कीं रे ऐकत नाहींस. मी मघांशीं तुला सांगितलं कीं, तूं घरीं बसून गंगूशीं खेळ. पण बिचारी वाट पाहून पाहून कंटाळली, पण तुझा तर पत्ताच नाहीं."

बाळूच्या मनांत जावयाचें नव्हतें. तो हळूंच म्हणाला—"मी हा आलों. काय भगभग आहे पहा!"

रस्ता ओलांडून तो पलीकडे गेला तेव्हां अन्नपूर्णाबाईनीं त्या दोन्हीं मुलांचे हात धरले आणि मोठ्या प्रेमळपणानें गुलाबबाईकडे एकवार दृष्टि फेंकून त्या आपल्या बंगल्यांत शिरल्या. गुलाबबाई कांहीं वेळ विचार करीत होत्या आणि पतिराज घरीं आल्यावर त्यांना ऐकलेली सर्व हकीकत कोणत्या प्रकारें सांगावी याबद्दल बेत करीत होत्या. जेवणाच्या वेळीं त्या कांहीं बोलल्या नाहींत. जेवण झाल्यावर दिवाणखान्यांत मधुकरराव जाऊन बसले आणि त्यांनीं सिगरेट पेटविली, त्याबरोबर त्यांची तब्येत खुष आहे असें पाहून गुलाबबाई हंसत हंसत म्हणाल्या—"आपण सकाळीं गेल्यावर एक पाहुणा आमच्याकडे आला होता?"

"कोण आलें होतें?"

"अण्णासाहेबांचा बाळू आला होता."

"अण्णासाहेबांचा बाळू?"

"हो, तोच आला होता. तो आणि त्याची लहान बहीण ह्यांना समोर खेळतांना आपण पुष्कळ वेळां पाहिलीं आहेत."

"त्याच्या आईनें त्याला कांहीं कामासाठीं पाठविलें होतें?"

"नाहीं. तो आपण होऊन आला आणि मला विचारूं लागला, कीं, मीं कांहीं छानदार किडे पाहिले आहेत का? पुढें तो म्हणाला, कीं, आपली आई तुमची किड्यामुंगीइतकीसुद्धां किंमत नाहीं असें बाबांना वरचेवर म्हणते."

मधुकररावांनीं तोंडांतून सिगरेट काढून आपल्या कुटुंबाकडे अविश्वासयुक्त मुद्रेनें पाहिलें. "काय म्हणालीस तूं? अन्नपूर्णाबाई अण्णासाहेबांना काय म्हणतात?"

"कीडामुंगी म्हणतात. कारण ते जास्त पैसे मिळवीत नाहींत. बाळूला आपली आई मुळींच आवडत नाहीं, पण तो अण्णासाहेबांची सारखी स्तुति करीत होता. त्या बिचाऱ्यांची स्थिति कठीण खरी. ते जरा फाजिल डौलदारपणानें वागतात हें खरं, पण घरीं असली बायको. तेव्हां तिचे पराक्रम झांकण्यासाठीं त्यांना तसा डौल दाखवावा लागतो असं मला वाटतं. नुकतंच म्हणे त्यांच्या धर्मपत्नीनें त्यांच्याकडे कायसंसं फेंकलें त्यामुळं त्यांना जखम झाली."

"गुलाब, हें काय सांगते आहेस?"

"होय, बाईसाहेबांचे पराक्रम झांकण्यासाठीं बिचाऱ्या अण्णासाहेबांच्या नाकीं नऊ येत असले पाहिजेत. आतां तेहि तिला केव्हां केव्हां चौदावं रत्न दाखवितात; नाहीं असं नाहीं. परंतु आपली बायको जर दुसऱ्याबरोबर नाटकसिनेमा पहायला गेली तर कुणाला चीड येणार नाहीं? आणि घरीं तरी बाईचें वागणं काय? आणि परवां म्हणे त्यांच्यात केवढं तरी भांडण झालं अन् तेंसुद्धां मुलांच्या देखत हो!"

मधुकरराव उठून उभे राहिले आणि कुटुंबाकडे तीव्र दृष्टीनें पाहून म्हणाले— "तूं भलभलत्या गोष्टी सांगत सुटली आहेस!"

"कुणाचा विश्वास तरी बसेल का? बाळूनं जेव्हां एक एक गोष्ट सांगितली, तेव्हां माझ्या डोळ्यांत चक्क उजेड पडला. काय तरी चमत्कार! काल आपण त्यांच्या घरीं होतों त्या वेळीं दांपत्यप्रेमाचं केवढं तें प्रदर्शन. आणि इकडे पहावं तो सगळा प्रकार निराळा! घरीं रोज रोज तक्रारी! वरचेवर तंटेबखेडे! आणि केव्हां तंट्याचा परिणाम परस्परांनीं एकमेकांवर हात टाकण्यामध्यें! आपण तर अन्नपूर्णाबाईंच्या दयाळूपणाची केवढी तारीफ करीत होतां! मीं तेव्हांच म्हटलं, कीं, हा सर्व मानभावीपणा आहे. माझं म्हणणं आपल्याला

अगदीं खोटं वाटलं. मी कांहीं अशी अगदीं वेडी नाहीं. आणि आपलं म्हणणं अगदीं प्रत्येक वेळीं खरं असलेंच पाहिजे, असा हेका धरणं बरं नव्हे; हे आपल्या लक्षांत आतां नाहीं कां आलं? आपली चूक काढावी अशी माझी इच्छा नाहीं, पण अन्नपूर्णाबाईंच्या बाबतींत आपला अजमास अजिबात चुकला येवढी गोष्ट खरी. बाकी त्या बाईची बतावणीच तशी! मनुष्य अगदीं डोळ्यांत तेल घालून बसल्याशिवाय सहज फसायचं."

गुलाबबाईनीं हें भाषण हावभावांसकट, जरुरीप्रमाणें आवाज चढवून आणि उतरवून असें केलें. मग त्या म्हणाल्या—"मीं म्हटलं होतं, कीं माझं म्हणणं खरं ठरायला महिन्याचासुद्धां अवधि नको. पण मलासुद्धां वाटलें नाहीं, झांकली मूठ एका दिवसांत अशी उघडी होईल."

मधुकरराव आश्चर्यचकित झाले याबद्दल शंका नाहीं. गुलाबबाईनीं सर्व हकीकत पुन्हां एकदां सविस्तर सांगितली. बाळूनें सांगितलेल्या गोष्टींची द्विरुक्ति करतांना गुलाबबाई स्वतःचें तिखटमीठ त्यावर चढवीत. त्या जसजशा त्यासंबंधीं अधिक बोलूं लागल्या, तसतशी तिखटमिठाची वाढ चक्रवाढ व्याजाच्या पद्धतीनें होऊं लागली. एक तर मधुकररावांचें बोलणें खोटें ठरलें व आपलें खरें ठरलें याबद्दल त्यांना अंतःकरणांत समाधान झालें होतें. आणि शिवाय एकमेकांचीं वर्मैं काढणें हा शेजारधर्माचा धडा हें इतकें शिक्षण होऊन-सुद्धां गुलाबबाई विसरल्या नव्हत्या.

"माझा या गोष्टीवर मुळींच विश्वास बसत नाहीं." मधुकरराव म्हणाले—"काल संध्याकाळीं आपण त्यांची परस्पर वागणूक पाहिली त्यावरून त्यांचें एकमेकांवर पूर्ण प्रेम असलें पाहिजे असें स्पष्ट दिसलें."

"म्हणजे?—मी सगळें हें बनावट का सांगतें आहे आपल्याला?"

"छे! छे! तूं कशाला बनावट सांगशील? त्या मुलानेंच तुला कांहीं भलभलतें सांगितलें असलें पाहिजे."

"आपल्या आईबापांविषयीं तो भलभलतें सांगेल?

"कांहीं मुलें वाटेल तसल्या गोष्टी रचून सांगतात. आपण खोटें बोलत आहों हें कांहीं त्यांना कळत नाहीं."

गुलाबबाईच्या मतें मधुकररावांना असली साधी गोष्टदेखील कळूं शकली नाहीं. त्या म्हणाल्या—"हें पहा, त्या मुलानें मला सर्व हकीकत जशीच्या तशी

सांगितली. आपल्या घरच्या स्थितीचें त्यानें माझ्यापुढें चित्रच उभें केलें. त्यांत एका ठिकाणींसुद्धां पूर्वी बोललेल्याच्या विरुद्ध नव्हतें. मुलें कदाचित् गोष्टी रचून सांगत असतील, पण सातआठ वर्षांच्या मुलाला आपल्या घरची हकीगत एखाद्या कादंबरींतल्या गोष्टीप्रमाणें बिनचूक सांगतां येईल असें मला वाटत नाहीं. बाळूनें सगळी गोष्ट बनावट रचिली अशी आपल्याला अगदीं खातरी कां वाटते ?"

"त्यानें सांगितलेल्या गोष्टी जरा चमत्कारिक दिसतात."

"चमत्कारिक ?—बाळूनें सांगितलेली गोष्ट भयंकर होती पण ती अगदीं खरी होती."

मधुकररावांच्या चेहऱ्यावर उद्विग्नतेची छटा दिसूं लागली. ते म्हणाले— "असेल खरी कदाचित्, पण आपणांला त्याच्याशीं काय करायचें आहे ? आपण नुकतेच इकडे रहायला आलों आहों. तेव्हां शेजाऱ्यांच्या भांडणांत आपणांला पडण्याचें कारण नाहीं. त्याबद्दल आपण अवाक्षरसुद्धां काढूं नये. तूं जें ऐकलेंस तें कोणाजवळ बोलूं नकोस."

गुलाबबाईनीं तोंड जरासें फिरविलें आणि क्षणभर त्या विचारांत पडल्या. शेवटीं त्या म्हणाल्या—"तें खरं, बाकी अण्णासाहेबांचा आमचा कांहीं विशेषसा स्नेहसंबंध नाहीं. त्यांची आमची पुरती ओळखसुद्धां झालेली नाहीं असं म्हटलं तरी चालेल."

"नाहीं. आणि म्हणून तर आपण त्यांच्या भानगडींत पडण्याचें मुळींच कारण नाहीं. ऐकल्या गोष्टीबद्दल तूं कोठें बभ्रा करूं नकोस. मी तर अर्थात् ही गोष्ट ऐकिलीसुद्धां नाहीं अशा प्रकारें वागणार."

"आपलं म्हणणं बरोबर आहे. बाकी त्यांचा आपला कांहीं संबंध जर नाहीं, तर याबद्दल आपण कुठं बोललों किंवा नाहीं बोललों तरी अर्थ एकच."

"अर्थ एक कसा असेल ?" मधुकररावांनीं विचारलें. गुलाबबाईच्या एकंदर बोलण्यावरून त्यांचें मन थोडेंसें साशंक झाल्यावांचून राहिलें नाहीं. "गुलाब, तूं याबद्दल कुणाजवळ बोलली तर नाहींस ?"

"काय ?" गुलाबबाईनीं चपापून विचारिलें.

"बाळूनें तुला जें सांगितलें तें तूं दुसऱ्या कुणाजवळ बोललीस काय ?"

"मुळींच नाहीं. म्हणजे ज्यांचा अण्णासाहेबांशीं कांहीं संबंध आहे अशा कुणाजवळहि मी बोलल्यें नाहीं."

मधुकररावांनीं थोड्या आवेशानें प्रश्न केला. "मग कुणाजवळ तूं बोललीस? आणि तुला बोलण्याचें कारण काय होतें?"

"कारण काय असणार? चार बायका जमल्या म्हणजे वेळ जाण्यासाठीं प्रत्येकानं कांहींतरी बोललं पाहिजे ना! पण अन्नपूर्णाबाईंच्यापाशीं घसण किंवा संबंध असणाऱ्या कोणाहि माणसाजवळ मीं यांतील अक्षरसुद्धां काढलं नाहीं. उमाबाई दुपारीं क्षणभर बसायला आल्या होत्या, त्यांच्याजवळ मात्र मीं बोलल्यें, पण त्यांचा त्यांत कांहीं संबंध नाहीं. त्या एका कानानं ऐकणार आणि दुसऱ्या कानांतून सोडून देणार."

"मला उमाबाई माहीत आहेत. त्या ही गोष्ट अन्नपूर्णाबाईंच्याकडे काढल्याशिवाय मुळींच राहणार नाहींत. लोकांनीं छिद्रें आणि वर्में काढण्याची आम्हांला संवय आहे, असा आपला लौकिक होणें कांहीं बरें नाहीं."

"तीं जर माणसं अशीं वाईट आहेत, तर त्याना वाईट म्हणायला आपल्याला एवढी भीति कुठची?"

मधुकरराव उठून फेऱ्या घालूं लागले. त्यांच्या चेहऱ्यावर असमाधान पूर्णपणें प्रतिबिंबित झालें होतें. ते म्हणाले—"तूं किती जरी मला सांगितलेंस तरी या नसत्या भानगडींत पडून भलत्या गोष्टीची वाच्यता करण्याची तुला जरुरी नव्हती."

पतिराजांचें हें निक्षून बोलणें ऐकून गुलाबबाईंना राग आल्याशिवाय राहिला नाहीं. आणि तो राग अनावर होण्यासहि अगदीं थोडा वेळ पुरला. त्या म्हणाल्या—"मला अगदीं कळतच नाहीं, अशी का तुमची समजूत झाली आहे? शेजाऱ्याशेजाऱ्यांत कलागती लावण्याखेरीज मला दुसरा उद्योग का नाहीं? आपली चूक आपल्या गळ्यांत आली म्हणून माझ्यावर हा गहजब कशाला करावा? काल आपलं बोलणं झालं तेव्हां मीं सांगितलं होतं, कीं, तुमची अन्नपूर्णाबाईंविषयीं झालेली समजूत अगदीं चुकीची होती. आतां माझं बोलणं खरं ठरलं म्हणून तुम्हांला चीड आली आहे. दुसरं कांहीं नाहीं. मला अगदीं मूर्खांत काढून तुम्ही वागवितां, पण मला तें कांहीं खपणार नाहीं." बोलतां बोलतां प्रयागचें स्टेशन जवळ आल्यासारखें दिसूं लागलें.

मधुकररावांना अर्थात् हें भाषण रुचलें नाहीं. ते म्हणाले—"इतक्या थोड्या दिवसांत माझ्याबद्दल असें बोलशील असें मला वाटलें नव्हतें."

" इतक्या थोड्या दिवसांत तुम्हीसुद्धां मी शेजाऱ्यांत तंटे लावणारी आहें असें मला बोलाल असं मलाहि वाटलं नव्हतं. "

" ही अशी हमरीतुमरी बायकांना शोभत नाहीं. "

" माझ्यावर तुम्ही हमरीतुमरीचा पण आळ घालतां ? "

" म्हणजे, हमरातुमरी करूनसुद्धां पुन्हां मीच आळ घालतों ? मोठा चमत्कार आहे ! "

हुंदके देत देत गुलाबबाई आंत निघून गेल्या. तें भांडण त्यांना दोन दिवस पुरलें. त्या अवधींत पतिपत्नी एकमेकांशीं बोललींसुद्धां नाहींत. तिसऱ्या दिवशीं मधुकरराव व्हरांड्यांत सिग्रेट फुंकीत बसले होते. गुलाबबाई पुढें बगिच्यांत होत्या. त्या एकाएकीं पतीकडे वळून म्हणाल्या—" अण्णासाहेब आणि अन्नपूर्णाबाई आल्यासारखीं वाटतात. ".

मधुकरराव गडबडीनें उठले. गुलाबबाईनीं आणखी एक दोन खुर्च्या बाहेर आणून ठेवल्या. इतक्यांत मंडळी आली. पण त्यांचा बसण्याचा विचार दिसला नाहीं. अन्नपूर्णाबाई हंसत हंसत म्हणाल्या—" बसण्यास आम्हांला वेळ नाहीं. आम्ही बाहेर निघालों तेव्हां जातां जातां म्हटलं तुम्हांला विचारून जावं. तुमचे निशिगंधाचे ताटवे कीं नाहीं फार सुंदर आहेत. मला ते एकदां पहायचे होते. "

" क्षणभर बसा ना ? " गुलाबबाई हळूच म्हणाल्या—" थोडासा चहा टाकूं कां ? "

" आम्हांला बसायला मुळींच वेळ नाहीं आम्ही त्या पोफळवाडीस आतां चाललों आहों. तिथं तुमच्या ओळखीचं कुणीतरी असेलच. आमची नारळवाडी फार चांगली. पोफळवाडींतल्या लोकांना दुसऱ्यांच्या उठाठेवी करण्याची फार संवय. कालच आम्हीं एक विचित्र गोष्ट ऐकिली. ती म्हणे तिथें नुकत्याच रहायला आलेल्या आणि परवां लग्न झालेल्या मुलीनं चार बायकांत सांगितली. आपल्या शेजारपाजाऱ्यांविषयीं असं भलतं भलत सागत सुटणं बरं नव्हे; असं तुम्हांलासुद्धां नाहीं का वाटत गुलाबबाई ? "

गुलाबबाईंना कसेंसेंच होऊं लागलें. बाकी त्यांनीं चेहऱ्यावर कसलाही विकार दाखविला नाहीं. मधुकरराव मात्र थोडेसे चरकले. आपल्या कुटुंबाची दुसऱ्यांनीं अशी सकारण पूजा बांधावी हें त्यांना अर्थात् आवडलें नाहीं. अन्नपूर्णाबाईंच्या प्रश्नाला गुलाबबाईनीं कसेंबसें " होय " म्हणून उत्तर दिलें.

" तुम्ही चांगल्या शहाण्यासुरत्या आहांत, गुलाबबाई. तुम्हांला असं वागण पसंत पडणार नाहीं अशी माझी खात्रीच होती. " अन्नपूर्णाबाई म्हणाल्या— " शेजाऱ्यांविषयीं बोललेल्या गोष्टी सरळ त्यांच्याकडे परत जातात. तो बाळू परवां तुमच्याकडे आला होता ना ? " गुलाबबाईची छाती धडधडूं लागली.

" परवांच तुम्ही त्याच्याशीं किती वेळ बोलत होतां. तो मुलगा तुम्हांला आतां पुनः भेटणार नाहीं. तो रामा आमची मोटार हांकत असे ना, त्याचा तो मुलगा. रामाची बायको त्याला सारखी सांगत असे कीं, आमच्याकडे पगार थोडा मिळतो तेव्हां दुसरीकडे नोकरी धर. नवराबायकोंचे वरचेवर तंटे होत असत, आणि केव्हां केव्हां हातघाईवर प्रसंग येत. आणि हें सगळं त्या मुलाच्या देखत चालत असे. कालच रामा आपल्या बाळूला व बायकोला घेऊन निघून गेला. बरं, गुलाबबाई, आतां उशीर झाला, आम्ही येतों. "

गुलाबबाईंना डोकें भ्रमण करीत आहे असें वाटूं लागलें. कसेंबसें आंत जाऊन त्यांनीं कुंकवाचा करंडा आणला आणि पुन्हां एकदां औपचारिक " या बसा, " झाल्यावर अण्णासाहेब व अन्नपूर्णाबाई हीं निघून गेलीं. मधुकरराव पत्नीकडे पाहून म्हणाले—" आज आपली अगदीं थोडक्यावर सुटका झाली, आणि याचें कारण अन्नपूर्णाबाईचा चांगुलपणा—"

गुलाबबाई कांहीं बोलल्या नाहींत. त्याचे डोळे पाण्यानें भरले होते. पण अशा प्रसंगींसुद्धां मधुकरराव आपली कड घेतल्याशिवाय राहिले नाहींत हें मात्र त्या पुनः कधीं विसरल्या नाहींत.

**मनोरंजन**, ऑगष्ट १९२४

# गुरुमहाराजांचा प्रसाद

" मग काय बुवा, तूं येणार का नाहीं नाटकाला ? " मी माझ्या हातांतील सोन्याच्या रिस्टवॉचकडे पहात पहात प्रतापरावाला विचारलें. " हें पहा, तीन वाजले. नाटक बरोबर तीन वाजतां सुरू व्हायचें आहे. आपण आतां टॅक्सी केली कीं, पांच मिनिटांत तेथें पोहोंचूं."

प्रतापनें मोठ्यानें आळस दिला; मग हातालगतच्या डबींतील पट्टी काढून ती तोंडांत भरली; आणि माझ्याकडे पाहून हंसत हंसत म्हणाला–" नाटक तरी कोणचें आहे ?"

" सगळें रामायण ऐकून रामाची सीता कोण याचा तुला पत्ता नाहीं. " मी त्रासून बोललों. " काल तुला मीं नाटक कोणतें, कसलें, कोणीं लिहिलेलें सर्व कांहीं सांगितलें. त्याचप्रमाणें कोणती मंडळी, कोणत्या थिएटरांत, किती वाजतां करणार तें देखील तुला माहीत आहे. हीं दोन तिकिटें मीं काल विकत घेतलीं. प्रत्येकाचीं किंमत चार रुपये आठ आणे–"

" आणि वरती कांहीं पै नाहींत का ! " प्रताप हंसूं लागला. मग अगदीं गंभीर चेहरा करून तो म्हणाला–" त्या नाटकाचा कर्ता–समजलास ना–मी काल पाहिला. त्या मंडळींतील ती नायकीण कोण–"

" नायकीण ? मंडळींत नायकीण तर कोणी नाहीं. "

" अरे शब्दप्रमाद ! माझ्या म्हणण्याचा अर्थ नायिका. ती नायिका होणारा पोऱ्या तो कोण–विसरलों त्याचें नांव. पण तें जऊं द्या. हे तुझे विद्वान् नाटककार त्या पोऱ्याच्या डोक्यावर छत्री धरून उभे होते. असल्या नाटक-काराचें नाटक आपण नाहीं पहाणार. "

" मग हें काल नाहीं का समजलें तुला ? आणि तूं अगोदर सांगतोस ही गोष्ट मुळींच खरी नाहीं. तो नाटककर्ता माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. तो मुसळधार पाऊस पडत असला, तरी सख्या बायकोच्या डोक्यावर छत्री धरणार नाहीं, इतका जुन्या चालीचा अभिमानी आहे. तो नाटकी पोऱ्यावर छत्री धरणार ? "

" मी तुला नेहमीं सांगतों कीं, तुला व्यवहार कळत नाहीं. अरे बायकोला

आपल्या छत्रींत न घेणारे कितीतरी सोवळे नवरोजी नाटकांतल्या नायिकेवर छत्री धरण्याला मागेंपुढें पहात नाहींत."

"हें पहा, हा वाद आपण पुढें केव्हां तरी करूं. तूं नाटकाला येणार का नाहीं?"

"म्हणजे? मी आलों नाहीं तर तूं एकटा का जाणार?"

"तूं येणार का नाहीं?"

"सकाळीं मीं पंचांग पाहिलें. त्यांत आजच्या सबंध दिवसांत नाटकाला जाण्याचा मुहूर्त नाहीं. मग त्या ज्योतिष्याला विचारतों तों तो म्हणाला आज माझ्या कपाळीं नाटक पाहण्याचा योग नाहीं."

"मग हे नऊ रुपये मातींत गेले तर?" मीं जरा त्रासून विचारलें.

"मातींत कसे जातील? आजकाल नाटक कंपन्यांना किफायत व्हावी तशी होत नाहीं. तेव्हां हे तुझे नऊ रुपये अगदीं सत्कारणीं लागतील. आणि यांतील एक आणा तुझ्या नाटककाराला मिळण्याचा संभव आहे. नायिकेवर छत्री धरून धरून त्याचे हात दुखूं लागले, म्हणजे एकाद्या औषधाच्या दुकानांत जाऊन आयोडिनचा बोळा हातावर फिरवायला तेवढी रक्कम पुरे झाली."

मला प्रतापचा इतका राग आला होता कीं, या फाजिलपणाच्या बोलण्याला कांहीं उत्तर न देतां मीं मुकाट्यानें डोक्यावर टोपी चढविली, सिग्रेट पेटवून तोंडांत धरली व दाराकडे निघालों. प्रतापहि लागलाच कपडे घालूं लागला व म्हणाला—"अरे, तूं खरोखर रागावलास? त्या नायिकेसाठीं का त्या नाटककारासाठीं? मी आलों ना!"

मी थांबलों. प्रताप कपडे घालून तयार झाला. आम्ही आतां बाहेर पडणार इतक्यांत दारावरची घंटी वाजली.

"सगळेंच मुसळ केरांत!" प्रताप म्हणाला. "तेवढें दार उघड पाहूं."

मी दार उघडलें. दोन गृहस्थ आंत आले. ते कांहीं बोलणार इतक्यांत प्रताप म्हणालाः—"आम्ही नाटकास जावयास निघालों आहोंत. आमच्याकडे कांहीं काम असल्यास उद्यां दुपारीं भेटा."

त्यांपैकीं एक गृहस्थ जवळजवळ पन्नाशी ओलांडलेले दिसत होते. त्यांचा पोषाख साधारणपणें जुन्या तऱ्हेचा पण चांगला झोकदार होता. दुसरा गृहस्थ तिशीच्या आंत बाहेर असून नखशिखांत—म्हणजे त्याला शिखा नव्हतीच—

विलायती पोषाखांत होता. हा तरुण गृहस्थ पुढें होऊन म्हणाला:—" आपल्याला तसदी द्यावी लागते याला इलाज नाहीं. पण आमचें काम फार निकडीचें आहे. उद्यापर्यंत वाट पहाण्याची मुळींच सोय नाहीं."

"आम्हीं हीं तिकिटें पाच पांच रुपये देऊन विकत आणलीं आहेत." मीं ताड्दिशीं उत्तर दिलें. माझें डोकें अगोदर त्रासलें होतें. आज आदितवाराचा दिवस. प्रतापनें अगोदर इतका वेळ घेतला. आणि आतां बाहेर पडणार इतक्यांत या दोन अवदसा,—अवदसा शब्दाचें पुल्लिंगी रूप मला माहीत नाहीं—दत्त म्हणून उभ्या. तेव्हा वरीलप्रमाणें आचरटपणाचें उत्तर मीं कोणत्या मनःस्थितींत दिलें, हें जर वाचक लक्षांत घेतील तर त्यांना त्याबद्दल मला फारसा दोष देण्याची इच्छा होणार नाहीं.

"आपल्या कार्यक्रमांत आम्ही बिघाड आणतों याबद्दल आम्ही खरोखर फार दिलगीर आहों." ता विलायती पोषाखवाला तरूण म्हणाला. "पण आमचें काम फार जरु रीचें आहे. आणि त्यांत तुम्हांला यश आलें तर निदान एक हजार रुपये बक्षीस म्हणून नानासाहेब मोठ्या खुशीनें देतील."

"एक हजार काय दोन हजारहि मी मोठ्या खुषीनें देईन." तो पोक्त गृहस्थ म्हणाला. त्यांचें नांव नानासाहेब होतें हें उघड आहे. "एक लाख रुपये किंमतीचा मोत्याचा कंठा माझ्या कुटुम्बाच्या दागिन्याच्या पेटींतून नाहींसा झाला आहे..."

"मग तुम्ही माझ्याकडे कशाला आलांत?" प्रतापरावानें विचारलें. "पोलिसांत वर्दी दिलीत म्हणजे रीतीप्रमाणें सर्व व्यवस्था होईल."

"प्रतापराव," नानासाहेब म्हणाले. "या गोष्टीचा गाजावाजा व्हावा अशी माझी बिलकूल इच्छा नाहीं. पोलिसांत वर्दी देऊन माझा मोत्याचा कंठा हातीं येईल कां नाहीं हा प्रश्न दूर ठेवला तरी, कोर्टांतून ही गोष्ट सगळीकडे जाहीर व्हावी हें मला पसंत नाहीं. मीं तुमची कीर्ति ऐकली आहे. तुम्ही सर्व हकीगत ऐकून घ्या आणि लागेल तो खर्च करा, पण या चोरीचा पत्ता लावा पोलीस तुम्हांला ओळखतातच. त्यांना तुमच्याबद्दल हेवा वाटण्याचें कारणच नाहीं."

माझीं तिकिटें माझ्या खिशांतच राहिलीं हें सांगावयास नकोच. आम्ही त्या दोघांहि गृहस्थांस बसावयास खुर्च्या दिल्या. प्रतापराव टेबलासमोरील आपल्या खुर्चीवर बसला. त्यानें त्या विलायती गृहस्थापुढें सिग्रेटची डबी केली. त्यांतून

एक सिगरेट काढून ती त्या गृहस्थानें पेटविली. नानासाहेब तमाखू ओढणारे नसून खाणारे होते; त्यांनीं प्रतापरावानें दिलेली एक पट्टी तोंडांत घालून वर तमाखूची एक चिमूट चढविली. मग तो विलायती पोषाखवाला म्हणाला. " नानासाहेबांचें नांव आपल्याला ऐकून माहीत असेल. हे डोंगरपूरचे इनामदार. यांचें जमीनजुमल्याचें उत्पन्न पांचपन्नास हजारांचें असून पुनः थोडाबहूत सावकारी व्यापार आहे. त्यावरहि त्यांची मिळकत चांगली आहे. वाडवडिलार्जित दागदागिना यांच्याकडे पुष्कळसा असल्याबद्दल बरीच प्रसिद्धिहि आहे..."

" हो, हो." प्रतापराव म्हणाला. " यांचें नांव मीं पुष्कळ वेळां ऐकलें आहे. आपल्या जिल्ह्याच्या हुजूर डेप्युटी कलेक्टरला यांनीं मोठा खाना दिला व त्यासाठीं दोन हजार रुपये खर्च केले म्हणून मीं नुकतेंच ऐकलें होतें. बरें, आपण प्रश्नाचा राग मानूं नये, पण आपला आणि इनामदारसाहेबांचा संबंध काय ?"

" आमचा त्यांचा फार स्नेह आहे. पुष्कळ दिवसांचा स्नेह आहे." नानासाहेब म्हणाले. " यांचें नांव रंगराव. माझ्या व्यापारधंद्यांत यांची मला फार मदत होते. यांनीं वकिलीचाहि कांहीं दिवस अभ्यास केला होता. पुढें यांचे डोळे बिघडले म्हणून यांना तो नाद सोडावा लागला."

" ठीक आहे." प्रतापराव म्हणाला. " आपला मोत्यांचा कंठा चोरीला गेला त्याची हकीगत..."

" मी सांगतों सर्व तुम्हांला." नानासाहेब म्हणाले. " आठ दिवसांपूर्वीं मी माझें सर्व खटलें घेऊन येथें आलों. माझ्या कुटुंबानें मुंबई पूर्वीं पाहिली नव्हती. तेव्हां म्हटलें पंधरावीस दिवस रहावें—"

" आपण मुंबईला तर वरचेवर येत असतां. मग आपण आपल्या कुटुंबाला कधीं आणित नव्हतां वाटतें बरोबर—" प्रतापरावानें अगदीं गंभीरपणानें प्रश्न केला.

" हो. मी येतों वरचेवर. पण माझा हा तृतीय संबंध. तेव्हां तें—त्यांनीं मुंबई पाहिलेली नाहीं. तेव्हां त्यांना दाखविण्यासाठीं म्हणून घेऊन आलें. तेव्हां येथें चार ठिकाणीं जावें लागणार म्हणून कांहीं ठळकठळक दागिने पण बरोबर आणले. त्यांत हा मोत्यांचा कंठा आला. वास्तविक तो कंठा मी घालावयाचा आहे. त्यांतील मोत्यें पुष्कळ जुनीं पण फार पाणीदार आहेत. कंठा माझ्या

वडिलांनीं घेतलेला. मीं आपल्या कुटुंबाची हौस म्हणून त्यांना घालायला दिला आणि त्यामुळें तो त्यांच्या पेटींत असे. कंठ्याची किंमत फार आहे. एक लाख रुपये. ती आपली आमच्या दप्तरीं दाखल आहे. पण आतां आज विकायला काढला तर त्याच्या दीडपट तरी किंमत आल्याशिवाय रहाणार नाहीं. आज सकाळीं माझ्या—त्या—त्यांनीं पेटी उघडली आणि पहातात तों कंठा नाहीं."

" त्यापूर्वीं पेटींत कंठा केव्हां पाहिला होता ?"

" परवांच्या दिवशीं संध्याकाळीं त्यांनीं तो गळ्यांत घातला होता. तो गळ्यांत घालून ते येथें मोठे साधु भारद्वाजमहाराज आले आहेत त्यांच्या दर्शनाला आम्ही सर्व गेलों होतों. परत आल्यावर तिनें आपल्या हातानें तो काढला व पेटींत ठेवून पेटी सेफमध्यें ठेविली. मी पंधरा दिवसांसाठीं आलों तरी बरोबर चार जिन्नस म्हणून सेफची मुद्दाम व्यवस्था केली आहे. आज सकाळीं पहातात तों पेटींत कंठा नाहीं. बाकी कोणत्याहि जिनसाला हात लागलेला नाहीं. तेव्हां तुम्ही चोरीचा तपास लावून द्याल तर माझ्यावर मोठे उपकार होतील. "

प्रतापरावानें कांहीं वेळ विचार केला. मग तो म्हणाला, " आपला कोणावर वहीम वगैरे आहे काय ? "

नानासाहेबांच्या चर्येवर थोडीशी उदासीनता आली. त्यांनीं उत्तर देण्याच्या पूर्वीं रंगराव बोलले:—" बोलण्यासारखी गोष्ट नाहीं, पण तुमच्यापासून कांहींहि लपविण्यांत अर्थ नाहीं. पोलिसकडे न जातां तुमच्याकडे आम्ही येण्याला तेंच विशेष कारण झालें असें म्हणण्यासहि हरकत नाहीं. नानासाहेब आणि बाई-साहेबसुद्धां पोलीसांतच वर्दी देण्याबद्दल आग्रह करीत होते. पण मीं म्हटलें "नको. अविचाराच्या भरांत माणसाच्या हातून फार चुका होतात आणि त्या एकदां झाल्या म्हणजे मग दुरुस्त होणें शक्य नसतें......"

" मग कोणावर वहीम आहे म्हणतां तुमचा ? " प्रतापरावानें रंगरावाकडे किंचित् तीव्र दृष्टीनें पाहून विचारलें. ?

" माझा वहीम ? मला विचाराल तर माझा वहीम कुणावरच नाहीं. पण—आतां आपल्याला सांगणें भाग आहे. नानासाहेबांचा एक सावत्र मुलगा आहे—सावत्र मुलगा म्हणजे नानासाहेबांचा नव्हे—म्हणजे मुलगा नानासाहेबांचा, पण त्यांच्या सध्यांच्या कुटुंबाचा सावत्र. त्याचें आणि बाईसाहेबांचें पटत नाहीं. तेव्हां तो घरीं नेहमीं रहातो असें नाहीं. आतां मुंबईला त्याला बरोबर आणला.

उघडच आहे. लौकिकांत वाईट दिसतें. बाईसाहेब तशा फार चांगल्या आहेत. पण बाळासाहेबांचा स्वभाव जरा भांडखोर म्हणा–तुसडा म्हणा–कुत्सित म्हणा पाहिजे तर. आतां ते भारद्वाजमहाराज आहेत. अगदीं योग्य पुरुष. मोटा साधु. खरा राजयोगी. मीं त्यांचा उपदेश दहा वर्षांपूर्वी घेतला. नानासाहेबांचीहि त्यांच्यावर भक्ति जडली आहे. बाईसाहेब तर त्यांना देव समजतात. त्यांनीं शेंकडों निपुत्रिकांना–त्यांनीं म्हणजे भारद्वाजमहाराजांनीं–पुत्रवान् केलें आहे. तर आमचे हे बाळासाहेब त्या साधुपुरुषाची सारखी निंदा करतात—"

"एकूण तुमचा वहीम बाळासाहेबांवर आहे?" प्रतापराव म्हणाला.

"मी कशाला तसें म्हणूं?" रंगरावानें उत्तर दिलें. "पण बाईसाहेबांनाहि त्यांचा संशय आला आहे खरा. नानासाहेबांनाहि तसेंच वाटलें. मीं मुद्दाम जाऊन गुरुमहाराजांना विचारलें. त्यांनीं क्षणभर समाधि लावली. अंतर्ज्ञानानें सर्व प्रकार त्यांना कळतो. ते म्हणाले, जास्ती वाच्यता करूं नका. पण रस्त्याची खूण बरोबर आहे. त्याच रस्त्यानें शोध करा."

प्रतापराव नानासाहेबांकडे वळून म्हणालाः—"आपला वहीम मग तर आपल्या चिरंजिवावर आहे?"

एक उसासा टाकून नानासाहेब म्हणालेः—"होय. आहे खरा. माझ्या मनांत प्रथम आलें होतें, पोलिसांत वर्दी द्यावी. पण आमचे हे रंगराव म्हणाले, कीं अविचार करूं नये. या कार्ट्यानें कित्येक दिवस जीव अगदीं नकोसा करून सोडला आहे. लहानसहान रकमा तो लांबवितो असें तिनें मला पुष्कळ वेळां सांगितलें, पण मीं तिकडे कानाडोळा केला. हा कंठा म्हणजे लाख दोन लाखांचा ऐवज. तिकडे कानाडोळा कसा करावा? शिवाय रंगराव म्हणाले त्याप्रमाणें पोरट्याच्या कपाळाला साधुपुरुषाचें नांव घेतलें, कीं आठी चढते. हे भारद्वाज-महाराज म्हणजे विभूति आहे. त्यांचें दर्शन घेणें म्हणजे महत्पुण्य आहे. मी म्हटलें बाळ्याला, 'तुला त्यांचें दर्शन नको तर घेऊं नकोस, त्यांची निंदा तरी करूं नकोस.' आणि निंदा म्हणजे कसली निंदा! वाटेल तें घाणेरडे आरोप तो महाराजांवर घालतो. मला तर ते ऐकवत नाहींत."

"एकूण बाळासाहेबांवर त्या साधुपुरुषाचा कोपच झाला म्हणतां ना?" प्रतापराव अगदीं गंभीरपणानें सिग्रेट पेटवत पेटवत म्हणाला.

"यांत काय संशय?" रंगराव बोलला. "जगांत वाटेल तें पाप खपतें,

पण भारद्वाजमहाराजांसारख्या साधुपुरुषाची निंदा मात्र कोणालाहि खपायची नाहीं."

"अगदीं बरोबर आहे तुमचें म्हणणें." प्रतापराव म्हणाला. "ठीक आहे नानासाहेब. तीन दिवसांत तुमचा कंठा पदरांत पडेल अशी तजवीज करतों."

"तर मग मी आपले उपकार कधीं विसरणार नाहीं." नानासाहेब उठून म्हणाले.

"तुम्ही मला दोन हजार रुपये फी देणार ती मात्र आगाऊ द्यावी लागेल. ती आली कीं मी कामाला लागतों."

नानासाहेबांनीं खिशांतून दोन नोटा प्रतापरावांपुढें काढून ठेवल्या. "कामाला मुळींच वेळ करूं नका. आणखी कांहीं खर्चबिर्च आल्यास मला निर्भीडपणें सांगा." ते म्हणाले.

"कामाला मी लागलोंच." नोटा आपल्या टेबलावर ठेवून प्रतापराव म्हणाला. "मग मी रंगरावांना जरा घटकाभर येथें ठेवून घेतों. आपल्या चिरंजिवाबद्दल त्यांना माहिती विचारावयाची आहे. तो प्रसंग तुमच्यावर आणण्याची माझी इच्छा नाहीं. बसा, रंगराव आणखी एक सिग्रेट घ्या."

रंगराव बसले व नानासाहेबांनीं आमचा निरोप घेतला.

[ २ ]

आम्ही बसलों होतों त्या खोलीच्या उजव्या हातास दुसरी खोली होती. तेथें टेलिफोन होता. प्रतापरावानें एक चिठ्ठी लिहून अगदीं निष्काळजीपणानें माझ्याकडे सारली. मीं तिच्यावरचा मजकूर वाचला, व थोड्या वेळानें उठून त्या दुसऱ्या खोलींत गेलों. खोलीचें दार ओढून घेऊन मीं टेलिफोन घेतला व कागदावर प्रतापनें लिहिलेला निरोप जिकडचा तिकडे पोंचविला व त्याचें उत्तर आलें तें बाहेर येऊन त्याच चिठ्ठीवर लिहिलें व ती चिठ्ठी आली होती तशीच परत माझ्या मित्राकडे सारली. त्यानें अर्थात् ती वाचली, पण इतक्या जलद, व त्यानंतर ती फाडून त्यानें केराच्या टोपलींत इतक्या चटदिशीं व बेगुमानपणें टाकली कीं, त्या चिठ्ठीवर कांहीं वाचण्याजोगा मजकूर होता आणि तो प्रतापरावानें वाचला हें कोणाच्याहि लक्षांत आलें नसतें. रंगरावाच्याहि तें लक्षांत आलें नाहीं. तो सिग्रेटचे झुरके घेण्यांत तल्लीन झाला होता. दहा मिनिटें

कोणीं कांहीं बोललें नाहीं. मग रंगराव म्हणालाः—“ प्रतापराव, तुम्ही मला कांहीं माहिती विचारणार होतां ना ? ”

“ हो. त्यासाठीं तर तुम्हांला बसवून घेतलें. तुमचे ते बाळासाहेब आतां येथें येणार आहेत. ”

“ म्हणजे ? ते कोठें आहेत हें तुम्हांला कसें कळलें ? ”

“ तुम्हीच आतां म्हणालां ना, कीं ते नानासाहेबांबरोबर मुंबईला आले आहेत म्हणून. शिवाय नानासाहेबांनीं नाहीं, तरी तुम्हीं जाऊन पोलिसांत वर्दी दिली होतीच. ”

रंगराव क्षणभर विचारांत पडला. मग तो म्हणाला, “ मीं आपलें त्या इन्स्पेक्टरला भेटून नुसतें सुचवून ठेवलें होतें. कारण न जाणो बाळासाहेब पळून बिळून जावयाचा. ”

“ तुम्हीं अगदीं बरोबर केलेंत. ” प्रतापराव म्हणाला. “ तुम्हीं पोलिसांत नोकरी धरली तर अधिक गुन्हेगार सांपडतील याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. हें पहा, आतां बाळासाहेब येथें येईल, आम्हांला जरा अर्धा तास बाहेर जावयाचें आहे. तुम्ही येथें बसा आणि बाळासाहेब आल्यावर त्याला आम्ही येईपर्यंत सोडूं नका. आम्हांला कमींत कमी अर्धा तास वेळ लागेल. कदाचित् दहापांच मिनिटें अधिक लागतील. ”

रंगरावानें तें काम करण्याचें अगदीं खुषीनें कबूल केलें. आम्ही उजव्या बाजूच्या खोलीचें दार झांकलें व तिला कुलूप लावलें व बाहेर पडलों. मात्र बाहेर पडल्यावर रस्त्याकडे न जातां इमारतींत त्याच माळयावर पलीकडल्या बाजूला जाऊन, आमचा ब्लॉक होता त्याच्या मागच्या बाजूला आलों, व दुसऱ्या दारानें आमच्या बिऱ्हाडांत शिरलों व दोन खोल्या ओलांडून जातांना जी खोली आम्हीं बंद केली होती म्हणजे दिवाणखान्याच्या उजव्या हाताची खोली, तींत गेलों. आम्ही तींत गेल्यावर पांच एक मिनिटांनीं बाळासाहेब आले. दार उघडून रंगरावांनीं त्याना आंत घेतलें. त्यांचें जें काय बोलणें झालें तें सर्व आम्हांस ऐकूं आलें. आम्ही अर्ध्या घंट्यांत परत येऊं, तोंपर्यंत त्यांनीं तुला बसण्यास सांगितलें आहे असें रंगरावानें बाळासाहेबांस सांगितलें व त्याप्रमाणें तो बसला. मग प्रतापरावानें जाऊन थोडेंसें फडताळांतील फराळाचें काढलें. त्यावर आम्ही दोघांनींहि न बोलतां यथास्थित ताव मारला. मग आल्या

वाटेनें परत येऊन आम्ही आमच्या खोलीचें दार ठोठावलें. तें रंगरावानें उघडलें. बाळासाहेबाचें वय सरासरी पंचवीस वर्षांचें होतें. त्याचा चेहरा पाणीदार असून डोळ्यावर चष्मा होता. त्याचा बांधा सडपातळ असून त्याचा पोषाख कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसारखा म्हणजे नेसलेलें धोतर, त्यावर शर्ट, शर्टवर शॉर्ट कोट आणि डोक्यावर हंगेरियन तऱ्हेची टोपी होती. रंगराव वयानें वास्तविक तिशीच्या आंत बाहेर होता. पण त्याच्या चेहऱ्यावर वार्धक्याची छटा मारी. आम्ही आल्याबरोबर रंगराव म्हणाला:—

" तुमच्या सांगण्याप्रमाणें बाळासाहेबांस येथें मीं अडकवून ठेवला आहे. "

" म्हणजे मला अडकवून ठेवण्याबद्दल कां तुम्ही या गृहस्थाला सांगितलें होतें ? " बाळासाहेबानें प्रतापरावाला विचारलें.

" बाळासाहेब, रंगरावाला तुम्ही थोडेबहूत ओळखतांच. त्यांना कधींकधीं बरोबर ऐकूं येत नाहीं. मी तुम्हांला अडकवून ठेवण्यासाठीं काय म्हणून सांगेन ? रंगरावांची कांहींतरी गैरसमजूत झाली होती. तुम्हांला अशासाठीं बोलावलें कीं, या रंगरावांची तुमच्याबद्दल कांहीं तक्रार आहे. "

" प्रतापराव, " रंगराव म्हणाला. " तक्रार आहे बाळासाहेबांच्या वडिलांची. माझी तक्रार मुळींच नाहीं. "

" त्याचाच अर्थ तो. " प्रतापराव म्हणाला. " तुमची काय किंवा नानासाहेबाची काय तक्रार एकच. तेव्हां बाळासाहेब, तुमचें या तक्रारीबद्दल काय म्हणणें आहे ? "

" पण तुम्हीं मला तक्रार काय आहे हें मुळींच सांगितलें नाहीं. " बाळासाहेब म्हणाला.

" तक्रार अशी आहे, " प्रतापराव म्हणाला. " कीं तुम्ही साधुपुरुषांची फार निंदा करतां. दुसरी तक्रार अशी आहे कीं, तुमच्या सापत्न मातुःश्रीला अद्याप पुत्रप्राप्ति झाली नाहीं. तिसरी तक्रार अशी आहे कीं, तुमच्या वडिलांचा दोन लाख रुपयांचा कंठा नाहींसा झाला आहे. "

" प्रतापराव, हा थट्टेचा विषय नाहीं. " रंगराव जरा रागाचा आविर्भाव आणून म्हणाला " तुम्हांला नानासाहेबांनीं दोन हजार रुपये फीदाखल दिले आहेत, ते कांहीं तुम्हीं त्यांची चेष्टा करावी म्हणून नव्हे. "

" रंगराव, " प्रतापराव म्हणाला. " त्या फीचा मोबदला म्हणून हरवलेला

मोत्यांचा कंठा नानासाहेबांच्या हातीं तीन दिवसांच्या आंत येईल. त्याची तुम्ही काळजी करूं नका. नाहींच आला, तर मी दोन हजार रुपये नानासाहेबांकडे परत करीन."

"पहा प्रतापराव," रंगरावानें उत्तर दिलें. "हा कंठा बाळासाहेबांनीं चोरला आहे असा आमचा वहीम आहे ही गोष्ट त्यांना स्पष्टपणें सांगितली पाहिजे."

"हा चोरण्यांत त्यांचा हेतु?" प्रतापरावानें विचारलें.

"हेतु अगदीं उघड आहे;" रंगराव बोलला. "आपण कंठा चोरावयाचा आणि तो तुम्हीं कुणाला तरी देऊन टाकला असा बाईसाहेबांवर आळ घालावयाचा; म्हणजे यांच्या पदरांत कंठा पडेल व बाईसाहेबांविषयीं नानासाहेबांचें मत कलुषित होईल. बाळासाहेबांचें आणि यांच्या सावत्र आईचें बरें नाहीं."

"पण बाईसाहेबांनीं कंठा कुणाला दिला म्हणून हे आळ घेतील?" प्रतापरावानें विचारलें.

"बाळासाहेबांच्या जिभेला हाड का आहे?" रंगराव म्हणाला "अहो, बाईसाहेबांनीं कंठा भारद्वाजमहाराजांना नेऊन दिला असें म्हणण्याला सुद्धां ते मागेंपुढें पहावयाचे नाहींत. फार तर काय, पण माझेंदेखील नांव घेण्याला ते कचरणार नाहींत."

"कां बरें?" प्रतापरावानें पुन्हां प्रश्न केला. "तुम्हांला कंठा बाईसाहेबांनीं द्यावा असा तुमचा त्यांचा काय संबंध आहे?"

रंगरावाचा चेहरा खर्रकन् उतरला. पण लागलीच तो म्हणालाः—"कुत्सित माणसांना बोलायला कांहीं संबंध कां लागतो? ज्याच्या तोंडांतून भारद्वाज महाराजासारख्या साधुपुरुषाबद्दल शिवी निघते त्याला माझ्यासारख्या गरिबाच्या अब्रूची काय पर्वा?"

"काय बाळासाहेब, बोला." प्रतापराव बाळासाहेबांकडे वळून म्हणाला. "तुमच्यावर हे उघड उघड चोरीचा आरोप करतात. याला कांहीं तुमचें उत्तर आहे?"

"माझें उत्तर प्रसंग आल्यास मी योग्य ठिकाणीं देईन. या रंग्या वाढप्याला मी ओळखीत नाहीं. वाढप्याचा आतां हा भारद्वाजमहाराजांच्या पदरीं प्रधान बनला आहे. माझ्यावर वहीम घेणारा हा कोण? माझ्या वडिलांना किंवा त्यांच्या

कुटुंबाला जर माझी शंका येत असेल तर ते मला विचारतील व मी त्यांना जाब देईन."

"बाळासाहेब, असें रागावूं नका;" प्रतापराव शांतपणें म्हणाला." तुमचे वडील आतां येथें आले होते व आपल्याला तसा वहिम असल्याचें त्यांनीं मजजवळ बोलून दाखविलें."

"मग पोलीसांत वर्दी द्या, नाहीं तर मला पोलीसच्या स्वाधीन करा." बाळासाहेबानें रागानें उत्तर दिलें.

"कां प्रतापराव, झाली कीं नाहीं खात्री?" रंगरावानें विचारलें. "असलीं वाकडीं उत्तरें सरळ माणसाच्या तोंडून निघालीं असतीं कां?"

"बाळासाहेब," प्रतापराव म्हणाला. "तुमचे वडील पोलिसांत जाऊं इच्छित नाहींत. तुम्हीं त्यांचे किती जरी अपराध केले, जरी त्यांच्या गुरुमहाराजांची तुम्हीं निंदा केलीत, जरी त्यांच्या कुटुंबाबरोबर म्हणजे आपल्या सावत्र आईबरोबर तुम्ही भांडलांत, जरी त्यांच्या रंगरावासारख्या स्नेह्यांना रंग्या वाढप्या अशी शिवी दिलीत—"

"शिवी?" बाळासाहेब हंसून म्हणाला." तुम्हांला ठाऊक नाहीं. हा रंग्या एके काळीं खरोखर वाढप्या होता. याच्या या विलायती थाटावर जाऊं नका. पण तो लुच्चा भारद्वाजमहाराज आणि हा रंग्या यांचें मेतकूट जमलें. हा त्यांना शिष्य व शिष्यिणी गांठून देतो व त्याबद्दल ते ह्याला चांगली मिळकत करून देतात. माझ्या सावत्र आईला मुलगा नाहीं. आपल्याला मुलगा झाला नाहीं, तर सगळी इस्टेट मला जाईल अशी तिला काळजी पडली आहे. भारद्वाज-महाराजांच्या प्रसादानें पुत्रप्राप्ति होते अशा थापा रंग्यानें आमच्या नानासाहेबांना दिल्या. तेव्हांपासून याचें बिऱ्हाड आमच्या घरीं आणि आमचे वडील मातुःश्री नेहमीं त्या लफंग्या भारद्वाजमहाराजांच्या द्वारीं—"

"बाळासाहेब, वायफळ बोलण्यांत अर्थ नाहीं." प्रतापराव म्हणाला. "तुमच्या बोलण्यावरून तुमचें आपल्या आईबद्दल किती प्रेम आहे हें उघड होतें आणि म्हणून तिच्यावर कांहीं तरी बालंट आणण्यासाठीं तुम्ही तो कंठा लांबविला नसेल असें म्हणवत नाहीं......"

"म्हणजे, तुम्ही का चोरीचा आळ माझ्यावर घालतां?" बाळासाहेबांनीं विचारलें.

" अलबत् ", रंगराव म्हणाला. " बाळासाहेब, कबुलीजबाब द्या आणि आपसांत मिटवून टाकूं. तुम्हीं तुरुंगांत जावें अशी कांहीं नानासाहेबांची इच्छा नाहीं, आणि कांहीं जरी शिव्या दिल्यात तरी आमचीहि नाहीं......"

" आमची म्हणजे ? " प्रतापरावानें हळूच विचारलें.

" आमची म्हणजे माझी, बाईसाहेबांची, महाराजांची..."

प्रतापराव एकीकडे हंसल्याचा मला भास झाला. पण तो खरोखर हंसला कां मला नुसता भास झाला ? कांहीं मला सांगतां येत नाहीं. मग तो बाळासाहेबांना म्हणालाः—" मग, तुमचें म्हणणें काय ? "

" मी पूर्वीच सांगितलें तुम्हांला. " त्यानें उत्तर दिलें.

" ठीक आहे. " प्रतापराव म्हणाला. " मला सरळपणें उत्तर न दिल्यानें तुमच्यावरचा संशय अधिक दृढ होतो एवढें मात्र लक्ष्यांत ठेवा. तुमच्या नशिबीं जर फौजदारींत जावयाचें असलें, तर तें आम्हांला यापुढें टाळतां येणें शक्य नाहीं. अद्यापि खरी गोष्ट कबूल करा. म्हणजे हें सर्व आपापसांत मिटवितां येईल. "

बाळासाहेब हंसला. " प्रतापराव, तुमचा डिटेक्टिवपणा फक्त दुसऱ्याला तंबी देण्यापुरता दिसतो. पण तंबीला मी भीक घालणार नाहीं. मी तुम्हांला सांगतों, कीं कंठा कोठें आहे याची या रंग्याला नक्की माहिती आहे. "

रंगराव प्रथम गडबडला पण लागलाच तो उसळून म्हणालाः—" हो, मला माहिती आहे. तो कंठा बाळासाहेबांजवळ आहे, आणि ती माहिती मी प्रतापरावांना दिली आहे. तुम्ही हें बालंट माझ्यावर घालाल हें मला ठाऊक होतें. म्हणून मी त्याबद्दल प्रतापरावांना आगाऊ बोललों होतों. "

" मग काय मला पोलिसच्या स्वाधीन करण्याचा तुमचा विचार आहे कीं काय ? " बाळासाहेबानें प्रतापरावाला विचारलें.

" यांत शंका आहे काय ? " रंगराव म्हणाला.

" रंग्या—" बाळासाहेब उसळला.

" बाळासाहेब, " प्रतापराव बोलला, " तुम्हांला पोलिसच्या ताब्यांत देण्याला हरकत नाहीं. पण मी तुम्हांला एक दिवसाची विचार करण्याला मुदत देतों. मला परवपार्यंत कंठा नानासाहेबांना मिळवून दिला पाहिजे. उद्यां संध्याकाळीं पांच वाजेपर्यंत तुम्ही या गोष्टीचा विचार करा. तुम्ही आतां जाण्यास हरकत नाहीं. "

" म्हणजे ? " रंगराव आश्चर्यचकित मुद्रेनें म्हणाला. " अहो, हा आतां पळून जाईल ? "

" त्याची काळजी तुम्हांला नको. आमची नजर त्याच्यावर आहे. " नंतर बाळासाहेब निघून गेले, रंगरावनें सिग्रेट आणखी एकदां पेटविली. तो प्रतापरावांना म्हणालाः—" तुम्ही त्याला जाऊं दिलेंत हें बरें केलें नाहीं. बाकी तुमची शिताफी खरी. तुम्ही वांकडे तिकडे प्रश्न टाकून आरोपीकडून जवळ जवळ कबुलीजबाब घेतलात. "

" अगदीं बरोबर बोललांत, रंगराव. " प्रतापरावानेंहि एक सिग्रेट पेटवून तोंडांत धरली. " तुम्ही अगदीं काळजी करूं नका. आरोपी माझ्या हातांत सांपडल्यासारखाच आहे. पुराव्याचे आणखी एकदोन धागे मिळाले कीं, मग पकडतों त्याला. तुम्ही अगदीं स्वस्थ असा त्याबद्दल. "

रंगराव हंसला. मोठ्यानें हंसला. तो प्रतापरावाकडे वळून म्हणालाः— " अहो, चोरी आणि खून हीं कां कोणाला पचलीं आहेत ? "

" निदान कच्च्या माणसाला तरी तीं पचणार नाहींत. " प्रतापरावहि मोठ्यानें हंसूं लागला. मग हंसें आवरून तो म्हणालाः–" खरेंच, रंगराव, माझ्या मनांत एक कल्पना आली आहे. "

" बोला कोणती ती. "

" तुम्ही म्हणता कीं, तुमचे भारद्वाज महाराज समाधि लावतात व योगबलानें सर्व कांहीं जाणतात. हा कंठा कोणीं व कसा चोरला याबद्दल मला शंका नाहींच; पण माझ्या मनांत आलें आहे कीं, तुमच्या महाराजांना विचारावें. त्यांचें सांगणें आणि माझा तर्क हे एक ठरले कीं, मग मी मुळींच वाट पहाणार नाहीं. आरोपीच्या मुसक्या बांधून त्याला पोलीसच्या हवालीं करतों. "

" बेत कांहीं वाईट नाहीं. " रंगराव म्हणाला. " महाराज रात्रीं दहा ते अकरापर्यंत समाधि लावतात. दहा वाजण्यापूर्वी आपण त्यांना भेटण्याची मी व्यवस्था करतों. अकरा वाजल्यानंतर आपण त्यांना विचारा. तुमचे दोन तास मात्र खर्च होणार. "

" ते होऊं द्यात हो. बोलून चालून दोन हजार रुपये फी मला मिळाली आहे. तिच्यासाठीं दोन तास काय पण दोन दिवस गेले तरीहि माझी हरकत नाहीं. मग काय, आज रात्रींच आपल्या महाराजांना भेटावयाचें ? "

"हो. आजच भेटा. उद्यांवर कशाला ढकला? आज बाळासाहेबांवर चांगली नजर ठेवा. तो पळून जाण्याचा प्रयत्न करील."

आम्ही रात्रीं साडेनऊ वाजतां भारद्वाजमहाराजांच्या बंगलारूपी मठांत किंवा मठरूपी बंगल्यांत जाण्याचें ठरविलें व प्रसन्न चित्तानें रंगरावानें आमचा निरोप घेतला. आमचें नाटक मात्र बुडालें. भारद्वाज महाराजांचा मुक्काम होता तो बंगला वाळकेश्वरावर होता. आम्ही तेथें गेलों त्या वेळीं स्त्रीपुरुषांची अतिशय दाटी झालेली होती. श्रीमान् लोक आपल्या मोटारींत बसून त्या सत्पुरुषाच्या दर्शनासाठीं धांवत आले होते. कांहीं भक्तिमान् आणि श्रद्धाळू लोक पायीं चालत येऊन महाराजांच्या पायांवर डोकें ठेवण्याची वाट पहात होते. आम्ही एक टॅक्सी करून गेलों. रंगराव आमच्या स्वागताला बंगल्याच्या आगाशींत उभे होते. त्यांनीं आमच्या टॅक्सीवाल्याचे पैसे चुकते करून त्यास निरोप दिला व परत जातांना आम्हांला गाडी मिळण्याची व्यवस्था आपण करूं असें त्यानें आम्हांस सांगितलें. महाराजांची स्वारी एका अत्यंत सुखदायक अशा उच्चासनावर बसली होती. ज्या दिवाणखान्यांत ते बसले होते, तेथें बिजलीच्या दिव्यांचा अगदीं लखलखाट करून सोडला होता. दर्शनाला आलेली मंडळी महाराजांच्यापुढें अनेक प्रकारचे जिन्नस नजर म्हणून ठेवत होती. दागिन्यांनीं भरलेल्या व तारुण्य आणि सौंदर्य यांनीं मुसमुसलेल्या अनेक लक्ष्मीपुत्रांच्या बायका महाराजांच्या सेवेंत अगदीं गर्क झाल्या होत्या. महाराजांचा पोषाख संन्याशाला साजण्यासारखा नसला तरी राजयोग्याला साजण्यासारखा होता. त्यांच्या चेहऱ्यावर विशेष प्रकारचें पाणी होतें किंवा त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर कांहीं विशेष तेजस्विता नजरेस पडल्यासारखें वाटे असें मुळींच नाहीं. पण त्या वेळीं, त्या गर्दीत, भक्तमंडळींच्या त्या दंगलींत, आणि श्रद्धेच्या अतिरेकानें अंतःकरणाच्या भावना अंधता पावल्यावर व बुद्धीच्या क्रियेचा संपूर्ण लोप झाल्यावर भारद्वाजमहाराजांची स्वारी त्यांच्या शिष्यगणाला व त्यांच्या वशिल्यानें परमेश्वरापासून आपलीं कामें करून घ्यावयास आलेल्या कामुक लोकांना एकाद्या देवतेच्या अवताराप्रमाणें वाटल्यास नवल नाहीं. महाराजांच्या दर्शनाला आलेल्या महिलामंडळांत 'वसुधैव कुटुंबकम्' अशा वृत्तीच्याहि कांहीं महिला चमकत होत्या; व महाराजांच्या दर्शनाला आलेले कित्येक श्रद्धाळू व भक्तिमान् पुरुष विशेषेंकरून त्यांच्याकडे टक लावून पहातांना आम्हांस आढळले.

असो. रंगरावांच्या कृपेमुळें असल्या गर्दींतहि आमचा प्रवेश होण्याला फारसा उशीर लागला नाहीं. लोकाचाराला अनुसरून महाराजांना आम्हींहि प्रणिपात केला. प्रतापरावानें तर तो इतक्या ठाकठीकपणें केला कीं, मला त्याचें हंसें आलें. वेळ प्रसंग पाहून मी हंसलों नाहीं ही गोष्ट निराळी. प्रतापरावाला पाहून महाराजांनीं किंचित् हास्य केलें व त्याच्याशीं दोन शब्दहि ते बोलले. आपण कशासाठीं आलां आहांत हें रंगरावानें आपणांला सांगितल्याबद्दल त्यांनीं आम्हांस कळविलें; व समाधि उतरल्यानंतर आपण सर्व गोष्टीचा उलगडा करूं असेंहि ते म्हणाले. आम्ही आणखी एकदां प्रणिपात करून गर्दींतून बाहेर पडलों; व एकीकडे जाऊन रंगरावानें सुचविल्याप्रमाणें एका कोचावर बसलों.

पुढें महाराज ध्यानधारणा करणार असा पुकारा होऊन त्यांच्या भोंवतालची गर्दी कमी होऊन मंडळी दूर जाऊन बसली. हळुहळू भारद्वाज महाराजांची दृष्टि नासिकाग्र झाली व त्यांचे नेत्र अर्धस्तिमित झाले. चोहोंकडे एकदम शांतता झाली. ध्यानावस्था एक तासभर टिकावयाची असल्यामुळें आम्ही त्या दिवाणखान्यांतून उठून बाहेर आलों व इकडे तिकडे थोडेसे हिंडलों. तेथें आम्हांला निरनिराळ्या प्रकारची मंडळी भेटली. रंगराव महाराजांच्या सेवेसाठीं त्यांच्या सन्निध राहिला होता म्हणून त्याच्या संगतीच्या लाभाला त्या एक तासभर आम्ही अंतरलों. मंडळींपासून आम्ही जरा दूर राहिलों. प्रतापराव कोणाला न दिसेल अशा बेतानें एक दोन पट्या तोंडांत चढवून त्या चावत चावत मला म्हणालाः—“ मला तर भारद्वाजमहाराजांचा गुरूपदेश घेण्याची अतिशय तीव्र इच्छा झाली आहे. ”

“ खरें कीं काय ? ” मी आश्चर्यानें विचारलें. प्रतापची वृत्ति बुद्धिप्रधान होती. तो एखाद्याचा गुरूपदेश कधीं घेईल असें मला कोणीं सांगितलें असतें तर मीं त्यावर विश्वास ठेवला नसता. तेव्हां खुद्द त्याच्या तोंडून असे उद्गार बाहेर पडलेले ऐकून क्षणभर मी तर स्तंभितच झालों. खरें सांगावयाचें म्हणजे माझ्या मनावर भारद्वाजमहाराजांच्या राजयोगाचा बिलकूल परिणाम झाला नाहीं. त्यांचा तो थाट, सांसारिक वासनांनीं ओथंबलेला त्यांचा तो शिष्यसमूह, त्यांची सामान्य माणसाप्रमाणें दिसणारी चर्या वगैरे गोष्टींमुळें त्यांना पाहून मला कांहीं विशेष वाटलें नाहीं. त्यांना नमस्कार करणेंसुद्धां मला किती जड वाटलें. पण प्रतापरावानें डोकें खालीं वांकविल्यावर मला त्याचें अनुकरण करणें भाग

पडलें. अशी वस्तुस्थिति असतांना प्रतापराव अगदीं गंभीरपणानें तसें बोलला तेव्हां मला चमत्कार वाटला.

" महाराजांचें साधुत्व जर हिणकस असतें, तर हे स्त्रीपुरुष त्यांच्या भजनीं लागले असते काय? तो पहा पलीकडचा लठ्ठ पोटाचा शेटजी. चोरावर मोर म्हणून त्याची प्रसिद्धी आहे. कोणाच्या थापाथापीला बळी पडावयाचा नाहीं. पण भारद्वाजमहाराजांच्या पुढें तो किती आदबीनें उभा होता. तशीच ती पलीकडची मोत्यांच्या हिऱ्यांच्या दागिन्यांनीं मढवून काढलेली बाई पहा. तिचा नवरा तर आपल्या धंद्यांत वाकबगार म्हणून प्रसिद्ध आहेच, पण तो सुद्धां तिच्या अगदीं मुठींत आहे. असली बाई अंतःकरणांत कांहींतरी श्रद्धा उत्पन्न झाल्याशिवाय अशा ठिकाणीं यावयाची नाहीं. आणि तिथें उभा राहिलेला—"

" प्रताप, " मीं जरा त्रासिक आवाजानें म्हटलें, " तुला जर शिष्य व्हावयाचें असेल तर तूं खुशाल हो. मी तुझ्यासाठीं म्हणून येथें आलों. पण तुझ्या बरोबर आलों म्हणून तूं देशील तीं व्याख्यानें ऐकण्याला मी कांहीं बांधलों गेलों नाहीं. खरें म्हणशील तर आजचा दिवस फुका गेला. नाटक बुडालें— नऊ रुपये बुडाले—"

" काय बुवा विचित्र प्राणी तूं? नऊ रुपये गेले, नऊ रुपये गेले म्हणून घेऊन बसला आहेस. बसल्या बसल्या दोन हजार रुपये मला मिळाले हें तर तूं पाहिलेंस. नऊ रुपये कांहीं दोन हजारांपेक्षां अधिक नाहींत. "

प्रतापरावाच्या या बोलण्यावर मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. कांहीं वेळ गेल्यानंतर रंगराव आला. तो म्हणालाः—" महाराजांची समाधि आतां दहा मिनिटांनीं उतरेल. मग कांहीं वेळ त्यांच्याजवळ कोणीं जावयाचें नाहीं असा नियम आहे. त्या अवधींत तुम्ही मजबरोबर चला. ध्यान उतरतां उतरतां त्यांना प्रश्न विचारले पाहिजेत. "

रंगरावाच्या सांगण्याप्रमाणें आम्ही त्याच्याबरोबर भारद्वाजमहाराजांकडे गेलों. ते अद्यापि ध्यानस्थ होते. दोन स्त्रिया मोरपिसांच्या पंख्यानें त्यांना वारा घालीत होत्या. रंगरावानें त्यांना जावयास सांगितलें, व एक पंखा घेऊन त्या बायांच्या ऐवजीं तो वारा घालूं लागला. प्रतापरावानें महाराजांना पुन्हां एकदां प्रणिपात केला आणि हात जोडून तो म्हणालाः—" महाराज, एक दोन प्रश्न विचारण्याची इच्छा आहे. तर आपली परवानगी असावी. "

महाराजांनीं डोळे उघडले नाहींत किंवा ध्यानधारणेसाठीं घातलेला मांडीचा चौकडाहि त्यांनीं हालविला नाहीं. अगदीं मंद स्वरानें ते म्हणाले, " मला खुशाल प्रश्न विचार, भिऊं नकोस. "

प्रतापराव म्हणालेः—" महाराज, आपले शिष्य मंडळींतील नानासाहेब यांचा मोत्याचा कंठा नाहींसा झाला आहे. तो हुडकून काढण्याचें कठीण काम त्यांनीं मजवर सोपविलें आहे. माझ्या बुद्धीप्रमाणें तो कंठा कोणीं नेला याबद्दल मीं तर्क बांधला आहे. पण महाराजांना अंतर्ज्ञानानें सर्व गोष्टी कळतात, तेव्हां त्यांनीं मला कांहीं मार्ग दाखवावा अशी विनंति आहे. "

त्यावर दोन तीन मिनिटें महाराज कांहीं बोलले नाहींत. मग ते तसेच डोळे झांकून म्हणाले,—" तुला आलेला संशय बरोबर आहे. बाळासाहेबांखेरीज कंठा गेलेला नाहीं. "

" मलाहि तसेंच वाटतें. " प्रतापराव म्हणाला. " बाळासाहेब नसते तर कंठ्याची भानगड झाली नसती. "

" यांत काय संशय ? " महाराज म्हणाले. त्यांचें ध्यान आतां उतरावयास लागलें होतें. महाराजांचें बोलणें ऐकून रंगरावाला विशेष समाधान झाल्यासारखें दिसलें. पुढें महाराजांची समाधि उतरली. तेव्हां त्यांना पुनः नमस्कार करून प्रतापराव म्हणाले,——" महाराज, आपल्याशीं अगदीं एकांतांत चार शब्द बोलावयाचे आहेत. तेव्हां रंगरावांना आपण किंचित् अनुज्ञा द्याल, तर ते बाहेर जातील. माझे स्नेही येथें रहाण्यास कांहीं हरकत नाहीं. "

महाराजांनीं किंचित् शंकित बुद्धीनें प्रतापरावाकडे पाहिलें. मग ते म्हणालेः—" रंग, बाहेर जा. मी बोलावल्यावर आंत ये. प्रतापराव, तुमचे स्नेहीहि बाहेर गेले तरी चालेल. "

प्रतापराव त्यावर कांहीं बोलला नाहीं. त्यानें फक्त मला बाहेर जाण्याबद्दल खुणावलें, मी बाहेर आलों; व रंगरावाला गांठलें. महाराजांकडे जाण्याला मंडळी उत्सुक होती. पण रंगरावानें त्यांना सांगितलें कीं, इतक्यांत आंत येण्यास आज्ञा नाहीं. मी बाहेर आलों, तेव्हां नानासाहेब मला दिसले. त्यांच्याबरोबर बाईसाहेबहि होत्या. बाईसाहेबांचे वय तेवीस वर्षांच्या आंत बाहेर असेल. रंगरावांचें त्यांचें परस्परदर्शन झाल्यावर त्या जराशा हंसल्या. तें हंसणें नानासाहेबांना दिसण्यासारखें नव्हतें. आम्हाला बाहेर अर्ध्या तासावर बसावें लागलें. नंतर प्रतापराव बाहेर

आला व तो आणि रंगराव मिळून आंत गेले. महाराजांचें व प्रतापरावांचें काय बोलणें झालें असावें याबद्दल मला कांहींहि कल्पना नव्हती. पण प्रतापरावाच्या एकंदरींत बोलण्यावरून माझ्या मनांत एक भय उत्पन्न झालें होतें. सावत्र आईची फजिती करण्यासाठीं सावत्र मुलगे चोऱ्या करणार नाहींत असें नाहीं, हें मी जाणून होतों. पण बाळासाहेबांला पाहिल्यानंतर तो या भानगडींत नसावा असें मला वाटतें. अर्थात् या बाबतींत मत देण्याचा अधिकार मजपेक्षां प्रतापला जास्त आहे व त्यानें उघड आळ बाळासाहेबांवर घेतला अशी माझी समजूत झाली यांत नवल नव्हतें; आणि आतां त्या महाराजांच्या अंतर्ज्ञानावर विश्वास ठेवून माझा मित्र बाळासाहेबांवर शह ठेवणार असें मला वाटलें. असे विचार माझ्या मनांत घोळत असतांना मी, नानासाहेब आणि बाईसाहेब यांनीं आंत जाण्याबद्दल सूचना आली. त्याप्रमाणें आम्ही गेलों. प्रतापराव व रंगराव जवळ-जवळ बसले होते. महाराजांनीं, त्यांच्या कुटुंबाला व मलाहि बसण्याबद्दल सांगितलें. मी खालीं बसणार इतक्यांत आपल्या बाजूला येऊन बसण्याबद्दल प्रतापरावानें मला खुणावलें. प्रतापराव महाराजांच्या उच्चासनाच्या इतका जवळ होता व रंगराव त्याच्याजवळ इतका चिकटून बसला होता कीं, रंगरावाच्या, जवळ अलीकडे बसल्याशिवाय मला गत्यंतर नव्हतें. त्याप्रमाणें मी बसलों. महाराज नानासाहेबांकडे वळून म्हणालेः–" नानासाहेब, तुमचा कंठा नाहींसा झाला. तुमचा वहिम कोणावर आहे ? "

उत्तर देतांना नानासाहेब गडबडले. इतक्यांत त्यांच्या पत्नीनें त्यांच्याकडे तीव्र दृष्टीनें पाहिलें. नानासाहेब म्हणालेः—" महाराज, ही गोष्ट सरकारदरबारीं जावी अशी माझी इच्छा नाहीं. म्हणून तर चौकशीचें काम मी या प्रतापरावांच्याकडे दिलें. मला वहिम माझ्या मुलाचा येतो. "

" तुम्हांला वहिम येण्याच्यापूर्वी बाळासाहेबांबद्दल वहिम प्रथम दुसऱ्या कोणाला आला काय ? " महाराजांनीं विचारलें.

" दुसऱ्याला ? " नानासाहेब म्हणाले. " ही एकदां म्हणाली होती आणि रंगरावांनीं त्याला दुजोरा दिला होता. मलाहि त्यांचें म्हणणें खरें वाटलें. पण ही गोष्ट षट्कर्णी करण्याची माझी इच्छा नाहीं. बाळासाहेब माझा मुलगा आहे. "

" आपला मुलगा जर घरच्या घरीं चोऱ्या करावयाला लागेल तर त्याची गय करून कसें चालणार ? " रंगराव हंसत हंसत म्हणाला.

" नानासाहेब, " महाराज म्हणाले. " तुमचा वहिम चुकीचा आहे. बाळासाहेबांचें तुमचें नीट नाहीं; परंतु तो जरी कसाहि असला तरी तो चोरी करणार नाहीं. त्याच्याबद्दल मनांतील शंका काढून टाका. "

भारद्वाज महाराजांचे हे शब्द ऐकून मी आश्चर्यानें थक्क झालों. ध्यानस्थ असतांना हे बोलले काय, आणि आतां ते बोलतात काय असें मला वाटलें. रंगरावाचा चेहरा निःसंशय उतरला व बाईसाहेबहि कावऱ्याबावऱ्या दृष्टीनें इकडे तिकडे पाहूं लागल्या.

" महाराज, आपल्या शब्दावर माझा पूर्ण विश्वास आहे. " नानासाहेब म्हणाले. " माझ्या मुलावरची तोहमत गेली हें ऐकून मला केवढा आनंद वाटतो. पण मग तो कंठा गेला कोठें ? "

"कंठा गेला आपल्या चिरंजीवाबरोबर." रंगराव जरा तिरसटपणानें म्हणाला.

" नानासाहेब, " महाराज म्हणाले. " कंठा कुठें आहे हें प्रतापरावांनीं हुडकून काढलें आहे. "

" काय—? " रंगराव ओरडला व उठूं लागला. पण प्रतापरावानें त्याचा हात ओढून खालीं बसविलें. महाराज पुढें म्हणालेः—" कंठ्याचा प्रतापरावांनीं शोध बरोबर लावला. तो मी हा तुमच्या स्वाधीन करतों. " असें म्हणून त्यांनीं खरोखर मोत्यांचा एक सुंदर व तेजस्वी कंठा नानासाहेबांच्या हातीं दिला.

" नानासाहेब, गुरुमहाराजांचा आपल्यावर प्रसाद म्हणून हा कंठा परत मिळाला. " प्रतापराव म्हणाला.

" तो प्रसाद म्हणूनच मी ग्रहण करतों. " नानासाहेब तो कंठा आपल्या पत्नीकडे देऊं लागले.

" पण एक गोष्ट मला तुम्हांस सांगावयाची आहे; " भारद्वाजमहाराज म्हणाले. " हा कंठा तुमच्या वडिलांनीं स्वतःच्या गळ्यांत घालण्यासाठीं केला व आपल्या घराण्यांतल्या मुख्य पुरुषाच्या जवळ तो रहावा अशी त्यांची इच्छा होती. त्या इच्छेला अनुसरून तुमच्या नंतर याचें स्वामित्व बाळासाहेबांकडे जावयाचें आहे. तुमचा आतां वृद्धापकाळ झाला आहे, तेव्हां तो तुम्ही ताबडतोब बाळासाहेबांच्या हवालीं करावा असें मला वाटतें. "

" महाराजांची ही आज्ञा आहे. " प्रतापराव म्हणाला.

"महाराजांची आज्ञा मला शिरसा वंद्य आहे." नानासाहेब बोलले. "आपल्या आज्ञेप्रमाणें उद्यां सकाळीं हा कंठा बाळासाहेबांच्या हवालीं करतों."

"आणखी एक गोष्ट आपणांस सांगावयाची आहे." महाराज म्हणाले. "वयातीत झालेल्या माणसांनीं घरीं बरोबरीचीं मुलें असतांना नव्या विवाह-संस्कारांत पडण्यांत सुपरिणाम होत नाहीं. त्यामुळें घरांत विनाकारण कलह वाढतो. झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. पण तुमच्या कुटुंबाचें वय अद्यापि लहान आहे. प्रत्येक बाबतींत त्यांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय सोडून द्या, आणि ती तुमच्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणाच्या नादानें चालणार नाहीं याबद्दल खबरदारी घ्या." मग प्रतापरावाकडे वळून ते म्हणालेः—"बोला, आतां ही चोरी कोणीं केली होती?"

प्रतापराव म्हणालाः—"महाराज, चोरीचा माल तर सांपडला. चोरी कोणीं केली हा प्रश्न पोलिसला जितक्या महत्त्वाचा, तितका कांहीं नानासाहेबांना महत्त्वाचा नाहीं. आणि त्यांची इच्छा तर हें प्रकरण पोलीसांत नेण्याची नाहीं. असेंच कीं नाहीं नानासाहेब?"

नानासाहेबांनीं मान डोलावली. प्रतापराव पुढें म्हणालाः—"ज्यानें ही चोरी केली तो आपल्या वर्तनानेंच ती गोष्ट बाहेर फोडील. पण चोर कोण याचा खुलासा उद्यां संध्याकाळपर्यंत मीं केल्याशिवाय रहाणार नाहीं."

"मग हें प्रकरण पोलिसांत जात नाहीं, असें म्हणावयाचें?" रंगराव म्हणाला.

"कां पोलिसांत जावें अशी आपली इच्छा आहे का?" प्रतापरावानें विचारलें.

"हो, अशी माझी इच्छा आहे." रंगराव म्हणाला. "प्रतापराव, ही सर्व माया तुह्मी केलीत व आमच्या गुरुमहाराजांनाहि तुह्मी भुरळ घातलीत. पण कंठा तुम्हांला कसा सांपडला हें मी सांगतों. तो बाळासाहेबानें तुमच्याजवळ आणून दिला व त्याच्यापासून पैसे खाऊन त्याला सोडविण्यासाठीं तुम्हीं हें सर्व पुढचें नाटक रचलें. डिटेक्टिव्ह म्हणवून घेतां आणि असले धंदे करतांही गो पोलीसच्या कानावर गेलीच पाहिजे. आणि ती त्याच्या कानावर घालण्याचें काम मी ताबडतोब उरकतों."

रंगरावाचें भाषण ऐकून क्षणभर मला देखील चमत्कारिक वाटलें. पण मी माझ्या मित्राला ओळखत होतों; तेव्हां अशी शंका येणें मला शक्य नव्हतें.

रंगराव उठूं लागला. इतक्यांत तीन चार पोलीस ऑफिसर तेथें येऊन दाखल झाले.

आलेल्या लोकांना पाहून रंगराव म्हणाला, "माझी पोलिसांत जाण्याची इच्छा नाहीं." तेव्हां ही मंडळी आल्यावर प्रतापराव त्यांतील मुख्य अंमलदाराला म्हणाला, "मी सर्व हकिगत तुम्हांस सांगितली आहे. कांहीं पंचाईत होईल असा संभव होता म्हणून मीं तुम्हांस बोलाविलें होतें. पण चोरीचा म्हणून माल जो समजत होतों तो सांपडला व त्यासंबंधीं विशेष चिकित्सा करण्याची नानासाहेबांना इच्छा नाहीं. तेव्हां आपल्याला जी तसदी पडली त्याबद्दल मी तुमची माफी मागतों."

त्यानंतर थोडा वेळ बोलणें होऊन पोलीस अंमलदार निघून गेले व थोड्या वेळानें नानासाहेब व बाईसाहेब जावयास निघालीं. प्रतापरावानें नानासाहेबांकडे वळून म्हटलें, "घरच्या भांडणाचा परकी माणसें पुष्कळ वेळां फायदा घेतात आणि बाहेरचीं माणसें नामानिराळीं राहून घरचीं माणसें गोत्यांत येतात. कधीं कधीं त्यांच्यावर तुरुंगांत जाण्याचा सुद्धां प्रसंग येतो. ही गोष्ट तुम्ही व तुमच्या घरच्या सर्व मंडळींनीं लक्ष्यांत ठेवली तर पुन्हां असा प्रसंग यावयाचा नाहीं."

बाईसाहेबांनीं थोड्याशा क्रुद्ध दृष्टीनें प्रतापरावाकडे पाहिलें; पण प्रतापरावाची नजर त्यांच्याकडे नव्हती. नानासाहेबांनीं पुन्हां एकदां भारद्वाज महाराजांना वंदन केलें व तीं नवराबायको निघून गेलीं. तेव्हां प्रतापराव म्हणाला, "रंगराव, कोणच्या कारणामुळें तुम्हांला मीं गय केली हें सागण्याची जरुरी नाहीं; परंतु पुनश्च तुमच्याबद्दल आगळीक कानावर आल्यास जड जाईल हें लक्ष्यांत ठेवा. आणि भारद्वाजमहाराज, आपण आपल्या या उत्तम शिष्यासहित मुंबईतून तळ हालवावा हें बरें."

* * * *

आम्ही बिऱ्हाडीं आल्यावर हा सर्व प्रकार कसा झाला तें विचारण्याची जरूरी नव्हती. कारण आमच्या दिवाणखान्यांत रंगराव व बाळासाहेब यांची गांठ पडली, तेव्हां रंगरावाच्या भाषणावरून सर्व गोष्टीचा उलगडा झाला होता. बाळासाहेबांवर कांहीं आळ आणावा ही बाईसाहेबांची इच्छा होती व त्या इच्छेला रंगरावांनीं दुजोरा दिला, आणि त्या सर्व व्यूहाचा फायदा घेऊन भारद्वाजमहाराजांच्या पूर्ण संमतीनें रंगरावानें दर्शनाच्या गर्दींत तो कंठा

लांबविला. " बाळासाहेब, " रंगराव म्हणाला, " तूं जर पांच हजार रुपये आम्हांला देशील तर कंठ्याचा पत्ता आम्ही लावून देऊं. नाहीं तर तुझ्या कपाळाचा तुरुंग सुटत नाहीं. " पण कंठा हरवल्याचें बाहेर पडतांच बाळासाहेब प्रतापरावाला नानासाहेबांच्या पूर्वींच येऊन भेटला होता. त्यामुळें रंगरावाच्या धमकावणीला तो घाबरला नाहीं.

मी प्रतापरावाला फक्त विचारलें:—"तूं रंगरावाला कैचींत कां धरला नाहींस."

" रंगराव हलकट मनुष्य आहे. कोर्टांत खटला गेल्यास तो बाईसाहेबांविषयीं वाटेल तें बोलेल; आणि नानासाहेबांच्या घरची परिस्थिति अशी आहे कीं, खटल्याला कांहीं निराळें चमत्कारिक स्वरूप येईल. कांहीं झालें तरी त्या मूर्ख बाईवर अरिष्ट ओढवावें अशी माझी इच्छा नव्हती. उद्यां मी नानासाहेबांकडे जाऊन सर्व खुलासा करणार आहें व भारद्वाजमहाराजांकडूनहि घेतलेला सर्व कबुलीजबाब त्यांच्यापुढें ठेवणार आहे. म्हणजे पुढें ते सावध रहातील. सावत्र मुलें, सावत्र आया आणि म्हातारपणीं नवरोबा बनलेले नंदीबैल यांच्यामुळें केवढे तरी घोंटाळे होतात, त्याचा हा एक मासला आहे. "

रंगरावाला कोर्टांत खेचतां कां येऊं नये याबद्दल माझें अद्यापहि समाधान झालें नव्हतें. पण त्या वेळीं माझ्या मित्राबरोबर वाद करण्यांत अर्थ नव्हता.

**मनोरंजन**, दिवाळी अंक, आक्टोबर १९२५

# आई — पण

सुमतीला सुचत नव्हतें. तिच्या अंतःकरणांत कालवाकालव चालली होती. हातीं आलेलें सुख भोगावें कीं टाळावें याबद्दल तिच्या डोक्यांत निश्चय होईना! तिनें तरी काय करावें? वैधव्य तिच्यावर फार लौकर आलें; बाळपणीं आलें असें त्या शब्दाच्या पूर्वीच्या अर्थानें म्हणतां येणार नाहीं. तिचें लग्न अठराव्या वर्षी झालें होतें. तिची प्रवेशपरीक्षा उतरल्यावर तें झालें. पण तिच्या आईबापांनीं तिचें लग्न एका प्रौढ विधुराशीं लावलें. म्हणजे तो तसा प्रौढ नव्हता पण तसा धडधाकटहि नव्हता. त्याची बत्तिशी खरोखर पडली होती—दंतवैद्यानें ती पाडली होती. पण तिच्या जागीं, वाटेल तेव्हां काढावी, आणि वाटेल तेव्हां बसवावी, म्हणून जी कधींहि पडण्याचें भय नव्हतें अशी नवी बत्तिशी त्यानें बसवून दिली. ती इतकी बेमालुम बसली कीं त्यामुळें तो, म्हणजे सुमतीचा सौभाग्यालंकार, खरोखर तरुण दिसूं लागला. चाळिशी तो लावित असे पण त्यांत नवीन असें कांहीं नव्हतें. चाळिशी आणि लग्न यांचा कांहीं संबंध नव्हता. ती त्याच्या मुंजीच्या वेळेपासून त्याच्या नाकावर—काय म्हणतातना? टिच्चून बसली होती. त्याची पन्नासी खास उलटली नव्हती आणि साठी उलटेपर्यंत त्याला बुद्धि नाठी झालेली पहावी लागली नाहीं. कारण त्याला बुद्धि कमीच होती—नव्हती म्हटली तरी चालेल. आणि मुळीं पन्नासी उलटली नाहीं, तेथें साठी काय करणार? साठीची बाधा त्याला झालीच नाही. त्यानें सुमतीशीं लग्न केलें तें खरोखर "मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्" असा प्रकार केला. लग्न केलें तरी लग्नांत त्यानें गोड खावयास नको होतें! पण जो शरीरांत व्याधि असतांना लग्न करण्याला डरला नाहीं, तो का जिलब्या खाण्याला डरेल? त्याच्या शरिरांतील साखर वाढली आणि बिचाऱ्या सुमतीचें कुंकूं वाढलें. लग्नानंतर सहा महिन्याच्या आंत तिच्या वैवाहिक आयुष्याचीं शंभर वर्षें भरलीं. लोक म्हणूं लागले, हिच्या पायगुणानें नवरा मेला. लोकांना काय! 'मुखमस्तीति वक्तव्यम्!' त्याच्या मूर्खपणानें ही बिचारी गोत्यांत आली त्याचा त्यांना हिशेब नव्हता. ही अठरा वर्षांची मुलगी, लग्नास कबूल कां झाली? तिनें नाहीं कां म्हटलें नाहीं? तिनें प्रतिकार कां केला नाहीं? हे प्रश्न विचारतां येतील. त्यांच्या उत्तराचा या कथेशीं संबंध नाहीं. तिचें लग्न झालें, तिचा नवरा मेला,

ती अनाथ विधवा झाली, एवढ्या गोष्टी खऱ्या – बऱ्या नव्हत–पण खऱ्या–त्याला इलाज नाहीं.

याप्रमाणें आयुष्यांतील तिचा डाव हुकला. पण ती शहाणी मुलगी होती. तिनें हळुहळू विचार केला, आपलें शिक्षण संपविलें, आणि मग एक नोकरी मिळविली. शिकलेल्या मुलीला नोकरी कसली मिळणार ? एका शाळेंत ती शिक्षकीण झाली. तिला शेंपाउणशें रुपये मिळूं लागले. तिला बराच वेळ काम करावें लागे. त्यामुळें वेळ जाण्याला–म्हणजे दुःखाचे विचार टाळण्याला चांगलें साधन झालें. तिला एक दोन शिकवण्याहि मिळाल्या. याप्रमाणें अर्थप्राप्ति व स्वतंत्रता यांच्यामुळें तिच्या मलिन मुखावर पुनः तजेला आला, ती आईबापांना मदत करी, पण त्यांच्या स्वाधीन ती राहिली नाहीं. तिच्या सासरचें तिला कांहीं मिळालें नाहीं. पायगुणाच्या नांवानें शिव्याशाप मात्र मिळाले. आपलें शिक्षण तिनें केलें तेंहि स्वतःच्या हिंमतीवर केलें. लोकांच्या निंदेला तिनें जुमानिलें नाहीं. आईच्या रडण्याला तिनें भीक घातली नाहीं. बापाच्या ओरडण्याला तिनें दाद दिली नाहीं. जगाकडे ती क्रुद्ध मुद्रेनें पाही. पुरुषाकडे तुच्छ मुद्रेनें पाही. स्वतःकडे अभिमानानें पाही. स्वसंरक्षणाला आपण समर्थ आहों अशी तिची खात्री झाली होती. आणि कां होऊं नये ? संसार नष्ट झाला अशी आपत्ति येऊनहि ती डरली नाहीं. ती त्यांतून नीटपणें तगली. दुःखाच्या सागरावर हेलकावे खाणारें मन तिनें अभ्यासाच्या साहाय्यानें खेचलें व त्याला स्थिर केलें. ती स्वतःच्या बलानें स्वतंत्र झाली. तिला कोणाची डर नव्हती. तिच्याकडे वांकड्या नजरेनें पहाणाऱ्याकडे तिच्या सरळ आणि तीव्र नजरेचा मोर्चा फिरला कीं ती वांकडी नजर करणाऱ्याची मान खालीं जात असे. आयुष्यांत वैषयिक सुख हेंच कांहीं एक सुख नाहीं; त्याला विसरवतील अशीं दुसरीं सुखें आहेत असें तिनें ऐकलें होतें. आणि प्रत्येकाला सर्व सुखें मिळत नसतात; त्याप्रमाणें आपणहि या एका सुखास अंतरलों; त्याची फारशी पर्वा करण्याची आवश्यकता नाहीं; असें ती स्वतःचें समाधान करी, व समाधान झालें असें तिला वाटलें. तिला कोणी लोक नांवें ठेवीत पण सुशिक्षित स्त्रियांना नांवें ठेविलीं नाहींत तर या विशिष्टप्रकृति पुरुषांचा मर्दपणा सिद्ध होत नाहीं. तिला हें माहीत होते. ती कधीं त्याबद्दल चिरडीला येत नसे. उलट त्यामुळें ती आपली करमणूक करून घेण्यास शिकली होती.

शाळेंतील नोकरी म्हणजे ओळखी व्हायच्याच. अगोदर वर्गांतील मुलांची आणि मुलींची ओळख ही होणारच. सुमति ज्या शाळेंत जात होती ती मुलामुलींची होती–अर्थात् मुलींची संख्या मुलांच्या मानानें फार कमी होती. अद्यापि "स्त्रियांकरितां स्वतंत्र शाळा पाहिजेत आणि त्यांत बालशुश्रूषा व पाकशास्त्र आणि गायन हे आवश्यक विषय पाहिजेत" ही हाकाटी त्या शाळेच्या चालकांच्या कानांवर आली नव्हती. पाकशास्त्रांत "गृहीतागमा" आणि "प्रदेयागमा" झालेल्या स्त्रियांच्या स्वयंपाकाला नांवेंसुद्धां ठेवितां येणार नाहींत व तोंड दाबून बुक्यांचा मार म्हणजे कसलें तरी खाऊन हंसरा संसार अशी जेवणाऱ्याची स्थिति होईल. या गोष्टींचा अर्थात् "स्त्रियांकरितां स्वतंत्र शाळा" वाल्यांनीं विचार केलेला दिसत नाहीं. शिवाय हार्मोनियमच्या साहाय्यानें सध्यां जो घरोघर बदसूर झालेला आहे, त्यांतच प्रत्येक मुलगी, मग तिला गाण्याचें अंग असो किंवा नसो, जर गायनांत आवश्यक विषय म्हणून निष्णात झाली तर काय प्रसंग ओढवेल यांतहि त्यांनीं डोकें घातलेलें दिसत नाहीं. कांहींहि असो, सुमतीची शाळा "मिश्र" होती आणि त्यामुळेंच कीं काय न कळे शिक्षकवर्गहि मिश्र होता. अर्थात् त्यांतहि स्त्रीशिक्षक अल्पसंख्याक होते हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. तेव्हां सांगण्याचें तात्पर्य काय, नाहीं म्हटलें तरी शाळेंत नोकरी धरल्यावर तेथील शिक्षकांची थोडीबहुत ओळख होणें हें अपरिहार्य असतें. अर्थात् पुरुष शिक्षकांशीं जी ओळख करावयाची ती फार तर औपचारिक असावी हा नियम स्त्रीशिक्षकांनीं विसरूं नये असे कित्येकांचें मत आहे. पण अलीकडची एक लेखिका (ती लेखिका आहे कां लेखक याचा कित्येकांना अद्यापि संशय आहे) म्हणते, त्याप्रमाणें स्त्रियांना शंभर स्त्रिया मित्र असण्यापेक्षां एक पुरुष मित्र झाला तर अधिक बरें वाटतें. (त्या लेखिकेचें मत येथें अगदीं सौम्य शब्दांत दिलें आहे.) यांतील कोणतें मत खरें हें ठरविण्याच्या यातायातींत येथें पडण्याचें कारण नाहीं. गोष्टींत मतांची चर्चा नसावी असा कथातंत्रांत नियम आहे, तेव्हां ती चर्चा येथें केली नाहीं तर कोणाला चुकलेसें वाटणार नाहीं. कोणतेंहि मत खरें असो. सुमतीची पुरुष शिक्षकांशीं थोडीबहुत ओळख झाली होती एवढें खरें.

सुमति निर्भय होती हें वर आलेंच आहे. तेव्हां अशा ओळखी होण्यांत कांहीं भिण्याचें कारण आहे असें तिला वाटत नव्हतें हें उघड आहे. आतां जशी

एकाच हाताचीं झालीं तरी पांची बोटें सारखीं नसतात, त्याचप्रमाणें पुरुष शिक्षकांशीं झालेली ओळख ही सर्वांच्या बाबतींत सारखी असणें शक्य नाहीं. हाच प्रकार सुमतीच्या बाबतींत घडला. शिक्षकांमध्यें एक वामनराव म्हणून होते. आतां वामनराव हें त्यांचें खरें नांव नव्हतें, हें कांहीं खोटें नाहीं. पण त्यांचें नांव बंडोपंत किंवा धोंडोपंत होतें असें अगदींच अरसिकपणानें सांगण्यापेक्षां किंवा त्याचें नांव मोहन किंवा मधुकर होतें असें फारच काव्यमय भाषेंत सांगण्यापेक्षां वामन हें सुटसुटीत, साधें आणि सोपें आणि कांहीं झालें तरी एका कवीचें नांव येथें घेतलें आहे. या वामनरावांशीं सुमतीचा परिचय वाढत्या स्वरूपाचा होता. ते तिला कधीं कधीं वाचण्याला पुस्तकें आणून देत. तिच्याशीं फारच अदबीनें वागत. तिचीं कामें नसतच म्हणा, पण बारीकसारीक कांहीं कामें असलीं तर तीं मोठ्या खुषीनें करीत. ते कवि नव्हते; त्यांचें नांव जरी वामन होते तरी ते ठेंगू नव्हते; ते साडेपांच फुटापेक्षां सहा फुटाच्याच जवळ होते. इंग्रजी आणि मराठी कवींचा त्याचा व्यासंग चांगला होता. त्याचें वय बरोबर सांगणें जरा कठीण होतें. नाकाखालीं मिशा नसल्यामुळें कदाचित् त्यांचें वय होतें त्यापेक्षां ते तरुण दिसत असल्याचा संभव आहे. पण ते दिसण्यांत देखणे होते, बोलण्यांत गोड होते, कामाला तत्पर होते, आणि नित्य वागणुकींत सभ्य होते. त्यांचा "आजतागायत" वाचनाबद्दल फार लौकिक होता आणि विचारांत ते फार "पुढें" असल्याचा बोभाटा होता. हळुहळू सुमति व वामनराव यांची चांगली ओळख झाली. शाळा सुटल्यावर कधीं कधीं थोडा वेळ थांबून ते गप्पा मारूं लागले. सुमतीला असा चांगला पुरुष आपल्याला मित्र मिळाला याबद्दल आनंद वाटूं लागला. पण हळुहळू त्या आनंदाचें रूपांतर कांहीं तरी अर्थ कळण्याला कठीण अशा चमत्कारिक मनोवृत्तींत होऊं लागला आहे असें तिला वाटण्यास सुरवात झाली. पण ती भित्री नव्हती. आणि ती स्वतंत्र होती हें सांगितलेंच आहे.

* * * *

दोन तीन वेळां ते नेहमींपेक्षां बराच वेळ बोलत बसले आणि त्याच्या सान्निध्यांत आपल्याला समाधान होतें असें सुमतीला वाटूं लागलें. तो एखादे दिवशीं दिसला नाहीं तर तिला चमत्कारिक होई व उत्सुकतेनें तो केव्हां दिसेल असें तिला होऊन जाई. एकदां चुकून त्याचा हात तिच्या हाताला, लागला तेव्हां

तिच्या शरीरांत विजेचा झटका बसावा त्याप्रमाणें क्षणिक पण अगदीं जाणवणारी अशी भावना तिच्या मनांत चमकून गेली. आणि संगतीला वामनराव मोठा आनंददायक होता यांत शंका नाहीं. त्याचें वाचन पुष्कळ आणि विविध प्रकारचें. नवीन नवीन मतांची त्याला माहिती फार. केवळ कित्येक कवींनीं उत्पन्न केलेली नवी नीतीच त्याला माहीत होती असें नाहीं. त्या नीतीला काव्यमय अतएव खुळी नीति म्हणून खुळ्यांची नीति असें म्हणणारे कोणी आहेत. शेलेनें एक बायको टाकली आणि दुसरी केली. याचें कारण त्याचें काव्यमय प्रेम असें कोणी कोणी म्हणतात. पण वामनरावाला प्रेमाची शास्त्रीय मीमांसाहि माहीत होती. अंतःकरणांत प्रेमोद्भव झाल्यावर त्याच्या कार्याला जर अवसर दिला नाहीं तर मानसिक रोग उद्भवतात—शारीरिक उद्भवतात हें आहेच—हें त्याला माहीत होतें आणि तें त्यानें एकदां दोनदां सुमतीला समजावून सांगितलें. आतां हें तत्त्व ज्यांची प्रकृति बिघडली आहे, जे विकृतावस्थेंत आहेत, त्यांची चर्चा करतांना सांगितल्यामुळें आजारी माणसाचें पथ्य ज्याप्रमाणें निरोगी लोकांना लागू होत नाहीं त्याप्रमाणें बहुजनसमाजावर या तत्त्वाचा अंमल करूं नये ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाहीं यांत नवल नाहीं. संयमातिरेकानें एकाद्याचें डोकें हलकें झालें म्हणून त्याच्या संयमाचा अतिरेक मोडण्यासाठीं त्याचा संयम प्रथम मोडावा लागतो. याचा अर्थ संयम हा सर्वत्र मोडला पाहिजे असा होत नाहीं. जी सामान्य योग्य वागणूक तिला विशिष्टप्रकृति व विकृत यांच्या अपवादात्मक वागण्यानें बाध येत नाहीं हें तो विसरला, यांतहि नवल नव्हतें; शिवाय विशिष्ट परिस्थितींत एखादी वागणूक स्वाभाविक ठरली तरी ती उपेक्षणीय ठरत नाहीं. एका माणसानें दारू पिऊन खून केला. दारूच्या निशेंत खूनसुद्धां होणें शक्य आहे; माणसाच्या हातून खून कसा झाला याची ही कारणमीमांसा आहे. पण त्यामुळें खुनाचा घोरपणा आणि खुनाचा गुन्हेपणा नाहींसा होत नाहीं. पण एवढा सूक्ष्म विचार, जो मानसशास्त्रांत आणि नीतिशास्त्रांत लागतो, तो करण्याचें त्या त्या शास्त्रांचे महापंडितसुद्धां पुष्कळ वेळां विसरतात; तेव्हां सामान्य वाचक तें विसरला तर त्यांत नवल नाहीं. पण या चर्चेचा सुमतीच्या मनावर हळुहळू—अगदीं हळू—परिणाम होऊं लागला. कधीं कधीं रस्त्यानें चालणारीं गोजिरवाणी मुलें तिला दिसत. तीं पाहिलीं म्हणजे त्यांना उचलून घ्यावें आणि कुरवाळावें, त्यांचें

चुंबन घ्यावें आणि त्याच्याशीं हसावें खिदळावें, असें तिला वाटे. आणि हें सर्व करण्याला आपणाला सत्तेचें मूल नाहीं व तें मिळण्याचा संभव नाहीं हा विचार मनांत येऊन ती फार खिन्न होई. एक दिवस ती व वामनराव असेच चालले असतांना तसा प्रसंग आला आणि सुमतीची खिन्नता—मुलांविषयीं तिची आतुरता—शब्दांतून बाहेर पडली. ती थोडकेच शब्द बोलली पण वामनरावानें मातृत्व हेंच स्त्रियांच्या जन्मांचें सार्थक्य—केवळ पातिव्रत्याला फाजील महत्त्व पुरुष ज्या समाजांत फार बलिष्ठ आहेत तेथें देतात—वास्तविक मातृत्वाचा अनुभव—आणि त्यासाठीं तत्पूर्वस्थितीचा अनुभव हेंच स्त्रीचें सर्वस्व आहे वगैरे महत्त्वाच्या गोष्टी तिला सांगितल्या आणि त्या तिलाहि पटल्यासारख्या दिसल्या.

मातृत्व म्हणजे स्त्रीजन्माचें मोठें लेणें या सामान्य सिद्धांताबद्दल कोठें दुमत असण्याचें कारण नाहीं. त्यामुळें वामनरावाचें बोलणें तिला पटलें व आपल्या अंतःकरणांत जी अमूर्त, अनामिक भावना अलीकडे खेळते ती मातृत्वभावनाच असावी असेंहि तिला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. अलीकडे वामनरावहि हळु-हळू तिच्याबरोबर फार मोकळेपणानें वागे. हाताला हात लागला कीं पूर्वीं तिला विजेचा झटका बसल्यासारखें वाटे, पण आतां कधीं कधीं हिंडायाला गेल्यावर हातांत हात घालण्याचा प्रसंग आला तरी ते टाळीत नसत. आणि तिला वाटे, यांत काय बिघडलें ! मी स्वतंत्र आहे, माझी मी मालकीण आहे आणि मला तर वामनरावांच्या सान्निध्यामुळें सुख वाटतें. तर त्या सान्निध्याचा केव्हां केव्हां आस्वाद घेण्याला काय हरकत आहे ? जुन्या विचारांचें माझ्या मनावर फाजील दडपण आहे त्यामुळें माझें मन कचरतें. पण यांत गैर कांहींच नाहीं. सुखाचा संयम म्हणजे सुखाचा अभाव नव्हे. आणि मी तरुण आहे—मला सुख मिळ-ण्याचा हक्क आहे—आणि—मला भलतें सलतें सुख नको. पण मित्र असावेत, त्यांचें सान्निध्य असावें, त्यांच्याशीं हंसावें खेळावें एवढें तरी सुख मला नको कां ? असें ती म्हणे.

आणि हे आपल्या मनांत येणारे विचार तिनें एकदां वामनरावांना सांगितले तेव्हां त्यांनीं, ते अगदीं बरोबर आहेत, अलीकडच्या शास्त्रज्ञांना मान्य आहेत असें सांगितलें. त्या दिवशीं तीं दोघें मिळून जरा दूर फिरावयास गेलीं होतीं व मध्येंच बोलण्याच्या भरांत त्यानें तिचा हात थोडासा घट्ट धरला व बोलण्याच्या भरांत तिनेंहि तें मनावर घेतलें नाहीं. अलीकडे तिचा वामनरावाबद्दल आदर

वाढला होता. आणि वामनरावहि सर्व प्रकारें तिची मर्जी सांभाळून असे. एकदां तर दुसरी एक शिक्षक बाई होती तिनें सुमतीची थोडीशी चेष्टाहि केली व वामनरावाबरोबर शाळेंतल्या एखाद्या मास्तरणीची एवढी दोस्ती झालेली आहे असें जर त्याच्या बायकोला कळलें तर तिला खपणार नाहीं असेंहि ती बोलून गेली. तें ऐकून सुमतीला कसेंसेंच झालें पण ती त्या बाईवर फार चिडली आणि दुसऱ्याच्या पंचाईती करण्याची कित्येकांना फार संवय असते असें म्हणून तिनें तिला अपरोक्षपणें झाडलेंसुद्धां.

तिनें ती बाई काय बोलली हें त्यानंतर वामनरावाची गांठ पडल्याबरोबर त्याला सांगितलें. तो हंसला आणि मग म्हणाला—"माझ्या बायकोला हें कळलें तर आवडणार नाहीं हें खरें. ती अगदीं जुन्या वळणाची वेंधळी स्त्री आहे. तिला प्रेम आणि आनंद या गोष्टींची ओळखच नाहीं. माझें अंतःकरण तिला समजत नाहीं आणि तिचें अंतःकरण–त्यांत समजण्यासारखें कांहीं नाहींच. खरोखर सुमति, तुझी ओळख झाल्यापासून (परिचयाचें आतां दुहेरी रूप जाऊन तेथें एकेरी रूप आलें होतें) माझी सृष्टि अगदीं बदलल्यासारखी झाली आहे. तुझ्या संगतींत क्षण इतक्या आनंदांत जातात कीं त्यामुळें मी माझी दुःखें विसरतों." तें ऐकून सुमति क्षणभर विचारमूढ झाली; पण आपण वामनरावासारख्या बिचाऱ्या चांगल्या माणसाला आपल्या दुःखाचा केव्हां केव्हां विसर पाडूं शकलों याबद्दल तिला अस्पष्टपणें पण बरें वाटलें. मग ती म्हणाली–"ती–मास्तरीण–मोठी चमत्कारिक आहे. तिला माझा हेवा वाटतो हें खचीत." वामनराव म्हणाला—"सांगूं नये पण सांगतों. ती बाई फारच चमत्कारिक आहे. तिच्याशीं जपून वागत जा. तिचा माझ्यावर फार राग आहे. तिनें मला नादीं लावण्याचा पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. पण मी तसला मनुष्य नाहीं हें तुला माहीतच आहे. मी तिच्या फासांत सांपडलों नाहीं; म्हणून ती मजवर नुसती जळते आहे." तें ऐकून सुमतीला उमज पडला. त्या बाईचें हृद्गत तिला उकळलें. तरीच सटवी माझ्या पाठीमागें हात धुवून लागली आहे, असें तिला वाटलें. त्या दिवसापासून तिचा वामनरावाबद्दल आदर वाढला. तो तसा मनुष्य नाहीं अशी खातरजमा झाल्यावर आदर कां वाढणार नाहीं? त्यानेंच त्याबद्दल तिची खात्री करून दिली होती. आणि जुन्या वळणाची वेंधळी बायको असणें हें बायको मुळीं नसल्यापेक्षांहि दुःखदायक

असलें पाहिजे असें तिला वाटूं लागलें. आपला नवरा मेला–पण होता तेव्हां त्याबद्दल कुठें आपल्याला उल्हास वाटत होता? त्याचें मोठें वय, त्याची रोगट प्रकृति, त्याचा तिरसट स्वभाव–तिला बिचाऱ्या वामनरावाच्या परिस्थितीची चांगली कल्पना करतां आली. आणि त्या बाईचा तिला राग आला. त्या बिचाऱ्याला घरीं बायकामुलें आणि या लावसट बाईनें त्याच्यावर अशी मोहिनी घालण्याचा कां उद्योग करावा–आणि केला तरी तो पुरुष केवढा सभ्य आहे हें समजल्यानंतर मग स्वस्थ तरी बसावें–पण! याप्रमाणें कांहीं दिवस चाललें. मग एके दिवशीं ते जरा दूर हिंडावयास गेले होते आणि चांदणें पडूं लागलें आणि जवळच एक सुंदर ओढा वहात होता. अर्थात् पक्ष्यांची किलबील थांबली होती पण पुष्पांचा सुगंध आसमंतात् जणूं दरवळून राहिला होता; आणि वामनरावाच्या वाणींत उत्सुकता आणि आतुरता यांचा परमावधि झाला होता. तो म्हणाला–"सुमति, मला क्षमा कर. माझें अंतःकरण अनावर झालें आहे. बोलण्याची भीति वाटते. पण बोललों नाहीं तर माझें डोकें ताळ्यावर राहणार नाहीं अशीहि भीति वाटते. माझें तुझ्यावर प्रेम आहे, तुझें पाऊल पडलेली मातीसुद्धां मला प्राणाच्या पलीकडे वाटते. तुझ्या गालावर उमटलेलें हास्य कौमुदीपेक्षां मला आनंद देते!" हें तें काव्यमय भाषण ऐकून सुमति थरारली. तिची बुद्धि क्षणभर विमूढ झाली. पण तें भाषण ऐकून तिच्या अंतःकरणाच्या आंत आनंद झाला. आणि तिच्या मुखावर उमटलेली भावना पाहून वामनरावाला आनंद झाला. तो शहाणा होता, पुनः बोलला नाहीं. पण पहिली लढाई आपण जिंकली असें त्याला वाटलें.

* * * *

आणि तें सगळें खरें होतें. बायकापोरांना टाकून देऊन नवें लग्न करण्याची वामनरावाची स्थितिहि नव्हती आणि इच्छाहि नव्हती. बिचारा परिस्थितीनें बांधलेला–जखड बांधलेला–माणूस–हीच अमेरिका असती तर दोघांचे स्वभाव जुळत नाहींत म्हणून घटस्फोट झाला असता–वामनराव बंधनांतून सुटला असता आणि मग त्यानें सुमतीशीं पुनर्विवाह केला असता. पण जें होणार नव्हतें त्याचा विचार कशाला करावयाचा! शिवाय–आणि मोठ्या मोठ्या ग्रंथकारांचीं नांवें वामनरावानें तिच्यापुढें घेतलीं–विवाहसंस्थेचें एवढें स्तोम कशाला! कांहीं झालें तरी स्त्रियांच्याच बाबतींत विवाहाचें बंधन

काय तें आहे. पुरुष कोठें त्या बंधनाला विचारतात? मग आपण तरी त्याचें येवढें स्तोम का माजवावें ? विवाहविधि हा खरोखर स्त्रीचा बलिदानविधि आहे; तिचा हवनविधि आहे; तिचा बंधनविधि आहे; आणि नशीबानें म्हणा कशानेंहि म्हणा मी मुक्तबंध झालें आहे. तेव्हां बंधनाच्या पलीकडे जायला मला काय हरकत ? आणि शिवाय वामनराव म्हणाला, " तसाच तुझा आग्रह असेल तर आपण लग्न करणार नाहीं असें नाहीं—". पण तसाच आग्रह धरणें सुमतीला नीट वाटलें नाहीं. त्याच्या बायकोला पदच्युत करण्याचा विचार— ! तशी त्याला कांहींच हरकत दिसत नाहीं, सुमति स्वतःशीं म्हणाली; ' ज्या मूर्ख स्त्रीला नवऱ्याचें मन प्रसन्न राखतां येत नाहीं, जिला त्याचें अंतःकरण समजत नाहीं, जिला त्याच्या काव्यमय प्रसंगांत मन घालतां येत नाहीं तिची अशीच खोड मोडली पाहिजे ! ' आणि मग सुमतीला आठवलें कीं ही तर आतां नवी चाल पडूं लागली आहे.

कित्येक चांगल्या सुशिक्षित स्त्रिया बेधडक ज्याची पहिली बायको जिवंत आहे त्याच्याशीं लग्न करतात. मग बाहेर येतें कीं त्या पहिल्या बायकोची तब्येत बरी नव्हती आणि तिनेंच आग्रह केला म्हणून तो तरी नाखुषीनें लग्नाला उभा राहिला. नाहींतर मग ठरतें कीं ती पहिली बायको वेडीच होती. मग त्या बिचाऱ्यानें काय करावें ? वेडीबरोबर जन्म कसा घालवावा ? आतां ती अगोदर वेडी होती कीं कलावंत पतिराजाचें काव्यमय प्रेम घराबाहेर सैरावरा धावूं लागलें म्हणून ती वेडी झाली वगैरे वगैरे प्रश्न निघणार नाहींत असें नाहीं. पण वामनरावाला ते आठवले नाहींत आणि सुमतीला त्यामुळें असे प्रश्न असतात हेंहि कळलें नाहीं.

आणि शिवाय तो म्हणाला—" तुझ्यासारख्या शहाण्या आणि समंजस स्त्रीच्या ठिकाणीं केवळ कामाचा अतिरेक होणें शक्य नाहीं आणि माझ्याहि ठिकाणीं शक्य नाहीं. आपण विचारी आहोंत, पण लहान मुलांकडे पाहून तुझे डोळे जेव्हां आतुर झालेले दिसतात तेव्हां मला तुझी खरोखर दया येते—आईपणाचा तुझा हक्क हिरावून घेण्याचा या समाजाला काय अधिकार आहे ? "—आणि ती म्हणे, " सुंदर कविता वाचतानां तुमचें अंतःकरण जेव्हां सद्गदित होतें त्या वेळीं त्या कवितांचा आस्वाद समजणारी पत्नी तुम्हांला नाहीं म्हणून मला कितीतरी वाईट वाटतें. " याप्रमाणें त्यांचें काव्यकूजन चाललें होतें. तिनें पुष्कळ, पुष्कळ

विचार केला आणि एक दिवस ती अगदीं हतबळ झाली. आणि त्याचा पुष्कळ दिवस आग्रह चालला होता कीं चार दिवस आपण कोठें तरी येथील मंडळीला अज्ञात अशा ठिकाणीं जाऊन येऊं, भिण्यानें सुख मिळणार नाहीं, धैर्य ही आपल्या परस्पर प्रेमाची कसोटी आहे, या नैतिक धैर्याच्या परीक्षेंत आपण उतरलें पाहिजे आणि मी स्वतंत्र नसलों तरी तूं स्वतंत्र आहेस, तेव्हां आपण त्या डोंगरी ठिकाणावर जाऊं; तेथें आपल्या ओळखीचें कोणी भेटणार नाहीं; आणि आपल्याला आपल्या अंतःकरणाचा ठाव घेतां येईल, अशा त्या त्याच्या सांगण्याला संमति द्यावी असें तिला वाटूं लागलें. आतां त्या चोरटेपणाचा तिला जरा कंटाळा वाटूं लागला—चोरटी गोष्ट चोखट असणें शक्य नाहीं असा एक ग्रह तिच्या मनावर होता तो टोचणी करूं लागला. पण वामनरावानें तिच्या पुढचा प्रश्न अगदीं हंसत खेळत सोडवला. तो म्हणाला, कीं समाजानें परिस्थितिच अशी निर्माण केली आहे कीं त्यांत सद्गुणानें चोरटेपणानें राहण्याखेरीज दुसरा रस्ता नाहीं. आणि हा सामान्य सिद्धांत केव्हां केव्हां खरा असला तरी आपण जें करणार म्हणतों तें सद्गुणाच्या सदराखालीं येण्यासारखें आहे कीं नाहीं हें कांहीं सुमतीला त्यावेळीं सुचलें नाहीं. वामनरावाच्या बोलण्याचा आवेश आणि त्यानें दिलेलीं उदाहरणें यामुळें ती अगदीं मुग्ध झाली आणि ज्या समाजानें मला न्याय दिला नाहीं त्याची पर्वा मी कां करावी ? असेंहि तिच्या मनांत आलें. मला जर आई व्हावेसें वाटत असेल तर मी होणार, भिणार नाहीं, असा निश्चय ती करूं लागली.

आणि हळुहळू त्याबद्दलचा तिचा मोहहि वाढूं लागला. आपलें प्रेम जागृत झालें असून तें वामनरावावर बसूं पाहतें—नव्हे बसलें आहे हें तिला कबूल करावें लागलें. आणि हें काय म्हणून जेव्हां ती विवंचना करूं लागली, हें प्रेम स्वर्गीय कां काव्यमय, हा मातृभावनेचा उल्हास कां स्वातंत्र्याचा परिपोष कां निर्भयतेचा प्रकाश अशा प्रश्नांची जेव्हां ती उत्तरें काढूं लागली तेव्हां ती जरा चरकली. पण जसजसी ती त्या उत्तरांनीं चरकूं लागली तसतसे हे प्रश्न विचारणें म्हणजे वेडेपणा आहे असें तिचें मन तिला सांगूं लागलें. कारण दर वेळीं उत्तर तेंच येई कीं—ही प्रबळ वासना आहे; हा विषयाचा ध्यास आहे; हें शरीरानें केलेलें बंड आहे; ही इंद्रियांची हांक आहे, हृदयाची हांक नव्हे; आणि—मग एक दिवस तिनें धीर केला आणि स्वतःलाच विचारलें, कीं इंद्रियांना हांक मारण्याचा

अधिकार आहे कां नाहीं ? शरीराचें आपल्यावर कांहीं ऋण आहे कीं नाहीं ? शारीरिक इच्छा पूर्ण न करणें म्हणजे देहदंड करणें नव्हे काय ? आणि देहदंड काय म्हणून करावा ? संयम म्हणजे देहदंड नव्हे काय ? आतां संयमाची आवश्यकता सामाजिक जीवनांत न्यायासाठीं, परोपकारासाठीं म्हणजे दयेसाठीं, सत्यासाठीं, सौंदर्यासाठीं असते या गोष्टी तिनें ऐकल्या नव्हत्या असें नाहीं; आणि म्हणून संयम हा देहदंड नसून देहाला अधिक कार्यक्षम करण्याचा, देहाला खरोखर पुष्कळ काळ योग्य प्रकारें टिकवून सुखी करण्याचा, तो मार्ग आहे, आणि स्वतःच्या इंद्रियावर, देहावर, इच्छांवर ज्याचा ताबा नाहीं म्हणजे ज्याला संयम करतां येत नाहीं त्याला स्वातंत्र्य असणें शक्य नाहीं हेंहि तिनें ऐकलें होतें. पण तें तिच्या तितकेसें लक्षांत राहिलें नाहीं. ती तारुण्यानें मुसमुसलेली, सुखाच्या क्षुधेनें व्याकुळ झालेली आणि तिच्या समोर वामनरावासारखा सर्व प्रकारें मोहक, काव्यमय, मधुभाष्र असा पुरुष सदोदित उभा. आणि शरीरवृत्तींच्या कार्याला अडथळा करूं नये असें विद्वानांचें मत असल्याबद्दल बऱ्याचशा लोकांची–ज्यांना आपण विद्वान् समजतों, जे वाचनालयांतून मोठालीं पुस्तकें आणून वाचतात ( निदान आणतात ) अशांची तें मत खरें असल्याबद्दल ग्वाही; मग तिचें मन चंचल झालें याचा दोष केवळ तिलाच देणें रास्त होणार नाहीं. जसजसी ही बाजू तिच्या मनांत घोळूं लागली तसतसें ही "इंद्रियांची हांक" न ऐकणें म्हणजे भित्रेपण आहे असें ती समाधान करून घेऊं लागली. आपल्याला आई होण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे. आणि आई होणें हेंच स्त्रीच्या जन्माचें सार्थक आहे असेंहि ती स्वतःच सांगूं लागली. तसें होण्यासाठीं योग्य वर पाहून पुनर्विवाह करण्याचा रस्ता तिला खुला होता. पण ती वामनरावावर भाळली होती हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. त्याचा काव्यशून्य संसार कांहीं काळ तरी काव्यमय करण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं आहे आणि तो म्हणतो तें करण्यांत आपला स्वार्थ यत्किंचित्‌हि नसून केवळ त्याला सुखी करण्याचा–परमार्थाचा–हा प्रयत्न आहे असें तिला वाटूं लागलें. तसें ती एक दिवस वामनरावाला म्हणाली आणि त्यानेंही तिला तिचा विचार अगदीं बरोबर असल्याचें सांगितलें. त्या दिवशीं तीं दोन घटका एकमेकांना बिलगून बसलीं, आणि त्याच्याबरोबर चार दिवस अज्ञात ठिकाणीं जाण्याचें तिनें कबूल केलें. आणि दुसरा डावहि आपण जिंकला

असें त्याला वाटलें. त्यांच्यामधली भीड अगदीं नाहींशी झाली आणि त्या दिवशीं दोघांनीं आपलीं अंतःकरणें परस्परानां खुलीं करून सांगितलीं. परिस्थितीचा बेसुरपणा, सुमतीचें सौभाग्यशून्य आयुष्य आणि वामनरावाचा काव्यशून्य संसार, या सर्व गोष्टी दोन दिवस कां होईना अगदीं विसरून पूर्ण आनंदी आनंद उपभोगण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यावेळीं लागलेल्या तंद्रीमुळें तें काव्यमय वातावरणांत वर वर गेले आणि तेथें त्यांना भावकवींच्या गायनाचें पार्श्वसंगीत ऐकूं येऊं लागले. आणि अशा मनःस्थितींत त्यानें तिला सांगितलें कीं मी जरी व्यावहारिक बंधनानें जखडला असलों तरी तुझा आहे. प्रेमाच्या राज्यांत बंधनें नाहींत असें तो म्हणाला. त्याला बिचाऱ्याला काय ठाऊक कीं प्रेमाची मूर्त काय पण अमूर्त बंधनें सुद्धां वज्रानें तोडण्याला कठिण असतात! पण ज्यांच्यावर विकाराचा इतका अंमल चढला आहे कीं जे विकाराला विचार म्हणूं लागतात त्यांना विवेक सुचणें म्हणजे अवसेच्या रात्रीं चांदणें पडण्यासारखें आहे.

त्यानें सेकंड क्लासचीं तिकिटें काढलीं. शाळा मास्तरांची स्थिति सेकंड क्लासचीं तिकिटें काढण्यासारखी नसते, पण आजचा प्रसंग निराळा होता. आणि त्याला वाटले कीं बहुधा डबा रिकामा मिळेल. त्या दिवसापर्यंतचा त्याचा ऐकीव अनुभव असा कीं, सेकंड क्लास बहुधा रिकामा असतो; हे असले कठीण दिवस; उगाच खर्च कोण करील? आणि गाड्यांत गर्दीहि कमी आणि गर्दी नसली म्हणजे थर्ड क्लास कांहीं तसा वाईट नव्हे. तेव्हां हें सगळें जरी खरें होतें तरी वामनरावानें आज सेकंड क्लासचीं तिकिटें काढलीं. पण त्या दिवशीं गाडी भरून आली. सगळा पहिल्या दुसऱ्या वर्गाचा एक डबा गाडीलां. त्यांत सेकंड क्लासचे दोन कंपार्टमेंट. त्यांतला एक सोल्जरांनीं भरलेला तेव्हां दुसऱ्यांत सुमतीला घेऊन वामनराव चढला. तेथें एका बांकावर एक स्त्री व तिचीं दोन मुलें, एक मुलगा व एक मुलगी बसलीं होतीं आणि दुसऱ्या बांकावर दुसरी एक स्त्री बसली होती. तिच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून ती कोण असावी हें कळण्यासारखें होतें. शिवाय एक गृहस्थ उभा असून तो वरच्या बर्थवरून कांहींतरी सामान काढीत होता. तो या बांकावरचा कां त्या बांकावरचा ही शंका वामनरावाला आलीच. पण तो तसाच बांकावर बसला आणि कोपऱ्याच्या जागेला सुमति बसली. तो गृहस्थ वरून कांहीं सामान काढून तीं दोन मुलें आणि बाई बसली

होती त्या बांकावर बसला व त्यांतली ती मुलगी अलग वर उचलून मग तिला मांडीवर घेऊन खालीं बसला. तेव्हां ती मुलगी, "मामा मला खाऊं देना" म्हणून त्याला ओरडून सांगूं लागली व तिचा भाऊ–तिच्यापेक्षां तो दोन वर्षांनीं मोठा असेल–तिच्या मदतीला गेला. त्या मुलांची आई तें सर्व कौतुकानें पहात होती. मुलांनीं मामाभोंवतीं मोठाच गिल्ला केला तेव्हां मामा चेष्टेनें म्हणाला–"मी मधूला थोरलें चाकोलेट देणार. पण तूं फार हट्टी म्हणून तुला, चमे, धाकटें देणार." तेव्हां "मला मोठें" म्हणून मधूनें टाळ्या वाजविण्याला सुरवात केली आणि 'मला मोठेंच पाहिजे' म्हणून चमीनें रडण्याला सुरवात केली आणि त्याच धांदलींत बहिण भावंडांनीं मारामारी सुरूं केली. आणि त्यांची आई व मामा हसूं लागले. इतक्यांत त्या मारामारींत चमी धाडकन् खालीं आपटली.

त्याबरोबर तिची आई इतकी कावरीबावरी झाली कीं, तिची मुद्रा पाहिल्यावर सुमतीला फार चमत्कार वाटला. चमीला कांहीं लागलें नव्हतें. तिला उचलल्यावर व दोघांच्याहि हातांत थोरलें चाकोलेट दिल्यावर सर्व स्थिरस्थावर झालें. पण तेवढ्या त्या अल्पावधींत मातृमुखाचें जें दर्शन सुमतीला झालें त्यामुळें मातृभावना म्हणजे काय याची तिला कल्पना आली. ती कल्पना त्या भावनेवर लिहिलेले ग्रंथ वाचून येण्यासारखी नव्हती. त्या लहान पोरीला जर खरोखर कांहीं झालें असतें तर तिच्या आईचें डोकें ताळ्यावर राहिले नसतें हें त्या मुद्रेंत तिला स्पष्टपणें दिसलें. मातृभावना ही इतकी आश्चर्यकारक आहे कीं, तिचा अंमल चढल्यावर प्रत्यक्ष मृत्यूला स्त्री भिणार नाहीं, मग क्षुद्र इंद्रियवृत्तींची ती परवा करील ही गोष्ट शक्य नाहीं. इंद्रियांच्या आवेगाला बळी पडून जर आपल्या बाळाला धोका येत असेल तर जी आई आहे, जिच्या ठिकाणीं आई–पण उद्भूत झालें आहे, ती त्या इंद्रियवृत्तीच्या वेगाला नष्ट करून टाकील किंबहुना तो वेग त्या मातृभावनेच्या प्राबल्यांत तिला बाधा करूं शकणार नाहीं, हें त्या साध्याच प्रसंगानें त्या मातेच्या चर्येवरून सुमतीनें जाणलें. ती तरी स्त्रीच होती आणि मातृभावनेचें तेज तिच्याहि अंतःकरणांत गुप्त होतें तें त्या प्रसंगानें जागृत झालें आणि बाळकाच्या हास्यावर–हास्यावर काय पण त्याच्या बालिश रुदनावर, माता आपले पंचप्राण ओवाळून टाकतें हें तेव्हां तिला पटलें. यत्किंचित् धोक्यानें जर ती बाई इतकी घाबरली, अणुरेणूइतका

त्याचा कर्मीपणा झालेला जर मातेला खपत नाहीं, तर जन्मभर आपल्या बाळाला लोक भलभलतीं नांवें ठेवतील असें कृत्य करण्याला, जिच्यांत मातृभावना जागृत झाली आहे ती स्त्री कधीं तरी तयार होईल काय? असें त्यावेळीं सुमतीला वाटलें. अगोदर तिच्या डोक्यांत विचारचक्र चालूं होतेंच. वामनरावाबरोबर आले हें बरें केलें कां गैर केलें हा विचार तिची पाठ सोडीत नव्हता. तशांत एकांताच्या आशेनें जास्ती पैसा खर्च करून तिकिटें काढलीं तर डब्यांत गर्दी. अशा सर्व प्रकारें तिचें मन त्यावेळीं इतकें नाजूक झालें होतें कीं तो लहानसा धक्का कोणाच्या लक्षांतहि आला नसता, जो तिला जाणवला.

इतक्यांत सुमति व वामनराव ज्या बांकावर बसले होते तेथें बसलेली बाई बोलूं लागली. तिनें जवळचीं दोन खेळणीं काढून तीं मुलांच्या हातांत दिलीं. तेव्हां मुलांचा मामा म्हणाला—" तुम्ही कोठें चाललांत?" ती म्हणाली—" माझा शेट मुंबईस असतो, तिकडे जातें. " " गेलां होता कोठें ? " मामानें विचारलें. ती म्हणाली—" मला मुलग्याची हौस आहे. आमच्या लोकांत मुली झाल्या तर आनंद मानतात. पण मला मुलगा पाहिजे आणि इकडे एक साधु आहेत त्यांच्या आशीर्वादानें मुलगा होतो असें मी ऐकिलें, म्हणून तिकडे गेलें होतें. माझ्या शेटनें मला पुष्कळ पैका दिला आहे. तेव्हां मुलगा झाला तर मी त्याला शिकवून चांगला शहाणा करणार आणि त्याचें छान लग्न लावून देणार. तुमचीं मुलें फारच गोजीरवाणीं आहेत हो—" असें म्हणून त्या बाईनें त्या धाकट्या चमीला जवळ घेतलें आणि तिला खिडकीजवळ बसविली. सुमतीच्या मनःस्थितीवर हा दुसरा आघात बसला. ती बाई, तसली बाई—तिला आपला मुलगा शिकूनसवरून शहाणा करावासा वाटतो व त्याचें योग्य प्रकारें लग्न करावेसें वाटतें—आणि मला—मला जर मुलगा झाला—या परिस्थितींत जर मी आई झालें, तर त्या मुलाच्या कोवळ्या गळ्याला नख लावण्याची नाहीं कां मला पाळी येणार ? आणि मुलाच्या गळ्याला नख लावण्याची तयारी ही कां मातृभावना—आणि त्या दिवशीं ते काय म्हणाले होते—संततिनियमन—म्हणजे माझ्या परिस्थितींत माझें सत्कृत्य लपविण्यासाठीं तें मी करणार आणि त्याचा अर्थ काय तर जन्माला आल्यावर नख लावण्याऐवजीं जन्माला येण्यापूर्वीच मी त्या बाळाला नख लावणार—? सुमतीचें अंतःकरण हादरलें. तिच्या आंगाला घाम सुटला. तिनें वामनरावांकडे पाहिलें. त्यांनेंहि स्निग्ध दृष्टीनें तिच्याकडे

पाहिलें पण त्याची स्निग्ध दृष्टि त्यावेळीं तिला विषमय वाटली. त्याचा देखणे-पणा भुजंगानें कवटाळलेल्या चंदनाच्या सुवासाप्रमाणें तिला वाटला. त्याच्यावर आपलें प्रेम कसें बसलें याचें तिला आश्चर्य वाटूं लागलें. आईपण माझा हक्क आहे—पण आईपण म्हणजे मुलाला मारणें नव्हे—आईपण म्हणजे मुलाच्या नांवाला कायमची काळोखी लावणें नव्हे; आईपणाचें व्रत घेतात त्यांना आपल्या बाळासाठीं पंचप्राणांची कुरवंडी करावी लागते—आईपण फुकाचें नाहीं, हें सुमतीला पटलें.

तिच्या डोक्यांत याप्रमाणें विचारांचा हलकल्लोळ चालला असतां अग्निरथ थांबला. स्टेशन आलें. त्यांना उतरावयाचें स्टेशन पुढचें होतें. पण सुमतीला आतां धीर धरवेना. ती म्हणाली—“ वामनराव, मी येथें उतरणार. ” तिनें एक हमाल बोलावला व ती खालीं उतरून तिनें आपलें सामान खालीं काढविलें. वामनरावहि खालीं उतरला. गाडी निघून गेली. सुमति स्टेशनमास्तराकडे जाऊन उलट जाणारी गाडी केव्हां येईल म्हणून विचारून आली. ती येण्याला दीड तासांचा अवकाश होता. वळकटीवर सुमति बसली. ऊन नुकतेंच कमी होत होतें तरी ती जेथें बसली होती तेथें तें होतेंच—वामनराव म्हणाला—
“ सुमति, याचा अर्थ काय ? कां परत जाणार ? ”

सुमति प्रथम बोललीच नाहीं. मग ती म्हणाली; “ सगळें चुकलें. तुमच्या-बरोबर येण्यांत मी मोठी चूक केली. जास्ती बोलण्याची जरूर नाहीं. माझी काळजी करूं नका. मी माझें तिकीट काढलें आहे. तुम्ही माझ्यासाठीं आज खर्च काय केला तो मला कळवा म्हणजे ते पैसे मी तुमच्याकडे पाठवून देईन. आणि आतां मजपुढें उभे राहूं नका—”

“ सुमति, तुझी तब्बेत बरी कां नाहीं ? तुला काय झाले आहे ? ” वामनराव काकुळतीनें म्हणाले.

“ माझी तब्बेत ? बिघडली होती. पण आतां ती बरी होईल आणि वामनराव, पुनः पुनः तुम्हीं मला विचारूं नये, म्हणून सांगतें. ज्या मातृभावनेविषयीं तुम्ही मला इतक्या खोट्या गोष्टी सांगितल्या त्या मातृभावनेच्या स्वरूपाचें आज मला ज्ञान झालें. आणि त्या पवित्र भावनेचा अवमान करण्याची माझी इच्छा नाहीं. तुमचें काव्यमय प्रेम जितकें खोटें तितक्याच मातृभावनेविषयीं तुम्ही सांगितलेल्या गोष्टी खोट्या. आतां कृपा करा. माझ्या डोळ्यांपासून दूर व्हा. ”

" एकूण इतकें करून सद्गुणाचें सोंग आणतां—" वामनराव पुढें बोलणार होता पण सुमतीनें इतक्या क्रोधानें व तुच्छतेनें त्याच्याकडे पाहिलें कीं, तो पुरुष पण गडबडला आणि मुकाट्यानें दूर झाला. सुमतीचे डोळे पाण्यानें भरले होते पण तिनें अश्रु मागें सारले आणि शून्य चित्तानें ती समोर पहात राहिली. मग परत जाणारी गाडी आली आणि बायकांचा थर्ड क्लासचा डबा होता, त्यांत गर्दी होती आणि कुणबी बायका पण पुष्कळ होत्या तरी त्यांतच ती चढली. ती बुडणार होती पण आईपणाच्या त्या साध्या दृश्याच्या दर्शनानें ती सावरली. आणि ती भित्री नव्हती म्हणून मागें परततांना भ्याली नाहीं.

**मनोरंजन**, जानेवारी १९३५

---

# सुलोचनेचा हक्क

सुलोचनाबाई सुंदर होत्या, बुद्धिमान् होत्या, सुविद्य होत्या आणि मनांत असेल त्या वेळीं गृहकृत्यांत प्रवीण होत्या. प्रभाकरानें जेव्हां सुलोचनेला प्रथम पाहिलें तेव्हांच तो तिच्यावर अगदीं खूष होऊन गेला आणि दोहों पक्षीय वडिलांच्या संमतीनें व वधूवरांच्या परस्पर पसंतीनें प्रभाकर आणि सुलोचना यांचें शुभमंगल थाटामाटानें पार पडलें.

प्रभाकराला चांगली नोकरी होती व त्याचे वडील शहाणे असल्यामुळें सूनबाईला सासुरवास बिलकुल न लागतां संसाराची सुरवात तिनें मालकी हक्कानें करावी अशी योजना त्यांनीं ताबडतोब अमलांत आणली व निराळ्या थाटलेल्या घरांत हें नवीन जोडपें नांदूं लागलें. निराळ्या घरांत नांदण्याचा सुलोचनेला फार आनंद झाला. प्रभाकराचें स्थळ उत्तम म्हणून तें सुलोचनेच्या मातापितरांनीं पसंत केलें होतें आणि प्रभाकर स्वतः जरी सर्व प्रकारें लायख माणूस होता तरी त्याचें 'स्थळ' उत्तम असण्याला त्याचे आईबाप पुष्कळसे कारणीभूत होते यांत शंका नाहीं; व स्थळ पाहतांना आणि पसंत करतांना उत्तमपणाचें हें कारण सुलोचनेच्या वडिलांच्या पूर्णपणें हिशेबांत होतें.

पण स्थळ वगैरे ठरून विवाह निश्चित झाल्यावर सुलोचनेची आई म्हणे– "सर्व प्रकारें चांगलें आहे, पण सासू-सासरा घरीं; तेव्हां कसें काय होतें येवढें पहावें. आमची सुलोचना लाडांत वाढलेली; पुनः वयानें आतां वीस वर्षांची. विद्येनें म्हणावें तर खरोखर कोणतीच सासू तिच्यापुढें टिकणार नाहीं. तेव्हां आतां तिच्यावर सून म्हणून सासूनें अंमल गाजविणें बरें नव्हे. पण काय तिच्या कपाळीं असल तें खरें!" आईचें असें बोलणें वरचेवर ऐकून सासूची गांठ पडण्यापूर्वीच तिच्याबद्दल आमच्या सुविद्य व सुस्वरूप सुलोचनेच्या मनांत अढी भरून गेली. सासरादेखील कसा काय निघतो याचें तिला भय वाटूं लागलें, आणि तिनें मनांत ठरविलें कीं, लग्न होऊन पतीची गांठ पडली कीं स्वतंत्र राहण्याचाच त्याला आग्रह करावयाचा; म्हणजे शिंक येण्यापूर्वीं पडसें जाईल.

पुढें लग्न-कार्य थाटामाटानें झालें आणि त्या वेळीं प्रभाकराच्या आईबापांनीं सुनेचें जें कौतुक केलें त्यावरून त्यांचा विचार सुलोचनेवर सासुरवासाचे कांहीं

जबरे प्रयोग करावेत असा असेल असें कोणासही वाटलें नसतें. विशेष गोष्ट म्हणजे नानासाहेबांनीं चिरंजिवांच्या सासऱ्याकडून हुंड्याचा एक रुपयाही घेतला नाहीं व "कांहीं देण्याची इच्छा असेल तर मुलीच्या नांवें पैसे ब्यांकेंत ठेवा किंवा तिच्या नांवें कॅश सर्टिफिकिटें ध्या," असें त्यांना सांगितलें. हुंडा कांहीं मागत नाहींत तेव्हां लेकीच्या अंगावर दागिने कसे काय पडतील याची सुलो-लनेच्या आईला कांहीं वेळ काळजी वाटत होती; पण सुनमुखाच्या वेळीं तिच्या अंगावर मोत्यांचे दागिने पडलेले पाहून ती काळजी दूर झाली. हे दागिने अर्थात् नानासाहेबांनीं आपल्या संचित द्रव्यांतून सुनेसाठीं मुद्दाम नव्या फॅशनचे असे तयार करवून आणले होते. आणि ते घातल्यानंतर सुलोचना जरी आधींच रूपवती होती, तरी तिचें सौंदर्य विशेष खुलून दिसूं लागलें.

सुलोचना मोठी भाग्यवान् आहे, तिचे सासू-सासरे फारच हौशी आहेत, सुनेचें त्यांना मोठें कौतुक आहे, असे उद्गार तिच्या माहेरची जमा झालेली पाहुणे-मंडळी काढूं लागली, आणि तिच्या आईची सारखी दोष काढण्यांत तत्पर असलेली दृष्टीसुद्धां तात्पुरती निवळली. तरीसुद्धां लग्न झाल्याबरोबर मुलगी सासरीं जाण्यास निघाली, तेव्हां ती म्हणालीच—"माणसें चांगलीं हो. नानासाहेब उभे आहेत म्हणून त्यांनीं येवढ्या थाटानें लग्न केलें, आणि आमच्या सुलोचनेच्या अंगावर मोत्यांचे दागिने घातले. दागदागिने घालायला सासरा पाहिजे खरा. पण सासू-सासरा असणें म्हणजे मुलीला सासुरवासाचें भय हेंही खरें." पुढें मुलीच्या कानांत त्या बोलल्या—"एव्हांपासूनच गांठ पडेल तेव्हां त्यांना पूर्णपणें आपल्या बाजूचें करून घे. तूं आतां लहान नाहींस. तुझ्या रूपावर ते अगदीं खूष आहेत. त्यांना अगदीं आपल्या मुठींत आणून ठेव."

सुलोचना हंसली. तिला तो उपदेश फार फार मानवला.

सासुरवासाची पहिली खेप माहेरवासापेक्षांहि अधिक आनंदांत गेली. सासूसासऱ्यांनीं सुनेचें कौतुक करण्यांत कमाल करून सोडली. तिच्या आईनेंसुद्धां तिचें जेवढें कौतुक केलें नसेल तेवढें सासूनें केलें. त्यामुळें आईनें दिलेला इषारा खरोखर अस्थानीं होता, असें सुलोचनेलासुद्धां वाटलें. पुढें नव्या जोडप्याची स्थापना नव्या घरीं लौकरच करावयाची असें नानासाहेबांनीं ठरविलें व सूनबाई माहेरीं परत आल्या तेव्हां त्यांना ही हकीकत माहीत झाली होती. सुलोचनेच्या रूपावर प्रभाकर अगदीं बेहोष झाला होता आणि आपला अंमल सुरू

करण्यापूर्वीच त्याची बजावणी पतिराजांवर झालेली आहे हें सुलोचनेसारख्या शहाण्या आणि प्रौढ मुलीला कळण्यास मुळींच वेळ लागला नाहीं. जरी घरांत कसलाही प्रतिबंध नव्हता, तरी तिच्या रसरशीत मुखाकडे तो कितीतरी वेळां कोणी पहात नाहीं अशा वेळीं टक लावून पहात असे. तिची गांठ पडली कीं त्याचा चेहरा प्रफुल्ल होई. तेव्हां निराळ्या बिऱ्हाडाची गोष्ट काढली कीं, नकार येणें शक्यच नाहीं हें सुलोचनेनें ताडलें. पण तिनें प्रभाकराजवळ ही गोष्ट काढण्यापूर्वीच त्यांना नवीन घर देण्याचा विचार नानासाहेबांनीं मुक्रर केला असल्याचें सांगितलें.

पुढें सुलोचना माहेरीं आल्यावर तिनें आपल्या कोड-कौतुकाची व निराळ्या घराची सर्व हकीकत आपल्या आईला सांगितली. त्यामुळें मुलगी आल्यावर तीनचार दिवस सासरच्या मंडळींचें कांहीं तरी कुसळ काढण्याचें सीताकाकूंना ( सीताकाकू हें सुलोचनेच्या आईचें नांव ) धैर्य झालें नाहीं. पण मग त्यांनीं हळुहळू आपल्या जिव्हारूप बंदूकींतून छरे मारण्याला सुरवात केली.

त्या म्हणाल्या, " हीं मानभावी माणसें भारी मायावी असतात. त्यांना तूं हुरळून जाऊं नको. ते प्रथम असें अगत्य करतील, गोडगोड बोलतील, पण केंसानें केव्हां गळा कापतील याचा नियम नाहीं. "

यावर सुलोचना म्हणाली, " आई, तुझ्या कल्पना चुकीच्या आहेत. तूं करतेस त्यापेक्षांदेखील त्यांनीं माझें कौतुक केलें. "

तेव्हां सीताकाकू म्हणाल्या, " एवढी घोडी झालीस आणि दोन-चार परीक्षा पण उतरलीस, तरी तुला अक्कल कशी ती नाहीं. सासूची तुलना सख्ख्या आई-बरोबर करतेस ? कांहीं झालें तरी सासू तुझी वैरीण ! ती उभी आहे तोंपर्यंत तुझा अंमल घरांत बसणार नाहीं; पण नवऱ्यावरसुद्धां बसणार नाहीं. या आया आपल्या मुलांना कशा भुरळ घालतात ! तूं सावध रहा, पोरटे ! आणि नवऱ्याला अगदीं पुरा कह्यांत आण. त्याला आपला स्नेही-सोबती असा असतां उपयोगी नाहीं. त्यानें सर्वस्वीं तुझ्यावर अवलंबून असलें पाहिजे असें कर. तरच तुझी धडगत आहे; आणि हें वेळेवर कर. एकदां का त्या माणसांच्या आहारीं पडलीस म्हणजे मग माझें बोलणंसुद्धां खोटें वाटूं लागेल तुला. तुम्हांला निराळें घर देतों म्हणतात, पण माझा अजून भरंवसा नाहीं. प्रत्यक्ष पाहीन तेव्हां मात्र खरें वाटेल. पण जर नव्या घरीं गेलीस, तर सासरच्या माणसांना तेथें अगदीं दोन हात दूर ठेव.

नाहीं तर दीर आणि नणदा, मावसभाऊ आणि आतेभाऊ यांची होईल गर्दी आणि त्यांना खादीला घालतां घालतां तुझा होईल चक्काचूर ! "

सुलोचना म्हणाली, " पण आई, आम्ही स्वैंपाकी ठेवणार आहों. "

" स्वैंपाकी असला म्हणून काय झालें ? तुझ्या घरांत तुझी सर्वस्वीं सत्ता पाहिजे. नाहीं नाहीं त्यांना खादीला घालूं नको. मी मुळीं प्रथम आपल्या तुंगीला तुझ्याबरोबर पाठवीन. तुंगी गेली म्हणजे मला दुसरी स्वैंपाकीण बघावी लागेल; पण दोन चार महिने मी सोशीन गैरसोय. "

तुंगाबाई ही सीताकाकूंची दूरची नातलग होता. ती विधवा होती आणि तिला कोणी नव्हतें. तेव्हां सीताबाईंनीं तिला घरांत आणलें व स्वैंपाकीण कमी केली. सीताकाकूंचें सगळें काम तुंगीच करी. वर त्यांच्या शिव्या खाई आणि आश्रय दिल्याबद्दल त्यांचे प्रसंग येईल तेव्हां जाहीर आभार मानी. सीताकाकूंची मनोवृत्ति तिनें हस्तगत केली. सीताकाकूंनीं तिला ' छू: ' म्हणून कोणावर सोडलें कीं, ती त्यावर सारखी भुंकत राही. सुलोचनेला ती आवडत नव्हती; पण आईच्या बोलण्यावर अपील नाहीं म्हणून ती कांहींच बोलली नाहीं.

थोड्या दिवसांनीं सुलोचना सासरीं गेली. चार–पांच दिवसांनींच प्रभाकर व सुलोचना यांनीं नव्या घरांत प्रवेश केला. त्या घरांतील सर्व सामानसुमान चिरंजिवांच्या हौसेप्रमाणें व सूनबाईच्या हौसेची कल्पना करून आपल्या पत्नीच्या सल्ल्याप्रमाणें नानासाहेबांनीं घेतलें होतें आणि तें घेतांना पैशाकडे पाहिलें नव्हतें. नव्या घराचा थाट पाहून सासू–सासऱ्यांवर सुलोचना खूष झाली व मनांतल्या मनांत तिला आपल्या आईच्या बोलण्याचा रागसुद्धां आला. नव्या घरांत नव्या आनंदांत नवराबायको अगदीं तल्लीन झालीं. गडी–माणसांखेरीज दुसरें तेथें कोणीही नसल्यामुळें तेथें राहणें म्हणजे दीर्घ एकांतच होता. त्या घरांत निराळ्या एकांताची वाट पहात बसण्याचें कारण नव्हतें. कारण तेथें त्यांच्या एकांतांत विघ्न येण्याचें भयच नव्हतें.

चार दिवस याप्रमाणें आनंदातिरेकांत गेले. पति–पत्नींनीं एकमेकांचें निष्प्रतिबंध कौतुक करण्याचा आनंद भरपूर घेतला. पुढें आईची आठवण सुलोचनेला झाली. नव्या घराच्या हकीकतीचें पत्र तिनें आईला लिहिलें. त्या पत्रांत सासू–सासऱ्यांची तिनें मनमुराद स्तुति केली होती आणि तुंगीला पाठविण्याची बिलकूल आवश्यकता नाहीं, असें आईला कळविलें होतें. पत्र पाठवून

चार दिवस झाले तरी उत्तर आलें नाहीं; पण सहाव्या दिवशीं तुंगाबाईची स्वारी काखोटीला एक मोठें गांठोडें घालून पांढऱ्या रंगाची एक ट्रंक हमालाच्या डोकीवर ठेवून सुलोचनेच्या नव्या घरीं प्राप्त झाली. या वेळीं राजा-राणींचा चहा चालला होता. इतके दिवसांत तिसऱ्या माणसांचा उपसर्ग म्हणून त्यांना लागला नव्हता. पण तुंगाबाई प्राप्त झाल्यावर सुलोचनेला मध्येंच उठून तिचें स्वागत करावें लागलें व माहेरच्या पाहुणीची (ती माहेरांत पोळपाट–लाटण्याचीच मालकीण होती) व्यवस्था लावण्यांत तिचा एक तास गेला.

आपल्याला कांहीं न विचारतां सवरतां ही पाहुण्याची भानगड घरीं आली हें कांहीं प्रभाकराला आवडलें नाहीं. त्यानें पत्नीला त्यासंबंधीं विचारलें. तुंगाबाई आली हें सुलोचनेलाही आवडलें नव्हतें. पण आईला दोष देणें म्हणजे स्वतःची अब्रू गमावणें असें तिला वाटलें. ती म्हणाली, "माझ्या सोबतीला तिला आईनें पाठविली आहे."

त्यावर प्रभाकर म्हणाला, "निदान कांहीं दिवस कोणाचा उपसर्ग नको, म्हणून नानांनीं घरसुद्धां निराळें करून दिलें आणि शिवाय कांहींच न विचारतां न कळवतां ही कोण बाई तुझ्या आईनें पाठविली? हें मला पसंत नाहीं."

त्यावर सुलोचना रागावली. ती म्हणाली, "मला या घरांत कांहीं सत्ता आहे का नाहीं? माझें माणूस येण्याला मीं तुमची परवानगी घेतली पाहिजे काय?"

प्रभाकरानें त्या वेळीं कांहींच उत्तर दिलें नाहीं.

[ २ ]

काय असेल तें असो, तुंगाबाईचें आगमन झाल्यापासून त्या घरांतील आनंदाला ओहोटी लागली. वास्तविक घरांतील कारभारांत ढवळाढवळ करण्याची तिला मुळींच जरुरी नव्हती; पण तशी ती होऊन करीत असे, कीं सीताकाकूंची तिला तशी ताकीद होती, हें सांगतां येत नाहीं. नवरा–बायको एकदम जेवीत व दोघेंच होतीं, तोंपर्यंत वाटेल तशा प्रेमानें व लडिवाळपणानें गप्पा मारीत जेवण करीत. तुंगाबाई ही तिसरी व्यक्ति पंक्तींत हजर होतांच बोलण्यांत संकोच उत्पन्न झाला. हळुहळू जेवणाच्या वेळचें बोलणें अगदीं संपुष्टांत आलें. बोलणें संपुष्टांत कां आलें याचें कारण समजण्याइतकी अक्कल, विद्या आणि वय हीं सुलोचनेजवळ होतीं; पण नवरा आपल्याशीं कमी बोलूं लागला असेंच तिनें डोक्यांत घेतलें.

वास्तविक जितक्या मोकळेपणानें आणि प्रेमळपणानें प्रभाकर तिच्याशीं बोलत बसत असे, तितका मोकळेपणा व प्रेमळपणा अगदीं त्रयस्थाच्या देखत—त्यांतल्या त्यांत तुंगाबाईसारख्या खरोखर स्वैंपाकीण असलेल्या पण आतां पाठ-राखणीच्या पदवीला चढलेल्या बाईच्या सान्निध्यांत—त्यानें दाखविणें शक्य नव्हतें.

लग्नानंतर प्रेमाच्या पहिल्या भरांत, परस्परानुरागाच्या आनंदांत, प्रत्यवाय असा नसावा म्हणून मुलाला जीवप्राण करणारें माता-पिता आणि सुनेलाही कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें होऊन गेलेले सासू-सासरे यांनादेखील दूर ठेविलें; पण माहेरच्या लोभामुळें आणि आईच्या भलत्या हट्टामुळें आणि तो आचरट हट्ट चालवूं दिला नाहीं, तर नवऱ्याची सत्ता वरचढ झाली व आपली सत्ता नाहींशी झाली अशा केवळ अजागळपणाच्या समजुतीमुळें तुंगाबाईचें लचांड सुलोचनेनें घरीं ठेवून घेतलें आणि त्या बाईच्यामुळें घरच्या वातावरणांत झालेल्या फेरफाराबद्दल ती नवऱ्याला दोष देऊं लागली. ती जसजसा दोष देऊं लागली, तसतसा प्रभाकरला राग येऊं लागला व घरांत त्याचा वेळ त्रासांत जाऊं लागला. पूर्वीप्रमाणें नवरा-बायकोचें एकत्र बसणें, बोलणें, हंसणें, खिद-ळणें यांना ओहोटी लागली. तेव्हां कांहीं दिवस गेल्यावर प्रभाकरानें लग्न झाल्याबरोबर आपल्या मित्र-मंडळींत बसणें, उठणें जें अगदीं बंद केलें होतें आणि ज्याबद्दल त्याचे मित्र चेष्टाही करीत तें पुनः सुरू केलें. नोकरीच्या वेळाव्यतिरिक्त तो बराच वेळ बाहेर राहूं लागला व घरीं येई तेव्हां एक-दोन मित्र बरोबर आणूं लागला; आणि त्यांच्याशीं गप्पागोष्टी कराव्या, पत्ते खेळावे अशी सुरवात झाली.

पुढें त्यानें आपल्या एका चुलतभावाला आपल्याकडे रहावयास बोलावलें. तो वयानें प्रभाकरापेक्षा लहान होता व कॉलेजांत जात असे. सध्यां सुटी होती म्हणून तो घरीं आला होता व महिनाभर राहण्याची त्याला सवड होती. वहिनीशीं तो फार अदबीनें वागे. पण तो आल्या दिवसापासून वहिनींच्या तब्येतीचा गरमपणा वाढत चालला आणि तो गरमपणा वाढण्याच्या कामांत तुंगाबाई अगदीं उदारपणानें हातभार लावूं लागली.

तुंगाबाई म्हणे, " सुलोचने, बाई, लक्षण धड दिसत नाहीं ग ! हा चुलत दीर कशाला घरांत आणून घातला आहे ? आणि रोज हे चार-चार, पांच-पांच दांडगोबा चहा ढोसायसाठीं कशाला येतात इकडे ? सीताकाकूंना उगीच नव्हती

काळजी वाटत ! तरी मी आलें म्हणून तुला सोबत तरी झाली; नाहीं तर असल्या नादिष्ट नवऱ्याच्या घरीं तुझा निभाव लागणें कठीण. आतां तुझ्याशीं अक्षर बोलायला त्यांना सवड तरी मिळते का ? आणि आल्या दिवसापासून माझ्याशीं एक शब्द तरी बोलले आहेत का ? तुझ्या आईच्या घरीं मी चार वर्षे स्वैंपाक करतें, म्हणून मी स्वैंपाकीण का झालें ? कांहीं झालें तरी मी तुझी बहीण. मला या घरांत मेहुणीच्या मानानें वागवलें पाहिजे. पण जिथें तुलाच कोणी येथें पुसत नाहीं, तेथें मला गरिबाला कोण पुसणार ! ''

तुंगाबाईनें याप्रमाणें बडबड केली कीं सुलोचनेला खरेंच वाटे व दिवसेंदिवस तिच्या मनांत नवऱ्याविषयीं अढी वाढूं लागली. संसाराची पैन् पै नवरा मिळवितो, त्याला घरांत कांहीं हक्क आहे, तो आपल्याला कांहीं कमी करीत नाहीं, वगैरे गोष्टी ती साफ विसरली आणि आपल्यालाच कोणी बरोबर वागवीत नाहींत अशा समजुतीनें ती वागूं लागली. त्यांत मधून मधून सीताकाकूंचीं पत्रें येत. त्या पत्रांत ' माझी भीति खरी ठरली ' अशीं वाक्यें मोठ्या आनंदाच्या भावनेनें लिहिलेलीं असत व ' कांहीं झालें तरी त्या दिराला घरांतून हालव, त्या कामांत तुंगाबाई तुला मदत करील आणि त्यांचीं स्नेही-माणसें घरीं येण्याचीं बंद झालीं पाहिजेत. नवऱ्याचे सगळे मित्र हे बायकोनें शत्रु लेखले पाहिजेत ' असाही त्यांत उपदेश असे.

' तुंगी कांहीं झाली तरी दूरची कां होईना, तुझी बहीण. तिला मेहुणी म्हणून मान दिला पाहिजे, ' हें वाक्य वाचतांना आणि त्याला मान्यता देतांना तुंगाबाईसारख्या स्वैंपाकिणीला जर नवऱ्यानें मोठ्या सन्मानानें वागवावें अशी आपली अपेक्षा, तर प्रत्यक्ष सख्ख्या चुलत-दिराला-आणि तोही चांगला कॉलेजांत जाणारा, घरचा सुखी, कोणाच्या आश्रयाची आवश्यकता नसणारा-नवऱ्याच्या भावाप्रमाणें वागविलें पाहिजे ही गोष्ट मात्र सुलोचनेच्या लक्षांत आली नाहीं, आणि जरी येण्याचा कांहीं संभव असता तरी तिच्या शहाण्या आईच्या अनुभविक शहाणपणानें तो त्या वेळीं तरी नाहींसा झाला. बिचारा बाबू ( तिचा चुलत-दीर ) तिची मर्जी प्रसन्न ठेवण्यासाठीं झटत असे; पण त्याचा परिणाम विपरीत होऊं लागला.

एके दिवशीं तुंगाबाई सुलोचनेला प्रभाकराबद्दल कुत्सितपणानें कांहीं सांगत होती; तेव्हां कांहीं झालें तरी त्याचें पोरवयच, त्यानें तुंगाबाईला तसें न बोलण्या-

बद्दल बजावलें आणि संध्याकाळीं प्रभाकर घरीं आल्यावर त्याला सर्व हकीकत सांगितली. मग काय ? नदीचा बंधारा फुटला ! तुंगाबाईनें जी मोठमोठ्यानें हुंदके देऊन रडण्याला सुरवात केली ती थांबेनाच ! सुलोचनेनें तिचाच पक्ष घेतला व ती नवऱ्याला म्हणाली, " बाबूभाऊजी आतां कांहीं लहान नाहींत, त्यांनीं तुंगाताईवर भलतेंच तुफान घेण्याचें कारण नव्हतें. ती कांहीं झाली तरी माझी बहीण. माझ्याविरुद्ध आणि तुमच्याविरुद्ध कशी बोलेल ? तिचें-माझें खाजगी बोलणें चाललें होतें तें त्यांनीं कां ऐकावें ? "

प्रभाकर म्हणाला, " त्यानें मुद्दाम ऐकलें नाहीं. सहज त्याच्या कानांवर आलें. खासगी भाषणांत माझ्यावर भलती टीका होती हें तुला नाकबूल करवत नाहीं. "

" आपल्या भावाचा कड घेतां, माझी तुम्हांला किंमत नाहीं बाहेरचीं माणसें आणतां, माझ्याकडे आतां तुमचें लक्ष नाहीं " असें म्हणून शहाण्या, शिक्षित सुलोचनेनें रडण्याला सुरवात केली. प्रभाकर मुकाट्यानें तेथून उठून गेला. बाबू रात्रीच्या जेवणालासुद्धां राहिला नाहीं. तो नानासाहेबांच्याकडे रहावयास गेला.

बाबू गेल्याचें वर्तमान सीताकाकूकडे पोंचलें. तेव्हां त्या शहाण्या आईनें पत्र लिहून आपल्या सुविद्य मुलीची पाठ थोपटली ! बाबू गेला हें बरें झालें असें सुलोचनेला पटलें. ती आतां तुंगाबाईच्या तंत्रानें अधिक वागूं लागली. प्रभाकरानें बटाट्याची भाजी करावयास सांगितली, कीं घरांत भोपळ्याची भाजी होऊं लागली. घरांत सणाच्या दिवशीं श्रीखंड करा म्हणून सांगितलें, कीं तुंगाबाईच्या उपदेशाप्रमाणें सुलोचना रव्याचे लाडू करण्याचा हुकूम सोडी. प्रभाकराचे स्नेही घरीं आले कीं, चहापाण्याच्या वेळीं धुसफूस होई. एकदां तर घरीं माणसें आलेलीं पहातांच तुंगाबाईनें स्वैंपाकी कांहीं कामाला बाहेर पाठविला.

तो रविवारचा दिवस होता. मंडळी बराच वेळ बसली तरी चहाचा पत्ता नाहीं. प्रभाकर खालीं आला. पहातो तो ब्राह्मण घरीं नाहीं ! राणीसाहेब चुलीजवळ जायच्या नाहींत; आणि सीताबाईच्या घरीं पोळ्या लाटतांना जरी तुंगाबाईच्या हाताला घट्टे पडले होते तरी तिचाही मान मेहुणीचा ! ती जाग्यावरून हलावयाची नाहीं ! सगळा प्रकार पाहून प्रभाकराला संताप आला. पण घरीं चार मंडळी जमलेली, शिवाय बायकोवर त्याचें प्रेम फार. त्यानें आपला

राग गिळला. समोरच्या ओळखीच्या घरीं गड्याबरोबर चिठी पाठवून तेथून च्हाचें व फराळाचें मागविलें.

तो दिवस निघून गेला. रात्रीं जेवणाचे पूर्वीं प्रभाकरानें ब्राह्मणाची हजेरी घेतली. ब्राह्मण बिचारा काय करणार ? तो म्हणाला, " मला तुंगाताईनीं कामाला धाडलें आणि वहिनीबाईनीं ' जा ' म्हणून सांगितलें, तेव्हां मी गेलों."

तेव्हां वर मान करून तुंगाबाई साळसूदपणानें म्हणते, " अरे, घरीं कामाची वेळ आहे असें मला सांगायला तुझें तोंड का कुठें गेलें होतें ? "

ब्राह्मण नानासाहेबांच्या घरीं पुष्कळ दिवस राहिलेला होता. सुलोचनेचा अपमान करण्याची त्याची इच्छा नव्हती. नाहीं तर तुंगाबाईची केव्हांच त्यानें बोळवण केली असती. तो जास्त बोलला नाहीं.

दुसरे दिवसापासून प्रभाकराचा एकही मित्र घरीं येईनासा झाला. सुलोचनेच्या मनांत आपलें कांहीं चुकतें कीं काय असा विचार येई, पण मधून मधून आईचीं पत्रें येत, त्यांत झाल्या प्रकाराबद्दल तिचें अभिनंदनच होत असे. आणि तुंगाबाईचें सान्निध्य ! अशामुळें होतें आहे यांत आपली चुकी नाहीं असें तिला खरोखर वाटूं लागावें यांत आश्चर्य नव्हतें. नवऱ्याला मुठींत ठेवणें हा आपला हक्क, त्यानें आपल्याला भिऊन वागणें हें त्याचें कर्तव्य ! आपल्या माहेरच्या स्वैपाकिणीलासुद्धां त्यानें नमस्कार केला पाहिजे; पण प्रत्यक्ष त्याच्या माता-पितरांशींसुद्धां अदबीनें वागण्याची जबाबदारी आपल्यावर नाहीं. राबण्याचें काम त्याचें, भोगण्याची सत्ता आपली, असे विचार तिच्या मनांत घोळूं लागले.

प्रभाकराचा कोणीही मित्र घरीं येईनासा झाला. एवढेंच नव्हे तर प्रभाकरही अगदीं जेवणाच्या वेळाखेरीज घरीं येईनासा झाला. रात्रीं जेवण झाल्यावर तो ग्रामोफोन लावून तास दीड तास बसूं लागला. त्याचें वाचन लग्नानंतर कांहीं दिवस अगदीं थांबलें होतें, तेंही पुनः जोरांत सुरू झालें. प्रभाकराजवळ जाऊन बोलावें—बसावें असें सुलोचनेला वाटे; पण प्रत्येक वेळीं ती बोलावयास जाई, तेव्हां कांहींतरी तक्रारीचें बोलणें काढी, नवऱ्याला टोंचून बोले व कधीं कधीं आपली विद्या व वय यांचा फायदा घेऊन ती त्याला अनादरानेंही बोले. अर्थात् अनादरानें बोलण्याचे प्रसंग फार नसत. पण असें अनादरानें बोलणें हें, जुना पत्नी—धर्म राहिला तरी निदान नव्या काळच्या समानतेच्या तत्त्वालाही अनुसरून नाहीं, हें कळण्याइतक्या सुलोचनेच्या परीक्षा पसार झाल्या होत्या. पण बिचारी दुरभिमानानें आणि आईच्या शिकवणीनें तें सगळें विसरून गेली होती.

पुढें एक दिवस तुंगाबाईच स्वतः प्रभाकराबरोबर कांहीं बोलावयास गेली. प्रभाकर तिच्याशीं मुळींच बोलत नसे. आज जें ती बोलली त्यांत कुचकेपणा बराच होता. प्रभाकर सुलोचनेचें बोलणें शांतपणानें ऐकून घेई व तिच्या कठोर शब्दांनाही कठोर उत्तर देत नसे. पण तुंगाबाईनें बोलतांच त्यानें दुसरें अक्षरही न बोलतां गड्याला हांक मारली व " या बाईला आत्तांच्या आत्तां स्टेशनवर नेऊन पोंचव, तिकडची गाडी सुटण्याला तीन तासांचा वेळ आहे. तोंपर्यंत तिच्या सामानाजवळ तेथेंच बस. तिला खायला मागेल तें घेऊन दे. तिला जेवावयाचें असल्यास स्टेशनवर खानावळींत जेवणाची व्यवस्था कर " म्हणून त्याला सांगितलें.

हें ऐकतांच तुंगाबाईनें भोंकाड पसरलें.

" याचा अर्थ काय ? " म्हणून सुलोचनेनें विचारलें.

" याचा अर्थ या मुरदाड बाईनें आमच्या घरांतून तावडतोब चालतें झालें पाहिजे हा आहे. "

" पण या कामांत माझें कांहीं बोलणें ऐकण्याइतकी तरी या घरांत मला किंमत आहे का नाहीं ? हिला ' जा ' म्हणून सांगतांना निदान मला विचारायचें होतें ! " सुलोचना म्हणाली व तिच्या डोळ्यांतून गंगा-यमुना वाहूं लागल्या.

" तिला ' ये ' म्हणतांना तूं मला विचारलें होतेंस का ? तसें विचारलें असतेंस तर तिला ' जा ' म्हणण्यापूर्वीं मींही तुला विचारलें असतें. हें घर तुझेंच आहे. या घरांत तुझा हक्क भरपूर आहे. पण तुझ्याखेरीज आणि माझ्या-खेरीज कोणाचाही हक्क नाहीं. पण माझा हक्क आहे हें तरी तुला कोठें मान्य आहे ? तें असतें तर बाबूबरोबर भांडून त्यालाच येथून परत जाणें भाग पडलें नसतें. हं, रामा, या बाईला स्टेशनवर पोंचव. " असें म्हणून प्रभाकरानें खर्चाचे पैसे त्याच्याजवळ दिले.

सुलोचना आतां संतप्त झाली. ती म्हणाली. " मीहि माहेरीं जातें. मला या घरांत किंमत नाहीं. माझ्या माणसांचा पदोपदीं अपमान होतो. माझ्याशीं आतां बोलायला वेळ होत नाहीं. मी नकोशी झालें आहे. मी जातें. गाडीला तीन तासांचा अवकाश आहे. तेवढ्या वेळांत मी तयारी करतें. मला आतां अपमान सोसून येथें राहण्याची इच्छा नाहीं. "

" तूं वाटेल तशी वागण्याला मुखत्यार आहेस. खर्चाला कांहीं लागल... " प्रभाकर बोलला.

" म्हणजे ? मी जावें अशी अगदीं मनापासून इच्छा आहे? द्या. मग खर्चाला पैसे द्या. तुम्हांलाच मी नकोशी झालें आहे; तर येथें राहून तरी काय करायचं ?" असें म्हणून सुलोचना आणखी रडूं लागली. प्रभाकरानें पत्नीस रुपये आणून तिच्याजवळ दिले आणि कपडे घालून तो बाहेर गेला.

सुलोचना बोलून गेली; पण तिला जावेंसे वाटत नव्हतें. प्रभाकर गेल्यावर ती तुंगाबाईबरोबर खरोखर भांडली व 'तूं आल्यापासून आमच्यांत बिघाड झाला' असेंही तिला तिनें सांगितलें. जाण्याच्या वेळेपर्यंत नवरा येईल असें तिला वाटत होतें आणि त्यानें येऊन 'जाऊं नको' म्हणून जर आग्रह केला व आपल्या मनासारखें राहण्याचें जर कबूल केलें, तर तुंगाबाईला घालवून देण्याचें व आपण घरींच राहण्याचें तिनें मनांत ठरविलें होतें.

पण प्रभाकर गेला तो आलाच नाहीं. तेव्हां तिचा दुरभिमान पुनः जागृत झाला. अगदीं गाडीची वेळ आली तेव्हां गाडी बोलावून ती संतप्त आणि दुःखित अंतःकरणानें तुंगाबाईबरोबर बाहेर पडली. स्टेशनवर तरी नवरा पोंचविण्यास येईल अशी तिला आशा होती; पण गाडी सुटेपर्यंत त्याचा पत्ता नव्हता. ती आशाळभूतपणानें खिडकींतून सारखी बाहेर पहात होती. गाडीची शिटी झाली. गाडी चालूं लागली. पण प्रभाकर आला नाहीं.

[ २ ]

माहेरीं आल्यावरसुद्धां सुलोचनेचा मनःसंताप कमी झाला नाहीं. तुंगाबाईबरोबर तर तिनें अबोला धरला व त्याबद्दल तुंगाबाई उघड उघड तक्रार करूं लागली. " मी जाईपर्यंत नवऱ्याचे चाळे या पोरीच्या लक्षांतच आले नव्हते. मी गेलें तेव्हां थोडी तरी दहशत बसली. आणि आतां माझ्यावर ही उलटली! माझेंच नशीब फुटकें, दुसरें काय ?" असें म्हणून ती सीताकाकूंजवळ चांगली ओक्साबोक्शीं रडली. सीताकाकूंनीं जेव्हां मुलीला विचारलें, तेव्हां त्यांनाही धड उत्तरें मिळालीं नाहींत. " तूं अशी एकाएकीं निघून कां आलीस ? " म्हणून त्यांनीं विचारलें, तेव्हां सुलोचनेनें उत्तर दिलें—" माझी मर्जी म्हणून मी आलें. बापाच्या घरीं यायला मला कांहीं आगाऊ परवानगी नको ना काढायला ? "

त्या उत्तरामुळें सीताकाकूंना साहजिक राग आला.

" अशीं बोलायला सासरीं जाऊन शिकलीस वाटतें ? स्वतःचा नवरा आंवरत नाहीं तर तिसऱ्यावर राग कशाला काढावा ? बिचारी तुंगी तुला सोबत

करायला आली. ती होती म्हणून तो रिकामटेकडा दीर आणि रोज येऊन चहा ढोसणारे खाबू स्नेही तरी घरापासून दूर झाले. तरी तुझा राग तुंगीवर!" आईचें हें बोलणें ऐकून सुलोचना भडकली. ती म्हणाली,

"तुंगाताई आल्यापासून सारी घडी विसकटली. तोंपर्यंत आम्ही अगदीं आनंदाच्या शिखरावर होतों."

"असशील तर!" सीताकाकू म्हणाल्या, "म्हणे आनंदाच्या शिखरावर! नुसती नवऱ्याच्या मुठींत होतीस! तुला कांहींतरी सत्ता त्या घरांत? तुंगी गेली म्हणून सगळा प्रकार बाहेर तरी पडला."

सुलोचना तेथून उठली व एका खोलींत जाऊन दार लावून घेऊन मनमुराद रडली आणि रडण्यानें डोळे, डोकें आणि अंतःकरण साफ झाल्यावर जो प्रकार झाला, त्यांत आपल्याकडे कांहीं दोष येतो कीं काय हा विचार तिच्या मनांत आला. तो तिनें दाबण्याचा प्रयत्न केला आणि जर तिची आई तिच्याशीं कमी तुसडेपणानें वागती, तर तो आणखी कांहीं काळ तिला दाबतां आला असता. पण फडाफडा बोलावयाची आणि आपला वरचष्मा गाजवावयाची सीताकाकूंना आज पंचवीस वर्षांची संवय! मेलेल्या सासूची आठवण करून कारण नसतांना त्या अजूनही तिला तास तासभर शिव्या देत बसत. बाबासाहेबांच्या—नवऱ्याच्या-बरोबरही बोलण्यांत कधीं प्रेमळपणा नसे, सदोदित कडकडाट! पण बाबासाहेबांना त्या गोष्टीची संवय झाली होती. ते पत्नीचें बोलणें खरोखरच कधीं मनावर घेत नसत; पण त्या बोलण्याच्या आपण उलट आहोंत असें चुकूनसुद्धां दाखवीत नसत.

सुलोचनेला आतां कोणाच्या तरी मायेची फार आवश्यकता होती. पण सीताकाकूंच्या अंगीं कोणाला लाडकेपणानें वागविण्याचा गुण आतां उरला नव्हता. आपला अधिकार गाजविण्यांतच त्या अधिक चूर असत. सुलोचना आल्या क्षणापासून त्यांनीं जांवयावर सारखी जीभ सोडली आणि प्रभाकराला आई जसजशी अधिक शिव्या देऊं लागली, तसतशी त्या शिव्या अगदीं चुकीच्या, अन्यायाच्या आहेत असें सुलोचनेला वाटूं लागलें आणि दोन दिवसांच्या आंतच नवऱ्याला दिलेल्या शिव्या जेथें सारख्या ऐकाव्या लागतात, तेथें राहण्यांत सुख नाहीं असें तिला वाटूं लागलें व तिचा वेळ अधिकाधिक एकांतांत आणि त्रासांत जाऊं लागला.

तिसरे दिवशीं कांहींतरी बोलणें निघून सीताकाकू सुलोचनेच्या सासू-सासऱ्यावर उखडल्या. "ते एक पोरकट! पण या म्हाताऱ्यांना कांहींतरी जनलज्जा असायला नको का? यांनीं कांहीं वास्तपुस्त करायला नको का? स्टेशनवर पोंचवायला तरी यायला नको का?" असें त्या म्हणाल्या.

बाबासाहेब तेथेंच बसले होते. सुलोचनेला आतां राहवेना. ती म्हणाली,

"मी जातें म्हणून कांहीं त्यांना सांगायला गेलें नव्हतें. त्यांचा यांत कांहीं संबंध नाहीं. त्यांना नाहक बोलूं नकोस!"

"म्हणजे? मी नाहक बोलतें का?" सीताकाकूंनीं विचारलें. "सासू-सासऱ्यांचा कैवार घेतेस होय? पोरटी अगदीं त्यांच्या आहारीं गेली! पण मी माझ्या घरीं असलीं दुरुत्तरें ऐकून घेणार नाहीं हां! लक्षांत ठेव. मुलगी झाली म्हणून काय झालें? वर तोंड करून मला शहाणपण शिकवतेस? आणि सासू-सासऱ्यांची कड घेतेस?"

"मी कड-बीड कोणाचीच घेत नाहीं" सुलोचननें उत्तर दिलें. "पण ज्यांचा यांत संबंध नाहीं त्यांना कां उगाच बोलतेस? मला तें खपणार नाहीं."

"अस्सें!" सीताकाकू फणकाऱ्यानें म्हणाल्या, "तुला खपेल तेवढेंच बोलण्याला आम्ही काय या घरांतले नोकर आणि तूं काय या घराची मालकीण होय? मला नाहीं हां असलें बोलणें खपणार!"

"मी मालक नाहीं—कांहीं नाहीं. पण माझें माहेर म्हणून येथें कांहीं मला सत्ता आहे का नाहीं?" सुलोचननें विचारलें.

"काय पहा चुरुचुरू बोलण्याला शिकली आहे! या पोरी कॉलेजांत जाऊन शिकल्या म्हणजे अशा बेताल होतात. ज्या घरीं तुझी सत्ता असायला पाहिजे तेथें मूग गिळून बसत होतीस आणि त्याच माणसांचा कड घेतेस? आणि आतां दुसऱ्याच्या घरांत सत्ता गाजवितेस होय? मी नाहीं असलें खपवून घेणार!"

"म्हणजे? हें घर मला दुसऱ्याचें का?"

"हो, हें आतां दुसऱ्याचेंच घर! आम्ही जेव्हां बोलावूं तेव्हां तूं चार दिवस आलीस म्हणजे आम्ही माहेर करूं; पण येथें येऊन वाटेल तसें वागून चालणार नाहीं हो! आतां कांहीं तुला कोणीं बोलावणें पाठविलें नव्हतें."

बाबासाहेब एक अक्षरही बोलले नाहींत. सुलोचना रडूं लागली. पण तिकडे तिच्या आईनें लक्ष दिलें नाहीं. मग कांहीं वेळानें ती आंत आली व माडीवर

वडील बसले होते तेथें गेली. बाबासाहेबांनीं तिला जवळ घेतली आणि ते म्हणाले, " बाळ, तिचें बोलणें तूं मनावर घेऊं नकोस. तिला अशीच संवय आहे. तिच्यावर रागावण्यांत अर्थ नाहीं. "

सुलोचना क्षणभर स्तब्ध राहिली. मग ती म्हणाली, " बाबा, मीं कोणावरही रागावलें नाहीं. पण आईचें म्हणणें खरें आहे. हें घर माझें नव्हे. माझें घर—जेथें ते तेथें माझें घर. माझेंच चुकलें. तुंगीला आल्या पावलीं मीं परत घालवावयास पाहिजे होतें. पण आईनेंच—"

" वेडे पोरी ! आतां तूं का लहान आहेस ? " बाबासाहेबांनीं विचारलें, " तुला सगळ्या गोष्टी कळायला नको होत्या का ? आपल्या अविचाराचा दोष दुसऱ्यावर ढकलूं नको. "

" तेंही खरें आहे, " सुलोचना उठली आणि म्हणाली, " बाबा, आज आतांच्या आतां मी घरीं परत जाणार. "

" तुला वेड तर लागलें नाहीं ? गाडीला अवकाश सारा एक तासाचा आहे. "

" मग पुष्कळ अवकाश आहे. माझ्या बॅगमधलें सामान हललेंसुद्धां नाहीं फारसें. तेवढी गाडी बोलवा, मी आतां क्षणभरसुद्धां येथें राहणार नाहीं. "

" अग, पण बरोबर कांहीं खायला-प्यायला—पुनः तिला विचारलें पाहिजे. "

" मी जाणार म्हणून आईला जाऊन सांगतें. " तिच्या तोंडावर आणखी कांहीं शब्द आले होते; पण ते तिनें मागच्या मागें दाबले. सीताकाकूंना जेव्हां तिनें सांगितलें, तेव्हां त्या म्हणाल्या, " आज शनिवार आहे. आजचा दिवस जाण्याला बरा नाहीं. "

" स्वतःच्या घरीं जायला मुहूर्ताची जरूरी नाहीं. "

पंधरा–वीस मिनिटांत सुलोचनेनें तयारी केली.

" तूं एकटीच जाणार काय ? " सीताकाकूंनीं विचारलें.

" होय. मी एकटीच जाणार. सारा चार–पांच तासांचा रस्ता. रात्रीं जेवण्याचे वेळीं घरीं पोहोंचेन. "

" पण त्यांना पत्र तरी घातलें असतें. निदान आतां तार पाठवितों—" बाबासाहेब म्हणाले.

" कांहीं करूं नका. तार पोंचण्याच्या पूर्वीं मी घरीं पोंचेन. "

" आणि त्यांनीं घरांत घेतली नाहीं तर ? " सीताकाकूंनीं विचारलें.

त्यावर तिनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. बाबासाहेबही कांहीं बोलले नाहींत. गाजावाजा न करतां विचारपूर्वक वागण्याची कला ते आपल्या पत्नीमुळें शिकले होते. मुलीनें असें परत येणें त्यांना पसंत नव्हतें, पण मुलीच्या घरीं नसता घोंटाळा आपल्या कुटुंबाच्या आचरटपणानें उपस्थित झाला हेंही ते जाणून होते. कुटुंबाला अगदीं जिवावर आल्याशिवाय टाकून बोलणें ते टाळीत. तेव्हां सुलोचना परत जाणार ही गोष्ट त्यांना पसंत होती आणि सासरची सर्व मंडळी चांगली असल्यामुळें तिचा अव्हेर करणार नाहींत ही त्यांची खात्री होती. सुलोचनेला घेऊन ते स्टेशनवर गेले व तिला वेटिंग-रूममध्यें बसवून ते तिकिट काढण्यास जाऊं लागले. तेव्हां सुलोचना म्हणाली, " बाबा, तिकिटाचे पैसे माझ्याजवळ आहेत. त्यांनीं येतांना भरपूर पैसे दिले होते. तुम्ही हे पैसे घेऊन तिकिट काढा. "

बाबासाहेब कांहीं बोलले नाहींत. त्यांनीं ते पैसे घेऊन तिकिट काढलें व थोडयाच वेळांत सुलोचनेची गाडी चालू झाली.

सुलोचना आगगाडींतून उतरली व गाडी करून आपल्या घरीं गेली. तेथें दाराला कुलूप होतें. शेजाऱ्यांनीं सांगितलें कीं, चार दिवस झाले, प्रभाकरपंत वडिलांकडे रहावयास गेले आहेत. सुलोचनेनें गाडीवाल्याला तिकडे जाण्यास सांगितलें.

रात्रीं आठ वाजले होते. नानासाहेबांच्या घरीं साडे आठ ही जेवणाची वेळ ठरलेली होती. सुलोचना आपल्या सासरच्या दारासमोर उतरली, तों दरवाज्यांत नुकतेच हिंडून आलेले नानासाहेब कोणाशीं बोलत उभे होते. त्यांना पाहून सुलोचनेचे डोळे पाण्यानें भरले. तिला पाहून नानासाहेबांनीं लागलीच गड्यास हांक मारली व सामान उतरण्यास सांगितलें. पुढें सोप्यांत बाबू उभा होता त्याला ते म्हणाले, " बाबू, तुझ्या काकूला सांग कीं सूनबाई आल्या आहेत. त्याही आतां जेवायला बसतील. "

सुलोचना आंत गेली व सासूला तिनें नमस्कार केला. सुलोचना इकडे तिकडे पहात होती, पण प्रभाकर कोठें दिसेना व विचारण्याचा तिला संकोच वाटूं लागला. थोड्या वेळानें नानासाहेब आंत आले व पानावर बसले; तेव्हां त्यांनीं सुलोचनेला हांक मारली. सुलोचनेची सासू म्हणाली,

" ती मागाहून बसते म्हणते. "

" छेः छेः ! आतांच बसलें पाहिजे. आणि आज प्रभाकर घरीं जेवायला नाहीं, हें तिला सांगितलें का ? तो आज आपल्या त्या बापूसाहेबांकडे जेवायला गेला आहे. आणि दोघेही मग नाटकाला जाणार आहेत. सुलोचने, चल ये, जेवायला बैस. "

सुलोचना मुकाट्यानें जेवायला बसली. तिच्या जाण्या-येण्यासंबंधीं कोणीं चकार शब्दही काढला नाहीं. जेवण झाल्यावर बाबू नानासाहेबांना म्हणाला, " नाना, मी प्रभाकरदादाला घेऊन येतों. "

" कांहीं वाईट कल्पना नाहीं. " नानासाहेब हंसत हंसत म्हणाले.

तें बोलणें सुलोचनेनें ऐकलें.

बाबू बाहेर पडल्यावर ती सासरा बसला होता तेथें जाऊन दूर उभी राहिली आणि म्हणाली, " माझ्यावर आपण रागावलां नाहीं ना ? मी वेडेपणानें वागलें. "

" छट् ! तुझ्यावर आम्ही रागवावयाचें ? " नानासाहेब प्रसन्न मुद्रेनें म्हणाले, " आमचा प्रभाकरसुद्धां एक दिवस घर सोडून गेला होता. जसा तो, तशी तूं. आणि गेलीस तरी चार दिवसांत आलीस. माझी खात्रीच होती. कारण आमच्या मुलीला आमच्या घराबाहेर फार दिवस राहून चैन पडणारच नाहीं. "

ते निष्कपट आणि प्रेमळ शब्द ऐकून सुलोचनेनें दाबून धरलेले अश्रू घळघळां वाहूं लागले. तिनें मागें मान फिरविली, तों तेथें सासू उभी होती. ती म्हणाली, " अग, तुझ्यावर कोणीं रागावलेलें नाहीं. "

दहा वाजण्याचा सुमारास खरोखरच प्रभाकर बाबूबरोबर घरीं आला आणि तो आलेला पहातांच सुलोचनेचें अंतःकरण अगदीं निःशंक झालें.

नानासाहेब चिरंजीव व सून यांकडे पहात हंसत म्हणाले,

" आज रात्रीं येथेंच रहा आणि उद्यांपासून पुनः नव्या घरीं रहावयाला जा. "

सुलोचना पुढें आली. ती म्हणाली, " आम्हांला नवं घर इतक्यांत नको. मला तर येथेंच राहाण्याची इच्छा आहे. "

" मग तुझी इच्छा आहे तर तुला नको का म्हणतें कोणी ? घर तुमचेंच आहे. "

सुलोचना आणि प्रभाकर पंधरा दिवस तेथेंच राहिलीं आणि मग वडिलांच्या आग्रहामुळें तीं पुनः घरीं गेलीं; पण तीं दोन घरें म्हणजे अगदीं एकरूप होतीं. त्यापुढें दीड–दोन वर्षें झालीं. तरी सुलोचना माहेराकडे फिरकली नाहीं. तेवढ्या

कालांत तिच्या घरीं छोटा बाळ आला आणि त्याच्या नादांत व पतीच्या अपरंपार प्रेमांत तिला दुसऱ्या कोणाचीही आठवण होण्याला अवसरच राहिला नाहीं.

छोट्या बाळाला पहाण्यासाठीं बाबासाहेब व सीताकाकू एकदां आल्या. त्यांचें स्वागत सुलोचनेनें व पतीनें मोठ्या आनंदानें केलें. आल्या दिवशींच आई म्हणाली, " सुलोचने, या तुझ्या साडीचा पदर कांहीं चांगला नाहीं. आणि रंग पण बरा नाहीं दिसत. "

" रंग फारच उत्तम आहे. तो त्यांना आवडतो आणि पदर मला फारच पसंत पडला म्हणून ही साडी घेतली. "

जेवणापूर्वीं बाबासाहेबांनीं फलाण्याला भेटून यावें म्हणून सीताकाकूंनीं सांगितलें. तेव्हां सुलोचना म्हणाली, " बाबा, आम्ही बरोबर साडे–दहाला जेवायला बसतों. आतां साडे-नऊ वाजले आहेत. आतां बाहेर गेलांत तर तुम्ही वेळेवर येणार नाहीं आणि उशीर झालेला त्यांना खपत नाहीं. "

बाबासाहेब गेले नाहींत. त्या संध्याकाळीं सीताकाकू म्हणाल्या, " सुलोचने, मी त्या रमाबाईकडे जाणार आहें. तूं चल माझ्याबरोबर. "

तेव्हां सुलोचना म्हणाली, " पाहिजे तर उद्यां येईन तुझ्याबरोबर, पण आज आम्ही बाळाला घेऊन हिंडावयास जाणार आहों. "

दोन दिवसांनीं सीताकाकू परत निघाल्या. गाडींत बसल्यावर त्या बाबासाहेबांना म्हणतात, " आमच्या सुलोचनेला नवऱ्याशिवाय जगांत कांहींसुद्धां दिसत नाहीं. माझीसुद्धां तिला आठवण होत नाहीं. त्या माणसांच्या अगदीं आहारीं गेली पोरगी ! "

बाबासाहेब हंसले. त्यांनीं जामाताचा निरोप घेण्याच्या वेळीं पाहिलेलें दृश्य त्यांच्या डोळ्यांसमोरून हाललें नव्हतें. सुलोचनेकडे प्रभाकर पाहूं लागला म्हणजे त्याचें मुख प्रफुल्ल होई आणि त्या मुखावर आनंद, अभिमान आणि प्रेम या भावना स्पष्ट दिसत. त्यामुळें मुलीबद्दल आतां त्यांना काळजी उरली नव्हती. पण त्याबद्दल त्यांनीं आपल्या पत्नीबरोबर चर्चा मात्र केली नाहीं.

**स्त्रीमासिक**, ऑगस्ट १९३३

# उमललेल्या कळ्या

प्रेमला आपल्या मैत्रिणीला वाचून दाखवूं लागली,

स्वर्गीय काय तो प्रेमा । स्वर्गींच प्राप्त होणारा ।।
आम्हांस पाहिजे येथें । या क्षणींच जो मिळणारा ।।
प्रेम दिव्य म्हणती त्याची । कोणास असे हो खात्री ।।—

येथपर्यंत भावगीताची मजल येऊन प्रेमला पुढची ओळ वाचणार इतक्यांत विमला हंसत हंसत म्हणाली,

'तो शब्द कापुनी टाका । आणूनि चांगली कात्री ।। '

विमलेचें हें शीघ्रकवित्व ऐकून सरलेला हंसूं आंवरलें नाहीं. पण प्रेमलेच्या डोळ्यात किंचित् लाली दिसूं लागली व तिचा अधरोष्ठही थोडासा प्रस्फुरित झाल्याचें दिसलें. ती म्हणाली, ' विमल, अशी प्रत्येक गोष्टीची चेष्टा बरी नव्हे. ही कविता, हें भावगीत म्हणजे प्रेमाच्या नवीन आणि केवळ नवीन नव्हे तर अगदीं खऱ्या स्वरूपाचें प्रभातगाणें आहे. दिव्य प्रेमाची थापाथापी यापूर्वींच्या कवींनीं करून जगांत जें शक्य आणि प्राप्त होण्यासारखें प्रेम आहे त्याची गळेचेपी करून टाकली होती. या अधोक्षज कवीनें त्या गळेचेपीविरुद्ध बंड करून या जगांत ज्याखेरीज दुसरें प्रेमच नाहीं त्या शारीरिक प्रेमाची द्वाही फिरविली आहे. '

' खरंच, प्रेमा, ' विमलनें उत्तर दिलें, ' तूं या कवींत एवढी तल्लीन झालीस हें मला माहित असतें तर मी त्याच्या शब्दांना कात्री लावण्याचें बोलले नसतें; पण काय तो शब्द ' खात्री—'

' कविता म्हणजे शब्दांचें प्रदर्शन नव्हे. ' प्रेमला बोलली, ' शब्दांचें काम अर्थवाहनाचें. त्यापलीकडे शब्दांची मिजास चालूं देणें म्हणजे अर्थत्याग करून केवळ शब्दांवर खूष होण्यासारखें आहे. हा अधोक्षज कवि शब्दांची मिजास राखणारा नाहीं. त्याच्या प्रतिभेचे बांध फुटल्यावर त्याच्या अंतःकरणांतला अर्थ इतक्या जोरानें उसळून बाहेर येतो कीं, शब्दांची निवड करण्याचें त्याला भानच रहात नाहीं. '

' पण ' वाचमर्थोनुधावति ' असें कांहीं महाकवींचें लक्षण आहे ना सांगितलेलें ? ' सरलेनें मध्येंच विचारलें.

'अग कसले महाकवि घेऊन बसलीस!' प्रेमला म्हणाली, 'हें महाकवींचें थोतांड आतां विसर. अंतःकरणाला अर्धा क्षण का होईना, पण अगदीं चटका लावून सोडणाऱ्या या भावगीतापुढें महाकवींच्या महाकाव्यांची काय मातब्बरी आहे? या अधोक्षज कवीनें तर आधुनिक कवींवरसुद्धां ताण करून सोडली आहे. प्रेमाची खरी कल्पना त्यालाच आहे आणि या जगांतच आपल्याला प्रेम पाहिजे असें तो स्पष्ट म्हणतो. पुढें—

आम्हांस पाहिजे येथें । जगतांत याच मिळणारें ॥
डोळ्यांत स्पष्ट दिसणारें । नसनसांत सळसळणारें ॥
गालांत खळी करणारें । मुखकळी उमलवीणारें ॥
लज्जेला विसरविणारें । बंधनास तुडवीणारें ॥
जें उंच विवाहाहूनी । जें उंच कुटुंबाहूनी ॥
जें क्षण जरि एक मिळालें । जन्माचें सार्थक झालें ॥

काय सुंदर कल्पना आहेत एकेक! विमल, जरा हें पुस्तक वाच म्हणजे प्रेमाचा हा नवा प्रकाश डोक्यांत शिरून तेथील अंधार नाहींसा होईल."

'पण प्रेमा, हा प्रकाश येवढा भडक आहे कीं माझे डोळे दिपून गेले आहेत.' विमलेनें उत्तर दिलें.

'पण काय ग, अधोक्षज हें खरोखरचें नांव का या भावकवींचें?

'भावकवि कां गांवकवि?' सरलेनें विचारलें.

'काय ग, गांवकवि म्हणजे काय?' प्रेमलेनें डोळे वटारले.

'अग ग्रामसिंह तसा गांवकवि!' विमला सरलेकडे डोळे मिचकावून म्हणाली.

'विमल, तुझी थट्टा बाई पुरे कर;' प्रेमलेनें काकुळतीनें सांगितलें, 'कवितेचें रहस्य कळण्याची रसिकता तुझ्या ठिकाणीं नाहीं हें मला माहीत आहे, पण आपणांला कळत नाहीं म्हणून या सुंदर कवितेची अशी चेष्टा करणें तुला कांहीं शोभत नाहीं!'

'मी चेष्टा करीत नाहीं, प्रेमा.' विमला म्हणाली, "पण अधोक्षज कवीच्या ह्या 'उमललेल्या कळ्यां'त त्याच्या उकलतां न येणाऱ्या नांवाखेरीज कोठें मौज नाहींच.'

'गाजरपारखी आहेत झालें.' प्रेमला म्हणाली. 'या 'उमललेल्या कळ्यां'वर केसरी आणि ज्ञानप्रकाश या पत्रांत सारखेच अभिप्राय आले आहेत. फर्ग्युसन

कॉलेज आणि वाडिया कॉलेज येथील मराठी वाङ्मय मंडळांत या कळ्यांची मारखीच स्तुति झाली आहे. आणि तूं कांहीं म्हण, या ‘ उमललेल्या कळ्या ’ मला फारच आवडतात आणि या कवीची व माझी आतां ओळखसुद्धां होणार आहे. ’

‘ खरं का ? ’ सरलेनें विचारलें. ‘ तुझी ओळख झाल्यावर मग आमची करून देशील कां ? ’

‘ अग सरल, आपण तो कवि परवां पाहिला, ’ विमला म्हणाली; ‘ त्या नव्या नाटकाला आपण गेलों होतों तेथें. तूं म्हणालीस कीं हा गृहस्थ आपले केंस कापून कां घेत नाहीं ? तोच तो बिनमिशांचा आणि पुष्कळ केंसांचा प्राणी, तो आमच्या प्रेमाचा अधोक्षज कवि बरं ! ’

‘ खरंच ? ’ सरला म्हणाली, ‘ अलीकडे कित्येक कवींनीं तऱ्हेतऱ्हेच्या पोषाखांवर बरीच भिस्त ठेविली आहे. कोणी बायकांसारखे केंस वाढवितो तर कोणी गुडघ्यापर्यंत लांब पैरणी घालतो. पोषाखाच्या चमत्कारावर यांना कां अवलंबून रहावें लागावें समजत नाहीं ! ’

‘ अग वेडे, ’ विमला म्हणाली, ‘ कवितेंत चमत्कार नसला म्हणजे हें बाहेरच्या चमत्कारांचें अवसान आणावें लागतें. आतांशीं कितीतरी कवींना आपल्या कवितांचे चरणसुद्धां सारखे जुळवितां येत नाहीं. त्याबरोबर निर्यमक कावित्वाचा चमत्कार निघाला. यमकाची कवितेला जरुरी नाहीं, पण साधीं यमकेंसुद्धां ज्यांना जमवितां येत नाहींत त्यांनीं फुलांच्या कळ्या आणि पाकळ्या— ’

‘ विमल, ’ प्रेमला म्हणाली. ‘ जरा आंवरतें घेशील का ? या अधोक्षज कवी-बद्दल तुझा गैरसमज झालेला दिसतो. त्यांच्या डोक्याचे केंस त्यांनीं वाढविलेले नाहींत, ते वाढलेले आहेत. त्यांना तसें म्हणशील तर आपण कसें दिसतों याची शुद्धही नाहीं. आणि परवाही नाहीं. ’

विमल म्हणाली, ‘ एकूण या कवीनें तुला बरेंच भारलेलें दिसतें !

‘ पण हा कोण, काय, कुठला, उद्योग काय करतो, का नुसत्या कविताच करतो आणि असल्याच कविता करतो—’

‘ विमल, तुला जर सरळ बोलायचें नसेल तर बोलूंच नकोस. या कवीची व माझी लौकरच गांठ पडणार आहे—म्हणजे मीं त्यांना पाहिलें आहे आणि

पाहिल्यापासून मला त्यांची कधीं ओळख होईल असें झालें आहे. शिवाय त्यांच्या ‘ उमललेल्या कळ्या ’ वाचून झाल्यावर मीं त्यांना एक अभिनंदनपर पत्र लिहिलें आणि त्याचें त्यांनीं मला पाठविलेलें उत्तर इतकें गोड आहे कीं— अगदीं त्यांच्या कवितेसारखें गोड आहे ! ’

‘ त्यांच्या कवितेसारखें गोड आहे ? ’ विमला आंबट तोंड करून म्हणाली. ‘ लज्जेला विसरविणारें । बंधनास तुडवीणारें ।। असें आहे कीं काय ? ’

‘ हो, तसेंच आहे. ’ प्रेमलेनें उत्तर दिलें.

‘ प्रेमा, गडे, सावध रहा हं. ’ सरला म्हणाली. ‘ हा कवि कोण, काय, याचा आगापिछा कांहीं माहीत नाहीं ! या दिवसांत जपूनच वागलें पाहिजे. ’

‘ खरोखर ‘उमललेल्या कळ्यां’तील काव्य म्हणजे अपूर्व आहे. या कवीची प्रेमाची आणि संसाराची कल्पना कशी वस्तुस्थितीला धरून आहे. अशा कवीची जी पत्नी होईल तिला आनंदाचा अगदीं सुकाळ होईल ! ’ प्रेमला म्हणाली.

“ अग पण नुसत्या कवितेवर संसार होत नसतो ! कसलाच होत नसतो— प्रेमाचाही होत नसतो आणि नुसत्या दागदागिन्यांचाही होत नसतो. पति हा पुरुष असावा लागतो आणि कर्तृत्ववान् पुरुष असावा लागतो. या ‘ उमललेल्या कळ्यां ’त रडगाणें इतकें आहे, आणि तारकांच्या लखलखाटांत, फुलांच्या शेजेवर आणि सृष्टिदेवीच्या गाण्याच्या तालाबरोबर विश्रांति घेण्याच्याच गोष्टी इतक्या आहेत, कीं हा प्राणी कधीं कांहीं उद्योग करील असें वाटत नाहीं. ’

‘ उद्योग ? उद्योग कसला ? ’ प्रेमलेनें विचारलें, ‘ ते फार तर पैसे मिळवत नसतील, काबाडकष्ट करीत नसतील, एखाद्या कारखान्यांत खपत नसतील, नाहीं तर कचेरींत रखडत नसतील, पण काव्य लिहिण्याचें महाकार्य त्यांनीं अंगिकारलें आहे. ‘ उमलेल्या कळ्यां ’तील एकेका कळीवर मुंबईची एक एक गिरणी ओंवाळून टाकावी अशी त्यांच्या कवितेची योग्यता आहे ! ’

‘ पण या कळ्यांची भाजी करून दुपारची भूक शमवितां येणार नाहीं. ’ विमला संथपणानें बोलली.

‘ या कळ्या आणि भाजी ! कसले बेजोड शब्द तूं जवळ आणलेस ! या काव्य-गीतांची भाजीबरोबर तुलना ! मघां ‘ खात्री ’ शब्द आल्याबरोबर ‘कात्री’ घेऊन तूं निघाली होतीस, आणि आतां या कळ्यांची भाजी करतेस ? ’

'त्या कवितांत खात्री आहे म्हणून भाजी करण्याची गोष्ट काढली. पण, गडे प्रेमा, तूं अशी रागावूं नकोस; मीं तुझी चेष्टा केली.'

'विमल, तूं माझी चेष्टा वाटेल तेवढी कर; पण त्यांच्या कवितांची चेष्टा करूं नकोस. तूं त्या कविता एकदां वाचून पहा. तुझ्या वृत्तींत सुद्धां पालट होईल.'

'अग वेडे, त्या वाचून पाहिल्यामुळेंच हा पालट माझ्या वृत्तींत झाला आहे. तो कवि मला बायक्या दिसतो, रडवा दिसतो, अशक्त दिसतो, दुर्जन दिसतो. त्याला मी कुत्रा म्हणूनसुद्धां बाळगणार नाहीं. मग त्याची-'

'बोलूं नको पुढें.' प्रेमला ओरडून म्हणाली; 'पुनः या विषयासंबंधीं मी तुजबरोबर बोलणार नाहीं.'

'असें करून कसें चालेल?' विमलेनें विचारलें, 'त्याची तुझी ओळख होणार तेव्हां मलाही बोलाव.'

'म्हणजे? तेथें तूं असेंच कुचकें नासकें बोलून त्यांचा पाणउतारा करणार आणि माझ्या सुखांत माती कालविणार?' प्रेमलेचे डोळे पाण्यानें भरले.

विमलेनें तिच्या खांद्यावर हात ठेवला व तिचें तोंड आपल्याकडे करून ती म्हणाली, 'प्रेमा, मी तुझ्या सुखांत माती कालवीन म्हणालीस हें खरें का?'

प्रेमलेनें डोळे पुसले. ती हंसली. 'माझं चुकलं. तूं माझ्या सुखांत माती कालविशील हें शक्य नाहीं. माझी त्यांची गांठ पडणार तेव्हां मी तुला बरोबर घेईन.'

कांहीं वेळानें त्या उठल्या.

* * * *

कवि अधोक्षज आनंदांत होते. त्यांच्या मस्तकावर त्यांचा केशकलाप अस्ताव्यस्त पिंजारलेला होता. त्यांच्या केशविहीन अपरोष्ठाच्या खालीं आणि अधरोष्ठाच्या वर पेटलेली सिग्रेट असून तिचा धूर हळूहळू निघत होता. ईझीचेअरसमोर एक खुर्ची ठेवून तिच्यावर त्यांनीं पाय पसरले होते आणि आपला देह त्यांनीं अर्थात् त्या आरामखुर्चीवर टाकलेला होता. मधुनमधून ते डोळे झांकीत व मधुनमधून उडवीत. ते डोळे झांकीत तेव्हां त्यांची सविकल्प समाधि लागे, का तंद्री लागे, का त्यांना खरोखर झोंप लागे हें सांगतां येणें कठीण होतें! ते नेहमीं म्हणत कीं, अशा स्थितींत (ती काय असेल ती असो) प्रतिभेचा संचार त्यांच्या अंतःकरणांत होऊन ती मूर्त शब्दरूपानें लेखणींतून

( किंवा पेन्सिलींतून ) कागदावर व्यक्त होत असते. आतांही त्यांच्या मांडीवर त्यांची सुप्रसिद्ध वही पडलेली होती व तिच्यावर एक फाउन्टनपेन पडलें होतें. तेव्हां त्यांच्या प्रतिभेचा उदय पाहण्याला ही संधि योग्य होती असा तर्क केला तर चुकलें असतें असें नाहीं. कवितेचा जन्म पाहणें ही गोष्ट माणसाचा जन्म पाहण्यापेक्षां कदाचित् चित्तवेधक आहे. या वेळीं कवीलाही प्रसूतिवेदना होत असतात. आतां आमच्या अधोक्षज कवींना सध्यां वेदना होत होत्या असें दिसलें नाहीं; पण कवीच्या काव्यांतील ध्वनि हा जसा साध्या दृष्टीला दिसत नाहीं, त्याचप्रमाणें कवीच्या प्रसूतिवेदना याही साध्या दृष्टीला कळत नाहींत किंवा निदान आकळत नाहींत. आणि अशा प्रसंगीं एखादा खरा अरसिक किंवा अभाविक ( म्हणजे भावगीतांचें मर्म न समजणारा ) जर कवीला भेटला तर त्याचे ( कवीचे ) हाल विचारावयास नको. त्या दुःस्थितींत सध्यां अधोक्षज सांपडले होते. त्यांच्या उजव्या बाजूला एका खुर्चीवर सुंदरराव बसले होते. त्यांच्यासंबंधीं अधोक्षज नेहमीं कोटी करी कीं, नांवाखेरीज सुंदररावाचा कसल्याही सुंदरपणाशीं संबंध नव्हता ! सुंदररावांना कविता कळत नसत आणि वर ते म्हणत कीं, अधोक्षजाची कविता म्हणजे निरुद्योगाची एक सबब आहे. सुंदरराव असें बोलला कीं अधोक्षजाला हार्दिक ( हा शब्द आतां वाचकांच्या पुऱ्या ओळखीचा झाला असावा ) धक्का बसे व त्याच्या सर्व भावना पार दडी मारून फक्त क्रोधाची भावना त्याच्याजवळ उपस्थित होत असे. पण तो सुंदररावावर रागावण्याला भीत असे. त्याचें कारण—पण सुंदरराव बोलतो आहे तेंच आपण ऐकिलें म्हणजे तें कारण निराळें सांगण्याची आवश्यकता रहाणार नाहीं.

‘ अरे, अधू—’ सुंदररावानें सुरवात केली.

‘ मला अधू म्हणू नकोस. ऐकणाऱ्याची भलतीच समजूत होते. ’

‘ पण येथें ऐकणारा तूं एकटाच आहेस, आणि तुझी भलतीच समजूत होण्याचें कारण नाहीं. शिवाय तुला अधू हें लाडकें नांव द्यायला कांहींच हरकत नाहीं. तुझ्या कविता वाचल्या—मी त्या वाचीत नाहीं हें तुला माहीतच आहे— म्हणजे तूं डोक्यांत आणि अंतःकरणांत अधू आहेस अशी कोणाचीही खातर-जमा होईल; पण मी त्यासाठीं तुला अधू म्हणत नाहीं हं ! अरे, मधुकराचें लाडकें नांव जसें मधू तसेंच तुझें नांव अधू. असो. तूं आतां माझें देणें सहाशें रुपये झालें आहे. तें मला पाहिजे. केव्हां देणार ? ’

‘ अरे सुंदरराव ! या वेळीं प्रतिभेचा संचार माझ्या डोक्यांत होत आहे— ’

‘ तुझ्या डोक्यांत कांहीं संचारण्याची भीति नाहीं; आणि जरी प्रतिभा संचारली तरी त्यामुळें माझें देणें देण्याला व्यत्यय कां ? ’

‘ अरे बाबा, कवितेच्या स्वर्गीय वातावरणांत पैशाच्या गोष्टी बोलणें म्हणजे अगदीं अरसिकपणाची कमाल आहे हें तुला समजायला पाहिजे ! ’

‘ मग तूं या वातावरणांत लोळणारा, का विहरणारा, का बागडणारा, तूं कशाला वरचेवर येऊन माझ्याकडून पैसे नेलेस ? तूं उद्योग करीत नाहींस, धंदा करीत नाहींस, घरांत तुझें लक्ष नाहीं; दोन वेळां मीं चांगल्या नोकऱ्या पाहून दिल्या तेव्हां कांहीं तरी सबब काढून त्यांपैकीं एकही पतकरली नाहींस; तुझें होणार तरी काय ?

‘ आतां बरोबर प्रश्न विचारलास ! अरे, माझ्यासारख्या कवीचें काय होणार ? सगळें जग बेहोप होऊन माझ्यावर तुटून पडणार ! ’

‘ म्हणजे ? आणखी कोणाकोणाचें देणें करून ठेवलें आहेस ? ’

‘ पुनः देण्याच्या गोष्टी ! म्हणे उद्योग—धंदा करावा ! अरे, कविता ही काय चीज आहे याची तुला कल्पना तरी आहे ? माझ्या एकेका भावगीतापुढें दहा दहा लक्ष भांडवलाच्या धंद्याची कांहींच किंमत नाहीं ! कारण या कारखानदारांना जेव्हां हार्दिक वेदना होतील, तेव्हां तसलीं भावगीतें वाचूनच त्यांना आराम मिळेल ! मी काबाडकष्टासाठीं जन्माला आलों नाहीं; मी कविता बसविण्यासाठीं जन्माला आलों आहें. ज्यांना कविता करण्याची अक्कल नसेल त्यांनीं उद्योग करावा; ज्यांना अंतःकरणाच्या खुंट्या पिळून अचेतन पदार्थांतूनसुद्धां भावनांचे सूर काढतां येत नसतील, त्यांनीं त्या अचेतन पदार्थांच्या पायीं काबाडकष्ट करावे. मी कवि आहें. प्राचीन कवीसारखा नाहीं तर अस्सल अर्वाचीन आहें. माझी कविता वाचून अंतःकरण थरारतें, शरीराला कंप सुटतो आणि स्वेदही सुटतो— ’

‘ हीं तर फेपरें आल्याचीं चिन्हें आहेत—! ’

‘ खरें आहे. यौवनाच्या उषःकालांत ज्यांनीं पदार्पण केलें आहे, अशा तरुणी माझ्या कविता वाचून इतक्या बेहोष होतात कीं त्या माझा सहवास मिळेल का म्हणून झुरणीला लागतात— ’

‘ पण या सर्वांतून दुपारच्या जेवणाची कांहीं तरतूद होते का ? ’

'काय आचरटपणाचा प्रश्न केलास? कोठें रसिकांना गुंगवून टाकणारी कविता, कोठें शारीरिक भूक लागलेल्यांना क्षणभर समाधान देणारें जेवण! प्रेमाची भूक निराळी आणि खाण्याची भूक निराळी! प्रेमाची भूक सारखी लागणें हें तर काव्यमय जीवनाच्या सुदृढतेचें लक्षण आहे. आणि भूक वेळच्या वेळीं लागणें हें तुझ्यासारख्या केवळ खावू आणि पैशाच्या मागें लागलेल्या मनुष्यरूपी पशूंच्या प्रकृतीच्या सुदृढतेचें लक्षण आहे.'

'एकूण माझा पैसा घेऊन पैशाच्या मागें लागल्याचा आरोप माझ्यावर! ही मोठी काव्यमय कल्पना आहे यांत शंका नाहीं! पण काय रे, खरोखर का एखादी तरुणी तुझ्यावर कवितेमुळें भाळली आहे? का हीही तुझी कविकल्पनाच?'

'हें पत्र पहा, या पत्रावरचें अक्षर पहा, या पत्रांतला मजकूर पहा, असें तुला म्हटलें असतें—पण त्यांतील हार्दिक रहस्य तुला कळणार नाहीं—'

'नको. मला तें कळून घेण्याची इच्छा पण नाहीं. मग ही मुलगी ठाण्याच्या इस्पितळांत आहे का येरवड्याच्या इस्पितळांत आहे?'

'म्हणजे? इस्पितळाचा काय संबंध यांत?'

'नाहीं; असें हार्दिक पत्र तुला लिहिणारी म्हणजे तिच्या डोक्याला कांहीं तरी विकार झालेला दिसतो!'

'होय. तिच्या डोक्याला प्रेमाचा विकार झालेला आहे आणि हा विकार डोक्याला जडणें यांतच डोक्याचें आणि जन्माचें सार्थक आहे. माझ्या 'उमललेल्या कळ्यां'ची तिनें जी स्तुति केली, ती वाचून तर माझा ऊर भरून आला आणि सगळ्यांत बहार म्हणजे तिला मीं पाहिली—'

'काय म्हणतोस?' सुंदररावानें विचारलें, 'तूं तिला पाहिलीस?'

'अगदीं प्रत्यक्ष; हे माझे दोन्ही डोळे उघडून मीं तिला पाहिली. काय तिचें सौंदर्य! आणि तिला माझी कविता इतकी पटावी हें माझें भाग्य होय. हें भाग्य एखादा लोखंडाचा कारखाना काढून किंवा डोंगराखालीं पाणी सांचवून त्यावर वीज उत्पन्न करून किंवा उंसाची साखर करून किंवा कांहींही करून मिळणारें नाहीं. तें काबाडकष्ट करून मर मर मरूनही मिळणारें नाहीं; तें कविता करूनच मिळणारें आहे. त्या सुंदरीचें रमणीय हास्य, तिचा काळाभोर केशकलाप, तिचे पाणीदार डोळे, तिचे गुलाबासारखे गाल, तिचे रसरशीत ओंठ, तिचे कुंदकळ्यांसारखे दांत—'

‘ थांब, थांब, ’ सुंदरराव ओरडला. ‘ मी एक क्विनीनची गोळी नाहीं तर ‘ फेरम फॉस’ची एक वडी, नाहीं तर थोडेंसें हिंगाष्टक तोंडांत टाकतों. या तुझ्या भडिमारापुढें माझी छाती फुटेल असें मला वाटतें ’

‘ छाती फुटेल तर उत्तम होईल. काव्य निर्माण होण्याला छाती फुटावी लागते, अंतःकरण तुटावें लागतें हृदयाचे बंध सुटावे लागतात ! आणि तूं असा दुर्भागी कीं, अशा वेळेस काव्य न सुचतां तुला फेरम फॉस, हिंगाष्टक आणि क्विनीन यांची आठवण होते ! तेव्हां बाबा तिचें–’

‘ बरें, पण माझे पैसे केव्हां देणार ? ’

‘ काय काव्याचा भंग केलास तूं ? आणि मी पैसे देऊं कुठून ? ’

‘ मग घेतलेस कशाला ? ’

‘ पाहिजे होते म्हणून घेतले. तूं दिलेस म्हणून घेतले. पण तुझे पैसे सत्कारणीं लागले आहेत. ’

‘ तें कसें काय ? ’

‘ अरे बाबा, ते कवितेच्या कारणीं लागले; आणखी कोणत्या सत्कारणीं लागायचे ? त्या पैशामुळें मला जी स्वस्थता आली तींतच ‘ उमललेल्या कळ्या ’ जन्माला आल्या. तूं पैशाची येवढी निकड लावणार हें मला माहीत असतें, तर तें पुस्तक मीं तुलाच अर्पण केलें असतें. तें माझ्या प्रकाशकानें आपल्या छापखानेवाल्याच्या जांवयाला अर्पण केलें आणि शेवटीं छापखानेवाल्यानें बिलाचा तगादा केला म्हणून मला जी बिदागी मिळणार होती ती मिळाली नाहीं; ती मिळाली तर मी तुलाच देणार होतों. ’

‘ आतां लक्षांत ठेव. माझे पैसे मला आठ दिवसांच्या आंत पाहिजेत. ते जर आले नाहींत तर मला कोर्टांत फिर्याद करावी लागेल. ’

‘ अरे, तूं माझा मित्र आणि तूं माझ्यावर फिर्याद करणार ? आणि फिर्याद करून तुला काय मिळणार ? माझ्या कवितांच्या पुस्तकाचे हक्क प्रकाशकानें राखून ठेवले आहेत. मला द्यायचा मोबदलाही त्यानेंच राखून ठेवला आहे म्हणा. तेव्हां फिर्याद करूं नकोस. तूर्त माझ्या मनाला स्वस्थता पाहिजे, कारण या सुंदर अप्सरेची गांठ पडणार आहे आणि त्या प्रसंगासाठीं मी एक कविता लिहीत आहें. ’

सुंदरराव निघून गेला.

* * * *

अधोक्षजानें एकामागून एक सात सिगरेट ओढल्या; डोक्यावरचे केंस अस्ताव्यस्त दिसताहेत कीं नाहीं हें पाहण्यासाठीं त्यानें आरशांत दहा वेळां पाहिलें; पोषाख कवीसारखा करण्यासाठीं कपड्यांच्या उलटापालटी पांच वेळां केल्या; अंगांत जोर येण्यासाठीं कडक चहाचे चार पेले तो प्याला आणि अशा प्रकारें कडेकोट तयारी करून प्रेमलेची गांठ पडल्यावर काय चमत्कार होईल याचें मनोराज्यरूपी सुख अनुभवण्यासाठीं तो पंधरा वीस मिनिटें सविकल्प समाधींत गुंगला.

त्या दोघांची भेट म्हणजे काव्य आणि सौंदर्य यांची भेट होती; पण त्यांत एकच न्यूनता होती; किंवा पहाणाऱ्याच्या दृष्टीप्रमाणें आधिक्य होतें. सौंदर्याच्या चढाओढींत विमला कांहीं प्रेमलेच्या फारशी मागें पडली असती असें नाहीं; पण तिला प्रेमलेनें बरोबर आणलें ही गोष्ट अर्थात् अधोक्षजाला आवडली नाहीं. तो मनांत चरफडला. कांहीं तरी तोंडांतल्या तोंडांत पुटपुटला अशी शंकासुद्धां प्रेमलेला आली; पण तिनें अगदीं प्रसन्नपणें सांगितलें:—

‘ ही माझी मैत्रीण विमला; तुमच्यासारख्या नामांकित आणि श्रेष्ठ कवीची व माझी गांठ पडणार हें तिला मीं सांगितलें तेव्हां तिचीही इच्छा आपली भेट व्हावी अशी असल्याचें मला दिसलें. तेव्हां मीं म्हटलें, ‘ चल माझ्याबरोबर. तिनें तुमच्या ‘ उमललेल्या कळ्या ’ पाहिल्या म्हणजे वाचल्या. त्या तिलाहीं फार आवडल्या. म्हणून मला वाटलें तिची गांठ पडून तुम्हांलाही आनंद होईल.’

‘ माझें अंतःकरण आनंदानें कसें तुडुंब भरून गेलें आहे. ’ अधोक्षज म्हणाला. ‘ आंधळ्यानें एक डोळा मागावा आणि त्याला दोन डोळे मिळावेत तसाच प्रकार झाला आहे. माझ्या कवितांमुळें ज्यांना आनंद झाला अशी मंडळी मला जितकी भेटतील तितकी हवीच आहेत. ’ हीं वाक्यें बोलत असतांना कवीची दृष्टि विमलेवर खिळली होती व तिच्याही सौंदर्यावर तो खूष झाला होता हें त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होतें.

विमला म्हणाली, ‘ तुमच्या ‘ उमललेल्या कळ्यांत ’ प्रेमाचें स्वरूप जरा पार्थिव दिसतें आणि काव्याचें कार्य तर माणसाला पार्थिव भूमीवरून थोडेंसें तरी उंच उचलून अंतरालांत कांहीं वेळ तरी तरंगावयास लावणें व त्याला उंचावरची शुद्ध हवा देणें हें आहे, हें आपणांला कबूल असेलच. ’

' हें मला मुळींच कबूल नाहीं. ही कांहीं वेड्या जुन्या कवींची समजूत होती, ती मला बिलकूल पसंत नाहीं. प्रत्यक्ष उदाहरण घ्या. या तुमच्या मैत्रिणीचें मला पत्र आलें, तेव्हां मला पुष्कळ आनंद झाला; पण आज त्यांच्या भेटीनें जो आनंद झाला त्यापुढें तो आनंद कांहींच नव्हे. आणि याहीपेक्षां हा भेटीनें झालेला आनंद जर चिरकाल भेटींत होईल तर माझ्या आनंदाला सीमाच राहणार नाहीं. '

' म्हणजे काय ? ' विमलनें विचारलें.

' मला वाटतें तुम्ही अगदीं आधुनिक काळच्या, आधुनिक विचाराच्या मुली आहांत. तेव्हां मी कांहीं इतर लोकांना चमत्कारिक वाटण्यासारखें बोललों तर निदान तुमच्यासारख्यांना धक्का बसण्याचें कारण नाहीं. '

' बोला, कांहींही बोला, कविराज ! ' विमला हंसत म्हणाली; ' तुम्ही कांहीं बोलल्यामुळें—कांहींही बोलल्यामुळें, आम्ही भिणार नाहीं किंवा आम्हांला धक्का बसणार नाहीं. आम्ही, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें, अगदीं आधुनिक काळच्या आणि आधुनिक विचारांच्या आहोंत. तुम्ही बोलण्यांत संकोच असा अगदीं करूं नका. '

' काव्याला स्फूर्ति सौंदर्यानें मिळते. ' अधोक्षज म्हणाला. ' आणि हें सौंदर्य हुडकण्यातच जर कवीचा सगळा वेळ गेला, तर त्याला कविता रचण्याला वेळच मिळणार नाहीं. तेव्हां सौंदर्य हें त्याच्याजवळ सारखें असलें पाहिजे. '

' म्हणजे ? आमची प्रेमला सतत आपल्याजवळ असावी असें तुमचें म्हणणें ?' विमलेनें प्रश्न केला.

' तसेंच म्हणाना ? ' कवीनें उत्तर दिलें. ' काव्यमय भाषेंत बोलायचें म्हणजे माझें तिच्यावर प्रेम बसलें आहे. '

' म्हणजे ? तिच्या सौंदर्यावर प्रेम बसलें आहे असाच ना तुमच्या म्हणण्याचा अर्थ ? ' विमलेनें प्रेमलेकडे पहात पृच्छा केली.

' प्रेमला आणि तिचें सौंदर्य यांत भेद आहे कुठें ? तिच्या सौंदर्यावर प्रेम करणें म्हणजेच तिच्यावर प्रेम करणें होय. ' कवि बोलला.

' पण हें सौंदर्य जाईल. प्रेमला केव्हां तरी तारुण्यकालांतून पुढच्या अवस्थेंत जाईल; किंवा कदाचित् ती आजारी पडून तिचें सौंदर्य नाहींसें होईल. समजा, देवीच्या सांथींत जर ती दुर्दैवानें सांपडली तर ती विद्रूपसुद्धां होईल—'

‘ आपल्या मैत्रिणीबद्दल काय भयंकर कल्पना तुम्हीं चालविल्या आहेत ! ’ आश्चर्यानें थक्क होऊन अधोक्षज म्हणाला.

‘ कल्पना भयंकर आहेत हें खरें; आणि तशी स्थिति माझ्या मैत्रिणीला कधींही न येवो आणि येणार नाहीं; पण तिच्यावर प्रेम करणें आणि तिच्या सौंदर्यावर प्रेम करणें यांत अंतर आहे हें सिद्ध करण्यासाठीं या भयंकर पण संभवनीय अशा कल्पना मला तुमच्यापुढें मांडाव्या लागल्या. ’

‘ अशा भलत्याच कल्पना करण्यांत अर्थ नाहीं. ’ अधोक्षज थोडासा लाजल्यासारखा होऊन बोलला. ‘ तुमच्या मैत्रिणीच्या सहवासांत माझी काव्यप्रतिभा अगदीं उत्कृष्ट स्थितींत राहील यांत शंका नाहीं ’

‘ तुमच्या प्रतिभेच्या स्थितीची मला शंका नाहीं. ’ विमलेचें मुख हंसरें होतें तें थोडें गंभीर दिसूं लागलें. ‘ आमच्या प्रेमलेची स्थिति काय होईल हें मला पहावयाचें आहे. तुमचें तिच्यावर प्रेम बसलें आहे; पण जरा घाईनें झालें असें तुम्हांला नाहीं वाटत ? ’

‘ काव्यमय प्रेम असेंच अचानक उत्पन्न होत असतें. ‘ दृष्टि पडे आणि प्रेम जडे ’ असा त्या प्रेमाचा प्रकार असतो. ’ कवीनें उत्तर दिलें.

‘ तेव्हां तुमचें म्हणणें आमची प्रेमला आपल्याला पत्नी मिळावी असें आहे ! ’ विमल म्हणाली.

‘ प्रेम हें निर्बंध असतें. विवाहापेक्षां तें फारच उंच असतें. ’ कवि बोलला.

‘ होय. तुमची कविता मीं वाचली आहे. ’ विमला म्हणाली. ‘ काय गती, प्रेमा ? तुझ्या लक्षांत असेल. हो, मलासुद्धां आठवली—

जें उंच विवाहाहूनी । जें उंच कुटुंबाहूनी ॥
जें क्षण जरि एक मिळालें । जन्माचें सार्थक झालें ॥

ही दुसरी ओळ जरा माझ्या घशांत अडकल्यासारखी वाटते, कविराज ! ’

‘ त्यांत काय आहे तुम्हांला नापसंत होण्यासारखें ! या ओळींत तर माझ्या कवित्वाचा परम उत्कर्ष झालेला आहे. खुद्द तुमच्या प्रेमलेच्या पत्रांत या ओळीची फारच तारीफ केलेली आहे ’ अधोक्षजानें मुद्रा थोडीशी चिंतातुर करून उत्तर दिलें.

‘ होय, मला ती ओळ फारच आवडली. ’ प्रेमला विमलेकडे पाहून म्हणाली.

‘ तें ठीक आहे. ’ विमला हंसली. ‘ त्यांत एका दृष्टीनें काव्य आहे हें मलादेखील मान्य आहे; पण तुम्ही म्हणतां कीं, प्रेम विवाहाहून फारच उंच आहे.. म्हणून तुमचा विचार कांहीं प्रेमलेशीं लग्न करण्याचा दिसत नाहीं ! पण ती तुम्हांस हवी आहे, नेहमीं जवळ हवी ! तुम्हांला स्फूर्ति देण्यासाठीं ती हवी. तुम्ही तिला काय देणार आहांत ? ’

‘ माझी सारी काव्यसंपत्ति तिच्या चरणांवर अर्पण करण्याला मी तयार आहें. ’

‘ पण तिच्या जेवणाखाणाची, कपड्यालत्त्यांची कांहीं व्यवस्था ? ’ विमलेनें विचारलें.

‘ म्हणजे ? ’ अधोक्षजानें आश्चर्यचकित होऊन विचारलें, ‘ जेवणखाण, वस्त्रप्रावरण यांची व्यवस्था नसण्याइतकी का ती दरिद्री आहे ? ’

‘ अहो, पण ती तुमच्याकडे येणार म्हणतां ना ? तेव्हां तिची व्यवस्था तुम्हांला नको का करायला ? ’ विमलेनें अधोक्षजावर दृष्टि रोखून त्याला विचारलें.

‘ तसा माझा अर्थ नव्हता. ’ कवि म्हणाला.

‘ मग ही तुमच्या सन्निध सारखी कशी असणार सांगा बरें ? ’ विमला बोलली. ‘ तुमचा अर्थ असा का आहे कीं, आमच्या प्रेमलेनें घरीं जेवावें आणि तुमच्या काव्याला स्फूर्ति देण्याचा उद्योग दिवसभर करावा ! तिच्याशीं तुम्ही लग्न करायला तयार नाहीं, कारण तुमचें प्रेम विवाहापेक्षां उंच आहे ! बरें, नुसतें जवळ ठेवून घेऊन निदान तिला जेवायला घालाल, वस्त्रप्रावरण पुरवाल म्हटलें तर तसाही तुमचा अर्थ नाहीं. शिवाय विवाह न करतां एखाद्या बाईला जवळ ठेवण्याचें प्रेम हें विवाहापेक्षां उंच आहे का विवाहापेक्षां नीच आहे ? ’

अधोक्षजाची मान या प्रश्नानें क्षणभर खालीं गेली; पण ती लवकरच वर आली. त्यानें आपली दृष्टि प्रेमलेवर रोखली. त्या दृष्टींत आतां क्रोध दिसत होता.

तो ओरडून म्हणाला, ‘ प्रेमले, तुला एकेरी नांवानें हांक मारली त्याची क्षमा कर. पण क्षमा कशाला ? तुझें माझ्यावर प्रेम आहे आणि माझें तुझ्यावर प्रेम आहे. आणि हा क्षण पुनः येणार नाहीं. अशा प्रसंगीं काव्याचा गंधसुद्धां नसलेली ही मैत्रीण येथें कशाला घेऊन आलीस हें सांग पाहूं ? ’

‘ तिला मी सोबत म्हणून घेऊन आलें. ’ प्रेमलेनें उत्तर दिलें, ‘ आणि

मला वाटतें ती आली हें बरें झालें. कारण या पुनः न येणाऱ्या क्षणांत काय झालें असतें कोणास ठाऊक !'

इतक्यांत अकालीं वीज कडकडावी तसा आवाज झाला. ही मंडळी बगीच्यांत जेथें बसली होती तेथें आणखी एक व्यक्ति आली. ही व्यक्ति म्हणजे एक बाई होती. ती म्हणाली, 'तुम्हांला हुडकतां हुडकतां दमलें. आतां अगोदर घरीं चला. सावकारानें टांच आणली आहे, भांडींकुंडींसुद्धां बाहेर निघण्याची वेळ आली आहे. घरीं बायकापोरें उपाशीं मरतात त्यांना तेथें टाकून कांहीं उद्योग-धंदा न करतां या फॅशनेबल पोरींच्या ओळखी करून त्यांच्याशीं गप्पा मारीत बसतांना लाज नाहीं वाटत तुम्हांला ? चला. तो सावकार म्हणतो कीं, आपल्या केरोसीनच्या वखारींत हिशेबाचें काम करीत असाल तर टांच परत नेतों. उठा ! रिकामटेकडेपणा आतां पुष्कळ झाला.'

तो सगळा प्रकार पाहून प्रेमलेला हुंदके येऊं लागले; पण विमलेला हंसू आलें. ती म्हणाली, 'बाई, हे आपले घरवाले का ?'

'होय !' ती बाई म्हणाली. 'मागच्या जन्मीं कोणाच्या संसारांत माती कालवली होती म्हणून यांच्या पदरीं पडण्याची पाळी माझ्यावर आली ! सगळ्या गांवांतल्या बायकांवर कविता करायला यांची लेखणी फुरफुरतें; पण माझ्याकडे कधीं यांनीं प्रेमानें पाहिलें नाहीं. पाहणें नाहीं तर नाहीं, पण घरीं कांहीं खाण्या-पिण्याची तरी सोय ! आणि माझ्या वडिलांनीं आठशें रुपये हुंडा देऊन यांच्याकडे मला दिली हो ! घरीं सोन्यासारखीं दोन लेंकरें आहेत. पण ती म्हणे दंगा करून यांच्या प्रतिभेला का लतिभेला अडथळा आणतात. सुंदर वस्तु पाहिली कीं यांना प्रेम वाटतें म्हणतात. हें कांहीं तुमच्यावर कविता करीत होतें वाटतें ?'

'नाहीं. ते माझ्या मैत्रिणीवर प्रेम करीत होते.' विमलेनें उत्तर दिलें.

'आणि तुमच्या देखत ?' बाईनें विचारलें.

'मी बरोबर होतें म्हणून त्यांना राग आला आहे. पण आपलें लग्न झालें आहे हें त्यांनीं कांहीं आम्हांला सांगितलें नाहीं.'

'पण तुम्ही कांहीं चौकशी करावी कीं नाहीं ?'

'ते लग्नाच्या गोष्टी बोलत नव्हते.' विमला हंसत हंसत म्हणाली.

'म्हणजे? कसल्या गोष्टी बोलत होते मग? आणि तुम्हीं कशा त्या ऐकून घेतल्यात?'

'आम्हीं ऐकून घेतल्या नाहींत. मी त्यांची कानउघाडणी करायला सुरवात केली होती, इतक्यांत तुम्ही आलांत.'

'मग अद्यापि कान धरायचे आणि उघडायचे असले तर अनमान करूं नका. मी आलें म्हणून संकोच करूं नका. पण यांचे कान उघडणें सोपें काम नाहीं; कान फारच लांबरुंद आहेत. उघडायला श्रम लागतील.'

अधोक्षज आतांपर्यंत चूप होता. आतां तो उसळला.

'असली ही कैदाशीण बायको मिळाल्यामुळें माझा जन्म फुकट गेला.'

'पण काय हो, आपलें लग्न झाल्याची बातमी आम्हांला मुळींच कळूं दिली नाहींत?' विमलेनें गंभीरपणानें विचारलें.

'तुम्हांला कशाला बातमी कळवायची? तुमच्या मैत्रिणीला कांहीं मी लग्न करतेस का म्हणून विचारण्यासाठीं आलों नव्हतों. माझें तिच्यावर प्रेम बसलें होतें तें सांगण्यासाठीं आलों होतों आणि तुम्हीं मधें नसतांत तर—'

'एक शब्द बोलूं नका.' प्रेमला संतापानें म्हणाली, 'तुमची चांगली शोभा करावी असें वाटतें; पण तुमच्या या बायकोकडे पाहून तिच्यासाठीं तो विचार मी सोडून देतें; पण तें एका अटीवर. तुम्ही बायकांमुलांच्या पोषणासाठीं नोकरी पत्करली पाहिजे.'

'नोकरी! खर्डेघाशी!' कवीनें विचारलें.

'हो हो, नोकरी! आतां सरळ बायकोबरोबर घरीं जा. आळशासारखे ऐतखाऊ बनूं नका; आणि प्रेमाच्या कविता कराल त्या विवाहापेक्षां उंच अशा करा; निदान त्याच्यापेक्षां नीच करूं नका. आणि सध्यांच्या काळच्या व सध्यांच्या विचारांच्या मुली तुमच्यासारख्या आळशी, अजागळ, फाजील, बाष्कळ आणि हलकट अशा कवित्वाचें अवसान आणणाऱ्या आपलपोट्या मूर्खांना भाळतील ही डोक्यांतील कल्पना साफ काढून टाका.' विमलनें सांगितलें.

अधोक्षज कांहीं बोलणार होता; पण त्यानें एक दीर्घ सुस्कारा सोडला व प्रेमलेकडे एकवार पाहून तो आपल्या कुटुंबिनीबरोबर जावयास निघाला.

'जरा थांबा!' प्रेमला म्हणाली. 'हें आपलें पुस्तक परत घ्या. आणखी एक सांगतें तें विसरूं नका. ही तुमची बायको रूपानें कशी छान आहे! कविता

लिहावीशी वाटेल तेव्हां प्रेमावर कविता लिहा, कामुकतेवर लिहूं नका. प्रतिभेची वाण पडेल तेव्हां या गृहलक्ष्मीकडे पहा म्हणजे ती वाण नाहींशी होईल; दुसऱ्या बायकांकडे पाहूं नका.'

अधोक्षजानें कुटुंबाबरोबर पाऊल उचललें.

विमला हंसून म्हणाली, 'प्रेमा, तुझी तब्येत ठीक आहे ना ?'

'ती नुसती ठीक आहे येवढेंच नाहीं, तर पूर्वींपेक्षां फार चांगली झाली आहे.'

त्या बगिच्यांत कळया उमलून फुलें झालीं होतीं आणि त्यांकडे पाहून अशुद्ध कल्पनांनीं भरलेल्या शब्दांच्या ओळींना 'उमलेल्या कळया' हें नांव देण्याचें धारिष्ट तरी कित्येकांना कसें होतें याचें प्रेमलेला आश्चर्य वाटत होतें !

**स्त्रीमासिक**, दिवाळी अंक, ऑक्टोबर १९३३.

# कोणता देव ?

वसंताची स्थिति खरोखर केविलवाणी झाली होती. बी. एस्‌सी. च्या परीक्षेंत तो पहिल्या वर्गांत आला, एवढेंच नव्हे, तर त्याचा विशेष गौरवपर उल्लेखही झाला. पण अद्यापि त्याच्या अंतःकरणांतील जी प्रबल आकांक्षा कीं विलायतेला किंवा जर्मनीला जाऊन अथवा अमेरिकेला जाऊन व्यावहारिक रसायनशास्त्रांत प्राविण्य मिळवावयाचें ती सफल होण्याचें चिन्ह दिसेना. त्याची स्थिति गरिबीची. अंगच्या गुणांनीं व पुढें मिळविलेल्या एक दोन मित्रांच्या आणि गुरुजनांच्या साहाय्यानें त्यानें येथपर्यंतचा शिक्षणक्रम पार पाडला होता. स्कॉलर्शिपा वगैरे मिळाल्यामुळें कॉलेजांतील त्यांचीं शेवटचीं दोन वर्षें सुखानें गेलीं होतीं. पण त्याला दहा पंधरा हजार रुपायांची मदत कोण करणार? त्याच्या बरोबर बी. ए. ची परीक्षा कशीतरी पहिल्या वर्गांत उतरलेले दोन मुलगे आय्. सी. एस. च्या परीक्षेला निघूनसुद्धां गेले. एकाचा बाप पैसेवाला; दुसऱ्याला त्याच्या जातीच्या फंडांतून मदत झाली. वसंताचा बाप त्याच्या लहानपणींच वारला होता. त्याच्या जातीचा असा फंड नव्हता. त्यालाही आय्. सी. एस. ला तुम्ही जातां कां, असें एकानें विचारलें होतें. त्याला आय् सी. एस्. ला जावयास नको होतें. आपल्या देशाला खरोखर कांहीं तरी आपला उपयोग होईल असें शिक्षण संपादन करण्याची त्याची इच्छा होती. पण तशा शिक्षणासाठीं त्याला मदत करण्याला कोणी तयार नव्हतें. आज तो एका गृहस्थाला भेटून आला होता. त्या गृहस्थानें शास्त्रीय शिक्षणासाठीं परदेशीं जाणें कसें मूर्खपणाचें आहे यावर त्याला एक भलें लांबलचक व्याख्यान दिलें व आय. सी. एस्. ला दिलेला पैसा निदान बुडत नाहीं म्हणून त्यास जोरानें सांगितलें. त्या परीक्षेला गेलेल्यांपैकीं पास किती होतात ही गोष्ट त्या गृहस्थाच्या लक्षांतून गेली असावी. कारण आय्. सी. एस्. साठीं पाठविलेल्या दहा मुलांपैकीं नऊ मुलांवरचा पैसा फुकट जातो हें त्याला माहीत असतें किंवा त्याच्या लक्षांत असतें तर तो असें बोलता ना. त्याचें बोलणें ऐकून आणि आपल्या आकांक्षांची त्यानें केलेली अवहेलना कळून वसंत फार खट्टू झाला आणि विषण्ण मनानें तेथून आला व आपला प्रिय मित्र माधव याच्याकडे गेला. माधव घरीं नव्हता. त्याची बहीण इंदिरा घरीं होती. ह्या घरांत त्याचा पुष्कळ घरोबा तर होताच, पण इंदिरा

आणि वसंत ही परस्परांवर अनुरक्तही होतीं. माधवही गरीब, अर्थात् त्याच्या बहिणीशीं लग्न करील त्याला तिच्याखेरीज कांहीं मिळण्याची आशा नव्हती. पण तसेंच पाहिलें तर इंदिरा ज्याला मिळेल तो खरोखर भाग्यवान्, अशी ती गुणी मुलगी होती.

दुर्दैवानें व्यवहारांत पैशाचा व्यवहार रोखीनें चालतो. गुणांच्या हुंडीवर कांहींही चालत नाहीं. मुलीच्या बाबतींत गुणांची हुंडी पटत नाहीं; पण हुंडा पटतो. वसंत आणि इंदिरा यांचा जोडा सुंदर शोभण्यासारखा होता, पण दोघांचीहि परिस्थिति अडचणीची. तेव्हां लग्नाची गोष्ट काढण्याची तूर्त सोय नव्हती. आज वसंत आला व माधवाची वाट पहातो म्हणून बसला. तो माधवाकडे कितीतरी वेळां येई व त्याच्याशीं किंवा त्याच्या बहिणीशीं बोलत बसे. पण आज तो अगदीं उदास झाला होता. काय करावें हें सुचत नव्हतेंच, पण काय विचार करावा हेंसुद्धां त्याला सुचेना. कितीतरी वेळ तो स्तब्ध बसला. तेव्हां इंदिरा म्हणाली—‘ वसंत, आज कांहीं मौनव्रत घेतलें आहेस कीं काय ?’

वसंतानें वर पाहिलें. त्याची ती खिन्न मुद्रा पाहून इंदिरेला कसेसेंच झालें व ती म्हणाली—

‘ आज झालें तरी काय ? ’

वसंतानें एक दीर्घ उसासा टाकला. तो म्हणाला—‘ इंदु, मला पैशाची कधीं परवा वाटली नाहीं; पण जवळ पैसा नाहीं याची मात्र चिरड आली आहे. मूर्ख नंदीबैलाला पैसा मिळावा आणि माझ्यासारख्याला परदेशीं जाणें अशक्य व्हावें हा काय न्याय ? ’

‘ हा मोठाच अन्याय, वसंत ! ’ इंदु हंसली. इंदु हंसली कीं, तिच्या गालाला खळी पडे आणि मुखावर शोभा पसरे. अशा वेळीं सगळी दुनिया तिच्यावरून ओंवाळून टाकावी असें वसंताला वाटे. पण आज तो खरोखर इतका चिरडीला आला होता कीं, तिच्या त्या हंसण्याचा त्याच्यावर कांहींही परिणाम झाला नाहीं.

‘ पण या जगांत अन्याय सारखे चाललेच आहेत. ते नाहींसें करणें सोपें नाहीं. पण वसंत, जगानें तुझ्या बाबतींत अन्याय केला म्हणून तूं मला अन्यायानें वागवावेंस हा तरी न्याय आहे काय ? ’

‘ हं हं, मी तुला अन्यायानें काय वागविलें ? ’

' अरे, केव्हांचा आलास, अगदीं चूप बसला होतास. जशी कांहीं आपली ओळखच नाहीं! तुझी आकांक्षा किती उत्तम आहे हें कळण्याची अक्कल लोकांना नसेल, तर तूं स्वतःचा इतका संताप कां करून घ्यावास?'

' तो तात्यासाहेबांचा धोंड्या मॅट्रिकला मजबरोबर बसला होता. तो चार वेळां नापास झाला आणि आतां म्हणे कोलंबोला मॅट्रिकची परीक्षा देऊन मग विलायतेला ब्यारिस्टर होण्याला जाणार."

' गेला तर गेला. जसा तात्यासाहेबांच्या पैशानें विलायतेला गेला तसाच दहा वर्षांनीं ब्यारिस्टर होऊन आल्यावर त्यांच्याच पैशावर तो मजा मारणार. त्याचें सुखदुःख तुला आणि मला कशाला?'

' तुझ्याशीं बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं.' वसंत त्रासिकपणानें म्हणाला.

' यांत नवें काय सांगितलेंस? माझ्या जवळ अर्थ असता तर तुला पैशाची ददातच पडली नसती.'

' उगीच शब्दावर काय कोट्या सुचताहेत तुला? तुझ्याजवळही पैसा नाहीं आणि माझ्याजवळही नाही. आतां कोठें तरी मास्तरकी पाहतों आणि उरलेलें आयुष्य कसें जाईल तसें घालवितों.'

इंदिरा हंसली, पण मोठ्यानें हंसली. ती म्हणाली-' सगळें आयुष्य अद्यापि पुढेंच आहे. येवढ्यांत त्रागा करून काय होणार?'

' मी त्रागा नाहीं करीत;' वसंत म्हणाला, ' पण कंटाळलों मी."

' मग थोडा चहा करून देऊं का? का सरबत देऊं? का वाटीभर ताक देऊं?'

वसंत तिच्याकडे पहात होता. पहातां पहातां तिच्या सोज्वळ मुखावरच्या हास्याचें प्रतिबिंब त्याच्या मुखावर पडलें आणि तो किंचित् हंसून म्हणाला-' कांहीं नको, घोटभर पाणी प्यायला दे म्हणजे झालें-'

' नुसतें पाणीच?' इंदिरेनें विचारलें. ' आज आईनें बेसनाचे सुंदर लाडू केले आहेत. टाक तोंडांत एक आणि मग घोटभर पाणी पी आणि मग कांहीं आनंदाचा विषय काढून आपण दादा येईपर्यंत बोलत बसूं.'

इतक्यांत दादा आला आणि बेसनाचे सहा लाडू संपले आणि तांब्याभर पाणी खलास झाल्यावर इंदिरेनें चहाचें आधण ठेवलें.

' मधू,' वसंत म्हणाला ' आपण आतां चांगलें स्थळ पाहून इंदूचें लग्न केलें पाहिजे.'

'पण तूं ना तिच्याशीं लग्न करणार ?'

'माझ्यासारख्या दरिद्र्याला का तूं आपली बहीण देणार ?' वसंतानें विचारलें.

माधव त्याच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. इंदूनें तें आंतून ऐकिलें आणि चहाची पूड खळखळलेल्या पाण्यांत टाकण्याऐवजीं तिनें ती थंड गार दुधांत टाकली.

[ २ ]

प्रभाकरपंतांची कन्या प्रभावती ही आतां वयानें पंचविशीच्या आंतबाहेर होती. तिची गणना 'सुशिक्षित' स्त्रियांत करतां आली नाहीं तरी तिला अशिक्षित म्हणणें योग्य नव्हतें. ती मराठी वाचीत असे व लिहीत असे ( म्हणजे हिशेब व पत्रें लिहीत असे ) आणि इंग्रजी तीन पुस्तकें तिनें पाहिलीं होतीं. तिचें नांव जितकें गोंडस होतें तितकें तिचें रूप गोंडस नव्हतें, पण हा अपराध तिचा नव्हता. शिवाय तिच्या वडिलांजवळ दोन मुलांना खर्च करून तिच्यासाठीं खर्चण्याला पुष्कळ पैसा होता. अलीकडे चार वर्षांत तिचें शरीर शुक्लेंदुप्रमाणें वाढत होतें. (तिच्यांत आणि शुक्लेंदूंत दुसरा कोणताही समान धर्म नव्हता) आणि त्यामुळें पैसेवाल्या प्रभाकरपंतांनासुद्धां तिच्या लग्नाची काळजी वाटूं लागलेली होती. तिचा वर्ण जरी काळासांवळा होता तरी देवींचे वण वगैरे असा प्रकार तिच्या बाबतींत नव्हता. तिचे ओंठ जरा जाड होते आणि डोळे बारीक होते. नाक उभटपणांत जरा कमी दिसे आणि रुंदपणांत जरा जास्त दिसे. आतां हिचें लग्न फार लांबणीवर टाकूं नये असें प्रभाकरपंतांना तर वाटत होतेंच, पण प्रभावतीलासुद्धां आतां घरसंसार करण्याची इच्छा झाली होती. कर्मधर्मसंयोगानें वसंताची हकीकत प्रभाकरपंतांना कळली, त्याच्या आकांक्षा त्यांच्या कानांवर आल्या आणि त्याची निखालस गरिबीही त्यांच्या पूर्णपणें लक्षांत आली. तेव्हां सालंकृत कन्यादान करून जांवयाचें दारिद्र्य मिटविलें, तर वसंतासारखा मुलगा हजारांत मिळणार नाहीं हें त्यांना पटलें. त्यांनीं वसंताची भेट घेतली. इकडच्या तिकडच्या गोष्टी घटकाभर बोलून मग आपल्या मुलीच्या लग्नाची गोष्ट काढली व तुमची विलायतेला वगैरे जाण्याची इच्छा असेल तर आपण पंधरावीस हजार रुपये मोठ्या आनंदानें खर्च करूं असेंहि त्यास सांगितलें.

वसंताच्या डोळ्यांपुढून इंदिरेची मधुर मूर्ति क्षणभर सरकली व त्या क्षणांत समोर बसलेला प्रभाकरपंत सोमनाथाची मूर्ति फोडणाऱ्या महंमूद गझनीप्रमाणें

त्याला वाटला; व त्याच्या समोरून पळ काढावा असेंही त्यास वाटूं लागलें. पण प्रभाकरपंत त्याच्या खोलींत येऊन बसले होते. आणि वसंताला पंधरावीस हजारांची रक्कम डोळ्यांपुढें दिसूं लागली. प्रभाकरपंत बोलतच होते. ‘ माझी मुलगी कांहीं अप्सरेसारखी नाहीं. दहा मुलींसारखी आहे. जरा सुखांत वाढलेली आहे त्यामुळें वाढ खुंटलेल्या मुलीसारखी दिसत नाहीं. तुमच्या विद्येकडे आणि तुमच्याकडे पाहून मी ही गोष्ट करण्यास तयार झालों आहें. मला कांहीं पैशाचा तोटा नाहीं–’ वगैरे, वगैरे, वगैरे.

त्याच्यावर आपण काय बोललों हेंही वसंताच्या लक्षांत नव्हतें. पण पुढें दोन दिवसांनीं तो प्रभाकरपंतांच्या घरीं प्रभावतीला पहाण्यासाठीं गेला एवढी गोष्ट खरी. तिला पाहिल्यावर तो क्षणभर आश्चर्यचकित झाला व काय बोलावें हें त्याला सुचेना. त्या दिवशीं अर्थात् प्रभावती पुष्कळ नटली होती. अमावास्येच्या रात्रीं मध्येंच लटकलेला काळा ढग जसा दिसतो त्याप्रमाणें तिच्या कपोल-प्रदेशावर तिच्या आईनें लावलेली मायेची ‘ तीट ’ दिसत होती. श्वेतचूर्णिकेचा अवलेप मुखाला सढळ हातानें केला होता, त्यामुळें भस्म लावल्याचा भास होत होता. दागदागिने अंगावर तर भरपूर घातले होते आणि प्रभाकरपंत जातां जातां सहज उद्गारले, ‘ हे सगळे दागिने हिचेच आहेत. आणखीही आहेत ते सगळे हिच्याबरोबर हिच्या घरीं जावयाचे. ’ यानंतर प्रभावतीनें थोडासा हार्मोनियम वाजवून दाखविला. आणि याप्रमाणें कांहीं वेळ चालून मागचा पुढचा सर्व विचार करून, वसंतानें प्रभाकरपंतांच्या विनंतीला जवळजवळ रुकार दिला.

‘ आतां कांहीं जुना काळ उरला नाहीं. ’ प्रभाकरपंत म्हणाले; ‘ तुम्ही वाटेल तेव्हां घरीं येत चला. मोटर आहेच. केव्हांही प्रभाला घेऊन हिंडायला जात चला. तुमचा सप्टेंबरमध्यें जाण्याचा इरादा आहे तर आपण आतां फाल्गुन चालला आहे यांतच कार्य आटपून टाकूं. आणि मुहूर्त ठरला कीं तुमच्या नांवानें ‘ टॉमस कुक ’कडे दहा हजार रुपये ठेवून देतों. ’

दहा हजार, पंधरा हजार, वीस हजार! किती तरी वेळ वसंत हजारांचे आंकडे घोंकत–ऐकत होता. मधून मधून प्रभावतीच्या प्रफुल्ल मुखाकडे तो पहात होता. काळ्या घोंगडीवर पांढरी चादर पसरावी त्याप्रमाणें तिच्या मुखावर हास्य झळकत होतें. वसंतानें एक शब्द बोलण्यापूर्वींच प्रभाकरपंतांनीं लग्नाचा सगळा कार्यक्रम आंखला आणि मुहूर्तासाठीं पंचांग पहावें म्हणून हुडकूं लागले, तों

प्रभावती म्हणाली—'बाबा, मलासुद्धां विलायतेला पाठवा. मी नाहीं एकटी इकडे तीन चार वर्षें राहणार.'

'अग पोरी,' प्रभाकरपंत म्हणाले, 'ते वर्षांतून एकदां इकडे येतील, मग झालें ना?'

'मग मलाच पाठवा ना?'

'पहा, वसंतराव! एव्हांपासून तुमच्या विरहाची भीति वाटते हिला! ठीक आहे. तुलाही पाठवूं. मग झालें ना?'

प्रभावती हंसली व वसंत बसला होता त्या खुर्चीमागें येऊन उभी राहिली. वसंत खुर्चीत जरा अडचण करून बसला. त्याला वाटे कांहीं तरी बोललें पाहिजे; हें होत आहे हें कांहीं बरें नाहीं. इंदिरेवरून पंचवीस हजार रुपये ओंवाळून टाकावेत! पण काय असेल तें असो, त्याला बोलवेनाच!

प्रभाकरपंत म्हणाले—'तुम्ही उद्यां या, रात्रीं जेवायलाच या, म्हणजे आमच्या भटजींना मी बोलावतों. मुहूर्त, दिवस सर्व कांहीं पक्कें करून टाकूं. तुम्ही आतां सहकुटुंब जाणार, तेव्हां मे महिन्यांत गेलांत तरी आमची हरकत नाहीं. आमची मुलगी पसंत पडली ही आनंदाची गोष्ट आहे. तिच्या गुणांचें चीज कोणी केलेंच नव्हतें आतांपर्यंत; तिला इंग्रजी फारसें येत नाहीं, पण तिचें वय अगदीं बी. ए., एम्. ए. झालेल्या मुलीएवढें आहे, आणि शिवाय ती पोक्त दिसते, एवढेंच नाहीं, तर खरोखर पोक्त आहे.'

किती तरी वेळ बोलणें चाललें होतें आणि मांत्रिकानें भारलेल्या माणसा-सारखा वसंत ऐकत होता. दुसऱ्या दिवशीं रात्रीं जेवायला येण्याचें कबूल करून तो एकदांचा बाहेर पडला आणि 'एकच प्याला' हा बोलपट पहायला गेला.

[ २ ]

दुसरे दिवशीं संध्याकाळीं वसंत बगीच्यांत हिंडावयास गेला. तेथें त्याला माधव भेटला; पण दोघांची सलामी होते न होते, इतक्यांत प्रभावती तेथें समोरून येत असलेली त्याच्या दृष्टीस पडली. तिला टाळणें तर शक्य नव्हतें. ती आली व म्हणाली—'बाहेर मोटार आहे. हिंडायला येतां का? तसेंच मग घरीं जाऊं—'

गार वारा सुटला होता; पण वसंताचा शर्ट भिजून गेला होता. तो म्हणाला—

'हा माझा मित्र आतांच मला भेटला. त्याच्याशीं मला कांहीं बोलावयाचें आहे. मी ठरल्या वेळीं घरीं येतों."

'विलायतेंतील कांहीं लोक आपल्या भावी पत्नीला असें सांगावयाचे नाहींत.' किंचित् रागावून प्रभावती बोलली.

वसंत ओशाळला; पण कांहीं बोलला नाहीं. प्रभावतीही तेथें थांबली नाहीं. ती गेल्यावर माधव म्हणतो–'वश्या, हें काय ?'

'हें म्हणजे ?–' वसंतानें विचारलें.

'हें म्हणजे आतां येथें आलें होतें तें. एकूण मीं ऐकलें तें सर्व खरें ?–'

'तूं काय ऐकलेंस ?'

'कांहीं का असेना ! तूं सुखी हो म्हणजे झालें.'

'तूं मला शिव्या कां देत नाहींस ? माझ्या थोबाडींत कां लगावीत नाहींस ?'

'वसंत, तुझी पुष्कळ दिवसांची परदेशीं जाण्याची इच्छा परिपूर्ण होण्याची वेळ आली हें पाहून मला वाईट वाटेल का सुख होईल ? माझ्या बहिणीपेक्षां तुझ्या उज्ज्वल भविष्यकालाला मी जास्ती महत्त्व देतों.'

'असें काय ?' वसंत बोलतां बोलतां मागें बांक होतें त्यावर बसला. कांहीं वेळ तो बोलला नाहीं. मग त्यानें खिशांतून एक कागद काढला व त्यावर पेन्सिलीनें पुढील मजकूर लिहिला—

'रा. रा. प्रभाकरपंत यांसी–

क्रु. सा. न. वि. वि.

आपली मला आपला जांवई करण्याची इच्छा कळविलीत. मीं आपल्या सूचनेचा पूर्ण विचार केला. माझ्यासारख्या गरिबानें आपल्यासारख्या श्रीमंताची मुलगी पत्करणें म्हणजे मोठा अन्याय करणें होय. तेव्हां आपण माझा नाद सोडावा. स्पष्टपणें बोलण्याचें धैर्य यापूर्वी माझ्या अंगीं नव्हतें याची क्षमा करावी. कळावें. आपला–वसंत.'

तो कागद खिशांत घालून वसंत म्हणाला–'मधू, माझ्याबरोबर चल. नंतर मी तुझ्या घरीं येणार आहें.'

'माझ्या घरीं कसा येणार ? तुला तर प्रभाकरपंतांकडे जावयाचें आहे.'

'होय. प्रथम तेथें जाऊन मग तुझ्याकडे यावयाचें आहे. माझ्या मनोमंदिरांतला देव तुझ्या घरांत आहे.'

‘ पण -- पण–’

‘ पण बीण कांहीं नाहीं. चल ! ’ ते दोघेही उठले व तेथून प्रभाकरपंतांच्या घरीं गेले. प्रभाकरपंत दारांत उभे होते. त्यांच्या हातांत तें पत्र वसंतानें दिलें. तें वाचून प्रभाकरपंत हंसले. ‘ एकूण आकांक्षा आणि देशहित यांच्या गोष्टी फुकट. विकारवशता आणि कर्तृत्व यांपैकीं तुमचा देव विकारवशता हा आहे. तुमची मर्जी. पण तुमचें पोरवय आहे. मी पाहिजे तर आठ दिवस वाट पाहतों.’

‘ माझी वाट पाहूं नका. माझी वाट आतां दुसरीकडे आहे. ’ असें म्हणून तो माधवासह निघाला व घरीं आला. इंदिरा नेहमींप्रमाणें दारांत भेटली नाहीं. ती आंत मूक रुदन करीत बसली होती. तिच्याकडे पाहून वसंत माधवाला म्हणाला–‘ मधु, माझ्यासारख्या दरिद्र्याला तूं आपली बहीण देशील का ? ’

इंदूनें वर पाहिलें आणि तिच्या अश्रूंतून तिचें हास्य बाहेर आलें. माधव म्हणाला, ‘ इंदू, आमच्या वसंताला परदेशीं जावयाचें आहे. तूं त्याच्या मार्गांत विघ्न करणार कीं काय ? ’

इंदूनें एकदां आपल्या भावाकडे पाहिलें आणि एकदां आपल्या प्रियकराकडे पाहिलें, आणि ती म्हणाली–‘ तूं रे आमच्या दोघांत विघ्न करणार कोण ? ’

‘ असें काय ! ’ माधव हंसला. ‘ एकूण अजून तुम्ही दोन आहांत ? पण तें चालणार नाहीं. आतां पहिला मुहूर्त पाहून—’

बाजू आपल्यावर उलटली हें पाहून इंदू व वसंत मनःपूर्वक हंसूं लागलीं.

**किर्लोस्कर**, मासिक ऑगस्ट १९३४

---

# सोंगाची बतावणी

नाटक चालू असतांना मधुकर बेहोष होऊन गेला होता! काय तो गोड आवाज! काय तो यथायोग्य अभिनय! त्यांत फाजीलपणा कसला तो नाहीं! आणि काय तें रूप! त्या ओंठावरची मादक लाली, त्या गालावरची भेदक खळी आणि आकर्षक गुलाबी छटा, त्या डोळ्यांत चमकणारें पाणी, ते गोंडस हात, ती चालण्याबोलण्याची ढब, खरोखर 'सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन' हा श्लोक लिहितांना कालिदास हेंच नाटक पाहून आलेला असला पाहिजे असें मधुकराला वाटलें! सुनीता-नांवसुद्धां किती गोड! हिच्यामुळेंच कवि सुनीतें लिहूं लागले असावेत अशी त्याची खात्री झाली. आणि त्या नाटककारानें तरी काय गंमत केली पहा—तिचें खरोखरचें नांव विनीता—तिला कोणी विनी म्हणत, मग विणी म्हणूं लागले, मग त्या प्राकृत विणीचें रूपांतर पुनः वीणा या भारदस्त संस्कृत शब्दांत झालें. आतां तिला सगळे वीणाच म्हणत; पण मधुकराला वाटलें कीं वीणापेक्षां सुनीता हेंच नांव अन्वर्थक! आणि शिवाय त्या नाटकाला तिनें इतकें प्रसिद्ध केलें होतें कीं, किती तरी लोक तिलाच सुनीता म्हणूं लागले होते. मधुकरानें तिचें नाटक प्रथमच पाहिलें होतें असें नाहीं. हें नाटकसुद्धां त्यानें प्रथमच पाहिलें होतें असें नाहीं. ही त्याची पांचवी खेप होती. पण आज त्याच्या अंतःकरणांत कांहीं नवीनच आंदोलन सुरू झालें यांत शंका नाहीं. त्याला कांहीं तरी चमत्कारिक होऊं लागलें. त्याच्या छातीचे ठोके जरा जोरानें पडूं लागले. काय कारण असेल तें असो, त्याच्या डोळ्यांस पाणी येऊं लागलें, घशाला कोरड पडल्याची शंका येऊं लागली. उकाडा झाल्यावर होतें तसें त्याला गुदमरल्यासारखें वाटलें. अंगावर घातलेले कपडे—तसा तो सनातनी होता, कपडे कांहीं फारसे नव्हते, पण ते सुद्धां जड वाटूं लागले. डोळ्यांसमोर सुनीता दिसूं लागली, तिच्या गाण्याचे आलाप कानांत घुमूं लागले, तिचे खडे बोल हृदयाला हेलकावे देऊं लागले. तुम्ही खोटें म्हणाल पण त्याला कविता करावी असेंसुद्धां वाटूं लागलें. सुनीता—सुनीता! सुनीतेबद्दल त्याच्या अंतःकरणाला ओढ लागली. मग त्याला कळलें कीं, ज्या शक्तीमुळें विश्व आनंदमय होतें, जिच्यामुळें कवीला सुनीतें सुचतात आणि कळ्या निःश्वास सोडूं लागतात—त्या शक्तीच्या अंमलांत आपण पुरे

सांपडलें. प्रेम–प्रेम–प्रेम ! सुनीतेवर त्याचें प्रेम बसलें ! सुनीतेशिवाय जगांत मौज नाहीं याबद्दल त्याची खात्री पटली. सुनीतेची प्राप्ति म्हणजे जीविताचें सार्थक्य–म्हणजे आनंदाचें साम्राज्य ! सुनीतेची मूर्ति त्याच्या डोळ्यांत बसली–घुसली–तेथें हंसली. आणि मग तो हंसला. पण तें हंसें फार वेळ टिकलें नाहीं. तिची भेट कशी होणार–म्हणजे तिची ओळख कोण करून देणार–ती आपल्याकडे पाहील का, ती आपल्याला चाहील का–अशा शंका त्याच्या मनांत येऊं लागल्या.

आणि अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत काहूर करीत होते; त्यामुळें निर्मलेची आठवण तो कांहीं काळ तरी अगदीं विसरून गेला. वास्तविक निर्मला मोहक होती, आकर्षक होती, गुणवती होती. मधुकरानें तिच्यावर कवितासुद्धां केलेल्या होत्या. पण कांहीं वेळानें जेव्हां त्याला आठवण झाली, तेव्हां अर्थात् पहिली मानसिक क्रिया त्यानें केली म्हणजे सुनीता व निर्मला यांची तुलना केली. आणि त्याच्या मतें त्या तुलनेंत निर्मला हरली. सुनीतेच्या नेत्रांतील चमक हृदयाला भेदून तेथें विलक्षण ओढ उत्पन्न करीत असे, निर्मलेच्या नजरेनें केवळ प्रसन्नता उत्पन्न होई. आणि हृदयाला लागणाऱ्या ओढीपुढें, हुरहुरीपुढें ही सात्त्विक प्रसन्नता किती वेळ टिकाव धरणार ? खरें सांगावयाचें म्हणजे निर्मलेच्या कांहीं दिवसांच्या परिचयानंतरसुद्धां आज त्याच्या अंतःकरणांत जी कालवाकालव झाली होती ती पूर्वीं कधींहि झाली नव्हती. निर्मलेबद्दल काव्यस्फूर्ति होण्याइतकें प्रेम त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न झालें होतें; पण आतां त्याला जें काय वाटत होतें त्याची खुमारी कांहीं निराळी होती. त्याला भवभूतीचा प्रख्यात श्लोक आठवला आणि ' आंतरः कोपि हेतुः ' म्हणजे काय याची खूण बरोबर पटली. सुनीतेची कसेंही करून भेट घेण्याचें त्यानें ठरविलें.

आणि शेवटीं त्याचा मनोदय पूर्ण झाला. सुनीता म्हणजे वीणा एका टुमदार बंगल्यांत रहात होती. तेथें सभोंवतीं एक चांगला बगीचा होता. त्यांत चमेली आणि मोगरा यांच्या वेली ठिकठिकाणीं होत्या आणि गुलाबाचे व निशीगंधाचे ताटवे सर्वत्र पसरलेले होते. भरपूर छाया देतील असे उंच वृक्षही तेथें होतें आणि त्यांतील कांहीं झाडांच्या फांद्यांना झोंपाळे बांधलेले होते. तीन चांगले मांडवही त्या उद्यानांत होते आणि पुष्कळ वेळां वीणा-म्हणजे सुनीता-तेथें

बसत असे. तिच्या या बंगल्याचा पत्ता मधुकरानें काढला व तो तेथें गेला. ती वेळ संध्याकाळची होती. अद्यापि ऊन पडलेलें होतें पण त्याची तीव्रता पुष्कळ कमी झालेली. बगीचाचें फाटक उघडून तो आंत शिरला व एक नोकर माणूस त्याला भेटला त्यास तो म्हणाला–' मला वीणाबाईंना भेटावयाचें आहे.' त्या नोकरानें कांहींही प्रश्न न विचारतां आपल्यामागून चलण्यास त्याला सांगितलें. आपली चौकशीसुद्धां न करतां येवढ्या सुलभपणानें आपला प्रवेश झाला याबद्दल मधुकराला आश्चर्य वाटलें आणि बगीच्याकडे पहात पहात तो त्या नोकराच्या पाठीमागून चालला. एका उघड्या जागेंत चार खुर्च्या टाकलेल्या होत्या त्यांपैकीं एकींत सुनीता बसली होती. तिच्या हातांत एक पुस्तक होतें. मधुकर येतांच तिनें पुस्तक झांकून तें समोरच्या छोट्या टेबलावर टाकलें व किंचित् हास्य केलें. या वेळीं अर्थात् ती रंगभूमीवर नव्हती तरी तिचें स्वरूप मधुकराला अतिशय मनोहर वाटलें! तिचा पोषाख साधा होता, पण त्यामुळें तिचें सौंदर्य अधिक खुलून दिसत होतें. ती हंसत हंसत म्हणाली–' या बसा. चहा आतां येईल. आपण मला भेटण्यास यावें हा माझा मोठा सन्मान आहे.'

मधुकराला चमत्कार वाटला. पण आपलें स्वागत येवढ्या उत्साहानें झालें याबद्दल त्याला आनंदही वाटला. तो म्हणाला–' तुमचें सुनीतेचें काम पाहून मला फारच आनंद झाला. असा सुंदर अभिनय पाहिल्यावर त्याचें प्रत्यक्ष अभिनंदन करावें अशी त्याला अनिवार इच्छा झाली कीं, मी येथें आलों याबद्दल तुम्ही रागावलांत नाहीं ना? माझी तुमची ओळखसुद्धां नाहीं—'

' प्रत्यक्ष ओळख नव्हती हें खरें,' वीणा अत्यंत मोहक अशा दृष्टीनें त्याच्याकडे पहात म्हणाली, ' पण तुमची एक कादंबरी, तुमच्या गोष्टी आणि विशेषतः तुमच्या कविता यांमुळें खरोखर परिचय अगोदरचाच आहे.' आणि असें बोलून तिनें असें कांहीं स्मितहास्य केलें, आणि त्याची गुलाबी छटा तिच्या गालावर अशी कांहीं पसरली कीं, मधुकराला अगदीं धन्यता वाटली आणि खरोखर सुनीतेवर एक गोड गजल लिहावा असें त्यानें ठरविलें. उघडपणें तो म्हणाला–' माझ्याबद्दल तुम्ही एवढा आदर दाखवावा हें माझें मोठें भाग्य आहे, वीणाबाई–'

' बाई–' वीणा हंसली आणि तिचे कुंदकळ्यांसारखे दांत थोडेसे दिसले– ' बाई म्हणजे जरा प्रौढपणा वाटतो नाहीं? मला वीणा म्हणा ना...'

‘ ठीक आहे. पण वीणा म्हटलें तर पुढचें वाक्य एकेरी होईल कीं काय अशी भीति वाटते. ’

‘ त्यांत भीति वाटण्यासारखें काय आहे ? तुमच्यासारख्या प्रथितयश लेखकानें माझी होऊन ओळख करून घ्यावी आणि मला निकट मित्र समजून एकेरी बोलावें असें झालें तर मला धन्यता वाटेल. ’

पाण्यांत टाकलेलें मीठ किंवा दुधांत टाकलेली साखर किंवा तोंडांत टाकलेला पेढा जसा विरघळावा तसा मधुकर हें वाक्य ऐकून अगदीं विरघळून गेला. त्याचें अंतःकरण आनंदाच्या समुद्रांत उचंबळूं लागलें. क्षणभर तो तल्लीन झाला. ‘ वीणा, वीणा, ’ तो म्हणाला; ‘ जें मला बोलावयाचें होतें त्याची प्रस्तावनाच तुम्हीं करून दिली हें ठीक झालें. तुमचा विनीतेचा अभिनय पाहून मी नुसता संतुष्ट झालों असें नाहीं, तर माझें अंतःकरण तुमच्या-बद्दल अगदीं– ’

चहा आला होता आणि हंसत हंसत वीणेनें विचारलें–‘ साखर एक चमचा कीं दोन चमचे ? ’

मधुकराचा दुवा तुटला आणि उच्च वातावरणांतून तो धरातलावर आला. आपणांला किती चमचे लागतात हेंही त्याच्या लक्षांत नव्हतें. तो म्हणाला, ‘ साखर तुम्ही घालाल ती मला चालेल. तुम्हीं केलेला चहा सुंदर झालाच पाहिजे. मी म्हणत होतों... ’

‘ तुम्हांला हीं बिस्किटें आवडतात का ? का दुसरी मागवूं–का पोहे किंवा तिखटामिठाचा शिरा– ’

‘ मला हीं बिस्किटेंच आवडतात; ’ असें म्हणून मधुकरानें वीणेनें दिलेला चहाचा पेला हातांत घेतला व एक बिस्किटाचा तुकडा घेऊन तो तोंडांत टाकला. पण त्याचें लक्ष चहाकडे नव्हतें. तें वीणेच्या प्रसन्न आणि सुंदर मुखाकडे होतें. त्याला कोणती उपमा द्यावी याचा तो विचार करीत होता. त्याला जुनी उपमा द्यायला नको होती. तो नव्या सांप्रदायाचा कवि होता. त्यामुळें चंद्र आणि कमल ही अगदीं शतकानुशतकें शिळी झालेली उपमा देणें त्याला पसंत नव्हतें आणि नवी उपमा त्याला आठवेना. शेवटीं त्याची खात्री झाली कीं, या मुखाला उपमा नाहींच. शिवाय ‘ जातीच्या सुंदराला कांहींही चालतें ’ त्याप्रमाणें

कोणतीहि उपमा शोभेत हेंही त्याला आठवलें. पण हें शब्दांनीं सांगण्यापूर्वी चहाचा पेला संपला, दोन बिस्किटें खलास झालीं आणि वीणा म्हणाली—

'तुम्ही आलांत फार चांगलें झालें. केलेली ओळख विसरूं नका. मी नाटकांत तोंडाला रंग फासून नाचणारी पोर—तुम्ही विद्वान्, उदयोन्मुख कवि आणि कथाकार—'

'वीणा—' मधुकर गंभीरपणें म्हणाला, 'थोडीशी भीड सोडून बोललों तर रागावूं नकोस. एकेरीवर आलों याचें कारण आपल्यांत द्वैत नसावें हीच माझी इच्छा आहे. तुझ्यावर माझें प्रेम बसलें आहे आणि तुझें सान्निध्य मिळेल तर मला सुखानें जगण्याची आशा आहे.'

निमिषभर अगदीं शांत दृष्टीनें वीणेनें त्याच्याकडे पाहिलें. तिचा हात सहज पुढें गेला व मधुकराच्या हाताला लागला. मग ती म्हणाली—'मधुकर, हें मी काय ऐकतें आहें ? हें खरें का ? मी नाटकी आहें, मी नटी आहें, माझा धंदा—माझा धंदा लोक प्रतिष्ठितपणाचा समजत नाहींत हे सर्व तुमच्या लक्षांत आहे का क्षणिक भावनेच्या भरांत बोलतां आहांत ?'

'वीणा, ही क्षणिक भावना नाहीं. मी तुझें नाटक प्रथम पाहिलें नाहीं—'

'म्हणजे माझें नाटक पाहून का—'

'नाहीं, नाहीं, केवळ नाटक पाहूनच नव्हे.'

'नाहीं तर नाटक म्हणजे नाटकच तें, खरें नव्हे. मी निरनिराळ्या पात्रांचीं कामें करतें. निरनिराळ्या रसांचा मला उठाव करावा लागतो. तेव्हां माझें नाटक पाहून म्हणजे सोंग पाहून—'

'वीणे, माझा अंत पाहूं नकोस. तूं माझी झालीस तरच मला आतां या जीवितांत राम आहे.'

'मधुकर, आपण पुनः याबद्दल बोलूं. पण मीं जें ऐकलें त्यानें मला धन्यता वाटली. तुमच्यासारख्यांचें प्रेम बसावें अशी माझी योग्यता नाहीं. पण योग्यता नसलेल्याला सुद्धां मोठ्या गोष्टीची प्राप्ति होण्याचा संभव दिसेल तर आनंद होणारच. पण मला विचार करण्याला वेळ द्या—'

'पण मला आशा आहे ना ?'

'तुम्हांला आशा ? निराश होण्याला काय कारण आहे ?'

मधुकराला समाधान झालें. धरातलावरून तो पुनः आकाशांत चढला. काय

बोलावें हें त्याला सुचेना आणि वीणेच्या मुखावर पसरलेली प्रसन्नता शब्दांना निःशब्द करण्यासारखीच होती.

* * *

निर्मलेला मधुकराच्या वागण्याचें फार आश्चर्य वाटलें आणि त्याच्यांत हा इतका फेरफार कसा झाला याचा ती विचार करूं लागली. पण विचार करून पत्ता लागण्यासारखी ती गोष्ट नव्हती. त्याचें लक्ष आपल्यावरून उडालें होतें हें तिला स्पष्टच दिसत होतें आणि तिचें त्याच्यावरचें प्रेम त्यामुळेंसुद्धां रतिमात्रही कमी झालेलें नव्हतें. तिनें पुष्कळ प्रयत्न केला, जरा आडूनआडून प्रश्न विचारून अंतःकरणांत काय चलबिचल झाली हें अजमावून पाहिलें; पण थांग लागेना. तेव्हां एक दिवस तिनें प्रत्यक्ष हल्ला चढविला. माझ्यासंबंधीं तुम्ही अलिकडे बेफिकिरी दाखवतां, असें तिनें त्यास स्पष्ट सांगितलें आणि विवाहाबद्दल आपण वचनबद्ध झालों आहोंत याचीही त्याला आठवण करून दिली. तो प्रथम उडवा-उडवी करूं लागला; पण तिच्या प्रश्नांच्या सरबत्तीपुढें त्याचा निभाव लागेना. आणि निर्मला म्हणजे कांहीं अशी तशी हुषार मुलगी नव्हती. बुद्धिमत्ता आणि रूप या दोहोंचा तिच्या ठिकाणीं मोठा संयोग झालेला होता. तिच्या परीक्षांतील यश हेंच तिच्या बुद्धिमत्तेचें किंवा ग्रहणशक्तीचें निदर्शक होतें असें नाहीं. तिचें वाचन चांगलें होतें आणि विचार करण्याची कलाही तिनें हस्तगत केली होती. मध्यम वर्गांतील सुशिक्षित मुलांमुलींनीं हुंड्यापांड्याच्या भरीं‌त पडून कसलीं तरी लग्नें लावण्याच्या प्रकाराला साहाय्य न करतां ‘ परस्परेण स्पृहणीयशोभं ’ असे संबंध घडवून आणावेत व एकमेकांच्या साहाय्यानें संसार करून आपलें जीवित अधिक सुखमय आणि उज्ज्वल करावें असें तिच्या वडिलांचें मत होतें. तेव्हां तिचें आणि मधुकराचें जमलें असें कळल्यावर त्यांनीं तिचें अभिनंदन केलें. मधुकर तिला सर्व प्रकारें योग्य वर होता यांत शंका नाहीं आणि मधुकरालाही तिचें फार कौतुक वाटत होतें. आणि आतां तो शिकण्याच्या दगदगींतून मुक्त होऊन लेखक म्हणून थोडासा पुढेंही आला होता व साधारण-पणें प्राप्ति असणारा प्रतिष्ठितपणाचा असा लेखनक्षेत्रांतील एक उद्योगही त्याला मिळाला होता आणि त्याचा निर्मलेशीं विवाह लौकरच होण्याचें घाटत होतें. अशा वेळीं मध्यंतरीं मधुर वीणानाद श्रवण करून प्रथम त्याचे कान आणि नंतर हृदय मुग्ध झालें आणि अशा प्रकारें निर्मलेच्या मनोराज्यमय–सफल

होण्याच्या मार्गांत असलेल्या मनोराज्यमय–आकाशांत ढग उत्पन्न झाला. तो प्रथम तिला लहानसा वाटला, पण तो तसा नाहीं हें तिच्या लक्षांत येण्यास फार वेळ लागला नाहीं. हा ढग लवकरच वाढत जाऊन सर्व आकाशभर काळोख होणार आणि त्यामुळें होणाऱ्या वादळांत आपण सांपडणार असें तिला वाटूं लागलें. पण ती धीराची मुलगी होती. तिला अगदीं सुचेनासें झालें. तेव्हां मधुकराशीं अधिक निकरानें न बोलतां त्यानें कांहीं तरी स्पष्ट उत्तर देण्यापूर्वी तिनें तो विषय बदलला व तो बदलल्यामुळें त्यालाही बरें वाटल्यासारखें दिसलें आणि बाह्यात्कारीं पूर्वीचीच स्थिति कायम राहिली.

आणि योगायोग असा आला कीं, तिची व वीणेची एक दिवस गांठ पडली. हायस्कुलांत ती व वीणा कांहीं दिवस एका वर्गांत होत्या. वीणेचें शिक्षण मध्येंच थांबलें आणि निर्मला हायस्कुलांतून कॉलेजांत गेली; पण त्यांची जी ओळख होती ती कायम राहिली. त्यांची गांठ फार वेळां पडत होती असें नाहीं, पण केव्हां तरी पडे. निर्मलेला वीणेबद्दल एक प्रकारचें कुतूहल होतें आणि वीणेला तिच्याबद्दल आदर होता. त्यामुळें ज्या ज्या वेळीं त्या भेटत त्या त्या वेळीं त्यांच्या स्नेहांत भर पडे. पुढें वीणा बोलून चालून नाटकांत शिरली आणि तिच्याबद्दल निरनिराळे लोक निरनिराळ्या गोष्टी बोलूं लागले. तरी पण त्यामुळें वीणा व निर्मला यांच्यांत जो स्नेहाचा धागा उत्पन्न झाला होता, त्याला धक्का बसला नाहीं व केव्हां केव्हां त्यांची गांठ पूर्वीप्रमाणेंच पडत असे. आज जी पडली ती बरेच दिवसांनीं पडली होती. पण पांचदहा मिनिटें झाल्यावर निर्मला नेहमींसारखी व फारसें बोलत नाहीं हें वीणेच्या ताबडतोब लक्षांत आलें. वयाच्या मानानें वीणेला व्यवहाराचें ज्ञान पुष्कळ होतें आणि त्याच्या अनुरोधानें निर्मलेच्या मनांत काय खळबळ चालली असावी याबद्दल तिनें कल्पना केली आणि थोडेसें कुतूहल दृष्टीनें, थोडेसें मित्रभावानें ती हळू हळू तिच्या अंतःकरणांत शिरली. ज्या ठिकाणीं त्यांची गांठ पडली तेथेंच कोणी निर्मलेच्या मधुकररावाबरोबर ठरलेल्या विवाहाची गोष्ट काढली. ती ऐकून वीणेला प्रथम चमत्कारिक वाटलें. कोणाचेंही लग्न ठरल्याचें ऐकलें कीं, तिला थोडेसें चमत्कारिक वाटत असे. पण पुढें ती मनःस्थिति लौकरच नाहींशी होत असे. निर्मलेशीं बोलतां बोलतां तिनेंही तिच्या लग्नाची गोष्ट काढली व तें ठरल्याबद्दल तिचें अभिनंदन केलें आणि तिच्या भावी वराबद्दल विचारलें.

वास्तविक अशा प्रश्नाचें उत्तर उल्हासपूर्ण द्यावयाचें, पण निर्मलेची मुद्रा खिन्न दिसली व कांहीं तरी उत्तर दिल्याशिवाय सुटका नाहीं म्हणून ती म्हणाली, ' कांहीं नक्की ठरलें आहे असें नाहीं. ' पण बोलतां बोलतां तिचे डोळे पाण्यानें भरून आले व आपण कांहींतरी अनुचित प्रश्न विचारला असेंसुद्धां वीणेला वाटलें. पण तिची कुतूहलबुद्धि औचित्यबुद्धीला मागें सारून पुढें सरसावली आणि ती म्हणाली—' गडे निर्मल, मी विचारतें म्हणून रागावूं नकोस. पण तुझा चेहरा असा खिन्न कां ? दुसरीं माणसें तर तुझ्या लग्नाबद्दल बोलताहेत आणि तुमचा जोडा मोठा चांगला जमला आहे म्हणतात. आणि मला तर त्यांचें नांवसुद्धां कळलेलें नाहीं. तुला विचारलें तर तुझे डोळे हे पाण्यानें भरलेले—'

निर्मला यावर कांहीं बोलली नाहीं, पण तिच्या डोळयांत उभ्या राहिलेल्या अश्रूंचे दोन बिंदू तिच्या गालावर पडले. तेव्हां वीणेनें त्या वेळीं तो विषय बदलला. पण पुढें तिची अधिक वेळ गांठ घेऊन हा काय प्रकार आहे याचा तपास लावण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें योग जमून आला व पुनः भेट झाली तेव्हां निर्मलेनें आपलें हृदय उघडें केलें.

आणि मधुकराचें नांव जेव्हां वीणेनें ऐकलें, तेव्हां तिच्या डोळ्यांत चक्क उजेड पडला. आणि काय असेल तें असो, तिचें अंतःकरण त्या वेळीं निर्मले-बद्दल प्रेमानें उचंबळून आलें. कांहीं झालें तरी निर्मलेला दुःख होईल असें निदान आपल्याकडून शक्य तितकें होऊं द्यावयाचें नाहीं असा तिनें निश्चय केला आणि ती आपल्या मैत्रिणीला म्हणाली— खरोखर त्या अल्प कालांत त्यांच्या परिचयाचें रूपांतर मैत्रींत झालें होतें. ' निर्मल, मधुकरासारख्या उत्तम गृहस्थाबद्दल तूं असा संशय घेऊं नयेस. '

' संशयाचा आतां प्रश्नच उरला नाहीं. '

' म्हणजे ? '

' म्हणजे काय ? त्यांनींच मला प्रत्यक्ष सांगितलें कीं, आपण वचनबद्ध झालों आहोंत; पण आपल्या मनःस्थितींत आतां बदल झाला आहे. तेव्हां संशयाला आतां जागाच उरलेली नाहीं. '

' अग, तुझें मन पाहण्यासाठीं ही त्यांनीं तुझी चेष्टा केली असेल. '

' ही असली प्राण घेणारी थट्टा कसली ? आणि अशी थट्टा करण्याचा त्यांचा

स्वभावही नाहीं. त्यांच्या दृष्टीवर दुसऱ्या कोणाची तरी भुरळ पडली आणि माझें दैव फिरलें दुसरें काय ?'

'वेडे,' वीणा म्हणाली, 'अशा शहाण्या आणि विद्वान् पुरुषाच्या दृष्टीवर भुरळ सहजासहजीं पडणें शक्य नाहीं. तूं उगीच जिवाचें रान करून घेत आहेस. सगळें कांहीं ठीक जुळून आल्याशिवाय राहणार नाहीं.'

निर्मलेनें कांहीं उत्तर दिलें नाहीं; पण तिच्या मुखावरची खिन्नता अधिकच वाढली. वीणेनें कांहीं वेळ विषय बदलला; पण पुनः ती मूळ पदावर येऊन म्हणाली-'निर्मल, या बाबतींत पुष्कळ वेळां चुका होण्याचा संभव असतो. तूं घाई मात्र करूं नकोस, म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल.'

'मी घाई करणार नाहीं.' निर्मला म्हणाली, 'पण माझ्या सुखांत विष कालविणारी ही कोण व्यक्ति उत्पन्न झाली आहे हें जर मला कळलें—'

'तर काय करशील ?'

'दुसरें कांहीं नाहीं. तिच्याकडे जाईन आणि आपलें मायाजाळ परत घेण्याची तिला विनंति करीन.'

'पण मायाजाळांत पडणाऱ्यांकडे कांहींच दोष नाहीं का येत ?' वीणेनें विचारलें.

'मला त्याचा विचार करण्याला सुचतच नाहीं.'

'आणि तूं त्याचा विचार करूंही नको. आणि निर्मल, मी तुला सांगतें, मधुकराची बेफिकिरी लौकरच नाहींशी होईल. तूं माझ्यावर विश्वास ठेव. माझी खात्री आहे, हा आलेला ढग लौकरच वितळून जाईल.'

'तुझ्या तोंडांत साखर पडो.' असें म्हणून विमनस्कपणानें निर्मलेनें वीणेचा निरोप घेतला.

*　　*　　*　　*

आज मधुकर फारच खुषींत होता. सुनीता म्हणजे वीणा आतां आपली होणार अशीं सुखस्वप्नें त्याला पडूं लागलीं होतीं आणि वीणाही इतकी गोड बोलत होती कीं, तो आतां स्वर्ग दोन बोटें उरला अशा समजुतींत तरंगत होता. वीणा त्याला लडिवाळपणानें म्हणाली, 'मधुकर, आज रात्रीं माझं नाटक पहायला या हं !'

'आज रात्रीं तुझें नाटक! ज्या नाटक मंडळींत तूं सुनीतीचें काम करतेस तेथें तर आज काहीं नाहीं आणि आज कुठलें नाटक काढलेंस तूं?'

'ती सह्याद्रि प्रासादिक संमिश्र संगीत मंडळी आहे, तिचें 'सावकार' म्हणून नाटक आहे. त्यांत मी रंगी नायकिणीचें काम करणार आहें.'

'काय? त्या तमासगीर नाटक मंडळींत तूं काम करणार! आणि सावकार नाटकांत! आणि रंगी नायकिणीचें! सावकार नाटक म्हणजे तमाशा आहे!'

'आणि रंगी नायकीण म्हणजे नायकीण आहे!' वीणा हंसत हंसत म्हणाली.

'वीणा! वीणा! तुझी योग्यता एवढी मोठी आहे कीं असल्या घाणेरड्या नाटकांत तूं दृष्टीसदेखील पडतां उपयोगी नाहीं. सुनीतीचें पात्र जिनें निर्माण केलें, तिनें रंगी नायकिणीचें काम करावयाचें? नायकिणीचें सोंग सुनीतेनें घ्यावयाचें?'

'वेड्या मधुकरा! सुनीता हें सोंगच ना?'

'सुनीता हें सोंग नाहीं. सुनीता हें दृश्य काव्य आहे.'

'पण सुनीतेचें काम करून मला जितके पैसे मिळाले त्याच्या चौपट पैसे रंगी नायकिणीचें काम करून मला मिळणार आहेत.'

'वीणा! काय बोलतेस तूं हें? पैशासाठीं कां तूं काम करतेस?'

'म्हणजे! हा माझा धंदा आहे. मी नाटकांत एकच काम करतें का? तुकारामाचें काम करणारा नट म्हणजे तुकाराम नव्हे; रुक्मिणीचें काम करणारा नट म्हणजे श्रीकृष्णाची पट्टपत्नी नव्हे. नाटक हा धंदा आहे, मधुकर, सोंगाच्या बतावणीचा धंदा आहे. मीं सुनीतेचें काम केलें म्हणून मी सुनीता होत नाहीं. सुनीता ही आपल्या पित्याची—एका थोर कवीची कन्या आहे. मी पगार घेऊन काम करणारी, तोंडाला रंग फासून नटणारी नटी आहे—'

'वीणे—बोलूं नकोस असें. तूं कोणीही अस, पण तूं उत्तम आहेस. तूं सौंदर्याची खाण आहेस तशी सद्‌गुणांची पुतळी आहेस. सुनीतेचें सोंग आणणेंसुद्धां जातिवंत स्त्रीशिवाय कोणालाही शक्य नाहीं. रंगी नायकिणीचें काम तुझ्या हातून वठणें शक्यच नाहीं. त्या कामासाठीं तूं नाहींस. तुला सुनीतेसारखेंच काम पाहिजे. आणि मी एक नाटक लिहिण्यास घेतलें आहे, त्यांत तुला पुढें ठेवूनच नायिकेची योजना करणार आहें. तूं भलताच नाद सोडून दे; आणि तूं माझी होणार आहेस. मी तुला हें काम करण्याची मनाई करतों.'

'पण मधुकर, माझ्या कलावंत जीवनाला अडथळा आणणार नाहीं असें तुम्हीं कबूल केलें आहे. केलं आहे ना कबूल ? खरंच सांगा ?'

'वीणे, रंगी नायकिणीचें काम ही कला नव्हे. कलेची पायमल्ली आहे !'

'मृच्छकटिकांत वसंतसेनेचें काम केलें तर तुमची हरकत नाहीं ना ?'

मधुकर जरा घोंटाळला. 'वसंतसेना निराळी होती.' तो हळूहळू बोलला.

'ही कला आहे. त्यांत तुम्हांला समजत नाहीं. कलावंताला निरनिराळ्या भूमिका कराव्या लागतात.'

'पण तुला दुर्गुणाची भूमिका करतां येणें शक्यच नाहीं. तुझ्या डोळ्यांत आकर्षकता आहे, पण त्यांत वेश्येची भूल येणें शक्य नाहीं. तुझ्या हावभावांत सौंदर्य आहे पण छचोरपणा येणें शक्य नाहीं—'

'मधुकर, आज रात्रीं नाटकाला या. तुमच्यासाठीं जागा ठेवण्यास मीं सांगितलें आहे. आणि हें पहा, नाटक संपतांच किंवा अंक संपल्यावरसुद्धां मला जरूर भेटा. कॉफी पिण्यासाठीं मी तुमची वाट पहात बसलेली आहें हें विसरूं नका.'

त्या रात्रीं नाटकाला किती तरी गर्दी ! मधुकराची खास व्यवस्था होती ही गोष्ट निराळी; नाहीं तर रात्रीं तिकिटसुद्धां मिळण्याची मारामार होती. असल्या गचाळ नाटकांत काम करून वीणा आपली अब्रू गमावते आहे असें मधुकराला वाटत होतें; पण त्याची तिच्यावर तशी सत्ता नव्हती. पुन्हां ती शेंकड्यांनीं नव्हे तर हजारांनीं पैसा मिळविणारी; तिच्या लहरीला आलें तें तिनें केलें. पण अशी ही लहर बरी नव्हे असें मधुकराला वाटलें. पहिला अंक पाहून तो चीत झाला. वेश्येचें काम वीणेनें इतकें बेमालूम केलें—तिच्या हावभावांत निर्लज्ज नखरा एवढा भरला होता कीं, समोर वीणा नव्हे—सुनीतेचे काम केलेली वीणा नव्हे तर दुर्गुणाची कोणी तरी पुतळी आहे असें त्यास वाटलें आणि तो अंतःकरणांत चरकला. दुसऱ्या अंकांत तर तिनें कहर केला. तिच्या नेत्रकटाक्षांतून उत्तान कामुकतेच्या ठिणग्या पडत होत्या. तिच्या अंगविक्षेपांत सभ्यपणा कोठेंच नव्हता. आणि दारूचे पेले झोंकून ती जी चाळे करूं लागली, तेव्हां तर मधुकरानें डोळेच झांकले—

आपली वीणा आणि तिच्या मुखावर या हिडिस वासना दिसतील—हे अश्लील आविर्भाव तिला करतां येतील, हें त्याला खरें देखील वाटेना. पण

तेथें त्याच्या वाटण्याचा प्रश्न नव्हता. त्याच्या प्रत्यक्ष डोळ्यांपुढें तें सर्व दिसत होतें. तिची मुद्रा इतकी छचोर-इतकी भेसुर-इतकी उत्तान दिसत होती कीं, त्यानें तिच्या सद्गुणाबद्दल बांधलेली इमारत ढासळली. सोंग पाहून त्याच्या डोळ्यांवर झापड पडली. सोंग पाहूनच दुसरी झांपड पडली. एक दुसरीच्या दुप्पट–पण दोन्ही वेळां झांपडच !

कबूल केल्याप्रमाणें तो तिला आंत जाऊन भेटला. तिनें दिलेली कॉफी त्यानें हातांत घेतली पण तो शून्य दृष्टीनें वर पहात होता. वीणा म्हणाली,–

'माझें काम कसें काय झालें ?'

मधुकरानें सुसस्कारा टाकला. तो म्हणाला,

'काय हें काम ! काय हें नाटक ! निव्वळ तमाशा ! हें बरें दिसत नाहीं !'

'हें सगळें सोंग आहे. माझें खरें स्वरूप निराळें आहे. तें तुम्हांला समजणार नाहीं. मग आतां पुढें-आपण-'

'मी आतां जातों,' मधुकर म्हणाला; 'मला पुढचें नाटक पहाण्याची इच्छा नाहीं. असलीं नाटकें मी पहात नाहीं. असल्या नाटकांत काम करणारीं माणसें - जाऊं द्या !'

'जाऊं द्या !' वीणा म्हणाली. 'पण ओळख विसरूं नका हं ! आणि नाटक लिहाल तेव्हां मला द्यायला विसरूं नका.'

'माझें नाटक या कंपनीसाठीं नाहीं.' असें म्हणून मधुकर निघाला. त्याला निर्मलेची आठवण झाली. कुठें निर्मला आणि कुठें वीणा ! तो नाटकगृहापासून झपाट्यानें चालता झाला.

वीणेनें एकदां आरशांत पाहिलें. तिच्या मुखावर खिन्नता होती. 'निर्मल, तूं तरी सुखी हो !' असें म्हणून तिनें रुमाल डोळ्याला लावला आणि पुढच्या तयारीला ती लागली.

किर्लोस्कर, (मासिक) जानेवारी १९३५.

---

# आजार गेला, पण—

सर्वांनाच चमत्कार वाटला. सरोज खरोखर बरी झाली होती. तिचें दुखणें फार लांबलें. दिवसांचे महिने झाले आणि महिन्यांचीं वर्षें झालीं. दोन वर्षें सरोजिनी अंथरुणाला खिळली होती. प्रथम प्रथम दुखण्याचें मागेंपुढें असें चाललें होतें; पण शेवटचे सहा महिने फारच खडतर गेले. आणि तिची आशा सर्वांनीं सोडली होती. डॉक्टरलासुद्धां विचारलें म्हणजे ते चमत्कारिक चेहरा करीत आणि म्हणत—'खटपटींत कांहीं कमी नाहीं; उपाय करण्यापलीकडे आपल्या हातांत काय आहे?' आणि उपायांची अगदीं परमावधि चालली होती. मधुकरानें खर्चाचा हिशेबच ठेविला नव्हता. किती तरी डॉक्टर येऊन पाहून जात व जाण्यापूर्वीं त्यांच्या खिशांत फीच्या मोठाल्या रकमा पडत. कोणी कांहीं करा म्हणून सांगण्याचाच अवकाश, कीं मधुकरानें वेळ न लावतां तें केलेंच. त्यांतल्या त्यांत या शेवटच्या सहा महिन्यांत सरूची मैत्रीण तरला तिच्या शुश्रूषेसाठीं मुद्दाम तिच्याकडे येऊन राहिली होती. तिला परिचारिकेचें शास्त्र व कला हीं उत्तम अवगत होतीं. तिनेंहि अगदीं जिवापाड मेहनत घेतली. पण एक दिवस वेळ अशी आली कीं, डॉक्टराच्याहि तोंडचें पाणी पळालें. घटका दोन घटकांचा प्रश्न नसला तरी दिवसगतीवर येऊन ठेपलें. चारआठ दिवसांपलीकडे निभाव लागणें कठीण असें तो तरलेजवळ म्हणाला आणि तरलेनें मधुकराला सांगितलें. मधुकराच्या मुखावर काय विकार दिसले हें तरलेलाहि सांगतां आलें नसतें. कारण तिचे डोळे पाण्यानें भरले होते. मृत्यूचा विचार कोणालाहि सद्गदित करतो; मग सरोजिनी आणि तरला तर जिवाभावाच्या मैत्रिणी. पाठच्या बहिणीचें एकमेकींवर नसेल असें प्रेम त्यांच्यांत होतें. सरूच्या लग्नानंतर तिचें जास्तींत जास्त कौतुक कोणीं केलें असेल तर तें तरलेनें. तिच्या तरलेवरील प्रेमामुळें मधुकराशीं तिचें अगदीं बहिणीसारखें नातें झालें होतें. तिच्या अंतःकरणांत डॉक्टरनें सांगितलेला निर्णय ऐकून काहूर उसळलें असलें तर त्यांत नवल नाहीं. आणि मधुकराचें तर जीवनसर्वस्वच नाहींसें होणार होतें! त्याचें सरोजिनीवरील प्रेम सर्वांना माहीत होतें. तो अगदीं चरकला असला तर त्यांतहि नवल नाहीं.

मधुकर आणि सरोजिनी यांचें प्रेम तीं कॉलेजमध्यें असतांनाच जडलें

आणि दोघांनींहि कवितेच्या रूपानें तें प्रकट केलें होतें. त्यांचें लग्न प्रेमविवाह म्हणून सर्वत्र गाजलें आणि त्यांच्या स्नेह्यांनाच नव्हे, तर आप्तस्वकीयांनाहि कौतुकाचा विषय होऊन बसलें. आणि लग्न झाल्यावर त्यांच्या संसाराचें मधुर स्वरूप पाहून प्रेमविवाहाची चेष्टा करणाऱ्या निंदकांचींसुद्धां तोंडें बंद झालीं. सरोजिनी आजारी झाली त्या वेळीं प्रथम जरी मधुकर गडबडला नाहीं, तरी जसजसा तो आजार साधा नाहीं हें स्पष्ट दिसूं लागलें तसतसा तो भीति आणि व्याकुळता यांनीं व्यग्र होऊन गेला. आणि दिवसांमागून दिवस चालले तरी सरोज बरी होण्याचें लक्षण दिसेना, तेव्हां तर कसल्या मानसिक यातना त्यानें भोगल्या तें त्याचें त्यालाच माहीत. सकाळीं जेवण करून हपिसांत जातांना बायकोकडे जाऊन त्यानें बळेंच हंसावें आणि म्हणावें, ‘ मी अगदीं साडेपांच वाजतां येणार हं आज. त्या वेळपर्यंत तूं जर अगदीं बरी झालीस तर आपण एकदोन दिवसांत सिनेमासुद्धां पहायला जाऊं. ’ पण सरोजचा कृश व फिका चेहरा पाहून त्याला मनांत वाटे, ‘ मी येईपर्यंत तरी ही सुखरूप असेल ना ! ’ आणि हपिसांतून परत येऊन घरांत शिरतांनाहि त्याचें मन भयानें ग्रासलेलें असे. आणि कांहीं जास्त कमी तर झालें नाहीं ना असें त्याला वाटे व तो प्रत्येकाच्या तोंडाकडे निरखून पहात पहात मग पत्नीच्या तब्येतीची चौकशी करी. अशा प्रकारें सर्वांची आशा सुटली होती. सरोजिनीदेखील फारशी बोलत नसे. तिच्या खेळकर वृत्तीला त्या आजारानें अगदीं खग्रास ग्रहण लावलें होतें. पण ती रागावतहि नसे. होतां होईलतों ती बोलतच नसे. मधुकर किंवा तरला हीं जवळ असतांना त्यांच्या प्रश्नाला उत्तर म्हणून काय शब्द बोलेल तेवढाच. अशा प्रकारें दिवस चालले होते आणि आशेला जागा म्हणून उरली नव्हती. आणि अशा आजारांतून ती बरी झाली. तिचें दुखणें साफ गेलें असें एका नव्हे तर चार डॉक्टरांनीं विचारपूर्वक चर्चा करून सांगितलें. तिचे खोल गेलेले डोळे सतेज होऊं लागले. तिच्या फिकट गालांवर रंग खुलणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं आणि अशा परिस्थितींत तिचें दुखणें उलटलें असें ऐकतांच सर्वांनाच चमत्कार वाटला.

सरोजिनी साफ बरी झाल्यावर तिला कसलेंहि भय नाहीं, असें चार नामांकित डॉक्टरांनीं एकमतानें सांगितल्यानंतर ती पुन्हा आजारी पडली याचाच सर्वांना चमत्कार वाटला; पण आजाराचें पर्यवसान इतक्या थोड्या दिवसांत मृत्यूंत

झालें हें जेव्हां कळलें, तेव्हां तर जो तो जागच्या जागींच थक्क होऊन राहिला! सरोजनें एवढ्या मोठ्या दुखण्याशीं टक्कर दिली. मृत्यूच्या दाढेंतून ती परत आली. डॉक्टरांचें चातुर्य, तिच्या नवऱ्याची खटपट, शेवटच्या सहा महिन्यांत तिच्या मैत्रिणीची शुश्रूषा या सर्वांमुळें ती बरी होणें शक्य झालें हें जरी खरें असलें तरी तिची ताकद, तिची जगण्याची इच्छा ही चांगली कणखर असली पाहिजे, हेंहि कबूल केलें पाहिजे. आणि तिला जगावेसें वाटलें नसतें तरच आश्चर्य! वयाची पंचविशी उलटली होती नव्हती एवढें वय; मधुकरासारखा बरोबरचा, हौशी, प्रेमळ पति; संसारांत सर्व गोष्टींची अनुकूलता; इतक्या गोष्टी असल्यावर कोणाला जगावेसें वाटणार नाहीं? तिला मूल झालें नव्हतें. पण तिचें वय लहान होतें आणि लग्न होऊन अवघीं चार वर्षें झालेलीं. त्यांत पहिलीं दोन कसल्या आनंदांत गेलेलीं आणि मग हें दुखणें आलें. मूल होण्याला पुष्कळ वेळ होता आणि त्यासंबंधीं तिला काळजी वाटण्याचें कारण नव्हतें. ती दुखण्यांतून बरी झाली तेव्हां एक डॉक्टर तर म्हणाले, 'एखादें बाळंतपण झालें असतें तर या दुखण्यांत निभाव लागणें कठीण होतें.' तेव्हां मुलाच्या संबंधानें तिच्या मनावर परिणाम व्हावा अशी स्थिति मुळींच नव्हती आणि असें असून एवढ्या मोठ्या दुखण्यांतून उठून सरोज पुन्हा आजारी पडली हें ऐकून प्रत्येकाला मोठें गूढ वाटलें. आणि आजार एकदम वाढून तिचा अंत झाला हें समजल्यावर प्रत्येकाला दुःख तर झालेंच; पण प्रत्येकाला अतिशय चमत्कारहि वाटला. असें झालें कसें, असें जो तो विचारूं लागला. मृत्यु कां आला हें विचारण्यांत खरोखर कांहीं तात्पर्य नाहीं; पण आलेला मृत्यु परत गेला आणि ही न होणारी गोष्ट होऊन गेल्यावर तो पुनः कसा आला आणि सरोज तारुण्याच्या भरांत आपल्या पतीला टाकून आणि सगळा भरला संसार मागें ठेवून कशी निघून गेली या दुःखदायक प्रश्नाला उत्तर मिळेना.

[ २ ]

सरोजिनीच्या दुखण्याला सुरवात होऊन एक वर्ष होऊन गेलें होतें. तिच्या खोलींत बराच वेळ बसून मधुकर नुकताच पाठीमागच्या आपल्या खाजगी खोलींत येऊन आरामखुर्चीवर बसला. सिग्रेट काढून त्यानें तोंडांत धरली व हातांत काडी धरून तो दुसऱ्या हातांतील पेटीवर ओढणार होता. आतांशा सिग्रेट हा त्याचा विश्रांतीचा विषय झाला होता आणि बायकोचा आजार

जसजसा लांबत चालला, तसतशी रोज ओढावयाच्या सिग्रेटांची संख्या वाढत चालली. आज त्याचें मन फार अस्वस्थ झालें होतें. सरोजवर दुखण्याचा परिणाम व्हावयास लागला हें त्याच्या स्पष्टपणें ध्यानांत आलें. तिच्या शरीराची कांति फिकट झाली. तिच्या चर्येवरील आकर्षकपणा मंदावला. तिच्या ओठांची लाली नाहींशी होऊन तिकडे पाहतांना आनंद होणें अशक्य झालें. आणि या तिच्या खालावलेल्या स्थितीचा विचार करतां करतां तिची सुदृढ मूर्ति त्याच्या मनश्चक्षूंपुढें उभी राहिली. मधुकराचें तिच्यावर जें प्रथम प्रेम बसलें तें तिच्या सौंदर्यामुळें ही गोष्ट खोटी नव्हती; आणि या गोष्टींत जसा दुसऱ्या कोणाला नाहीं तसा त्यालाहि कमीपणा नव्हता; निदान त्यांत अनैसर्गिक असें कांहींहि नव्हतें. विद्यालयीन जीवनाच्या त्या मधुर काळांत सरोजिनीचा परिचय ही अत्यंत मधुर गोष्ट मधुकराला लाभली आणि पुढें त्या परिचयाचें रूपांतर प्रेमांत होऊन दोघांचा यथाविधि विवाहहि झाला. वास्तविक मधुकराच्या बाजूनें परिचयाचें रूपांतर प्रेमांत झालें असें म्हणण्यापेक्षां त्याची पहिली दृष्टि सरोजवर पडली तेव्हांच तो तिच्याबद्दल अत्यंत आतुर झाला असेंच सांगणें रास्त होईल. तिच्या निष्कलंक सौंदर्याला सुंदर हृदयाची जोड होती हें त्याला मागाहून कळलें; पण त्या हृदयाची विचारपूस करण्यापूर्वीच तो तिच्या सौंदर्यावर इतका लुब्ध झाला होता कीं, तिची प्राप्ति हें आपल्या जीवनाचें पहिलें ध्येय हें त्यानें ताबडतोब ठरविलें. तो उल्लू नव्हता, शहाणा होता, विचारी होता. केवळ सरोजिनीच नव्हे तर तिच्या घरचीहि मंडळी प्रसन्न राहतील अशाच प्रकारें तो वागला. विवाहाच्या पूर्वी एकत्र येण्याचा प्रसंग आला म्हणजे तिचा हात आपल्या हातांत घ्यावा असें त्याला वरचेवर वाटे; तिच्या रसरशींत ओंठाकडे पाहतां पाहतां देहभान नाहींसें होण्याइतका तो बेहोष होत नव्हता असेंहि नाहीं; पण तो शहाणा असल्यामुळें त्याच्या हातून अतिप्रसंग कधींहि घडला नाहीं. आणि त्याच्या आत्मसंयमनाबद्दल सरोजलाच नव्हे, तर तिच्या निकट आप्तांनाहि कौतुक वाटूं लागलें आणि त्यांचें लग्न ठरणें अधिक सोपें झालें. आज मधुकराला तिची त्या काळची मूर्ति आठवली आणि त्याच्या अंतःकरणांत चर्र झालें. आपल्या लाडक्या सरोजची ही काय अवस्था झाली, हा विचार मनांत येऊन त्याला तीव्र वेदना झाल्या आणि आपल्याला अत्यंत आवडतें असें कांहींतरी दूरदूर चाललें आहे, नाहींसें होत आहे आणि त्याच्याशिवाय आपलें जीवन व्यर्थ आहे, असें

त्याला वाटूं लागलें. सरोजचा वियोग ही कल्पना त्याला अत्यंत दुःसह वाटली. लग्नानंतर दोन वर्षें काय आनंदांत गेलीं—मधुकराला चांगलीशी नोकरी मिळाली आणि त्याच्या घरांत त्याच्याखेरीज कोणीहि नव्हतें, त्यामुळें राजाराणीचें अप्रतिहत राज्य होतें. त्यांचें हंसणें आणि खिदळणें, त्यांचें परस्पराबद्दलचें प्रेम, परस्पराबद्दलचें कौतुक हीं समजण्याचा ज्या थोड्या व्यक्तींना प्रसंग आला त्यांना 'रत्नं समागच्छतु कांचनेन' या कालिदासोक्तीचें स्मरण झाल्याशिवाय राहिलें नाहीं. ती आपली सरोज–तो कटु विचार मनांत येऊन मधुकराचे डोळे पाण्यानें भरले आणि गळा दाटून येऊन आलेला हुंदका स्वतःपासून लपविण्यासाठीं कीं काय त्यानें मान खालीं घातली.

तो सरोजजवळ जाऊन बसे व तिला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करी. पण त्याच्या अंतःकरणांतलें औदासिन्य अधिकाधिक वाढत चाललें. घरांत महत्त्वाचें माणूस आजारी झालें, कीं सगळ्या घराला दुखणें लागल्यासारखी स्थिति होते. मधुकर जात्या आनंदी होता, हौशी होता, रंगेल वृत्तीचा होता. त्या उदास वातावरणांत त्याच्या मनाला अधिकाधिक वेदना होऊं लागल्या. पण आलेल्या प्रसंगाला तोंड द्यावें लागतें. पत्नीजवळ जाऊन बसावें, तुझें दुखणें खरोखर हलकें आहे, तूं आतां लौकर बरी होशील, असें तिला सांगावें. कधीं कधीं तिला वाचून दाखवावें, केव्हां केव्हां ग्रामोफोनच्या नव्या प्लेटी आणून लावाव्या, कधीं तिच्या परिचयाचीं माणसें आणून तिला भेटवावींत, असें त्यानें चालविलें होतें. सरोजला प्रथम प्रथम आपलें दुखणें लौकर संपेल असें वाटत होतें, पण एक वर्ष झालें तरी जेव्हां तें हटलें नाहीं, तेव्हां तिच्या हृदयांत शंका उद्भवली. पण नवरा जवळ असतांना ती आपलें स्वतःचें औदासिन्य दाखवीत नसे. एक वेळ तिच्या हास्यानें माणसें वेडीं होत. ती शक्ति आतां त्या हास्यांत उरली नव्हती. निरभ्र आकाशांत नुकत्याच उदय पावलेल्या सूर्याचे किरण आणि ढगांनीं भरलेल्या आकाशांत अस्ताला चाललेल्या सूर्याचे किरण, यांत जें अंतर असतें तें तिच्या पूर्वीच्या आणि आतांच्या हास्यांत होतें. त्या वेळीं तिच्या हाताचा स्पर्श झाला म्हणजे मधुकराला विजेचा झटका बसून अंगांत नवचैतन्याचा संचार झाल्यासारखें वाटे. आतां जवळ बसलेल्या पतीच्या हातांत सरोज जेव्हां हात घाली, तेव्हां तिच्या हाताला आलेली दुर्बलता पाहून मधुकराचें अंतःकरण विदीर्ण होई. ती

त्याला म्हणे, ‘ आपण सुरवातीला फार फार हंसलों; पण हें दुखणें जाईल आणि पुनः मी पहिल्यासारखी होईन. ’ आणि मधुकर म्हणे, ‘ तूं लौकर बरी होणार यांत शंकाच नाहीं. ’ आणि तिचा तो आतां दुर्बल झालेला हात आपल्या हातांत कितीतरी वेळ घट्ट धरून तो तिच्या निस्तेज मुखाकडे वेड्यासारखा पहात राही. पण दोघेंहि मनांत म्हणत, ‘ ही सगळी सोंगाची बतावणी आहे. हें दुखणें कठीण आहे. यांतून सुटका होणें म्हणजे चमत्कारच घडला पाहिजे. ’ सरोजला वाटे, ‘ माझा संसार संपणार. माझ्या मधूला मी अंतरणार. ’ मधुकराला वाटे, ‘ माझी लाडकी सरोज मला सोडून जाणार. माझें जीवन व्यर्थ होणार ! ’ आणि अशा प्रकारें त्याचें बोलणें थांबे व मग मधुकर उठून बाहेर येई.

याप्रमाणें आणखी कित्येक महिने लोटले. एक दिवस तरला सरोजला भेटण्यास आली. तरला परगांवीं होती. तिचा व सरोजचा पत्रव्यवहार होई. तिला नोकरी होती. त्यामुळें आपली मैत्रीण आजारी आहे हें कळूनसुद्धां तिला येऊन भेटणें शक्य झालें नाहीं. शिवाय सरोजची तब्येत इतकी विकोपाला गेली आहे, हें तिला प्रत्यक्ष पाहण्यापूर्वी समजणें शक्य नव्हतें. ती आली आणि तिनें सरोजची ती स्थिति पाहिली. तेव्हां सगळा विचार विसरून ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. थोड्या वेळानें सरोज तिला म्हणाली, ‘ गडे तरल, तूं मला धीर द्यावास तों तूंच आकांत मांडला आहेस ! ’ तरला थोडी शांत झाली. मैत्रिणीला पाहून प्रथम जो धक्का बसला तो तिला आंवरला नाहीं. पण पुढें ती विचार विसरली नाहीं. तिनें मैत्रिणीजवळ तिच्या शुश्रूषेसाठीं राहण्याचें ठरविलें. तिची तीन महिन्यांची रजा शिल्लक होती आणि त्यापुढें सहा महिनेपर्यंत अर्ध्या पगारी रजा मिळणें शक्य होतें. तिनें तीन महिन्यांची रजा ताबडतोब घेतली आणि ती परिचारिकेच्या कामांत निष्णात असल्यामुळें मधुकराचें पुष्कळसें काम तिनें हलकें केलें आणि तिच्या सान्निध्यामुळें सरोजला बरें वाटलें आणि सोबतहि झाली.

[ ३ ]

तरला आल्यावर सरोजला बरें वाटलें, म्हणजे तिच्या मनाला हुषारी वाटली. पण तिच्या शरीराला जी व्याधि झाली होती ती हटण्याचें चिन्ह दिसेना. तरला येण्यापूर्वी तिची शुश्रूषा उत्तम चालली होती, पण आतां ती आणखी

जास्त व्यवस्थितपणें होऊं लागली. शिवाय मधुकराला पूर्वीप्रमाणें सारखी देखरेख करण्याची आवश्यकता उरली नाहीं. किंबहुना त्यानें देखरेख करण्याची मुळींच जरुरी उरली नाहीं. त्यामुळें त्याला कांहीं विश्रांति मिळाली आणि केवळ चिंतेनें व्यग्र झालेलें त्याचें मन आतां थोडेसें उल्हसित झालें. त्याच्या चर्येवर काळजीनें बसलेली कृष्ण छाया अशा प्रकारें विश्रांति मिळून कमी झालेली पाहून सरोजिनीलाहि आनंद झाला. खरें सांगावयाचें म्हणजे मधुकर त्या पुष्कळ दिवसांच्या दुखण्यानें अगदीं कंटाळून गेला होता. आपलें कर्तव्य करण्यांत तो बिलकूल कसूर करीत नव्हता. आणि या दुखण्याच्या कटकटींतून केव्हां एकदां बाहेर पडेन असें तुला झालें आहे, असें जर त्याला कोणीं सांगितलें असतें तर त्याबरोबर तो भांडला असतां. पत्नीवर त्याचें प्रेम होतें, पण ज्या कारणासाठीं तें प्रेम स्थिर झालें होतें त्या कारणाची तीव्रता त्या दुखण्यामुळें कमी कमी होत चालली होती आणि दुखणें नाहींसें होऊन सरोज पुन्हां पूर्ण बरी होईल, तिच्या शरिरावरची रोगीपणाची छाया जाऊन तेथें सुदृढतेचें तेज पुनः चमकूं लागेल, तिच्या खोल गेलेल्या गालावर गुलाब पुन्हा उमलतील आणि तिच्या फिक्या ओठांत पुन्हा रक्त भरून ते आपल्या आकर्षकतेनें मधुकराच्या अंतःकरणाला तृप्त करावयास लावतील अशी आशा उत्पन्न होण्यासारखें कांहींहि घडत नव्हतें. मधुकराच्या शरीराला तें पत्नीचें दुखणें दिवसेंदिवस अधिकाधिक कष्टी करीत होतें. तसें होत होतें हें कदाचित् त्याच्याहि लक्षांत येणें शक्य नव्हतें. त्याला आनंदाची संवय होती आणि अपेक्षा होती; त्या आनंदांत सरोजशीं विवाह केल्यामुळें फार मोठी भर पडली होती आणि विवाहानंतर पहिल्या दोन वर्षांत त्याचा आनंद वाढविण्याचें, त्याच्या गात्रांना अधिक सुखी करण्याचें, त्याच्या अंतःकरणांत अधिक उल्हास ओतण्याचें कार्य सरोजनें फारच उत्कृष्टपणानें केलें. आणि तिला आजारी पडून वर्ष होऊन गेल्यावर आपल्या आणि तिच्या भागीदारींत हिचें काम होत नाहीं, कामाचा बोजा केवळ आपल्यावर पडतो असे अस्पष्ट विचार त्याच्या डोक्यांत येत आणि त्याला मनांतल्या मनांत चिरड वाटे. आतां आजारी पडण्यांत बिचाऱ्या सरोजचा अपराध नव्हता ही गोष्ट त्याला समजे आणि सरोजवर त्याचें प्रेम होतें, म्हणून असले विचार आले रे आले कीं, तो ते मागें दडपून टाकी. पण ते आले म्हणजे जाण्यापूर्वी त्याच्या अंतःकरणावर थोडा ना

थोडा तरी परिणाम करून जात. पण पुढें जेव्हां दुखणें लांबलें तेव्हां त्या विचारांनीं जोर चालविला; ते वरचेवर येऊं लागले. अर्थात् मधुकराच्या बाह्य वर्तनांत त्यांचें अस्तित्व बिलकुल दिसत नव्हतें. इतकेंच नव्हे तर जेव्हां सरोज केविलवाण्या मुद्रेनें त्याला म्हणे, ‘ मधु, मीं तुला फसविलें. या संसारांत मी तुझ्या दुःखाला कारण झालें; ’ तेव्हां तो स्निग्ध दृष्टीनें तिला सांगे, ‘ सरोज, तुझ्यावरचें माझें प्रेम ही माझ्या जीवनांत अत्यंत उज्ज्वल गोष्ट आहे. दुखणें आज ना उद्यां जाईल आणि मग आपण या त्रासांत गेलेल्या दिवसांची पुरी भरपाई करूं. ’ आणि मग सरोज हंसे. पण तिच्या हंसण्यांत एका तऱ्हेची निराशा असे. या दुखण्यांतून आपली मुक्तता होईल असें तिला आतां वाटत नव्हतें.

तरला आल्यापासून घरांतलें केवळ औदासिन्याचें वातावरण कांहींसें निवळलें. ती ज्याप्रमाणें सरोजला धीर देई, त्याप्रमाणें मधुकरालाहि आश्वासन देई. सरोजला झोंप लागली म्हणजे किंवा तिला एकटेंच पडावेंसें वाटे अशा वेळीं मधुकर घरीं असला तर तो व तरला बोलत बसत आणि केवळ रोग्याच्या स्थितीचा विचार करण्यांत वर्ष दीड वर्ष गेल्यामुळें अशा तऱ्हेनें कोणा तरी तिसऱ्या माणसाबरोबर बोलत बसण्याची संधि मिळाल्यामुळें मधुकरालाहि बरें वाटे. केव्हां केव्हां भयप्रद परिस्थितीचा किंचित् विसर पडून, सरोज जवळजवळ मृत्युशय्येवर पडली आहे याचें भान क्षणभर न राहून ते हंसत, बोलत किंवा ज्यांत चिंतेचा संपर्क नाहीं, अशाहि गोष्टी एकमेकांना सांगत. त्रासानें कंटाळलेल्या मधुकराच्या मनाला त्यामुळें विश्रांति मिळाल्यासारखें वाटे आणि अशा प्रकारें तरलेबरोबर मधूनमधून होणारीं संभाषणें त्याला प्रिय वाटूं लागलीं. त्याची आणि तरलेची ओळख लग्न झाल्या दिवसापासूनच होती; पण हा वेळपर्यंत तिच्याशीं निकट संबंध येण्याचें कारणच नव्हतें. आतां ती सारखी घरींच असल्यामुळें तिचें बोलणें, चालणें, वागणें, तिचें स्वरूप, तिच्या अंतःकरणाचे गुण, तिचा सोशिकपणा, तिची आनंदी वृत्ति हे गुण क्रमाक्रमानें त्याच्या लक्षांत येऊं लागले आणि घरांत तिच्यामुळें केवढें तरी स्थित्यंतर झालें होतें; त्याचा साहजिक परिणाम तिच्यासंबंधीं निकटभाव उत्पन्न होण्यांत झाला. तिच्याशीं बोलत बसतांना तिच्या सान्निध्यांत समाधान आहे, विश्रांति आहे, असें मधुकराला वाटूं लागलें. तिच्या रूपाची तुलना सरोजच्या रूपाशीं करतां येणें

शक्य नव्हतें. ती दहा बायकांसारखी होती; पण नीटनेटकेपणामुळें दहा बायकांपेक्षां उठून दिसे. तथापि आजाराशीं वर्ष दोन वर्षें झगडा केल्यामुळें सरोजचें सौंदर्य आतां बहुतेक स्मृतिप्राय झालें होतें आणि प्रकृति उत्तम असल्यामुळें तरलेला विशेष रूप नसतांहि तिच्याबद्दल उपजलेल्या निकटभावामुळें ती मधुकराला सुस्वरूप नव्हे तरी आकर्षक वाटूं लागली. अंगांत सळसळणारें निरोगी रक्त सामान्य माणसाला सुद्धां आकर्षकता आणतें. तरला तर दिसण्यासवरण्याला ठीक होती, आणि मधुकराच्या त्या क्षुब्ध आणि क्षुधित स्थितींत ती त्याला आकर्षक वाटली तर त्यांत नवल करण्यासारखें कांहीं नव्हतें. शिवाय आकर्षकतेंत शारीरिक समाधान हें एक महत्त्वाचें अंग आहे ही गोष्टहि खोटी नाहीं. मधुकराच्या भावना शारीरिक समाधानाच्या पलीकडे गेलेल्या नव्हत्या याबद्दल त्याला दोष द्यावा आणि पत्नीच्या असहाय स्थितींत जो पूर्ण व्रतस्थपणा मानसिक वृत्तींत सुद्धां राहिला पाहिजे तो त्याला अंगांत आणणें जमलें नाहीं किंबहुना तें त्याच्या शक्तीबाहेरचें होतें असें कबूल करून त्याची गणना पहिल्या प्रतीच्या माणसांत न करतां दुर्बळ माणसांत करावी हें जितकें न्याय्य आहे तितकेंच त्याच्या अंतःकरणांत होत चाललेले थोरपालट, हे त्याच्या मानसिक दुर्बलतेमुळें होत होतें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याला न कळत, त्याची इच्छा नसतांना आणि त्याला कळलें त्या त्या वेळीं त्यानें प्रतिरोध करण्याचा प्रयत्न केला असतांहि त्याची तरलेकडे पाहण्याची दृष्टि कांहींशी निराळी होऊं लागली आणि पत्नीच्या दुखण्याचें पर्यवसान तिच्या मृत्यूंत आज ना उद्यां होणार हें जसें स्पष्ट होऊं लागलें तसें त्या दृष्टींत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं असें त्याला वाटे. पण असें वाटणें म्हणजे सरोजबरोबर प्रतारणा करणें होय, हा विचार मात्र त्याच्या डोक्यांत आल्याशिवाय राहात नसे.

[ ४ ]

आणि कांहीं दिवसांनीं एक वेळ अशी आली कीं, डॉक्टरांनीं अगदीं आशा सोडली. दोनचार दिवस, फार तर आठ दिवसांपलीकडे निभाव लागणें कठीण म्हणून त्यांनीं सांगितलें. त्या दिवशीं सरोजला फारच क्षीणता आली होती. संध्याकाळची वेळ होती. सरोजला बऱ्याच वेळानें झोंप लागली आणि मधुकर व तरला दोघेंहि तेथून अगदीं हलकेंच, कसलाहि आवाज न करतां उठलीं आणि बाहेर आलीं. माडीवर दोघेंहि गेलीं आणि तरलेच्या नेत्रांतून चार अश्रुबिंदु गळले. मधुकराचें

अंतःकरण भरून आलें होतें. बाहेर मंद मंद वारा वहात होता. पलीकडच्या घराभोंवतीं मोठी बाग होती. तींतून फुलांचा नाजूक सुगंध तो मंद वारा आणीत होता. पक्षी घरीं चालले होते आणि झाडावर येऊन बसले होते; त्यांचा किलबिलाट चालू होता. साहजिकपणें तरलेचा हात मधुकरानें आपल्या हातांत घेतला. दोघांनाहि त्या हस्तस्पर्शानें एक प्रकारचें आश्वासन दिलें. मधुकर म्हणाला, 'तरल, या भयंकर प्रसंगीं तूं जवळ आहेस म्हणून माझी स्थिति किती तरी बरी आहे. तूं नसतीस तर मीं काय केलें असतें न कळे!' तरलेनें आपला हात त्याच्या हातांत तसाच राहूं दिला. कांहीं वेळ तीं दोघेंहि अगदीं स्तब्ध होतीं. त्या हस्तमीलनानें त्यांचे मानसिक संदेश एकमेकांना काय गेले असतील ते असतील, पण त्यांची परिस्फुटता वाणींत झाली नाहीं. कांहीं वेळ लोटल्यावर तरला म्हणाली–'बिचारी सरोज आतां फार तर आठदहा दिवसांची सोबती आहे. काय हा विलक्षण प्रसंग!'

'तरल!' मधुकर म्हणाला—'सरोजवर माझें केवढें प्रेम आहे हें तुला माहीत आहे. तिच्या मरणाचा विचार मनांत येऊन आज कित्येक महिने मी नुसता गोंधळून गेलों होतों. पण तूं आल्यापासून मला कांहींतरी विसांवा मिळाला. तिच्या मागें माझे दिवस कसे जाणार हेंच दिसत नाहीं.'

तरलेची मान खालीं होती. तिचा चर्येवर कोणत्या भावनेचें किंवा विचाराचें प्रतिबिंब होतें हें त्यामुळें मधुकराला कळलें नाहीं. पण तिचा हात त्याच्या हातांत होता आणि त्याच्या हातांतून जाणाऱ्या विद्युत्संदेशाला तिच्या हाताकडून प्रतिवचन मिळत होतें आणि तें प्रतिवचन अनुकूल होतें अशी त्याची समजूत झाली. तो म्हणाला, 'तरल, वर पहा. सरोज जरी जाणार असली तरी तिनें आपली मैत्रीण मला दिली आहे आणि तिला मी मुळींच जाऊं देणार नाहीं.'

तरलेनें मान वर केली आणि आपला हात सोडवून घेण्याचा ती प्रयत्न करूं लागली. ती म्हणाली, 'मधुकर, तुम्ही काय बोलतां आहांत? या बोलण्यानें सरोजशीं प्रतारणा नाहीं का होत?'

'आतां प्रतारणेचा प्रश्न कोठें उरला? तिच्या पाठीमागें–आणि तिची आतां आशा नाहीं हें अगदीं नक्की झालें आहे–माझें जीवित अगदीं शून्य झालें असतें. पण तरल, या पांच सहा महिन्यांत तुझ्या सान्निध्यानें या घराचें वातावरण-

सुद्धां बदलून गेलें. सरोजचे शेवटचे दिवस सुखाचे झाले आणि माझें अंतःकरण जें अगदीं हाताश झालें होतें, त्याला नवा हुरूप आला. तरल, तूं माझ्यावर रागावूं नको. पण माझें प्रेम तुझ्यावर जडलें आहे. सरोजनंतर तूं माझी पत्नी झाली नाहींस, तर हें जग मला शून्यवत् होईल आणि माझें सारें जीवन व्यर्थ होईल.'

'मधुकर, सरोज आहे आणि जरी डॉक्टरांनीं अगदीं आशा सोडली असली, तरी ती आहे तोंपर्यंत असले विचार आपण मनांतसुद्धां आणतां उपयोगी नाहीं. तसें करणें बरोबर नाहीं. ते विचार मागें परतवा, त्यांना उचल खाऊं देऊं नका.'

'खरें आहे तुझें म्हणणें, तरल. पण ते विचार मागें खेंचले तरी ते आतां माझ्या अंतःकरणांत स्थिर होऊन बसले आहेत यांत कांहींच शंका नाहीं. आणि तुझ्या पण अंतःकरणांत ते स्थिर होऊन बसले आहेत. सांग, तरल, सांग! तुझें माझ्यावर प्रेम आहे ना?'

तरल कांहीं बोलली नाहीं, पण तिची नाडी जोरानें चालूं लागली. तिच्या गालावर आरक्तपणा आला, आणि तिची दृष्टि लज्जेनें अवनत झाली. या प्रकारें केलेल्या प्रश्नाचें उत्तर मधुकराला मिळालें. त्यानंतर तीं दोघें बराच वेळ बोलत बसलीं.

* * * * *

आणि त्याच रात्रीं तो चमत्कार घडला, असें शेवटीं डॉक्टरांचें म्हणणें पडलें. अर्थात् डॉक्टरांना फक्त सरोजच्या बाबतींत घडलेल्या चमत्काराचें अनुमान करतां आलें. पण त्या दिवशीं संध्याकाळीं जो दुसरा चमत्कार घडून आला होता त्याची त्यांना दादहि नव्हती. सरोजला त्या दिवशीं जी झोंप लागली ती फारच गाढ लागली. ती जी संध्याकाळ होण्याच्या वेळीं झोंपली ती पहांटे उठली. इतका वेळ इतकी चांगली झोंप तिला गेल्या आठदहा महिन्यांत आली नव्हती. पहांटे जागीं झाल्यावर तिनें आज कितीतरी दिवसांनीं भूक लागली म्हणून सांगितलें. तरला तिच्याजवळ होती. तिनें तिला लागलीच कॉफी करून दिली. सकाळीं जेव्हां डॉक्टर तिला पाहण्यास आले, तेव्हां तिच्या चेहऱ्याकडे पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. तिची नाडी पाहून झाल्यावर त्यांचें तें आश्चर्य वाढलें.

ते सरोजजवळ पांच मिनिटें बसले आणि म्हणाले, 'सरोजिनी, आज मी नवें औषध देतों. त्यानें तुम्हांला चांगला गुण येईल.'

डॉक्टरांचें हें बोलणें ऐकून मधुकराला चमत्कार वाटला. तो म्हणाला, 'डॉक्टर, सरोजची तब्येत बरी आहे ना? तुम्ही तिला नवें औषध काय म्हणून देतां?'

डॉक्टर हंसून म्हणाले, 'तिची तब्येत कशी आहे हें आणखी तीन दिवसांनीं मी सांगेन. पण तुम्ही काळजी करूं नका. सरोजिनीची इच्छा आजाराशीं टक्कर देऊन त्याला जिंकण्याची आहे. होय ना?' असें म्हणून त्यांनीं सरोजकडे पाहिलें.

सरोज हंसली. आज खरोखर तिचा हंसण्याचा प्रयत्न कांहींसा फलद्रूप झाला. ती अगदीं हलक्या आवाजांत म्हणाली, 'माझी तशी इच्छा कां असणार नाहीं! मला काय कमी आहे?' तिनें अत्यंत स्निग्ध अशा नेत्रांनीं मधुकराकडे पाहिलें. मधुकर या वेळीं अगदीं गोंधळून गेला होता, त्यामुळें त्याच्या नेत्रां-कडून तिला कांहीं प्रत्युत्तर मिळालें नाहीं. पण तिला प्रत्युत्तराची अपेक्षा नव्हती. तिनें डोळे झांकले आणि 'मी कांहीं वेळ स्वस्थ पडतें' असें सांगून ती दुसऱ्या कुशीवर वळली.

तीन दिवस गेले. त्या तीन दिवसांत सरोजची तब्येत सारखी सुधारत गेली. अर्थात् तिच्या प्रकृतींत झालेला किंवा होणारा फेरबदल डॉक्टरनाच कळण्या-सारखा होता. तरलेला परिचारिकेचें शास्त्र अवगत असल्यामुळें तिलाहि तो समजला. तीन दिवसांनीं डॉक्टरांनीं दुसरे एक बडे डॉक्टर बोलावले आणि दोघांनींहि रोग्याची पूर्ण तपासणी करून 'आतां धोका उरला नाहीं' असें आपलें मत दिलें. अर्थात् सरोजला लागलीच बिछाना सोडण्यासारखी स्थिति नव्हती, हें सांगावयास नकोच. पण मृत्यूच्या भीषण छायेंत शिरलेली सरोज तेथून परतली आणि आतां ती बरें झाल्यावर काय काय करावयाचें यासंबंधीं गोष्टी कधींकधीं तरलेजवळ आणि कधींकधीं मधुकराजवळ बोलूं लागली.

[ ५ ]

सरोज बरी झाली, दुखण्यांतून उठली. तिला पूर्वीची सुदृढता येण्याचा प्रश्न आतां फक्त दिवसगतीवर अवलंबून राहिला. तिच्याच आग्रहावरून तरल अद्यापि घरींच होती. तिनें आपली रजा आणखी वाढविली होती आणि

मधुकराजवळ बोलण्याचालण्यांत तिचा बराच काळ जाई. त्या दोघांची मैत्री पाहून सरोजला बरें वाटलें. ती तरलेला म्हणाली, 'तरल, तूं अगदीं वेळेवर आलीस आणि तुझ्याच शुश्रुषेमुळें मला बरें होणें सोपें झालें. मधुकराला हें घर कसें अगदीं नुसतें त्रासाचें झालें होतें. पण तूं आलीस म्हणून त्यालाहि सोबत झाली आणि विसांवा मिळाला.'

यावर तरल कांहींच बोलली नाहीं. ती फक्त शून्य दृष्टीनें समोर पहात होती. अलीकडे तरलेची आनंदी वृत्ति मावळली होती. सरोज म्हणे, 'तरल, माझ्या दुखण्याचा शीण तुला फार झाला आहे. तूं आतां अगदीं स्वस्थपणें विश्रांति घे.' पण तरल जाण्याच्या गोष्टी बोलूं लागली व उरलेली रजा रद्द करून आपण पुनः कामावर जाणार असें म्हणूं लागली. तिच्या त्या म्हणण्यांत सरोजला अस्वाभाविक असें कांहीं वाटलें नाहीं, पण तिनें तिला आणखी कांहीं दिवस तरी रहा म्हणून फार आग्रह केला.

पुढें एके दिवशीं संध्याकाळीं मधुकर ऑफिसांतून परत आल्यावर आणि त्याचें चहापाणी झाल्यावर त्याची एकांतीं गांठ पडण्याचा तरलेला योग आला. त्या वेळीं सरोज आपल्या खोलींत होती. सरोज आतां हिंडत फिरत असे. पण तिच्या घरांत फिरण्याच्या वेळा बहुतेक ठरलेल्या असत. संध्याकाळीं ती सहसा आपल्या खोलींतून बाहेर जात नसे. मधुकर आणि तरला बसले होते त्याच्या पलीकडच्या खोलींत पुस्तकांचीं कपाटें होतीं. आणि तेथून एक पुस्तक घेऊन सरोज नुकतीच आपल्या खोलींत गेली होती. तरला मधुकराला म्हणाली,

'मी उद्यां जातें—'

'तूं जाणार?' हलक्या आवाजांत मधुकर म्हणाला, 'तरल! मी तुला जाऊं देणार नाहीं. तूं माझी आहेस, स्वखुषीनें माझी झाली आहेस आणि आतां तुझ्याशिवाय माझें मुळींच चालणार नाहीं.'

'मधुकर, वेड्यासारखें बोलूं नका. सरोज आतां बरी झाली आहे. आतां मला या घरांत राहण्याचें कारण उरलें नाहीं.'

'सरोजिनीचें शुश्रूषा करण्याचें काम आतां नाहीं; पण या घरांत मी आहे ना?'

'मधुकर, सरोज आतां बरी झाली आहे. आपण केलेला सगळा अंदाज

चुकला. पण अंदाज डॉक्टरांचा सुद्धां चुकला होता. आतां मलाच काय चार दिवस तळमळ होईल ती होईल. पण सरोजच्या अन्नांत विष कालविण्याची माझी इच्छा नाहीं.'

'पण तूं माझा मुळीं विचारच करीत नाहींस, तरल! आतां सरोजचा प्रश्न उरला नाहीं. तिनें मला दुहेरी रीतीनें फसविलें. तारुण्याच्या ऐन भरांत ती आजारी पडली आणि माझ्या आयुष्याचीं दोन वर्षें भयंकर यातनांत गेलीं. आणि मग तिची प्रकृति अत्यवस्थ झाल्यावर मी तुझ्याकडे दृष्टि फेंकली. आणि माझ्या अंतःकरणांत तुझ्यावरील प्रेमाचें पक्कें बीजारोपण झाल्यानंतर जसें काय तें तिला पहावेना म्हणून सरोज बरी झाली!–'

तरलेची चर्या कावरीबावरी झाली. तिनें न बोलण्याबद्दल मधुकराला खूण केली; पण तो आतां विचारांच्या कक्षेंत नव्हता. त्याच्यावर विकाराचा अंमल पूर्ण बसला होता. तो पुढें म्हणाला,

'तरल, मी तुला जाऊं देणार नाहीं. मी तुझ्याशीं लग्न करणार.'

'काय बोलतां हें, मधुकर! घरीं सरोज असतांना तुम्ही माझ्याशीं लग्न करणार? लोक काय म्हणतील?"

"लोक काय म्हणतील? लोक काय म्हणतील याची पर्वा मला नाहीं. आणि लोक काय म्हणणार? हिंदुधर्मांत बहुपत्नीकत्वाला आडकाठी नाहीं. आणि अलिकडे पुष्कळ लोक पहिली बायको असतांना दुसरीं लग्नें करूं लागले आहेत. स्त्रियांच्या जुलुमाखालीं पुरुषांनीं मरावें या मताचा मी नाहीं. या सरोजनें मला फसवलें आहे. ती ठरल्याप्रमाणें मेली असती तर! पण तरल, मी तुला जाऊं देणार नाहीं. तूं माझी आहेस. मी तुझ्याशीं लग्न लावणार! लग्न शास्त्राधारानें लागत नसलें, कायद्याप्रमाणें लागत नसलें, तर जो कोणी असलें लग्न लावण्यास तयार असेल त्याच्याकडे जाऊन आपण लग्न लावूं. आणि तसा कोणी मिळाला नाहींच, तर आपल्या प्रेमाचा संबंध हेंच आपलें लग्न म्हणून जगांत द्वाही फिरवूं—"

बोलतां बोलतां मधुकराचा आवाज चढला आणि पलीकडल्या खोलींत सरोज आली, हें त्याला समजलें सुद्धां नाहीं. तरलेला सुद्धां तें समजलें नव्हतें. पण मधुकराचें चढत्या आवाजांत भाषण चाललें असतां पलीकडच्या खोलींत धाड्दिशीं आवाज झाला. तरल दचकली, मधुकर धांवला. ते दोघेहि पलीकडच्या

खोलींत गेले. सरोज पुस्तकाच्या कपाटाजवळ खालीं पडली होती. तिच्या हातांत रघुवंशाचें पुस्तक होतें व आंगठ्या जवळचें बोट पुस्तकांत होतें तसेंच होतें. तरलनें तें बोट सोडविलें व पुस्तकांत पाहिलें तों चवदाव्या सर्गांतला सीतासंदेश त्या पृष्ठावर होता. त्या दोघांनीं सरोजला हळूच उचलून तिच्या खोलींत नेऊन बिछान्यावर निजविलें. डॉक्टर आले, घेरी येऊन सरोज पडली असें त्यांना समजलें आणि त्या दिवशीं दुखणें उलटलें तें सरोजला घेऊन गेलें. तरला शेवटच्या दिवसांपर्यंत राहिली; पण मधुकराशीं ती एकदांहि बोलली नाहीं. सरोजबरोबर बोलण्याचा तिनें पुष्कळ प्रयत्न केला, पण सरोज फार क्षीण झाली होती. ती बोलतच नव्हती. डॉक्टरांनीं सरोजला धीर देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण ती एकदां म्हणाली--'डॉक्टर, मी अगदीं कंटाळलें आहें. आलें मरण तें पदरांत घ्यावें. बरें होऊन तरी पुन्हा मेलेंच पाहिजे!' तें ऐकून काय म्हणावें हें डॉक्टरना समजेना. त्यानंतर मधुकर व डॉक्टर बाहेर गेले. तरलेला हुंदके आवरेनात. ती म्हणाली, 'सरोज, मीं तुझा गळा कापला. तूं मला क्षमा करशील का?' सरोज कांहीं वेळ थांबून अगदीं क्षीण आवाजांत म्हणाली, 'माझा कोणावरहि राग नाहीं. जो मरतो तो आपल्या मरणानें मरतो.' तरलेला त्यानंतर रडें कोसळलें तें कितीतरी वेळ खळलें नाहीं. दोन दिवसांनीं सरोज सर्वांना सोडून गेली. मधुकराचा आक्रोश ऐकून लोकांना नवल वाटलें नाहीं. पण सरोजचें दुखणें उलटलें कसें याचा मात्र सर्वांना चमत्कार वाटला. तिच्या मृत्यूचें कोडें डॉक्टरांनाहि उमगलें नाहीं.

सरोजच्या मृत्यूनंतर तरला ताबडतोब आपल्या नोकरीच्या ठिकाणीं निघून गेली. मधुकरानें एक दिवस जाऊन तिची भेट घेतली व तिला आपली पत्नी होण्याची विनंति केली, ती तिनें अत्यंत निष्ठुर शब्दांनीं अमान्य केली. त्यांचें लग्न होण्याचा संभव होता याची कल्पना कोणालाहि नसल्यामुळें तें कां झालें नाहीं म्हणून कोणीहि तर्ककुतर्क काढले नाहींत. आणि मधुकर आतां मुली पहातो आहे, त्याचें कोणाला नवल वाटत नाहीं. पण सरोजचें गेलेलें दुखणें परत कसें आलें हें कोडें मात्र अद्यापि कोणालाहि सुटलेलें नाहीं.

स्त्रीमासिक, मे १९३५.

---

# बाकी उरली काकी

## एक प्रणयकथा

तिला मनी म्हणत, आणि मनी हें मुलीचें नांव पुरातन आहे. पण तिचें खरोखर नांव मेनका होतें. हें नांव तिला कां मिळालें हे सांगण्याचें कारण नाहीं. नांवें ठेवण्याच्या तंत्रावर या ठिकाणीं चर्चा करणें विषयाला सोडून होईल. तिला घरीं दारीं मनी म्हणत. पुढें ती कॉलेजांत गेली आणि तेथें तिनें दोन तीन वर्षें घालविलीं. घालविलीं म्हणण्याचें कारण पहिल्या वर्षाची परीक्षा ती उतरलीच नाहीं. तिला गणित विषयाचा कंटाळा असे. खरें म्हटलें तर, त्यासाठीं तिनें कर्व्यांच्या विद्यापीठांत जावयास पाहिजे होतें. पण केवळ मुलींचें कॉलेज ही कल्पना तिला गणितापेक्षांही अप्रिय होती. नंतर संस्कृतचे तिचें फारसें जमत नव्हतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तिचें अभ्यासाबरोबर जमलें नाहीं. पण ही कॉलेजच्या बाबतींत क्षुल्लक गोष्ट वगळली तर बाकी तिनें आपल्या वेळेचा फारच सदुपयोग केला. ती हौशी आणि उल्हासी असल्यामुळें एवढ्या मोठ्या कॉलेजांतूनसुद्धां तिचें अस्तित्व जाणवलें. वादविवाद सभेंत ती वरचेवर बोलत असे असें नाहीं. पण मधून मधून ती भाषणें करी व तीं मोठीं चुणचुणीत असत. कॉलेजची कोठें ट्रिप निघाली तर त्यांत मनीला पुढारीपण असे. टेनिस थोडेंफार खेळतां आलें तरी तिकडे ती फार वेळ दवडीत नसे. पुस्तकें वाचण्याचा तिला शोक असा नव्हता. पण पुस्तकांसंबंधानें ती मित्रांबरोबर चर्चा करी आणि बरेच वेळां कोणीं विद्यार्थ्यानें जरा अधिक लघळपणा केला तर ती त्याला असा कांहीं सटकावत असे कीं, तो बिचारा अगदीं गोगलगाय होऊन जाई. तिनें बनवलेल्या गोगलगाईंची संख्या इतकी मोठी झाली कीं, बन्याबापूनें एकदां चार मित्रमंडळींत तिला 'मन्या' हें नांव दिलें. तें नांव त्या मंडळीला आवडलें. आणि हळूं हळूं तें कॉलेजभर पसरलें. पसरत पसरत तें मुलींच्या खोलीपर्यंत गेलें आणि शेवटीं मनीच्या म्हणजे मेनकेच्या कानावरहि आलें. ती तशी चिडखोर मुलगी नव्हती उजळ माथ्यानें फिरणाऱ्या कॉलेज–तरुणांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ती तशी "स्पोर्ट" म्हणजे खेळाडू वृत्तीची होती. पण तिनें मन्या हें नांव कोणीं ठेविलें याचा तलास काढला आणि याप्रमाणें तिचा बन्याबापूशीं संबंध आला.

मनीचें मोकळेपणाचें वागणें ही एकच आकर्षक गोष्ट तिच्याजवळ होती असें नाहीं. ती सुंदर नसली तरी तिचा चेहरा आकर्षक होता. प्रसाधन—तंत्राची तिला चांगली माहिती होती व त्या तंत्राचा अतिरेक न होऊं देण्याचें तारतम्य तिच्याजवळ असल्यामुळें भडक न दिसतां रंग कसा लावावा ही कला तिला साधली होती. बरेच वेळां, मुलांच्या गांठींभेटी झाल्या म्हणजे ती पुष्कळ वेळ बोलत उभी राही. कधीं कधीं कॉलेजांत अशा बोलण्यांत वेळ गेल्यामुळें तिला तासाला जाण्यालासुद्धां सवड मिळत नसे. तिला मिळत नसे म्हणजे अर्थात् जे विद्यार्थी तिच्याशीं बोलत त्यांनाहि मिळत नसे. कदाचित् परीक्षा न उतरण्याचें तिच्या बाबतींत हेंहि कारण नसेल असें नाहीं. पण परीक्षा न उतरल्यामुळें ती तशी कष्टी झाली नाहीं. तिच्या मित्रमंडळांत म्हणजे विद्यार्थ्यांत तिची परीक्षा उतरत नाहीं याबद्दल फार चर्चा होई व ते म्हणत, "पहिल्या वर्षाची परीक्षा ही बोलूनचालून कॉलेजची परीक्षा. हिला त्यांनीं (म्हणजे प्रोफेसरांनीं) पास करून घेतली पाहिजे." मंडळींत उत्साह उत्पन्न करण्याचा तिच्या अंगचा गुण मोठा होता यांत शंका नाहीं आणि त्या गुणामुळेंच तिला कॉलेजांत परीक्षा उतरली नसतांनाही आणखी दोन वेळां प्रवेश मिळाला. पण या गुणाच्या जोरावर ती परीक्षा कांहीं पास होऊं शकली नाहीं. तिच्या अंगच्या आकर्षक गुणामुळें तिला मित्र पुष्कळ मिळाले होते. कॉलेजची ट्रिप गेली म्हणजे मुलांचा घोळका तिच्याभोंवतीं बराच असे. अशा घोळक्यांत निर्भयता असते व मुलींना कसलाहि धोका नसतो, हा सिद्धांत आमच्या इकडे कांहीं वेदाभ्यासजडांना पटला नाहीं तरी तो खरा आहे, यांत शंका नाहीं. कांहीं विद्यार्थ्यांना तिचें सान्निध्य फारच आवडे. पण तिच्या "सटकावण्या"च्या संवयीमुळें त्यांच्या उताला येऊं लागलेल्या वृत्तींना आळा बसे. तरी पण दोन तीन विद्यार्थ्यांचें तिच्यावर प्रेम बसलें व तें कवितारूपानें बाहेरसुद्धां आलें. या उदयोन्मुख तरुणांच्या कवींनीं (दोन्हींही विशेषणें कवींचीं) तिला गांठून आपल्या कविता तिला ऐकविल्या. त्यांना वाटलें होतें कीं त्या ऐकतांच तिच्या मुखावर "विषण्ण वृत्ति" (त्याचा अगदीं बरोबर अर्थ त्यांना माहीत होता असें नाहीं) दिसेल आणि तिच्या नेत्रांतून दोन (दोनच हं !) अश्रुबिंदु गळून ते गालावर पडतील. मग त्या प्रसंगावर ते निराळी कविता करणार होते. पण ती पोरगी मोठ्यानें हंसली आणि त्या बिचाऱ्या कवींची फारच निराशा झाली.

पण आजकाल या कवींच्यासारखे सगळेच कांहीं भित्रे नसतात. प्रेम व्यक्त कसें करावें व तरुणींना कोणत्या उपायांनीं आपल्या विनंतीला मान देण्यास वळवावें यांविषयीं कोठें कोठें येणारी माहिती वाचून तिचा प्रयोग करण्याचें एका दोघांनीं ठरविलें. एका नामांकित लेखकानें प्रेमतंत्रावर एक ग्रंथच लिहिला होता. त्यांत कित्येक कादंबरीकारांची त्यांच्या कथांतील वर्णनें देऊन प्रेमतंत्राबद्दल मतें उद्धृत केलीं होतीं. "त्यानें तिचा हात घट्ट धरला" हें वाक्य नायिकेला आपलीशीं करून घेण्याच्या बाबतींत एकानें अनेकवार लिहिलें होतें. दुसऱ्या एकानें चाकोलेट आणि प्रेम यांचा संबंध लावून दिला होता. त्याच्या प्रत्येक गोष्टींत नायक हा नायिकेला चाकोलेट देत असे. मनीच्या एका मित्रानें तिलाही चाकोलेटचे आहेर करण्यास सुरवात केली. पण बिचाऱ्याचे डबेच्या डबे खलास होऊनसुद्धां मनी प्रसन्न झाली नाहीं. तिला चाकोलेट आवडत असे व तिनें या मित्रानें पाठविलेले त्याचे निरनिराळे प्रकार अगदीं मनापासून खाऊन टाकले. चाकोलेटवर इतका खर्च केल्यावर त्याचें प्रेम संपुष्टांत आलें व त्यानें मनीचा नाद सोडला. दुसरा बहाद्दर होता, त्यानें तिचा हात घट्ट धरण्याचें ठरविलें. तो स्वतः तसा राष्ट्रीय वृत्तीचा होता. "भिक्षां देहि"चें राजकारण त्याला बिलकूल मान्य नव्हतें. "मागून चालत नाहीं, घेतलें पाहिजे," या तत्त्वावर त्याची श्रद्धा होती. त्यांत एका कादंबरी-काराचा त्याला आधार मिळाला. मग तर त्याला शंकाच उरली नाहीं. त्याला प्रेमतंत्राच्या या कलमाचा उपयोग करण्याची व पडताळा पाहण्याची संधिच पुष्कळ दिवस आली नाहीं. पण कर्मधर्मसंयोगानें एक दिवस आली व ती त्यानें विलंब न लावतां घेतली. कादंबरीकाराच्या वर्णनाप्रमाणें "त्यानें तिचा हात घट्ट धरला", "आणि मग तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले; तिच्या कपोलावर लज्जेची लाली पसरली; तिची मान खालीं गेली व ती त्याच्याजवळ गेली!" पण या तरुणाच्या दुर्दैवानें मनीजवळ प्रकार विपरीत झाला. तिला प्रथम त्याच्या धिटाईचें नवल वाटलें व ती त्याला सटकावूं लागली. मग त्यानें तिचा दुसराही हात धरण्याचा प्रयत्न केला, त्याबरोबर—काय झालें कुणास ठाऊक—तो हात त्याच्या हातांत येण्याच्या ऐवजीं तडक त्याच्या गालावर पडला. 'पडला' या क्रियापदांत काय झालें त्याचा संपूर्ण बोध होत नाहीं. पण जें झालें तें तिच्या हाताला कां त्याच्या गालफडाला माहीत. तो पुनः त्या भानगडींत

पडला नाहीं व प्रेमतंत्राचे ग्रंथ वाचून त्यांतील सिद्धांताचे प्रयोग करणें धोक्याचें आहे एवढें त्याला समजून तो शहाणा झाला.

असें कांहीं असलें तरी बन्याबापू– ज्यानें तिला मन्या हें नांव दिलें– तो हळू हळू तिच्या आकर्षणांत पुरा सांपडला व त्याचें प्रेम खरोखर तिच्यावर बसलें आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, तिचेंही त्याच्यावर प्रेम जडलें. म्हणजे त्याला त्याचें कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं–कारण आपणां-वर कोणाही तरुणीचें प्रेम बसलेंच पाहिजे असें त्याला खरोखर वाटत होतें. ती कॉलेजांतून बाहेर पडल्यावर बन्याबापूला आपलें प्रेम लक्षांत आलें. ती दिसेनाशी झाल्यावर तिला पहाण्याची आपली केवढी उत्सुकता आहे तें त्याला कळलें. वादविवादसभेला तिच्या गैरहजेरीमुळें केवढी नीरसता झाली आहे हें त्याला पटूं लागलें. कॉलेजच्या ट्रिप्समध्यें ती नसतांना काळ्या पाण्यावर जाणें आहे असें त्याला वाटूं लागलें. मग त्याची खात्री पटली कीं, तिला परीक्षेंत पास करणें हें प्रोफेसरांचें कर्तव्य होतें; आणि मग तो म्हणूं लागला, परीक्षेंत काय आहे ? अर्थात् त्यानें आपला अभ्यास सोडला नव्हता. तो नुकतीच बी. ए. ची परीक्षा उतरला होता, आणि त्यामुळें तूर्त कांहीं महिने तरी प्रेम कर-ण्याला त्याला बरीच सवड होती. चुलत्याचें त्याच्यावर मोठें प्रेम होतें व मनी-ऑर्डरीची वेळ कधींही टळत नसे. पुण्यांत कायद्याचें कॉलेज निघाल्यामुळें तेथेंही आतां मुंबईप्रमाणेंच जो तो विद्यार्थी कायदा आणि एम्. ए. यांचा अभ्यास एकदम करी. म्हणजे एक वर्षभर कोणताही अभ्यास न करण्यांत वेळ घालवी. बन्याबापू हा कांहीं या नियमाला अपवाद नव्हता. हळुहळू त्याची मनीबरोबर चांगली ओळख झाली. ओळखीचें रूपांतर परस्पर आदरांत झालें व परस्पर आदराचें रूपांतर प्रेमांत झालें. बन्याबापूच्या काकांकडे संपत्ति खूप होती व तिचा वारस बन्याच होणार होता. तेव्हां लग्नाच्या बाबतींत काकांची संमति आवश्यक होती. तथापि बन्याबापू कांहीं लेचापेचा नव्हता. तो मनीला म्हणाला, "काका तसें कांहीं विघ्न आणणार नाहींत. तुला पाहिलें कीं, ते लागलीच संमति देतील. पण समजा, ते नाहीं म्हणाले, तर आपण थोडीच परवा करणार ? आपलें प्रेम पैशाची फिकीर करणार नाहीं." या वेळीं त्यानें तिचा हात घट्ट दाबला; पण तिनें प्रतिकार केला नाहीं. तेव्हां आपल्याप्रमाणेंच आपल्या प्रियकरिणीला पैशाची परवा नाहीं, तिला प्रेम हेंच दैवत वाटतें, हें कळून त्याला फार आनंद झाला यांत नवल नाहीं.

[ २ ]

बन्याबापूचा जिगर दोस्त सोन्या होता. त्याच्याजवळ बन्याचें सर्व हितगुज चाले. तेव्हां मनीवर आपल्या बसलेल्या प्रेमाची हकीकत त्यानें हळू हळू सोन्याला सांगितली. प्रेमाच्या बाबतींत सोन्या तरी पुराणमतवादी होता. शिवाय काय कारण असेल तें असो, मेनकेबद्दल त्याचें मत फारसें अनुकूल नव्हतें. बन्याबापूनें तिला "मन्या" हें नांव ठेवलें; तेव्हां त्याची मनापासून तारीफ कोणी केली असेल, तर ती सोन्यानें– हो, त्याचें खरें नांव अर्थात् सोन्या नव्हतें हें न सांगूनसुद्धां कळण्यासारखें आहे. नांव शंकर; पण लहानपणापासून त्याची आजी त्याला सोन्या, सोनुल्या म्हणत असे आणि तें नांव त्याला मराठी शाळेंत चिकटलें. पुढें हायस्कुलांत गेला तेव्हां मराठी शाळेंतले बरेचसे सोबती त्याच्याबरोबर आले. त्यामुळें त्याचें लाडकें नांव तेथेंही कायम राहिलें. आणि कॉलेजांतसुद्धां त्याच्या जवळच्या मित्रमंडळींत तेंच कायम राहिलें. पण आतां तो "सोन्या" म्हणण्याच्या स्थितींत नव्हता. बी. ए. झाल्याबरोबर त्याला दरमहा पाऊणशें रुपयांची नोकरी लागली होती. लग्न-कार्यांत त्यानें राजरोसपणें हुंडा घेतला होता व तो घेतांना "करणी," 'शिक्षणाचा खर्च' असले मुत्सद्देगिरीचे शब्द त्यानें उपयोगांत आणले नव्हते. त्याची बायको इंग्रजी पांच इयत्तांपर्यंत शिकलेली होती व स्वयंपाक चांगला करीत असे. त्याला तसें पाहिलें, तर सगळे अण्णासाहेब म्हणत. पण तो जेव्हां आपल्या लंगोटीयारांत असे तेव्हां त्याला अण्णासाहेब कोण म्हणणार ? त्या वेळीं त्याला सगळे सोन्याच म्हणत. आणि त्याला तरी त्या वेळीं आपणांला अण्णा-साहेब म्हणतात याची कोठें शुद्ध असे ? असो. बन्याबापूनें सांगितलेला वृत्तांत ऐकून त्याला जरा आश्चर्यच वाटलें. बन्याचें प्रेम "मन्या"वर बसलें ही गोष्ट बन्याच्या मित्रांना आश्चर्य वाटण्यासारखी होती. आणि प्रेम बसलें होतें म्हणजे काय अगदीं जमीनदोस्त झालें होतें—उठण्याची ताकदसुद्धां त्यांत उरली नव्हती. असें प्रेम जबरदस्त बसलें होतें. मनीची नेहमींच टर उडवणारा बन्या आतां तिची इतकी तारीफ करीत असे कीं, त्याचे मित्र अगदीं भांबावून गेले. तिच्या गालावर वास्तविक खळी नव्हती, पण पावडरींचा यथायोग्य उपयोग करून खळीचा आविर्भाव ती उत्पन्न करी. त्या खळीच्या आभासावर

बन्या असा कांहीं खूष झाला होता—पण त्या बिचाऱ्यानें काय करावें? प्रेम आंधळें असतें असें महाकविवचनच आहे.

" बन्या, तूं तर अगदीं बाउंडरी मारलीस! त्या नटव्या पोरींत पाहिलेंस तरी काय? तूंच तर तिला मन्या मन्या म्हणून तिची चेष्टा करीत होतास." सोन्यानें विचारलें.

" सोन्या, माझी साफ चुकी झाली होती. मनीसारखी मुलगी लाखांत मिळावयाची नाहीं. तिचे गुण आणि तिचें रूप दोन्हीही फार अपूर्व आहेत." बन्यानें उत्तर दिलें.

" रूप अपूर्व तर खरेंच; कारण तें "पूर्व"—पहिलें नाहींच. तें उत्पन्न केलेलें रूप आहे. आजकाल कास्मेटिक्स्‌च्या मदतीनें वाटेल तें होतें."

" म्हणजे मनी कुरूप आहे असें तुझें म्हणणें?"

" छे, छे! माझें म्हणणें इतकेंच कीं, तिचें रूप लाखांत मिळणार नाहीं असें तूं म्हणतोस तें मला पटत नाहीं. दहा मुलींसारखी किंवा शंभर मुलींसारखी तीही आहे. पण ती व्यवस्थित आहे. ठाकठीक, चांगला कपडा, आणि रंगवल्लीचा शहाणपणानें उपयोग या साधनांनीं नसलेल्या रूपाचा आव कांहीं वेळ आणतां येतो. नाहीं असें नाहीं."

" सोन्या, तुझें मत मनीबद्दल नेहमींच उलट होतें." बन्या जरा चिडून म्हणाला.

" आणि तुझें फार चांगलें होतें नाहीं?" सोन्यानें विचारलें.

" माझें काय वाटेल तें असेल. पण तें आतां बदललें. तिच्या गालावरची खळी, तिच्या ओठावरची लाली, तिच्या डोळ्यांतील चमक—पण सर्वांत विशेष म्हणजे तिचें प्रेमळ अंतःकरण—" बोलतां बोलतां बन्याची तंद्री लागली; त्याची दृष्टि अर्धोन्मीलित झाली; आणि त्या दृष्टीपुढें आपल्या त्या मोहक आणि आकर्षक प्रियकरिणीची मूर्ति त्याला दिसूं लागली. तिच्या त्या दर्शनसुखाचा आस्वाद क्षणभर घेतल्यावर त्यानें डोळे उघडले; तो देहभानावर आला; त्यानें एक उश्वास टाकला. आणि मग तो म्हणाला —" सोन्या, तिनें माझ्यावर प्रेम करावें हें माझें केवढें भाग्य आहे! मी मागें तिची केलेली चेष्टा विसरून ती आतां मजवर कितीतरी प्रेम करते. तिचें नांव मनी मला आवडत नाहीं.

मेनका हें नांव कानाला कसेंसेंच लागतें. कांहीं फिकीर नाहीं. लग्नाच्या वेळीं असें फक्कड नांव—"

" काय रे, बन्या, काका तुला किती लक्ष रुपये ठेवणार आहेत ? "

" काय तुझ्या प्रश्नाचा अर्थ ? "

" माझा प्रश्न अगदीं साधा आहे. आपल्या चुलत्याचा तूं वारस होणार आहेस ही गोष्ट पुष्कळांना कळून चुकलेली आहे. "

" असेल कळलेली ! "

" मग मनीलाही कळली नसेल असें नाहीं. "

" म्हणजे तुझें म्हणणें असें कीं, मनीचें माझ्यावरचें प्रेम मला काकांकडून मिळणाऱ्या पैशावरचें प्रेम आहे. "

" असें नसेल असें नाहीं. "

" सोन्या, तुझा मोठा गैरसमज झाला आहे. मनीची योग्यता तुला माहीत नाहीं. मनीचें अंतःकरण तुला माहीत नाहीं. तिला पैशाची मुळीं परवा नाहीं. तिला मी पाहिजे—मी निष्कांचन असलों तरी तिला पाहिजे. "

" असें ती म्हणाली कीं काय ? "

" अरे, या गोष्टी बोलून कां दाखवाव्या लागतात ? सोन्या, माझें अभिनंदन कर. माझी तारीफ कर. मला शाबासकी दे. मनीसारखी बायको मिळणें फार कठीण आहे. "

" फार कठीण आहे असें दिसत नाहीं. कारण तुला ती मिळणार आहे असें तूं सांगतोस. " सोन्या वात्रटपणानें म्हणाला.

" तूं कांहींही म्हण. " बन्याबापू बोलला. " मनी म्हणजे एक रत्न आहे. मनी म्हणजे एक स्फूर्ति आहे. मनीचा स्वभाव एकदां कळला—ती माझ्याजवळ असली कीं, मला किती बरें वाटतें—किती उल्हास वाटतो—तिची आकर्षकता कांहीं विलक्षण आहे. "

" तिची आकर्षकता विलक्षण आहे म्हणून तर मला लक्षण बरें दिसत नाहीं. " सोन्या गंभीरपणें म्हणाला.

" सोन्या, एक विचारूं तुला ? "

" बेलाशक विचार. "

" रागावणार नाहींस? चिरडीला येणार नाहींस? मारामारी करायला उठणार नाहींस?–"

" नाहीं. वाटेल तें विचार. मी चिरडीला येणार नाहीं. तूं काय विचारणार हेंही मला माहीत आहे."

" हें तुला मुळींच माहींत नाहीं."

" अगदीं बरोबर माहीत आहे. तूं मला असें विचारणार आहेस कीं, मला तुझा हेवा वाटतो ना? मनीसारखी सुंदर, तीन वेळ परीक्षेंत नापास झालेली विदुषी बायको मला मिळाली नाहीं म्हणून मला वाईट वाटते ना–?"

बन्याबापू स्तंभितच झाला. तो असलेंच कांहीं विचारणार होता. सोन्या पुढें म्हणाला:—

" पण या प्रश्नांमुळें मला चिरड येणार नाहीं. त्याचीं उत्तरें मी सरळ देईन. मला हेवा वाटत नाहीं. मला तुझ्याबद्दल काळजी वाटते. आणि मी माझ्या बायकोवर अगदीं खूष आहें. ती फार शिकलेली नाहीं पण तिला वाचनाची संवय आहे. ती स्वयंपाक चांगला करते. ती काव्यमय भाषेंत बोलत नाहीं पण गोड बोलते, ज्यांत अर्थ आहे असेंच बोलते आणि माझा संसार नीट चालवते. तेव्हां मला हेवा वाटण्याचें कारण नाहीं."

" म्हणजे मनीच्या अंगांत हे गुण नाहींत असें तुझें म्हणणें?" बन्यानें विचारलें.

" माझें तसें म्हणणें मुळींच नाहीं. माझें असें म्हणणें कांहींच नाहीं. आतां तुझें म्हणणें काय तें सांग."

" माझें म्हणणें काय असणार? या आमच्या लग्नाला काकांची संमति मिळाली पाहिजे."

" आणि नाहीं मिळाली तर?"

" ती कां मिळूं नये हें समजत नाहीं. पण जर नाहींच मिळाली तर माझा मला मार्ग पहावा लागेल. मी कांहीं काका 'नको' म्हणतात म्हणून माझ्या अंत:करणाचा संदेश झुगारणार नाहीं."

" आणि मनी—"

" मनी का आतां निराळें करणार आहे? तिला काकांच्याबरोबर लग्न करावयाचें आहे का माझ्याबरोबर? तिचें माझ्यावर प्रेम आहे—आणि प्रेमाला

कसलाही अडथळा खपत नाहीं. पण सोन्या, काका संमति काय म्हणून देणार नाहींत ?"

"मी कोठें म्हणतों देणार नाहींत म्हणून! पण दिली नाहीं तर तूं काय करणार एवढेंच मीं विचारलें."

"मी त्यांना जाऊन सगळी हकीकत सांगतों. पाहिजे तर मनीलाहि घेऊन जातों. तिला पाहिल्यावर ते संमति देतील याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. पण माझें असें म्हणणें कीं, तूं माझ्या बरोबर चल. खरें म्हणशील तर काकांची मला जरा भीतिच वाटते."

"त्यांत भीति कसली ?"

"ते जरा आहेत जुन्या मताचे. त्यांचा सुशिक्षित मुलींवर आहे जरा रोख. ते कधीं कधीं असें म्हणतांना मीं ऐकलें आहे कीं, आजकाल बिनशिकलेली मुलगी मिळण्याची मुष्कील झाली आहे, नाहीं तर आपण पुनः लग्न केलें असतें. पण तें कांहींही असलें तरी हा माझ्या लग्नाचा प्रश्न आहे. त्यांत त्यांनीं विघ्न आणण्याचें कारण नाहीं."

"ठीक आहे. मी तुझ्याबरोबर येईन पाहिजे तर. पण मी येण्यानें काय फायदा होणार तुझा ?"

"तुला जरा ते जुना समजतात. तेव्हां तूं या लग्नाची शिफारस केलीस म्हणजे त्यांची संमति जरा अधिक लौकर मिळेल."

त्याप्रमाणें ठरलें. आणखी असेंही ठरलें कीं, बन्या व सोन्या या दोघांनींच जावें; मनीनें जाऊं नये; कारण सुशिक्षित मुलगी पाहून काकांना जर राग आला तर पुनः पंचाईत व्हायची. तशीच वेळ आली तर मनीला घेऊन जावयाचें हा निश्चिय बन्यानें केला होताच.

[ ३ ]

बन्याचे काका आपल्या गांवीं रहात होते. ते सगळें गांवच त्यांच्या मालकीचें झालें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें वय पन्नाशीच्या आंत नव्हतें आणि साठीच्या पुढें नव्हतें. पण त्यांच्या पिळदार शरीरावर आणि पाणीदार चेहऱ्यावर त्यांच्या वयाचा मागमूसही लागत नसे. एवढी धनदौलत पदरीं असतां त्यांनीं पुनः लग्न कां केलें नाहीं असें कोणासहि वाटणें अगदीं साहाजिक

आहे. तसें म्हटलें तर, त्यांनीं एकंदर चार लग्नें केलीं आणि मग ते कंटाळले. ते जुन्या वृत्तीचे, धार्मिक बाण्याचे म्हणून प्रसिद्ध असत. बन्याबापू त्यांचा पुतण्या व त्याच्यावर काकांची मोठी कृपा होती यांत शंका नाहीं. कॉलेजच्या खर्चाला लागतील तितके पैसे काकांनीं दिले. तेव्हां अर्थात् तो काकांचा वारस होणार हें सर्वतोमुखीं झालें. कांहीं लोक म्हणत कीं, काका तसे कांहीं म्हातारे नाहींत आणि ते तसे म्हातारे नव्हतेच. ते म्हणतच कीं, माझ्या आंगांत या वयांत जी धमक आहे ती आजच्या विशी–पंचविशीच्या घरांत असणाऱ्याजवळ नाहीं. पण आतां आठ वर्षें ते विधुरावस्थेंत होते, तेव्हां लग्न न करणाचा त्यांचा निश्चय आहे हें सर्वांना कळून चुकलें होतें. त्यांना शिक्षण जरूरीपुरतें मिळालें होतें. शेतकी खातें किंवा को–ऑपरेटिव्ह खातें यांतील साहेबांशीं ते बोलत चालत. कलेक्टरसाहेबांशींही त्यांची मुलाखत वेळीं प्रसंगीं होई. त्यांना एखादी पदवी मागें पुढें मिळेल अशी सार्वत्रिक अपेक्षा होती. साधारण ज्यांत विशेष भानगडींत येण्याचा संभव नाहीं अशा कांहीं चळवळींत ते भाग घेत. एका प्रसिद्ध गृहस्थाचा साठावा वाढदिवस समारंभानें करून त्याला थैली देण्याचें ठरलें; तेव्हां काकांनीं एकावन्न रुपये त्या थैलींत दिले होते. व्यायामपरिषदेंत ते लक्ष घालीत. नमस्कारांच्या सामन्यांत त्यांनीं बक्षिसें लाविलीं होतीं. गोरक्षण फंडाला ते दर महिन्याला सव्वा रुपया देत. केतकरांचा ज्ञानकोश त्यांनीं विकत घेतला होता. महाभारताच्या एका भाषांतराला त्यांनीं एका प्रतीचा आश्रय दिला होता. गांवांत गाणें बजावणें झालें कीं तें त्यांच्याच घरांत होत असे–तेव्हां शंभर शंभर माणसांनासुद्धां ते कॉफी पाजीत. भूकंप फंडाला आणि जुबिली फंडाला त्यांनीं देणग्या दिल्या होत्या. पंचांगशोधन कमिटीचें पंचांग ते वापरीत आणि साहित्य परिषदेचे ते सभासद होते. तिचें त्रैमासिक ते गांवांतल्या वाचनमंदिराला देत.

असे आमच्या बन्याबापूचे काका होते. आणि बन्या व सोन्या एके दिवशीं उठून त्यांना भेटण्यास गेले. सोन्या बन्याबरोबर पूर्वी दोन तीन वेळां काकांच्या गांवीं गेला होता, तेव्हां काकांची आणि त्यांची चांगली जानपछान होती. शिवाय काका सुखानें राहणारे गृहस्थ होते आणि आल्यागेल्याची बरदास्त ते चांगली राखीत. त्यांनीं लोकमान्य टिळकांना एकदां श्रीखंडपुरीची मेजवानी दिली होती व श्रीशंकराचार्यांना एकदां पुडीला बोलावलें होतें. बन्या तर घरचाच होता

आणि सोन्या त्याचा परम मित्र असल्यामुळें तो घरच्यासारखाच होता. गेल्या दिवशीं जेवण झाल्यावर काकांना कांहीं काम होतें तें आटोपून परत येण्याला त्यांना रात्र झाली, त्यामुळें त्या दिवशीं कांहीं बोलणें झालें नाहीं. पण सोन्याला बन्यानें काकांच्या शेतांतून फिरविलें; तसें फिरण्याचा सोन्याचा कांहीं अगदीं पहिला पसंग नव्हता. शेतांतून कांहीं ताज्या भाज्या व फळें ते घेऊन आले. रात्रीं जेवण झाल्यावर त्या दोघांचीही वृत्ति फार उल्हासित होती. दुसरे दिवशीं सकाळीं चहापाणी झाल्यावर काकांनीं आपली गुडगुडी चालू केली—ते एकदां काशीयात्रेला गेले होते, ते येतांना ही तिकडची चीज घेऊन आले होते—व मध्येंच ते म्हणाले—" काय सोनू, काय कमीअधिक काय आहे? पुण्याकडे काय म्हणे परवां एका ब्राह्मणाच्या मुलीनें एका अस्पृश्याबरोबर लग्न केलें! आणि त्याला म्हणे गांधींची संमति होती!"

सोन्याला वाटलें आणि बन्याबापूलाहि वाटलें कीं, आपला विषय काढायला संधि बरी आहे. बन्यानें सोन्याला हळूंच डिवचलें, तेव्हां जरा घसा साफ करून तो म्हणतो—" काका, ते पुण्यांतले लोकच चमत्कारिक; कसलीं लग्नें करतील आणि किती वेळां लग्न करतील याचा कांहीं नियमच उरला नाहीं."

" आणि मुंबईंत तरी काय तेंच!" काका म्हणाले.

" मुंबई काय आणि पुणें काय! दोन्हीं सारखींच!" सोन्या म्हणाला— " फक्त मुंबईंत पाऊस अधिक पडतो आणि पुण्यांत थंडी अधिक पडते."

" मला बुवा हीं अलिकडचीं लग्नें अगदीं पसंत नाहींत. मुळीं वडील माणसांना पत्तासुद्धां लागूं देत नाहींत. एक दिवस मुलगा येतो बरोबर एका बाईला घेऊन आणि सांगतो ही माझी बायको!"

सोन्या आणि बन्या दोघेही चपापले. काकांना कांहीं सुगावा लागला आहे कीं काय, अशीही त्यांना शंका आली. पण काकांना सुगावा लागणें मुळीं शक्यच नव्हतें. पुण्यांतल्या कितीहि बातम्या बाहेर कळल्या तरी कोण कोणावर प्रेम करतो या बातम्या ज्ञानप्रकाशच्या बातमीदारांनासुद्धां समजणें शक्य नाहीं. सोन्या हळूच म्हणाला, " काका, बन्याची एका मुलीशीं लग्न करण्याची इच्छा आहे."

काकांनीं गुडगुडी काढून खालीं ठेवली. डोळ्यावरचा चष्मा सावरून नीट बसविला. तीक्ष्ण दृष्टीनें—अलिकडच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे भेदक दृष्टीनें—

एकदां आपल्या पुतण्याकडे पाहिलें आणि मग त्याच्या मित्राकडे पाहिलें आणि मग ते म्हणाले–" काय म्हणतोस, सोन्या ?"

सोन्या पुनः म्हणाला–" बन्याची एका मुलीशीं लग्न करण्याची इच्छा आहे ?"

" बन्याची ? एका मुलीशीं ?" काकांनीं अगदीं गंभीर मुद्रेनें विचारलें. मग ते हंसूं लागले. आपण कांहीं तरी फक्कड कोटी केली असें वाटून ते हंसूं लागले. पण सोन्याला त्यांच्या हंसण्याचा अर्थ कळेना, बन्याचा तर धीर सुटला. काका असे काय वेड्यासारखे हंसतात असेंही त्याला वाटलें. धीर धरून तोच म्हणाला–" काका, माझें एका मुलीवर प्रेम बसलें आहे."

" प्रेम बसलें आहे ?" काका आश्चर्यमुद्रेनें म्हणाले. " म्हणजे काय भानगड आहे बुवा ? आम्ही चार चार लग्नें केलीं पण प्रेम बसण्याबिसण्याची भानगड आम्हांला नव्हती माहीत. मुलगी–म्हणजे मुलगीच आहे ना ? नाटक–सिनेमांतील एखादी नटी नाहीं ना ?"

" छे, छे, तसें कांहीं नाहीं. चांगली घरंदाज घराण्यांतली मॅट्रिक पास झालेली आणि कॉलेजांत दोनतीन वर्षें घालवलेली अशी मुलगी आहे." सोन्यानें सांगितलें.

" म्हणजे वय काय तिचें ?" काकांनीं विचारलें.

" वय तसें फार नाहीं. विशीच्या आंतबाहेर"

" आंत कां बाहेर ? आणि बाहेर म्हणजे किती बाहेर ?" काका म्हणाले. " माझी चौथी बायकोसुद्धां लग्नाच्या वेळीं तेरा वर्षांची होती."

" पण काका तेव्हां शारदा कायदा नव्हता." सोन्यानें माहिती दिली.

" शारदा कायदा झाला म्हणजे का म्हातारीशीं लग्न लावलें पाहिजे ?" काका बोलले.

" पण काका वीस वर्षांची मुलगी म्हातारी कशी होईल ?" बन्याबापूनें विचारलें.

" मग म्हणणें काय तुझें ?" काकांनीं विचारलें.

" त्याचें दुसरें म्हणणें काय असणार ?" सोन्या म्हणाला, " आपली लग्नाला संमति हवी."

" माझी संमति हवी ? मी मुलगी पाहिली नाहीं, तिचें नांवगांव मला माहीत नाहीं, ती मॅट्रीक झालेली आणि कॉलेजांत गेलेली म्हणजे जरा विचार

केला पाहिजे. या शिकलेल्या आणि वाढलेल्या मुलीशीं लग्नें लावतांना फार विचार करावा लागतो. आमची गोष्ट निराळी होती. आमच्या वेळीं लग्नाचा एवढा विचार करावा लागत नसे— "

" काका, या मुलीवर माझें अतिशय प्रेम आहे, तिचेंही माझ्यावर फार प्रेम आहे. आणि ती फार चांगली आहे, तिचें नांव मेनका—"

" तिचें नांव मेनका ? आणि मेनका नांवाच्या मुलीशीं कां तूं लग्न लावणार ? छे, छे, आपल्याला हें मुळींच पसंत नाहीं ! "

" काका, पण तिला सगळे मनी म्हणतात ! " बन्याबापू काकुळतीला येऊन म्हणाला. " मनी या नांवाला तरी तुमची हरकत नाहीं ना ?

" माझी हरकत नाहीं म्हणून तुला कुणी सांगितलें ? मनी हें का माणसाचें नांव आहे ? हें नांव मांजराचें आहे ! बस्स्, आपल्याला हें नांव मुळींच पसंत नाहीं. मनी नांवाच्या मुलीशीं का कोणी लग्न करतात, वेड्या ? तूं एवढा खुळा असशील हें मला माहीत नव्हतें. "

" पण काका आपल्या घरीं आल्यावर तुम्ही वाटेल तें नांव तिला ठेवा ! " बन्या म्हणाला.

" मी बायकांना नांवें ठेवण्याचा धंदा करीत नसतो. " काका बोलले आणि मोठ्यानें हंसूं लागले.

त्यांनीं केलेली कोटी सोन्याला लागलीच कळली आणि तो हंसूं लागला. आणि बन्याचे डोळे जरी पाण्यानें भरत आलेले होते, तरी त्यालाही हंसूं आलें. शेवटीं काका म्हणाले–" पोरांनो, अरे मी मुलगी पाहिल्याशिवाय आणि कांहीं चौकशी केल्याशिवायच का संमति देऊं ? "

" तसें नाहीं आमचें म्हणणें, " सोन्या म्हणाला; " बन्यानें फक्त हें आज तुमच्या कानावर घातलें आहे. तुमची इच्छा असेल तर मुलगी पहा. ती तुम्हांला पसंत पडेल अशीच आहे. "

" ठीक आहे. मी उद्यां तुमच्याबरोबर पुण्याला येतों. मुलगी पाहीन. तिच्या कुलशीलाची चौकशी करीन. तिचा बाप, हुंडा, मानपान, करणी—"

" काका, मला हुंडा नको, मानपान नको, करणी नको, कांहीं नको—" बन्या म्हणाला.

" तुला फक्त बायको पाहिजे ! अलीकडचीं पोरें फारच उल्लू बुवा ! आम्हीं चार चार लग्नें केलीं पण असे उल्लू नव्हतों बनलों. चौथ्या लग्नांतदेखील मी अडीच हजार रुपये हुंडा घेतला —"

याप्रमाणें ठरलें. दुसरे दिवशीं जेवणखाण आटोपल्यावर सोन्या, बन्या आणि काका हे त्रिकूट पुण्याला जावयास निघालें. मनीची याप्रमाणें वधूपरीक्षेची वेळ आली.

[ ४ ]

काकांनीं मनीला पाहिली. वधूपरीक्षेचें ठिकाण सोन्याचें घर होतें, हें सांगावयास नकोच. काका बराच वेळ विचार करून म्हणालेः—" मला या लग्नाला संमति देतां येत नाहीं."

आकाशांतून वीज पडावी तशी अवस्था बन्याची झाली. सोन्यालाही आश्चर्य वाटलें. आतांपर्यंतच्या एकंदर रंगावरून काका असें कांहीं करतील ही त्याला कल्पनाही नव्हती. काका म्हणाले—" नाहीं म्हटलें, तरी माझें जमीनजुमल्याचें वार्षिक उत्पन्न आठदहा हजारांचें आहे. त्या शिवाय सावकारी आहे ती निराळी. जवळ जवळ दोन लक्ष रुपये माझे ब्यांकेंत आहेत, किंवा सावकारी कागदपत्रांत आहेत. तुला बन्या, माझ्याशिवाय कोणी नाहीं. तुझें कल्याण करणें माझ्या हातीं आहे. तुला एक छदामही न देणें माझ्या हातीं. माझी सगळी दौलत स्वार्जित आहे. लग्न ठरविण्यापूर्वीं माझी संमति मिळेल कीं नाहीं याचा विचार तूं केलास नाहींस."

" म्हणजे तुम्ही या लग्नाला संमति देत नाहीं ?" बन्याबापूनें विचारलें.

" माझ्या बोलण्याचा दुसरा अर्थ कांहींही होऊं शकत नाहीं." काकांनीं उत्तर दिलें.

" पण तुम्हीं मनींत वैगुण्य काय पाहिलें ?"

" तिच्यांत वैगुण्य कांहींच नाहीं. पण तुझें तिच्याशीं लग्न होण्यांत अर्थ नाहीं. तुला ती बायको योग्य दिसत नाहीं. निदान तूं तिला नवरा योग्य नाहींस"

" मग तुम्ही हें माझें लग्न व्हावें या गोष्टीला तयार नाहीं ?" बन्याबापूनें विचारलें.

" मी हें लग्न होण्याच्या अगदीं विरुद्ध आहें."

"पण आमचें ठरलें आहे." बन्या म्हणाला.

"मीहि ठरविलें आहे." काकांनीं सांगितलें.

"आणि तुमच्या इच्छेविरुद्ध मी लग्न या मुलीशीं केलें तर?--"

"माझें म्हणणें ऐकल्यावर तुझ्याशीं लग्न करण्याला तयार होण्याइतकी ही मुलगी खुळी आहे असें मला वाटत नाहीं. आतांपर्यंत तरी ती कशी तयार होती याचाच मला चमत्कार वाटतो. पण जर कदाचित् ती तुझ्याशीं लग्न लावण्याला तयार झाली, तर तुझा माझा संबंध लग्न ठरतांच नाहींसा होईल."

"पण काका, मला तुमच्या पैशांची परवा नाहीं." बन्याबापूनें सांगितलें.

"फार उत्तम," काका म्हणाले. "आजपर्यंत मी तुझ्यासाठीं हजारों रुपये खर्च केले ते परत मागणार नाहीं. पण यापुढें तुला एक दिडकीदेखील मी देणार नाहीं."

बन्या क्षणभर विचारांत पडला. त्यानें एकदां मनीकडे पाहिलें, एकदां काकांकडे पाहिलें. मनी टाकावी कां काकांची संपत्ति टाकावी; हा पेंच त्याच्यापुढें येऊन पडला होता. शेवटीं त्यानें निश्चय केला; त्याच्या मुखावर तजेला चढला; त्याच्या डोळ्यांत नवीन पाणी चमकूं लागलें; त्याच्या दंडांत नवीन बळ आल्यासारखें दिसलें; त्याची छाती देखील थोडीशी वर आली. मग तो म्हणाला:—"काका, तुमचे मजवर फार उपकार आहेत. पण तुमच्या पैशाच्या लोभानें माझ्या प्रेमाची अवहेलना करण्याला, माझ्या अंतःकरणाच्या हांकेला बधीर होण्याला, माझ्या भावना पायांखालीं तुडविण्याला मी कधींही तयार होणार नाहीं. मनी जवळ असल्यावर मला झोंपडी राजवाड्यासारखी वाटेल, आणि साधी भाकरी पक्वान्नांपेक्षां अधिक वाटेल." असें म्हणून त्यानें प्रेमपूर्ण दृष्टीनें मनीकडे पाहिलें. ती कांहीं बोलली नाहीं. तिची दृष्टि खालीं होती, त्यामुळें त्या वेळीं बन्याच्या नेत्रांत ओतप्रोत भरलेली प्रणयाची भावना तिला दिसली नाहीं. ती बोलेल असें बन्याला वाटलें होतें. पण ती कांहींही बोलली नाहीं.

शेवटीं काका म्हणाले—"बन्या, तूं फार चांगलें भाषण केलेंस. कुठल्या तरी नाटकांत तें मला केव्हां तरी ऐकल्यासारखें वाटतें. पण फार चांगलें बोललास त्याबद्दल मी एवढेंच करतों कीं, तुझी कायद्याची परीक्षा पसार होईपर्यंत मी तुझा खर्च देईन. अर्थात् ती परीक्षा दोन वर्षांतच झाली पाहिजे. तुझा निश्चय

मला पसंत नाहीं. तुझें लग्न चांगलें जमवावें व स्वतः थाटामाटानें करावें अशी माझी इच्छा होती; पण तुझी तशी इच्छा नाहीं. तुझी मर्जी ! अलीकडच्या काळचीं तुम्हीं पोरें हट्टी फार. तुम्ही उल्लूही फार. लग्नासाठीं जसे कांहीं हपापलेले. आम्हीं चार चार लग्नें केलीं पण असे उल्लू आम्ही कधीं झालों नव्हतों. ठीक आहे. मी आतां येतों. मेनकाबाई, झाल्या प्रकारांत तुमच्याकडे कसलाही कमीपणा नाहीं. तुम्ही मला सर्व प्रकारें पसंत आहां, पण आमच्या बन्याला बायको म्हणून मात्र पसंत नाहीं. त्याला आतां माझ्याकडून कांहीं मिळणार नाहीं, हें लक्षांत ठेवून तुम्ही आपण काय करायचें तें ठरवा. तुमचें त्याच्याशीं लग्न झालें, तो माझ्या संपत्तीला मुकला म्हणजे तुम्हीही संपत्तीला मुकलां—"

"काका," बन्या उद्गारला. "मनी कांहीं माझ्या पैशावर नजर ठेवून बसली नव्हती."

"तुझ्याजवळ पैसाच नाहीं तर त्यावर कोणाची नजर कशी बसणार ?" हा शेवटचा टोला देऊन काका बाहेर पडले. त्या धांदलींत बिचाऱ्या सोन्याला चहा देण्याची देखील आठवण झाली नाहीं. झाल्या प्रकाराबद्दल बोलण्यासारखें कांहीं नव्हतेंच. त्याच दिवशीं संध्याकाळीं बन्यानें मनीची गांठ घेतली. तो म्हणाला— "मने, हा प्रकार झाला तर काय करावयाचें हें आपण ठरविलें आहे."

"माझें डोकें अगदीं सुन्न झालें आहे, मला कांहीं सुचत नाहीं. या विषयावर आतां बोलण्याला मी मुळींच तयार नाहीं."

"पण आतां बोलण्याचें काम आहे कोठें ? आतां कोणाची वाट पाहण्याचाही प्रश्न नाहीं. लग्न केव्हां करावयाचें एवढेंच ठरवावयाचें; काकांच्या नाकावर टिच्चून मी लग्न करणार, सोडणार नाहीं. मला काका काय समजले ?"

मनी कांहींच बोलली नाहीं. या वेळीं तिच्या शब्दांची बन्याला फार जरूर होती. या वेळीं त्याला अपेक्षा होती, कीं ती आपल्याला जवळ करील, कुरवाळील, प्रेमाचें आश्वासन देईल; आपल्या अश्रूंत तिचे अश्रू मिसळतील; आपण दोघें मिळून संसार करूं, या दुनियेशीं टक्कर मारूं, असें ती सांगेल. पण ती मुळीं बोललीच नाहीं. हाच अनुभव बन्याला पुढें एक आठवडाभर आला. त्यानें रोज तिला भेटावें व तें भेटणें फुकट जावें. पुढें ती कोठें गांवाला गेली म्हणून त्याला समजलें. ती गेली ती चार आठवडे गेली. बन्या बिचारा तळमळत होता. ती कोठें गेली, हेंही त्याला माहीत नव्हतें. पत्रांत आपलें

अंतःकरण ओतण्याचा मार्गही त्यामुळें त्याला खुला नव्हता. सोन्या त्याला एकदां म्हणाला--" बन्या, त्या पोरीचा नाद सोड. तुझ्यासारख्या दरिद्र्याबरोबर ती कसची लग्न लावते !" तेव्हां बन्याचें आणि सोन्याचें कडाक्याचें भांडण झालें. आठ दिवस ते बोलले नाहींत. पण एक दिवस काकांचें पत्र आलें त्यांत पुढील मजकूर होताः--

" चि. बन्याबापू यास, अ. आ. वि. वि. तुमच्याकडून पुष्कळ दिवसांत पत्र नाहीं, हें बरें नव्हे. पत्र पोंचतांच चार दिवस इकडे राहण्यास यावें. आतां घरांत मंडळी आहेत. कळावें, हे आशीर्वाद. काका."

त्या पत्राचा अर्थ उमगेना म्हणून लावून घेण्यासाठीं बन्याबापू सोन्याकडे गेला. सोन्या म्हणालाः--" मीही तुझ्याबरोबर येतों. तेथें प्रत्यक्ष गेलें म्हणजे सर्व कांहीं आपोआपच उमगेल."

मी व सोन्या दोन दिवसांत येतों असें बन्यानें काकांना पत्र लिहिलें व त्याप्रमाणें ते काकांकडे गेले.

स्टेशनपासून काकांचें गांव आठ मैल होतें. तेथून टांगे मिळत. एखादी बसही असे. पण आज बन्या चकित झाला. त्याला नेण्यासाठीं मोटारगाडी आली होती. काकांनीं मोटार केव्हां घेतली म्हणून बन्यानें विचारलें, तर पंधरा दिवस झाले असें त्याला कळलें. पण त्या आश्चर्यकारक दिवसाची ती नुसती सुरवात होती. घरीं गेल्यावर मोटारींतून बन्या व सोन्या खालीं उतरले. बन्याबापू सामान पहात होता. त्याला जोरानें डिवचून सोन्या म्हणतो—" बन्या, बन्या, तें पहा--"

बन्यानें वळून पाहिलें. व्हरांड्यांत हास्यमुखानें मनी उभी होती. बन्या चकित झाला. त्याला कांहीं समजेचना. तो मोठ्यानें म्हणाला, "मने, तूं इकडे कुठें?"

त्या प्रश्नाला उत्तर काकांनीं पुढें येऊन दिलें. " बन्या, " काका म्हणाले; " वडील माणसांशीं कसें बोलावें हें तुला अजून समजत नाहीं. अजून तुझा पोरकटपणा गेला नाहीं—"

" पण मी मनीशीं बोलत होतों—"

" पुनः तेंच. तिला मनी म्हणूं नकोस. ती तुझी काकू आहे. तिच्या पायावर डोकें ठेवून तिला नमस्कार कर—"

" म्हणजे ? " बन्याचे पाय लपटपले. सोन्यानें त्याला सांवरलें व तो जवळ असलेल्या खुर्चींत कसाबसा बसला. " म्हणतां काय तुम्ही, काका ?"

" अरे, ते दुसरें काय म्हणणार, बन्या ? " मनी हंसत हंसत म्हणाली, " तीन आठवड्यांपूर्वी आमचें लग्न झालें !—"

" मी म्हणत होतों—" काका म्हणाले, " कीं, चांगलें थाटामाटानें करूं. हो, माझें पांचवें असलें तरी हिचें पाहिलेंच कीं नाहीं ? असा खुळ्यासारखा काय पहातोस, रे बन्या ?"

" बन्या तसा जरा खुळाच आहे, बरं का ! " मनी म्हणाली, " एवढ्या लौकर लग्नसुद्धां करायला उभा राहिला होता. पण कांहीं झालं, तरी आपलंच पोर आहे, सांभाळून घेतलं पाहिजे. "

" तुझी काकू फार शहाणी आहे बरें, बन्या. " काका स्निग्ध दृष्टीनें पत्नीकडे पहात म्हणाले.

बन्या हळू हळू उठला. चिमण्या चिंवचिंव करीत होत्या; वारा वहात होता; वेळ शांत होती; काळ गंभीर होता; बन्या बापू थंडगार झाला होता. तीन पेले च्हा प्याला, तेव्हां तो हालचाल करूं लागला.

' जीते रहो, बन्या, ' सोन्या म्हणाला. ' तुझ्या प्रेमाच्या उदाहरणांत भाग बरोबर लागला नाहीं. बाकी उरली—आणि बाकी उरली काकी ! '

बन्या हंसूं लागला. किती तरी वेळ तो हंसत होता !

**महाराष्ट्र शारदा**, ऑगस्ट १९३५.

## ताजमहालाच्या मनोऱ्यांतून-

सविता उदया येउनि जरि होता एक लोटला प्रहर,
साम्राज्य पसरलेलें शैत्याचें तरिहि सर्व अवनिवर ॥ १ ॥

पाहुनि ताजमहाला तोषवुनी नयन, त्या मनोऱ्यांत
गेलों, चढलों वरती, येती नाना तरंग चित्तांत ॥ २ ॥

ताजमहालाभंवतीं चार मनोरे जणों कळवताती
वरच्या तेजोगोलां प्रणयाची दिव्य येथल्या शक्ति ॥ ३ ॥

दमलों, श्रमलों जातां परि चित्ता वाटलें समाधान
तें तुंग शृंग चढतां, क्षणभर गेलेंचि वाटलें भान ॥ ४ ॥

खालीं खोल पसरली कालिंदी वर्ण दे जिचा स्मरण
भगवान् श्रीकृष्णाचें, जो, वदती, नाशितो जनन-मरण ॥ ५ ॥

डावीकडेसि होता आग्र्याचा दुर्ग जेथ नृपतितति
ऐश्वर्यें शोभविती, स्मर्तव्यचि होय आजि केवळ ती ॥ ६ ॥

विश्वांतिल सौंदर्यें मेळवुनी निर्मिलें गमे स्थळ तें,
गतविभवाचें परि हें स्मशान जाणोनि चित्त हळहळतें ॥ ७ ॥

यमुना खरीच भगिनी यमधर्माची म्हणोनियां वाटे,
तीरीं जें जें होतें वैभव गेलेंचि बंधुच्या वाटे ॥ ८ ॥

जैशीं विस्तीर्ण तटीं यमुनेच्या जाहलींत भस्म शतें
प्रेताचीं, त्याचपरीं साम्राज्यें कितिक, मानसा गमतें ॥ ९ ॥

जो सौंदर्यनिकेतन विश्वीं विख्यात ताज हा भव्य
रमणीयतागुणानें प्रतिदिनिं वाटे जनांसि जो नव्य ॥ १० ॥

तो या गतविभवाच्या स्मशानभागांतलीच रक्षा जी,
जरि वच बहु कटु वाटे रसिकां, तरि या क्षमा करा आजी ॥ ११ ॥

प्रणयाची परि रक्षा रक्षाया बांधला महाल खरा
म्हणुनीच रम्यतेनें पावित्र्यें वा जगीं नसे दुसरा ॥ १२ ॥

प्रेमाच्या साम्राज्यीं कालाचा काय चालतो पगडा ?
प्रेमाच्या दिव्यबळें पाझर फुटतो प्रसिद्ध हें दगडा ॥ १३ ॥
पाषाणावरि ठेवुनि पाषाणचि भव्य ताज हा झाला
परि सौंदर्यगुणानें अखिल जगीं ऐकिला नसे असला ॥ १४ ॥
कारण कीं कविवरही लिहूं न शकतां विशुद्ध जें प्रेम
नृपवर शहाजहानें लिहिलें तें येथ दिव्य निस्सीम ॥ १५ ॥
ती खनि सौंदर्याची मुम्ताजमहाल आणखी नृपति
येथ पहा भूमितलीं काळमुखीं स्वस्थ सुप्त तीं असतीं ॥ १६ ॥
परि अन्योन्य प्रेमा दिव्य अमर जो तदीय हृदयांत
गंगौघापरि वाटत होता, जो प्रकट सर्वदा येथ ॥ १७ ॥
तेणेंचि या महाला स्वर्गोपम पावली असे शोभा !
या मर्त्य मृत्तिकेला अथवा मिळणार काय दिव्या भा ? ॥ १८ ॥
प्रेम असे दिव्य म्हणुनि दिव्यत्वा ताज पावला आहे !
अथवा शशिकिरणधवल हास्या पाषाण कायसा लाहे ॥ १९ ॥
ऐसे तरंग चित्तीं त्या समयीं विविध माझिया आले,
बाह्य जगाचें भानहि, होउनि मम वृत्ति तन्मया, नुरलें ॥ २० ॥

उद्यान, डिसेंबर १९१३

## मागें कीं पुढें ?

सायंतनीं सुखानें हिंडत त्या टेकडीवरी चढलों ।
मिळवुनि करीं तुझ्या कर विचार करण्यांत तेधवा गढलों ॥ १ ॥
अस्ताचलासि होता जात हळु हळू तदा सख्या तरणी ।
चित्रें गतकालाचीं उभीं राहिलीं कितीक तीं स्मरणीं ॥ २ ॥
“ सांग सख्या नव्हतों का आपण रे बाल एकदां सान
खेळांचें गोष्टींचें केवळ जें नित्य आपणां ध्यान ॥ ३ ॥
अन्योन्य प्रेमाचा होता जेव्हां बहार फार खरा ।
चित्तीं निर्मलतेचा होता संतत वहात शुद्ध झरा ॥ ४ ॥

मोठें व्हावें ऐशी होती जेव्हां मनीं सदा आस ।
जें जें थोर करीती तेंच करावें असा जिवा ध्यास ॥ ५ ॥

पागोटें घालावें वडिलांचें आणि त्यापुढें जावें ।
आम्हीच थोर झालों म्हणुनी होवोनि दंग नाचावें ॥ ६ ॥

तें शैशव सरुनीया गेलें आतां कुठोनि गा परतें ।
आम्हां न कळेचि कसें भराभरा आयु नित्य हें सरतें ॥ ७ ॥

बाल्याचें सुंदरसें गेलें उद्यान, आणि कानन हें ।
तारुण्यरूप दुर्धर आम्हांला प्राप्त जाहलें आहे ॥ ८ ॥

संसारसागराच्या तीरावरुनीच नेत्र फिरतात ।
आदळणाऱ्या लाटा चित्तांतिल धैर्य सर्व हरतात ॥ ९ ॥

आतांचि लागलें रे वाटाया बाल्य तें जरी असतें ।
तरि बहु खासें होतें; संसाराब्धींत डुंबणें नसतें ॥ १० ॥ ”

ऐकुनि हें वच माझें स्कंधीं ठेवूनि हात सखयानें ।
मम वदना निरखुनियां केलें स्मित हास्य तेधवां त्यानें ॥ ११ ॥

बोले प्रेमभरानें “ प्रस्तुत संकटपरंपरा आली ।
तुजवरती त्यायोगें बुद्धि तुझी, वाटते मला, भ्याली ॥ १२ ॥

प्रेम तुझें बाल्यावरि किंवा भय संसृतींत शिरण्याचें ।
शांति तुला प्रिय वाटे किंवा भय थोर युद्ध करण्याचें ॥ १३ ॥

मी भक्त शांततेचा ऐसें जो संगरांगणा भ्याला ।
तेणें नच बोलावें शोभा त्या वल्गनेंत नच त्याला ॥ १४ ॥

शस्त्र करीं झेंपेना म्हणुनी कां कंकणासि वानावें ।
ती स्तुति न कंकणाचीं तर त्याला ठेवणें असें नांवें ॥ १५ ॥

जें बाल्य सरुनि जाई, येई संसारसंगरीं शिरणें ।
स्तवणें तद्भय वाटुनि, बाल्याची गर्हणाच तें करणें ॥ १६ ॥

आहेचि बाल्य सुंदर, त्याला देतील साक्ष सर्व कवी ।
परि फल त्याचें यौवन पुरुषार्थ करावयास जें शिकवी ॥ १७ ॥

त्याचेंचि बाल्य सुंदर जो शिकला हरिपराक्रम कराया ।
तारुण्यीं; व्यर्थ इतर लालित ते भूमिभार कीं व्हाया ॥१८॥ ”

ऐकुनि मनीं विरमलों–सखयाचें बोलणें कळेना तें ।
तें तुल्य योग्यतेचें वाटे होतेंचि संपलें नातें ॥ १९ ॥

खिन्न वदन करुनीयां त्याला पुनरपि विचारिलें “ बा रे ।
तत्त्वज्ञान ऐकिलें आजवरी फुकट काय तें सारें ॥ २० ॥”

हांसुनि बोले, “ कैसें तारुण्यांतुनि निघेल शैशव गा ।
सृष्टिक्रमाविरुद्धचि या इच्छेला जगीं नसे जागा ॥ २१ ॥

जें जें फिरवी मागें अज्ञानचि तें नव्हे कदा ज्ञान ।
चाल पुढें, ठाक उभा, निर्भय हो, योग्यता न तव सान ॥ २२ ॥

मागें पुढें न कळतें परि ठावें जेवढें असें कांहीं ।
त्यांत पुढें जाणें या तत्त्वाविण तत्त्व गा दुजें नाहीं ॥ २३ ॥”

संवाद अझुनि सखया आहे चित्तांत माझिया जागा ।
परि मूढाला मजला त्याचा अर्थ न कळे महाभागा ॥ २४ ॥

उद्यान, एप्रिल १९१४

---

## भयभीताचे उद्गार

मेघांनीं भरलें असे गगन हें लोपोनियां तारका
झाल्या सर्व दिशा तमिस्रमय या, नेत्रां दिसेना पुढें; ।
जैशी दैत्यमुखांत चंड भयदा ती शुभ्र दंतावलि
विद्युत् ही चमके तशी कडकडे– मी त्रस्त झालों मनीं ॥ १ ॥

आधीं या गहनीं वनीं अशरणीं मी एकटा सांपडे;
त्यामाजीं घनकृष्णकांतिकलिता ही यामिनी भीषणाः ।
वाटे जी गगनांत कर्कशरवें सौदामिनी संचरे
ती आतां मम मस्तकीं पडुनियां ग्रासील मातें पुरी ॥ २ ॥

शंका व्यर्थ कशास तें दिसतसे होणार जें निश्चित;
याची दुर्गम काननीं मरण ही देणार विद्युल्लता ।
हीचा दुःस्वन येत कर्णविवरीं फोडोनिया अंबरा;
कैसा पामर हीन दिन लघु मी वांचेन या संकटीं ॥ ३ ॥

मी संचार करीत या घनवनीं, साहाय्य कोणी नसे;
सिंहव्याघ्रपशुस्वन श्रवण म्यां केलें धरोनि धृति ।
कांटे हे अतितीक्ष्ण बोंचति परी तें दुःखही साहिलें
कीं हें कानन संपुनी सुपदवी येईल केव्हां तरी ॥ ४ ॥

जीं कांहीं पडतीं तरूवरुनियां थोडीं फळें खालतीं
तीं सेवूनिच मार्ग हा क्रमियला ठेवोनि दृष्टी पुढें; ।
नौका ही मम या भयानकरसामाजीं जरी लोटिली
वल्हें हास्यचि घेउनी हळुहळू हांकारिली मी तरी ॥ ५ ॥

ऐसा मी असहाय दीन जन या संचारतां काननीं
गेले वासर यामिनी कितिक त्या त्यांची कशाला स्मृति ? ।
भास्वान् इंधन वर्षला स्वकिरणीं, तैशी त्रियामा तम ।
त्या कालासहि कंठिलें निवडुनी दुःखांतरीं मी सुख ॥ ६ ॥

केव्हां चंडतरें दिवाकरकरें संतप्त होई तदा
वृक्षासन्निध मी परोपकृतिचें गेलों पहाया व्रत ।
केव्हां इंदुकला दिसोनि सकला आल्हादलों अंतरीं;
केव्हां विस्तृत विश्व म्यां निरखिलें पाहोनियां तारका ॥ ७ ॥

आतां ही परि चंचला कटुरवा सौदामिनी राक्षसी,
तीचें साह्य करावयास्तव निशा नीलांबरा निर्घृणा ।
झांकोनी बसली समस्त अपुले ते तारकादीप हो,
तीनें नेत्र मदीय झांकुनि तसें अंधत्व मातें दिलें ॥ ८ ॥

यांचा हेतु असेल काय दुसरा घाताविणें माझिया ?
कां हे मालविते प्रकाश ? नयना कां झांकिते हे मम ?
जे केले अवघे मनोरथ मनांमाजींच ते ठेवणें,
त्यांना ते कृतिरूप अश्व कुठले ? त्यांची गती खुंटली ॥ ९ ॥

नाहीं दुःख मनीं सुखें कवळण्या विद्युल्लता भीषणा;
भस्मीभूत जरी मनोरथ तरी त्यांची न मातें क्षिति;।
ज्यांचें जीवन या जनावरिल तें निर्हेतुक प्रेमची
त्यांचें होइल काय येउनि मनीं--उद्वेग वेडा करी ॥ १० ॥

रचना, एप्रिल. १९१४ **मनोरंजन**, जून १९१५

---

## जान्हवीस्नान

जें चिंतिलें अनुदिनीं बहु अंतरंगीं
गंगे! विमज्जन घडो तुझिया तरंगीं।
तें लाधलें परम भाग्य म्हणोनि धालें
मच्चित्त; पावन शरीर तसेंचि झालें ॥ १ ॥

आकाशमध्यगत भास्कर ताप द्याया
उष्णांशुवृष्टि दिसतो वसला कराया।
मी हिंडुनी वणवणां बहु भागलेला
त्वां खेद दूर परि जान्हवि! सर्व केला ॥ २ ॥

यत्तोय शीत अति वाहतसे जवानें
स्पर्शेंचि ताप मम सर्व लयाप्रती ने।
घेतां बुडी हुडहुडी भरली क्षणांत
उत्साह येउनि परी तनु होय शांत ॥ ३ ॥

कन्या खरीच गमतेस हिमाचलाची
तद्वर्ण धारण करी तव कांति साची।
त्याचीं पदें दिसति येथ सभोंवतालीं
जीं वंद्य आणि बहुमान्य जनास झालीं ॥ ४ ॥

जें बोलती कितिक कीं परलोकभागीं
त्वत्स्नान जे करिति होति सुभाग्यभागी।
तें सत्य कां अनृत तो न विचार मातें
तत्रापि एक कथितों तुज मात, मातें ॥ ५ ॥

होई तुझ्या जलिं विमज्जन ज्या नरातें
त्या तत्क्षणीं अवनि मोदयुता गमे ते ।
होतें प्रसन्न बहु चित्त, तुझ्या जलाचा
त्याच्यावरी सुपरिणामचि होय साचा ॥ ६ ॥

जेथें तुझें अमतसे सुखकारि वारि
सस्यान्विता फलयुता मग भूमि सारी ।
या कारणें सुखखनी जननी तुला गे
मानोनि आर्यजनता चरणासि लागे ॥ ७ ॥

गंगे ! निमज्जन तुझ्या करतां जलांत
संकल्प एकचि असे अजि मन्मनांत ।
नाहीं तुला कठिण तो पुरवावयाला
या कारणें कथितसें जुळुनी कराला ॥ ८ ॥

श्रीमद्भगीरथनृपें बहु उद्यमाला
केले, प्रसाद तव येथ कळावयाला ।
तैसे भगीरथसुयत्न करावयाची
आम्हांसि काय मति देसिल सांग साची ॥ ९ ॥

मी दूर राहत जरी तुजपासुनियां
येईन जान्हवि ! पुनः तुजला नमाया ।
चित्तांतरीं स्मृति परी तव राहुनीयां
देईल संतत सुखानुभवाप्रती या ॥ १० ॥

उद्यान, आगष्ट १९१६.

---

## मान्यवर महर्षे, दादाभाई नौरोजी !

झालीं नव्वद वत्सरें बुधवरा ! दादा तुम्हांला पुरीं
त्यायोगें जनतेस आज सगळया आनंद हो अंतरीं ।
सेवा जी जनकारणार्थ तुमची झाली प्रशंसावहा
तीशीं आज तुलावयास उपमा लोकांत नाहीं पहा ॥ १ ॥

चित्तीं आठवितां चरित्र तुमचें आश्चर्य वाटे अति
स्वार्थत्याग विलोकुनी अतुल तो गुंगून जाई मति ।
केला उद्यम केवढा धनमनें वाणी तशी वेंचिली
कायाही जनतासुखार्थ; कृति जी पुण्यप्रदा मानिली ॥ २ ॥

दारिद्र्यें खचली नितांत अमुची ही आर्यभू माउली ।
त्वां सद्यःस्थिति आंग्लबंधुपुढती ती सर्वथा मांडिली ।
तैसें आंग्लजनांत जी सदयता वा सत्यनिष्ठा वसे
श्रद्धा त्यावरती सदैव धरण्या शिक्षा तुझी बा असे ॥ ३ ॥

राष्ट्राच्या उदयार्थ काय करणें तो मार्ग दावोनियां
त्याचा आक्रम साधण्यांत हरिखें त्वां लाविलें सद्वया ।
गात्रें जोंवर चाललीं, तनुवरी सत्ता असे तोंवरी
केलेंसी जनकार्य—आज अमुच्या येवोनिया अंतरीं ॥ ४ ॥

धांवे चित्त कृतज्ञतामतिभरें वंदावया त्वत्पदा
चालोनी पदवी तुझी खचित ही जाईल कीं आपदा ।
हें आम्हां पटलें म्हणोनि तुजला सांगावया सज्जना
झाली उत्सुक आज आर्यजनता; तीची असे प्रार्थना ॥ ५ ॥

जे जे राष्ट्रहितार्थ यत्न विविध प्रत्यंदिनीं चालले
ते ते मित्रमहन्मणे अखिल बा तूझ्या प्रसादामुळें ।
आशीर्वाद तयावरी सतत हा राहो तुझा बांधवा
सिद्धीची मग अल्पही उरतना आम्हांप्रती वानवा ॥ ६ ॥

दादा ! सागरतीरशांतसदनीं विश्रांति घ्या जी सुखें
आम्हीं कीर्तिसुधा यथेष्ट तुमची वर्णू सदाही मुखें ।
वीचीक्रीडन सागरीय हृदयीं आनंद तुम्हां करो
राष्ट्राच्या तव पुण्यशालि महिमा दुःखांप्रती संहरो ॥ ७ ॥

वीचीक्रीडन सागरीय हृदया आनंद देई जसें
वीचीक्रीडन येथही बुधवरा हें त्वत्प्रसादें असे ।
हिंदीस्तान समुद्र त्यांत सुगुणा चैतन्य ओतोनियां
राष्ट्रप्रेममया अनंत लहरी लावोनि धांवावया ॥ ८ ॥

केला विक्रम जो अजून तुजला होईल त्याची स्मृति
पोहोनी सदनांगणीं धवल त्या वीची यदा खेळती।
जैशा त्या नियमान्विता धवलही तैशीच ही भावना
राष्ट्रप्रेममया, जिला बुधवरा ! त्वां आर्पिलें जीवना ॥ ९ ॥

उद्यान, सप्टेंबर १९१५.

---

## कसलें पुस्तक?

पाहोनी तव सस्मितानन मला आनंद होतों मनीं
बाले, निर्मल मानसें बहुत तूं तल्लीन गे वाचनीं।
नेत्रें हीं ढळतीं मुळीं न अगदीं, एकाग्र दृष्टी दिसे
सांगे सांपडलें तयांत तुजला सौंदर्य भारी असें? ॥ १ ॥

ज्या योगें मुखमंडलीं अनुपमा कांती तुला लाधली।
तीचें कारण, युक्ति वा वद असे ग्रंथांतरीं वर्णिली?
किंवा हास्य सुरम्य हें खुलतसे ज्या हृत्प्रसादामुळें
त्याचें तत्त्व करोनियां पठण या ग्रंथास बाले! कळे? ॥ २ ॥

ज्यामाजीं अथवा नसे तिळभरी शोकास जागा जरा
ऐसा स्वर्ग तयांत काय लिहिला अत्यंत जो साजिरा?।
किंवा योगिजनांस केवळ मिळे आनंद भोगावया
ग्रंथीं या कविनें असे सुखभरें वर्णीयलें कीं तया ॥ ३ ॥

मीही पुष्कळ पुस्तकें घडिघडी वाचीत आहें तरी
तो आनंदमय प्रसाद नुगवे दुर्भाग्य या अंतरीं।
चिंतेची बसली मिठी क्षणभरीं दूरी कराया न ये,
सांगे यास्तव मोदकारण तुझें या पातक्याला सये ॥ ४ ॥

आहे पुस्तक वेगळेंचि अथवा ती वेगळी पद्धति?
जी तूंतें अवलोकनांत असला आनंद दे संप्रति।
किंवा हृत्कमला तुझ्या रुचिरता उत्फुल्लता सर्वदा
हें कांहीं न कळे, कळे न अथवा होईल ठावें कदा ॥ ५ ॥

उद्यान, डिसेंबर १९१६

तुज पाहुनियां हृदयवल्लभा प्रमुदित होइल मनीं
खुडियलें तुज यास्तव उपवनीं ।
कांटे टोंचुनि अशुद्ध आलें भळभळ अंगुलितुनी
निवाली इच्छा मनिंची मनीं।
त्या दिवसापासुनि नाद तुझा सोडुनी ।
निवडितो प्रियेस्तव दुसऱ्या कुसुमांतुनी ।
जे काव्यें गाती कवीश तुज वर्णुनी ।
त्यांविरुद्ध पामर कशास बोलूं ? हंसतिल मजला जनीं
स्तवितों अझुनि म्हणुनि गायनीं ॥ ३ ॥

रचना, मुंबई १५-१-२८ **मनोरंजन**, फेब्रुवारी १९२८

---

# धनुष्कोटीच्या किनाऱ्यावर—

येथें सागर आर्यभूमिचरणा प्रक्षालितो नित्य तो
येथें स्नान करूनि संसृतिभया यात्रेकरी वारितो।
जे प्राचीन ऋषीश्वर प्रतपनें सूर्यापरी शोभले
संचारीं किति त्यांतले कुतुहलें येथें दुरी पातले ॥ १ ॥

येथें श्री रघुनाथ मारुतिसवें आला प्रियान्वेषणीं
येथें त्या कपिसैनिकीं रचियला सेतु त्वरा दावुनी।
जिंकाया परदारलोलुप असा निर्लज्ज लंकेश्वर
येथें सागरबंधना तुडवुनी धांवे पुढें श्रीवर ॥ २ ॥

हा जो शीतळ वायु आज अमुच्या गात्रांस आल्हादवी
त्याची पामर हा कसा क्षम बरें वर्णावया थोरवी।
जी पूज्यांत विशेष पूज्य अमुतें सीतासती माउली
तद्वार्ता तनयाकडोनि बरवी ज्यानें अहो आणिली ॥ ३ ॥

या लाटा करिती निनाद भरती रंध्रांस कर्णांचिया
यांचें कौतुक शक्ति याप्रति नसे तें पूर्ण वर्णावया।
जो गंभीर निघे ध्वनि प्रबल तो आहे यशोदुंदुभी
रामाचा, करुनी पराक्रम जयें नेली दुरी साधु-भी ॥ ४ ॥

आहे आज गमावली स्ववशता या हिंदभूची तिला
आणायास मिळेल राम दुसरा कां सांग, रे सागरा।
या लाटा तुझिया पुनश्च यश तें गातील गंभीर का
या उंचावुनि बाहतील फिरुनि कां जानकीनायका ! ॥ ५ ॥

विलेपार्ले, १३-९-२९ भारतसेवक, ( ठाणें )

## चंद्रिका

तुझी बहुत फांकली रुचिर शीतला ही प्रभा
सुधालहरि या तुझ्या अतुल कांति देती नभा ।
हतद्युति तुझ्यापुढें सकल तारका होति या
प्रकाश कुठला तया, लपति घेति चित्तीं भया ॥ १ ॥

निशा जंववरी असे अखिल कृष्णपक्षांकिता
प्रकाशगुण देखण्या वसुमती मनीं शंकिता ।
असा समय साधुनी मिरविती नभीं चांदण्या
पुढें कितिक काजवे पळति कीर्ति संपादण्या ॥ २ ॥

तुझा उदय जाहला सकल त्या क्षणीं लोपले
तुझा उदय जाहला सकल लोक आनंदले ।
सुधामय सुमूर्ति ही तव गमेचि संजीवनी
नवीन रुचि आणिते बुधजनांचिया जीवनीं ॥ ३ ॥

तुझ्या रुचिर कांतिनें विसरले निशेला जन
तमोभय मनांतलें त्यजिति ते तुला पाहुन ।
प्रकाश जगिं द्यावया असति एक ते काजवे
असें भय मनांतलें तुजसि पाहुनी मालवे ॥ ४ ॥

तुझी मधुरकांति शांतिसुखदा विराजो सदा
सुधांशु तव आमुची करुत दूर ही आपदा ।
न या पुढति धृष्ट फार मिरवोत खद्योतही
करो तव सुधानदींत अवगाहना ही मही ॥ ५ ॥

रचना, विलेपार्लें, ६–४–३२ मनोरंजन, मे

9E33